मराठी गद्याचा पूर्वरंग

संपादक

प्रा. भीमराव कुलकर्णी

मराठी गद्याचा पूर्वरंग

अव्वल इंग्रजींतील
मराठी गद्य-वाङ्मयाचें
प्रातिनिधिक दर्शन

संपादक

प्रा. भीमराव कुलकर्णी

प्रस्तावना

डॉ. रा. शं. वाळिंबे

जोशी आणि लोखंडे प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणें ९.

प्रकाशक :
सु. दे. जोशी व दि. द. लोखंडे
जोशी आणि लोखंडे प्रकाशन,
सदाशिव पेठ, टिळक-रस्ता, पुणें २.

प्रथमावृत्ति : फेब्रुवारी १९६६

मूल्य पांच रुपये

मुद्रक : प्र. भा. काळे
प्रतिभा मुद्रणालय, २०११ सदाशिव पेठ,
टिळक-रस्ता पुणें २.

भूमिका

अव्वल इंग्रजींतील मराठी गद्याचें स्वरूप लक्षांत येण्यासाठीं अशा प्रकारच्या प्रातिनिधिक संग्रहाची अतिशय गरज होती.

कारण मराठी गद्याच्या अभ्यासकांना विष्णुशास्त्रीयुगानंतरचें गद्य-वाङ्मय या ना त्या तऱ्हेनें परिचित असतें आणि त्यापूर्वींच्या लेखनासंबंधानें निवळ इतिहासवजा ग्रंथांतून दिलेल्या अल्पस्वल्प उताऱ्यांवरून, हें गद्य-वाङ्मय पाहण्याची इच्छा झाली, तरी तें सहजासहजी मिळणें फार कठीण असतें. दुर्मिळ आणि दुष्प्राप्य असें हें वाङ्मय परत उपलब्ध करून देण्यामध्यें येणाऱ्या अडचणींची जाणकारांना चांगलीच कल्पना आहे.

'मराठी गद्याचा पूर्वरंग' या नांवावरूनच या संग्रहाचें अधिष्ठान चांगल्या रीतीनें लक्षांत येईल. मराठी गद्याच्या उत्तररंगाची सुरुवात खऱ्या अर्थानें विष्णुशास्त्रींपासून होते. म्हणून विष्णुशास्त्रीपूर्व गद्यलेखन असें ह्या संग्रहाचें साधारण स्वरूप आहे. अर्थातच दादोबा पांडुरंग व बाबा पदमजींची आत्मचरित्रें, गोडसे भटजींच्या आठवणी आणि शेवटचा गुंजीकरांचा लेख इ० महत्त्वाचें लेखन प्रसिद्धीच्या दृष्टीनें विष्णुशास्त्र्यांच्या उदयानंतर अल्पावधींत झालेलें असलें तरी प्रकृतीनें हें सर्व लेखन विष्णुशास्त्रीपूर्वच आहे, त्यामुळें या संग्रहांतील त्यांचा अंतर्भाव अत्यावश्यक होता, हें लक्षांत येईल.

हें सर्व लेखन जुन्या लेखन-प्रणालीनुसार छापलें आहे, कारण शासनानें स्वीकृत केलेल्या नव्या शुद्धलेखन-समितीचाही तसाच आदेश आहे.

मात्र शक्यतों हें सर्व लेखन त्याच्या मूळ स्वरूपांत छापण्याचा प्रयत्न केला आहे. सगळ्याच उताऱ्यांच्या बाबतींत मूळ लेखन शुद्ध स्वरूपांत हातीं लागणें अशक्य असल्यानें त्याबाबतीत तारतम्य ठेविल्याखेरीज गत्यंतर नव्हतें.

डॉ. रा. शं. वाळिंबे यांनीं आमच्या विनंतीनुसार या संग्रहास अत्यंत मौलिक आणि विचारसंपन्न अशी प्रस्तावना लिहून देऊन आम्हांस अतिशय उपकृत केलें आहे.

भीमराव कुलकर्णी

अनुक्रमणिका

● ●

प्रस्तावना

★

मराठी गद्याची परंपरा

बाळशास्त्री जांभेकरांपासून श्री. रा. भि. गुंजीकर यांच्यापर्यंत, म्हणजे १८३०-१८९० या साठ वर्षांच्या कालखंडातील, मराठी गद्य लेखकांच्या लेखनातील उतारे प्रस्तुत संग्रहात घेतलेले आहेत. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, भाऊ महाजन, कृष्णशास्त्री चिपळूणकर, बाबा पदमनजी, गोविंद नारायण माडगावकर, दादोबा पांडुरंग, विष्णुबुवा ब्रह्मचारी, नीळकंठ जनार्दन कीर्तने, काशिनाथ बाळकृष्ण मराठे, गोडसे भटजी आणि रा. भि. गुंजीकर या बारा लेखकांचा यात समावेश केलेला आहे. या यादीकडे वरवर पाहिले तरी आतापर्यंत तयार झालेल्या निबंधसंग्रहांपेक्षा प्रस्तुत संग्रहाचा वेगळेपणा तावडतोब लक्षात येईल.

अर्वाचीन मराठी गद्य वाङ्मयाची सुरुवात केव्हा झाली यासंबंधी विवेचन करताना "डॉ. केरी व पंडित वैजनाथ यांनी अर्वाचीन मराठी गद्य-वाङ्मयाचा पाया घातला." असे प्रा. सरदार यांनी म्हटले आहे.* श्रीरामपूर मिशनच्या विद्यमाने १८१४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'सिंहासन-बत्तिशी' या पुस्तकातील उतारा प्रा. सरदारांनी दिला आहे. अमेरिकन मिशनने १८१७ मध्ये बायबलचे जे मराठी भाषांतर केले त्यातीलही एक उतारा प्रा. सरदारांनी दिला आहे.

---

* अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका, दुसरी आवृत्ती, पृ. ७.

१८१४ मध्ये श्रीरामपूर मिशनने प्रसिद्ध केलेल्या 'सिंहासन-बत्तिशी'तील मराठी भाषेचे स्वरूप अगदीच हेंगाडे आहे. "यके दीवसीं राज्यानें सेवकांस आज्ञा केली तुम्ही कोणते देशाची कशी चरीत्र समझून या. चाकर राजाज्ञा पावून अवघे देशांत् भ्रमण करून् काश्मीर देशांत पावलेत्. त्या देशांत धनवान् यके मनुष्यानें मोट यक तळ केल आहे, परंतु त्यांत् पाणी नसे." मिशनरी 'सिंहासन-बत्तिशी' वैजनाथ पंडिताच्या मदतीने सिद्ध झाली असली तरी त्या मराठीचे स्वरूप हे असे आहे. १८२४ मध्ये मुंबईमध्ये 'सिंहासन-बत्तिशी'चे जे भाषांतर प्रसिद्ध झाले त्यातील मराठी यापेक्षा पुष्कळच बरे उतरले आहे. पण एकंदरीत रांगडे-पणाच विशेष दिसतो.

सदाशिव काशिनाथ छत्रे यांनी इंग्रजीवरून मराठीमध्ये १८२८ मध्ये 'बाळमित्र' या नावाने तर्जुमा केला. या भाषांतरातील एक नमुना देतो. "ती उगीच खालचे मानेने वाट पाहात होती कीं, बाप काय पारिपत्य बोलतो ते ऐकावें. तों तो तिला कठोर वाणीनें बोलला.—'पोरी, त्वां आपले आईबापांस ठकविलें; जी तुला जिवापलिकडे लेखते, आणि त्वां सुखी असावें असें जी निरंतर इच्छिते, अशे आईचें ऐकूं नये, आणि त्या दुष्ट कुळंबिणीचें ऐकावें, अशी तुझी वासना कशी झाली!" (तिसरी आवृत्ती, १८५७, पृ. २३८).

गेल्या शतकाच्या पूर्वार्धात निर्माण झालेल्या गद्य मराठी वाङ्मयाविषयी दादोबा पांडुरंग यांनी आपल्या 'मराठी भाषेचें व्याकरण' या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या (सन १८५०) प्रस्तावनेत पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे. "या देशांत पूर्वीपासून पद्यात्मक ग्रंथ लिहिण्याची चाल होती; सरकारी कामकाजा-शिवाय गद्यात्मक लेख लिहिण्याची चाल अगदीं नव्हती. मराठ्यांच्या अमलांत मात्र कोणीं कोणीं बखरा लिहून ही चाल नुकतीच पाडिली होती; परंतु तिचा प्रचार फारच थोडा, तेव्हां ती होती नव्हती सारिखीच म्हटल्यासही चिंता नाहीं. महाराष्ट्र भाषेंत शुद्ध रीतीनें वाक्ययोजना करून रसभरित असे पहिले ग्रंथ सदाशिव काशीनाथ छत्र्ये यांणीं रचिले; म्हणोन यांस गद्यात्मक ग्रंथांचे जनक म्हटल्यासही साजेल."

इंग्रजी अमदानीच्या सुरवातीला 'महाराष्ट्रातील नवशिक्षित तरुण इंग्रजी भाषेची वाङ्मयसंपत्ती पाहून दिपून गेले,' इंग्रजीची मदत घेतल्याशिवाय मराठीला तरणोपाय नाही असे त्यांना वाटले, आणि मराठीचे 'वाङ्मयीन दारिद्र्य' दूर करण्यासाठी इंग्रजी ग्रंथांच्या आधाराने मराठीत ग्रंथरचना

करण्याचा त्यांनी निर्धार केला, अशा आशयाचे विवेचन प्रा. सरदार यांनीही केले आहे.*

इंग्रजी वाङ्मयाच्या धाटणीवर मराठी गद्याची पुनर्घटना करताना त्यांनी प्राचीन पद्यग्रंथांचा काळजीपूर्वक अभ्यास केला नाही, एवढीच प्रा. सरदारांची तक्रार आहे. म्हणजे या नवीन गद्य लेखकांना पूर्वीच्या गद्यवाङ्मयाच्या परंपरेचा आधार मिळाला नाही, असे दादोबा पांडुरंग यांच्याप्रमाणेच प्रा. सरदार यांनाही वाटत आहे.

बखरी लिहून ही गद्यलेखनाची चाल काही लोकांनी 'नुकतीच' पाडली होती, पण या चालीचा फारच थोडा प्रसार झाल्यामुळे तिचा विचार करण्याचे कारण नाही असे दादोबांनी म्हटले आहे.

* * *

गेल्या शतकाच्या सुरवातीला मुद्रण-कलेची सोय आपल्याकडे अगदीच बेताची असल्यामुळे (किंवा जवळ जवळ नसल्यामुळे) बखरींचा सार्वत्रिक प्रसार होणे अशक्य होते हे खरे आहे. परंतु पद्य-वाङ्मयाच्या बाबतीतही हीच परिस्थिती नव्हती का ? जाणत्या बुद्धिमान लोकांना पद्य-ग्रंथ जसे उपलब्ध होते, तसेच बखरींसारखे गद्य-ग्रंथही निश्चित उपलब्ध असले पाहिजेत. दुसरे असे की, सन १८५४ मध्ये लिहिलेली 'शेडगांवकर बखर' ही शेवटची बखर मानली तर यापूर्वीच्या सुमारे दीडशे वर्षांच्या काळात लिहिल्या गेलेल्या बखरींची संख्या क्षुद्र खास नाही. नुसत्या संख्येचा विचार सोडून दिला तरी वाङ्मयीन गुणांच्या दृष्टीने या बखरींपैकी बऱ्याच बखरी फार वरच्या प्रतीच्या आहेत हे मान्य करावयास पाहिजे. खुद्द शिवाजीमहाराजांसंबंधी एकूण आठ बखरी उपलब्ध आहेत. त्यांच्यापैकी 'शेडगांवकर बखर' पुष्कळच अलीकडची (सन १८५४) म्हणून सोडून दिली तरी छत्रे यांच्या 'बाळमित्रा'च्या (सन १८२८) आसपास म्हणजे १८२९ साली 'शिवप्रताप' ही बखर लिहिली गेली. पेशवाईचा अन्त झाला त्याच साली (१८१८) 'शिवदिग्विजय' ही बखर तयार झाली. १८१७ साली 'मराठी साम्राज्याची छोटी बखर' सिद्ध झाली. १८१० मध्ये मल्हारराव रामराव चिटणीस यांचे 'सप्तप्रकरणात्मक चरित्र' तयार झाले. म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या तीस वर्षांमध्ये केवळ शिवाजीमहाराजांसंबंधी चार बखरी लिहिल्या गेल्या. सभासदी बखर सन १६९७, चित्रगुप्ताची बखर १७५९, ९१ कलमी बखर १७८०, अशा आणखी तीन बखरी शिवाजी महाराजांसंबंधी आहेत.

---

*. अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका (दुसरी आवृत्ती), पृ. १४.

या बखरींच्या गद्य शैलीचे विवेचन करणे आवश्यक आहे. १८३६ मध्ये तयार झालेल्या दादोबांच्या व्याकरणाच्या दृष्टीने या शैलीमध्ये काही दोष असले तरी कोणतीही भावना किंवा कोणताही विचार अतिशय प्रभावीपणाने व्यक्त करण्याचे सामर्थ्य तिच्यात खासच आहे. यथातथ्य वर्णन करण्याचेही सामर्थ्य तिच्यात आहे. 'सभासदी बखरी'तील पुढील लहानसा उतारा पाहा--" त्यास दुसरे दिवशीं राजियास वर्तमान कळलें कीं, व्यंकाजी राजे पळून गेले. त्याजवरून आश्चर्य केलें कीं, 'काय निमित्य पळाले? आम्ही त्यांस धरीत होतों कीं काय? आम्हांस बिरदें काय करावयाचीं? आमचीं बिरदें अष्ट दिशेस लागलीं आहेत. समुद्रवलयांकित भूमंडळीं कीर्त आपली जाली आहे. तेथें बिरदें काय करावयाचीं? वडलांची वस्त असावी म्हणून मागितली होती. पळावयाचें नव्हतें. द्यावयाचीं नव्हतीं तरी न देणें. उगेच उठोन पळून गेले. अति धाकटे ते धाकटे, बुद्धिहि धाकटेपणा योग्य केली.' असें बोलिले." १८१८ मधील 'शिवदिग्विजय' ही बखर तर शैलीचा एक उत्कृष्ट नमुना आहे. फार समर्थ आहे ही शैली. एक उतारा पाहा. " खान विजापुरीं ज्या समयीं होते, त्या काळीं शिवाजीमहाराजांनीं मोंगल, तुरुक लोकांचा पराभव केला. ते लोक धण्याजवळ आले, हकीकत सांगूं लागले, म्हणजे त्या लोकांशीं हसावें आणि हजरतीजवळ कित्येक प्रकारें बोलावें. 'लढाईचे मायने जाणत नाहींत. मराठे लोक म्हणजे बाजरीचा कडबा सुकला, दिसावयास हिरवा सरळ बारीक जसा तसे. हे लोक अंगावर चिरगूट नाहीं, घोडे कसे धरावे जाणत नाहींत. मग हत्यार लावणें, धरणें, त्यांस माहीत काय? मुसलमान लोक सर्व गोष्टी निपुण, जाणते, बेवकूब, गाफील, भिजाजींत राहून खराबी करून घेतली. रडत आले. मरावें परंतु धण्यास तोंड दाखवून, जन्मवरी अन्न खाऊन धण्याचें कामीं वक्तशीर माणूस नाहीं, तरी तें माणूस बाळगून फलादेश काय? शिपाई म्हणवितात, हजारों जनावरें गमावून, ठाणीं देऊन सांगत आले. यास लाज कशी वाटली नाहीं?' अशी कित्येक विक्रिया करून, बोलत असावें. त्यांणीं खजील व्हावें, तरी आपणांकडून लाचारी जाली, जबरी दाखवावी, तरी प्राणानिशीं जावें. त्या भयेंकरून आल्यामुळें धण्यांनीं उमेदवारीस चढवून, काम सांगोन साभिलात देऊन, हुषारी आणावी " आणखी एक उतारा देण्याचा मोह आवरत नाही. " तों एके दिवशीं बहिरजीराजे मोहिते यांस जमीनदारांनीं विनंती केली कीं, 'आपण दौलतदार खावंद आहांत; परंतु आपणांजवळ आम्हीं आहों. फार दिवस राहिलों हें कळलें असतां आमची रांडापोरें ढाणकास देऊन, अबरू घेईल. मग आपलेजवळ राहिल्याचें सार्थक काय? तुम्ही म्हणाला 'आम्हीं तुम्हांस बोलवूं कोठें पाठविलें?' ऐशियास मधुकर अरण्यांत स्वेच्छेकरून विहार करितो, परंतु वायूच्या योगें सुगंध आला

म्हणजे तें स्थान सोडून सुगंधाकडे जसा जातो, तसे तुम्ही हिंदुधर्मांचे स्थापक, या म्लेंच्छांचे नाशक, म्हणून तुम्हांकडे आलों. या गोष्टीचें ब्रीद तुम्हीं सोडिल्यास ईश्वरी क्षोभ म्हणून जीव देऊं. ”

वरील उतारा १८१८ साली लिहिलेल्या बखरीतील आहे. त्यातील भाषा-शैलीची तुलना श्रीरामपूर मिशनने १८१४ साली प्रसिद्ध केलेल्या ‘ सिंहासन-बत्तिशी ’च्या भाषांतराशी अवश्य करून पाहावी. बखरीतील भाषा कितीतरी प्रौढ, सुश्लिष्ट, आणि अर्थवाहक आहे हे ताबडतोब दिसून येईल. मल्हारराव रामराव चिटणिसांनी सन १८१०–११ मध्यें शिवाजी महाराजांपासून धाकट्या शाहू महाराजांपर्यंत सर्व राजांची चरित्रे लिहिली. या सर्व बखरींमधील चिटणि-सांची भाषा बहुतांशी प्रगल्भ आणि कमावलेली आहे. वाक्यरचना देखील सामान्यतः रेखीव आहे. ‘ संभाजी राजे यांचे चरित्र ’ या बखरीतील एक आढळला तो उतारा उदाहरण म्हणून देतो. “ एक कवजी सांगतील तें प्रमाण. दैवयोगें करून होणार काल प्राप्त झाला. त्यायोगें दुसरें सुचूं नये याप्रमाणें जालें. मातबर व बुद्धिवंत व शूर होते ते हतवीर्य जाले. महाराजांनीं नूतन पराक्रम करावा, नवें राज्यसाधन करावें, हें राहिलें नाहीं. सुभेदार प्रांतांतील वगैरे, तसेंच गडकिल्ले यांचे कारभारी, यांजवरि हा कारभारांत खातो म्हणून चुगली करितांच त्याचा विचार न करितां त्यास आणावा, मारावा, नागवावा. अंतरच्च असलिया शिरच्छेद करावा. या भयेंकरून मातबर चार होते ते कोण्ही जवळ बोलूं न पावत. त्यांस आपली आपलीच अबरू प्रतिष्ठा जतन होणें हेंच येऊन पडलें. एक कवजीचें सांगणें मात्र प्रमाण. त्या नादें महाराज चालणार. त्यासच अनुमोदन देणें. मग विचार काय राहिला? तजकरे घ्यावें, घरें बुडवावीं, नागवावें. माणूस राज्यांत वाढले ते कांहीं परराज्यांतून आणून वाढविले ऐसें घडत नाहीं. ”

* * *

१८१० ते १८३० या काळात लिहिल्या गेलेल्या बखरींमधील उतारे आतापर्यंत दिले. या काळाच्या पूर्वी अठराव्या शतकात लिहिलेल्या काही बखरींची भाषा निःसंशय मनोवेधक आहे. ‘ भाऊसाहेबांची बखर ’ ही एकच बखर या-साठी पाहिली तरी चालेल. या बखरीतील भाषा अतिशय प्रौढ आणि प्रभावी आहे. कोणत्याही प्रसंगातील उत्कट नाट्य परिणामकारक रीतीने व्यक्त करू शकणारी समर्थ भाषा या बखरीत इतस्ततः विखुरलेली आहे. परिणामकारक भावनाविष्कार अगदी सहज करू शकणारी ही भाषा आहे. ती कोणत्याही घटनेचे अगदी सूक्ष्म व मार्मिक वर्णन करू शकते. अन्वर्थक सुभाषितांची व म्हणींची या बखरीत मधून मधून जी पेरणी झाली आहे ती अत्यंत आकर्षक आहे. प्रस्तुत बखरीतील आकर्षक

भाषाशैलीचे नमुने किती म्हणून द्यावे ? पुढील उतारा पहावा. " ते समयीं मोठा प्रलय जाला......अंगावरील वस्त्रें कोणी ठेवीनात. असे पळूं लागले. तों पालखीजवळ दोघीजवळ दोघी बायका होत्या. पालखींत जखमी जनकोजी शिंदे होते. भोई घाबरे होऊन पालखी टाकावयाचे विचारांत आले. ते समयीं जनकोजी शिंदे यांस नेटें पालखी चालली तर यातना सोसेना. ते वक्तीं भागीरथीबाई यांनीं भोई यांची प्रार्थना केली कीं, ' बत्तीस भुई तुम्ही आहां ! तुम्हांवर घाव पडे तोंवर पालखी न टाकावी. दर असामीस शेर शेर सोन्याचें कडें देईन. ' या प्रकारें हिंमत दिली. तों पळायाची फारच गडबड जाली. जिवाचे धास्तीनें बावन्न बिरदांचे धणी, भले सरदार, घोडे सोडून जीव जगविण्याकरितां पाहाडांत शिरले ! ' जीव द्यावा त्यापेक्षां जितरब गेलें तरी उत्तम, ' म्हणोन घोडीं सोडिलीं. रांडपोरें घोडीं धरूं लागलीं. ते समयीं भागीरथीबाई यांनीं जनकोजी शिंदे यांस सांगितलें कीं, ' बाबा, मजला आतां घोडियावर बसून पळावयाची निभावणी पडत नाहीं. तुम्हीं झाडून पुढें चालावें. माझे समागमें जिव्हाळियाचा मनुष्य असेल तो द्यावा. गिलचा दृष्टीस पडे तों पावेतों मजला रक्षावें. निदान दृष्टीस पडून निभावणी दिसे-नाशी जाहाली म्हणजे माझे दोन तुकडे करावे ' असें बोललियावर ......"
केवढी समृद्ध व प्रभावी भाषा आहे ही ! ही सर्वच बखर असल्या परिणामकारक भाषाशैलीने परिपूर्ण आहे. कोणतीही भावना किंवा कोणताही विचार बखरकार अगदी सहज प्रभावीपणे व्यक्त करू शकतो. तो कुठेही अडत नाही. समृद्ध गद्य लेखनशैलीचा हा उत्कृष्ट नमुना श्रीरामपूरचे मिशनरी मराठी लिहू लागले त्याच्या पूर्वी सुमारें पन्नास वर्षे तयार झाला होता, हें ध्यानात ठेवणे जरूर आहे.

' होळकरांची कैफियत ' या उत्तरकालीन बखरीतही उत्कृष्ट प्रभावी गद्यशैलीची वाटेल तेवढी उदाहरणे आढळतील. वाक्यरचना बहुतांशी शुद्ध आहे. शब्दयोजना अगदी अचूक आहे. प्रसंग जसाच्या तसा वाचकाच्या डोळ्यांसमोर उभा करण्याचे सामर्थ्य या भाषेत आहे. मलकाजमानीचा वृत्तान्त यासाठी पाहावा. तसेच सुरजमल जाटाचा वृत्तान्तही पाहावा. अशी आणखी किती तरी उदाहरणे देता येतील.

तात्पर्य, १७५० ते १८३० या ऐंशी वर्षांच्या काळात लिहिल्या गेलेल्या बखरींपैकी पुष्कळ बखरींमधील भाषेचे स्वरूप खूपच प्रगल्भ दिसते. अर्थव्यक्तीचे भरपूर सामर्थ्य तिच्यात दिसून येते. तिच्यात नाट्यात्मकता सुद्धा आढळते. भावनाविष्काराचे तिचे सामर्थ्य वरच्या प्रतीचे आहे. इंग्रजी विद्येचे आगमन महाराष्ट्रात होण्यापूर्वी, आणि इंग्रजी वाङ्मयाचे अनुकरण करून मराठी गद्य लिहिण्याची प्रवृत्ती सुरू होण्यापूर्वी, बखरींमधील हे संपन्न गद्य निर्माण झाले होते.

* * *

बखरींमधील गद्याखेरीज दुसऱ्याही गद्यलेखनाचा विचार करणे जरूर आहे. मागच्या काळातील राजकारणी पत्रांतील गद्य-भाषा अनेक वेळा पुष्कळच प्रौढ व प्रभावी असते असे दिसून येईल. नागपूरकर भोसल्यांची पत्रे कै. प्रो. शेजवलकर यांनी छापली आहेत. अठराव्या शतकाच्या शेवटच्या वीस वर्षांच्या कालखंडातील या पत्रांमधील भाषा १८२८ मधील सदाशिव काशिनाथ छत्रे यांच्या 'बाळमित्रा'तील भाषेपेक्षा अधिक चांगली आहे. पत्र लिहिणाऱ्या माणसाचे धोरण पुस्तक लिहिणाऱ्या माणसाच्या धोरणापेक्षा पुष्कळच वेगळे असते हेही ध्यानात ठेवले पाहिजे. १७५० पासून १७६१ पर्यंतच्या काळातील जी राजकारणी पत्रे कै. वि. का. राजवाडे यांनी छापली आहेत त्यांपैकी कित्येक पत्रांमध्ये भाषेचे मोठे मनोवेधक स्वरूप दृष्टीस पडते. सदाशिवराव भाऊंनी गोविंदपंत बुंदेल्याला लिहिलेली पत्रे या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. लढाईच्या ऐन धामधुमीत लिहिलेली ही पत्रे आहेत, हे ध्यानात घेतले असता त्यांच्यातील लेखनशैलीची स्पृहणीयता वाढल्यावाचून राहणार नाही. दुसरे असे की, आपल्या लेखनात कलात्मकता यावयास पाहिजे हा हेतु मनात ठेवून ही पत्रे लिहिलेली नाहीत. मनातील भावनांचा तो सहजोद्रेक आहे. ११ जून १७६० च्या पत्रातील पुढील वाक्ये पाहा. "परंतु कांहींच ऐवज आला नाहीं. मसलतीचे दिवस, फौजेस पोटास द्यावें लागतें. सर्व तुम्हांस ठाऊक आहे तुम्ही मातबर सामलेदार बहुत दिवस या प्रांतास माहीत. सावकारीमध्यें पत उत्तम प्रकारची. या समयांत तुम्हीं हरप्रयत्नेंकरून जो ऐवज लागेल तो मेळवून द्यावा. असें असतां कांहींच तरतूद न जाली. अपूर्व आहे!" किती रसरसलेली भाषा आहे ही! १० जुलै १७६० च्या पत्रातील पुढील वाक्ये पाहा." तुमचे पदरीं मामला केवढा! तुम्हांपासून रुपया येणें किती! आणि कांहींच येत नाहीं. येथें खर्चाची निकड. हें कांहींच मनांत नाहीं. अपूर्व आहे! मागें कांहीं नव्हतें त्या दिवसांत कशी चाकरी केलीत! कसें बरें म्हणोन धेऊन या पद्धतीस आलां! आतां तरी खावंदाचे इतबारी, मातबर, मामलत पदरीं, पत चांगली, जर दंगा फार जाला तर एके सालचा ऐवज सरकारांत कर्जदाखल मेळवून द्यावा परंतु सरकारचें काम अडूं न द्यावें! हे योग्यता असतां तपशील लिहितां हें याउपरि न करणें."

याच्याही पूर्वी पंचवीस वर्षे १७३४ साली बाजीराव पेशव्याने अन्ताजी रघुनाथ यास लिहिलेल्या पत्रातील भाषेचा थोडा नमुना देतो. "ज्याचे तेच होऊन कार्यभाग करावयास सिद्ध आहेत, परंतु द्वितीय दिवशीं स्वामींनीं पदात सैन्याचें साहित्य येऊन पोंहचेसें केलें. यांनीं स्वामींचें ध्वजारोहण होतें. सैन्य पाठविणें तें अगोदर 'र'कार ग्रामीं पाठवावें. म्हणजे नेमिल्यानियमाप्रमाणें

कार्यभाग सिद्धीस पावेल, म्हणोन कित्येक तपशील लिहिले. ते लोक आले, ऐशियास तुम्हीं लिहिला मनसुबा बहुत उत्तम आहे. परंतु याचा विचार बहुत चौकशीनें करणें तो आधीं करून जेथील तेथें ठाकठीक करून रवानगी करावी लागते. तरी तुम्हीं बहुत बहुत जलदीनें हुजूर येणें. एक पळाचाही विलंब न लावितां येणें. विचार करून टांकोटांक तेच क्षणीं तुमची रवानगी करून एक घडी तुम्हांस ठेवणार नाहीं. तरी बहुत बहुत त्वरेनें येणें. जाणिजे. ”

सभासदी बखर १६९७ सालची आहे. सदाशिव काशिनाथ छत्रे यांच्या 'बाळमित्रा'च्या पूर्वी एकशेतीस वर्षे ही बखर लिहिली गेली. या बखरीतील भाषेचा एक नमुना पाहा. “ आठ महिने परमुलखांत स्वारी करावी. वैशाख मासीं परतोन छावणीस येतांच आपले मुलखाचे सरदेस कुल लष्कराचा झाडा घ्यावा. पूर्वील विशादीचे जाबते रुजू घालावे. ज्याजती होईल तितकी किंमत करून त्याच्या हक्कांत धरावी. थोर किंमतीची वस्तभाव असलियास दिवाणांत द्यावी. कोणी चोरून ठेवील आणि दाखल सरदारांस जाहलियानें शासन करावें. लष्कर छावणीस आलियावर हिशेब करून सोनें, रुपें, जडजवाहीर व कापड वस्तभाव कुल सरदारांनीं बराबर घेऊन राजाचे दर्शनास जावें. तेथें अवघे हिशेब समजावून माल हुजूर द्यावा आणि लष्कराच्या लोकांचे हिशेब देणें, [व] फाजील समजावीस जो ऐवज जो मागणें तो हुजूर मागावा. मग छावणीस यावें. काम कष्ट मशागत केलिया लोकांस सरंजाम करून द्यावा. ”

१८१४ साली प्रसिद्ध झालेल्या मिशनेरी ' सिंहासन बत्तिशी 'तील मराठी गद्याचे स्वरूप, किंबहुना १८२८ मधील छत्रे यांच्या ' बाळमित्रा 'तील मराठी गद्याचे स्वरूप पाहिले तर १६९७ मध्ये लिहिलेल्या सभासदी बखरीतील गद्य कितीतरी अधिक प्रौढ आणि डौलदार वाटते हे कबूल करावे लागते.

सन १८१७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या बायबलच्या मराठी भाषांतरातील एक उतारा प्रा० सरदार यांना दिला आहे. तो पुढीलप्रमाणे– “ माझें जोकड घ्या आणि मजपासीं शिका कां तर अंतःकरणामध्यें मी नम्र आणि लीन आहें आणि तुम्ही आपलें मनामध्यें विसांवा पावाल ॥ यास्तव कीं माझें जोकड सोपें आणि माझें वोझें हलकें आहे ॥ ”

शिवराम पूर्णानंदांची ' भगवद्‌गीताचंद्रिका ' सन १६८३ मध्ये लिहिली गेली. मिशनेरी मराठी गद्याचा जो नमुना वर दिला आहे त्याच्याशी १६८३ मधील (म्हणजे १३४ वर्षांपूर्वीच्या) गद्याच्या पुढील नमुन्याची तुलना करून

पाहावी. ' गीताचंद्रिके ' तील गद्याचा नमुना–" योगमाया पडळ मध्यें आलिया, जण आंधळे हे केवि पहाती मज अव्यया मोह दृष्टींनें ? ॥ येऱ्हवी, मी सुलभ सकळा सर्व तो सर्वत्र व्यापक. काय करूं या मूढ लोका ? कदापी मज नेणें ॥ "

१६८३ मधील ' गीताचंद्रिके'चे मराठी गद्य १८१४ मधील वैजनाथ पंडिताच्या मदतीनें तयार झालेल्या श्रीरामपुरी ' सिंहासनबत्तिशी ' तील गद्या-पेक्षा किती तरी अधिक सरस उतरले आहे. मग मिशनरी बांयबंलाच्या मराठी-पेक्षा ते सरस असल्यास त्यात नवल नाही.

*　　　*　　　*

श्रीरामपुरी मराठी गद्य (म्हणजे १८१४ च्या ' सिंहासन-बत्तिशी ' तील गद्य) ही मराठी गद्याची सुरवात होय असे मानणे किती प्रामादिक आहे हे सिद्ध करण्यासाठीच १६८३ ते १८२९ या सुमारे दीडशे वर्षांच्या कालखंडातील अनेक उतारे वर दिले. तसेच " सरकारी कामकाजाशिवांय गद्यात्मक लेख लिहिण्याची चाल अगदीं नव्हती. मराठ्यांच्या अमलांत मात्र कोणीं कोणीं बखरा लिहून ही चाल नुकतीच पाडली होती, परंतु तिचा प्रचार फारच थोडा, तेव्हां ती होती नव्हती सारिखीच म्हटल्यासही चिंता नाहीं. महाराष्ट्र भाषेंत शुद्ध रीतीनें वाक्ययोजना करून सरभरित असे पहिले ग्रंथ सदाशिव काशिनाथ छत्र्ये यांणीं रचिले; म्हणोन यांस गद्यात्मक ग्रंथांचे जनक म्हटल्यासही साजेल " या दादोबा पांडुरंगांच्या विधानातील निष्काळजीपणा स्पष्ट करावा हाही हेतू वरील उतारे देण्यामध्ये आहे.

मराठी गद्याची परंपरा प्रा. सरदार मानतात त्याप्रमाणे, किंवा दादोबा पांडुरंग मानतात त्याप्रमाणे, एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी (म्हणजे १८१४, पासून किंवा फार तर १८२८ पासून) सुरू झाली असे नसून अगदी लौकिक स्वरूपाचे व्यावहारिक गद्य १६९७ मधील सभासदी बखरीपासून विपुल प्रमा-णात आढळते. पण लौकिक स्वरूपाच्या व्यावहारिक गद्याचे अस्तित्व याच्याही पूर्वी २५० वर्षें होते हे कै. राजवाडे यांनी संपादिलेल्या ' महिकावतीची बखर ' या बखरीवरून बिनतोड सिद्ध करता येईल. सदर बखरीतील सन १४४८ या सालच्या गद्य प्रकरणातील भाषेचा एक नमुना देतो. " भागडचुरि घायाळ होतां आदळाआदळ जाली ॥ आरोळी फुटली ॥ त्याच वेगेसा जण अंगलग भागडचुऱ्यास घेवोन निघाले ॥ ते समिल म्हातऱ्यान देखिलें ॥ मग पाठि लागले॥ तवं भागडचुऱ्यासहित काररडाह्या पावले ॥ उड्या डाह्यांत घातल्या ॥ तवं

सीमल म्हातरा तो हि पावला ॥ तवं हे अंतरले ॥ तेधवां त्या डाह्यांत तारु होते ॥ त्या तांडलास सीमल म्हातऱ्यान हडकिलें ॥ जर तो निळे पगडीचा भागडचुरी मारिसिल तर जें तुं मागसिल तें देईन ॥ आइकोन तांडेल बोलिला जर आपली कन्या देसिल व जातित घेसिल तर मारिन ॥ '' याच्याही पूर्वीचा सन १४०२ चा गद्य-लेख सदर बखरीमध्ये आढळेल.

महानुभाव पंथातील आचार्यांनी लिहिलेले ग्रंथ हे धार्मिक स्वरूपाचे पंथीय गद्य म्हणून सोडून दिले तरी अगदी लौकिक स्वरूपाचे व्यावहारिक गद्य थेट पंधराव्या शतकाच्या अगदी सुरवातीपासून उपलब्ध आहे. महिकावतीच्या बखरीतील १४४८ चे मराठी गद्य एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीला लिहिलेल्या मिशनेरी गद्यापेक्षा निश्चित वरच्या दर्जाचे आहे. इतकेच नाही तर इंग्रजी मजकुराचे भाषांतर करणाऱ्या आपल्याकडील लेखकांच्या भाषेची प्रगल्भता यापेक्षा विशेष नाही, हे १८३० पर्यंतच्या मराठी गद्य-लेखनावरून दिसून येईल.

बहुतेक बखरींमधील वाक्ययोजना बहुतांशी शुद्ध आहे असे दिसून येईल. विशिष्ट कालखंडांत भाषेच्या विशिष्ट लकबी असतात हे विसरता यावयाचे नाही. आता काही बखरी अतिशय अशुद्ध आहेत हे खरे आहे. उदाहरणार्थ सन १७८० मधील ९१ कलमी बखर. पण याबाबतीत एक धोरण नित्य सांभाळावयाचे असते. विशिष्ट कालखंडात भाषेचे जे सर्वांत प्रगल्भ व प्रौढ स्वरूप असते ते प्रमाण मानावयाचे असते. अप्रौढ व अशुद्ध स्वरूपाकडे दुर्लक्ष करावयाचे असते. चिटणीस घराण्यातील लेखकांनी लिहिलेल्या सर्वच बखरी गद्य भाषेच्या प्रौढपणाच्या, परिणामकारकतेच्या, व शुद्ध वाक्ययोजनेच्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. 'भाऊ-साहेबांची बखर' आणि 'होळकरांची कैफियत' या बखरींचाही उल्लेख या संदर्भात अवश्य करावयास हवा.

गेल्या शतकाच्या सुरवातीला मिशनरी लोक मोडकेतोडके, अशुद्ध व बाटगे मराठी गद्य लिहीत असता आणि सदाशिव काशिनाथ छत्रे यांच्यासारखे महाराष्ट्रीय लेखक इंग्रजी पुस्तकांचे मराठीत तर्जुमे करीत असता, बखरकारांची परंपरा खंडित झालेली नव्हती या गोष्टीची पुन्हा आठवण करून देतो. मल्हारराव रामराव चिटणिसांच्या बखरी १८१०–११ या काळातील आहेत. 'मराठी साम्राज्याची छोटी बखर' १८१७ मधील आहे. 'शिवदिग्विजय' १८१८ सालचा आहे. 'शिवप्रताप' १८२९ सालचा आहे. 'हरिवंशाची बखर' १८४२ मधील असून 'शेडगांवकर बखर' १८५४ मधील आहे. याचा अर्थ

असा की, १६९७ पासून १८५४ पर्यंत सुमारे एकशे साठ वर्षे प्रौढ मराठी गद्याची जुनी अस्सल परंपरा अविच्छिन्न चालू होती आणि या परंपरेमध्ये रस-प्रकर्ष साधणाऱ्या, भावनाविष्कार करणाऱ्या, परिणामकारक व्यक्तिचित्रे रेखाट-णाऱ्या, व्यवहारातील सुभाषितांचा व म्हणींचा कुशलतेने वापर करणाऱ्या, यथातथ्य सूक्ष्म वर्णन करणाऱ्या किंबहुना नाट्यात्मक उत्कटता साधणाऱ्या, प्रभावी भाषेचा आविष्कार अनेक ठिकाणी झालेला आढळून येईल. वाक्य-रचनेच्या दृष्टीने सुद्धा या भाषेमध्ये आक्षेप घेण्यासारखी ठिकाणे शुद्ध वाक्य-रचनेच्या तुलनेनं अल्पच आहेत. शुद्ध वाक्यरचना करून रसभरित गद्य-ग्रंथ छत्रे यांनीच प्रथम रचले हे दादोबा पांडुरंगांचे विधान गतार्थ झाले असे समजावे.

* * *

बखरींमधील मराठी गद्याची धाटणी रसरसलेली व अगदी जिवंत आहे. मराठी भाषेत शब्दसंग्रह थोडा असून, 'तिची बोलावयाची शैली प्रौढ नव्हे' असे छत्रे यांनी 'बाळमित्रा'च्या प्रस्तावनेत म्हटले आहे. चांगल्या बखरी छत्रे यांनी पाहिल्या नसाव्यात हें उघड आहे. 'भाऊसाहेबांची बखर' किंवा 'शिवदिग्विजय' यांच्यापैकी एखाद्या बखरीचे वाचन त्यांनी केले असते तर असे विधान त्यांनी केलेच नसते. त्यांच्या 'बाळमित्रा'तील भाषेपेक्षा वरील बखरींची शैली कितीतरी पटींनी अधिक प्रौढ आहे हे सिद्ध करण्याचीही जरूरी नाही. इंग्रजीचे मराठीत भाषांतर करीत असल्यामुळे वाक्यरचनेच्या खास इंग्रजी लकबी मात्र छत्रे यांनी मराठीत आणल्या, आणि पूर्वीची सोज्वळ मराठी गद्य भाषा बाटविली. उदाहरणार्थ, "धाकटी मुलगी जी कुळंबिणीनें ठकविली" हे 'बाळमित्रा'तील एका गोष्टीचे शीर्षक पाहा. बखरीमधील भाषेतले रसरसलेले चैतन्य साऱ्या 'बाळमित्रा'त कोठेही आढळत नाही. सारे काही बेचव व निर्जीव वाटते. बखरींमधील प्रभावी गद्याच्या परंपरेचा आधार छत्रे यांना मिळाला नाही म्हणूनच असे झाले. इंग्रजीचे भाषांतर करण्याची धडपड या आपत्तीच्या मुळाशी होती यात शंकाच नाहीं. या धडपडीमुळेच "त्र्यंबकशेटीनें आपल्याजवळचे पैशांचा एक चांगला तारांचा एक पिंजरा आणविला, ज्याला खाली खण होते, आणि ज्यांत पाणी घालावयाचें बिलोरी भांडें होतें." अशी घेडगुजरी वाक्यरचना पैदा झाली. दर्जेदार बखरी वाचल्यानंतर 'बाळमित्र' वाचणे म्हणजे हापूसचा आंबा खाल्ल्यावर चुरमुऱ्याच्या फाका मारण्यासारखेच बेचव होय.

ग्रँट डफूने 'हिस्टरी ऑफ् द मराठाज्' या नावाने जो इंग्रजी ग्रंथ लिहिला होता त्याचे मराठी भाषांतर १८२९ साली कॅप्टन डेव्हिड केपन याने केले.

केशव सखाराम शास्त्री यांनी हे भाषांतर तपासले. या भाषांतराची भाषा 'बाळमित्रा'तील भाषेच्या मानाने अधिक प्रौढ व आकर्षक आहे. इंग्रजीचे हे भाषांतर आहे असे वाटू नये इतकी भाषेची सफाई या ग्रंथात आढळेल. एक नमुना येथे देतो. " इतक्यांत तानाजी मालुसरा पडला, तेव्हां मावळे लोक जिकडे दोरीची शिडी होती तिकडे पळून गेले. ते त्या भिंतीशी जाऊन पोंहोचतात तों सूर्याजी मालुसरा तानाजीचा भाऊ, बाकीचे मावळे लोकांसहित देऊन पोंहचला; तों हे लोक पळतात, असें पाहून मोठ्यानें ओरडून निषेध करून बोलिला कीं, तुमच्या बापाचें प्रेत महार नेऊन अमंगळ जागीं टाकतील, त्या दोषाचे अधिकारी मात्र तुम्ही व्हाल; आम्हीं तर दोरीची शिडी तोडिली, आतां मोंगल तुम्हांस मारतील किंवा तुम्ही त्यांस माराल, असें म्हणून आपल्या बरोबरचे लोकांसहित त्या लोकांस पुन्हां युद्धास नेलें." याच बखरीच्या उत्तरार्धातील आणखी एक उतारा पहा. " तें लष्कर पुढें चालतें झालें असतां युद्धविषयीं परमकुशळ असा सुरजमल्ल यानें जाणलें कीं, भाऊचे स्वाधीन मोठमोठ्या तोफा फार व पायदळ बहुत आणि बुणगेंही पुष्कळ यामुळें स्वारांस त्याबरोबर राहावें लागेल, आणि युद्धांत त्यांस अडचण पडेल, म्हणून त्यानें अशी मसलत केली कीं, मोठ्या मोठ्या तोफा व बुणगें एखाद्या किल्ल्याच्या आश्रयानें ठेवावें, आणि आपले व भाऊचे स्वार मिळून पुढें जाऊन त्या अबदालीच्या लष्कराचे आसमंतात् उपद्रव करून त्याच्या धान्यादि साहित्याचा नाश करावा, तेणेंकरून तो आपल्या आपणच मार्गें हटेल."

इंग्रजी अमदानीत आपल्याकडील नवशिक्षितांनी बखरींमधील अस्सल मराठी गद्याची परंपरा चालू ठेवली असती तर १८२० ते १८५० या काळात जे बरेचसे अप्रौढ लेखन निर्माण झाले ते झाले नसते. आपल्याला गद्य लेखनाचा बहुमोल वारसा मिळाला आहे हेच मुळी या नवीन लेखकांना माहीत नसावे. किंवा आपल्या भाषेत कसलेही कर्तृत्व नाही, जे कर्तृत्व आहे ते सारे इंग्रजी भाषेत आहे, आणि इंग्रजीमधील संपन्न वाङ्मयाचा मराठी तर्जुमा करणे इतकेच फार तर आपल्याला करता येण्यासारखे आहे, असेही त्यांना वाटले असेल. मुद्रणकलेचा प्रसार झालेला नसल्यामुळे बखरींचा समाजात सार्वत्रिक प्रसार झाला नाही हे खरे आहे. पण ज्ञानेश्वरीपासून मोरोपंतांच्या कवितांपर्यंत सर्वच पद्य-वाङ्मयाच्या बाबतीतही ही अडचण होतीच की. मुद्रणकलेच्या अभावी पद्य-वाङ्मयाचा प्रसार झाला, पण बखरींसारख्या समृद्ध गद्य-वाङ्मयाचा मात्र प्रसार झाला नाही, ही घटना आपल्या लोकांच्या मनोवृत्तीचे उत्कृष्ट निदर्शन करते. केवळ लौकिक स्वरूपाच्या व्यावहारिक वाङ्मयाचे जतन करणे व त्याचे

कौतुक करणे, या गोष्टी ज्ञानी लोकांच्या समाजात झाल्या नाहीत आणि म्हणूनच गद्य-वाङ्मय निर्माण करावयाचे ते इंग्रजी वाङ्मयाचे अनुकरण करूनच करावयाचे, अशी कल्पना या समाजात रूढ असली पाहिजे असे वाटते.

'दर्पण' आणि 'प्रभाकर' या वर्तमानपत्रांच्या द्वारे लोकांना ज्ञान प्राप्त झाले व मराठी गद्य लिहिण्याचा प्रचार वाढू लागला असे दादोबा पांडुरंगांचे विवेचन आहे. मराठी गद्याची पुनर्घटना करताना प्राचीन पद्यग्रंथांचा अभ्यास नवशिक्षितांनी केला नाही, आणि प्राचीन गद्य विस्कळित असल्यामुळे त्याची कोणास माहिती नव्हती; आणि यामुळे विचार, मांडणी, व भाषा या तीनही बाबतीत मराठी गद्याला इंग्रजी वाङ्मया-वरच अवलंबून राहावे लागले, असे प्रा. सरदारांचे विवेचन आहे. प्रा. सरदार पुढे म्हणतात– "शब्द मराठी, पण वाक्यरचनेची धाटणी मात्र पुष्कळ अंशी इंग्रजी, अशी सुरवातीच्या गद्यग्रंथांची स्थिती होती. प्राचीन परंपरेचा आधार न मिळाल्यामुळे अर्वाचीन मराठी गद्याची अवस्था अनाथ, बेवारशी मुलाप्रमाणे झाली होती. आईचे दूध त्याला मिळाले नाही. दाईच्या भाडोत्री दुधावरच त्याची वाढ झाली. यामुळे मालापूर्वकालीन गद्यात जिवंतपणाचा अभाव प्रामुख्याने दिसून येतो."* प्राचीन परंपरेचा आधार अर्वाचीन गद्याला मिळाला नाही असे प्रा. सरदार म्हणतात. पण परंपराच अस्तित्वात नव्हती असे जर त्यांना सुचवावयाचे असेल तर ते बरोबर नाही. बखर गद्याची जातिवंत, उज्ज्वल व स्पृहणीय परंपरा भोवताली जिवंत होती तरी सुद्धा नवीन लेखकांनी त्या परंपरेचा उपयोग करून घेतला नाही, आणि यामुळेच गेल्या शतकातील सुरवातीच्या नवीन प्रकारच्या गद्याला 'भाडोत्री' स्वरूप प्राप्त झाले, असा यातील निर्णय आहे. घरातला संपन्न वारसा सोडून दिला, आणि बाहेर याचना सुरू झाली म्हणजे हा चमत्कार होत असतो.

* * *

इंग्रजी विद्येच्या परिचयाने नवीन वाङ्मयप्रकार आपल्याला माहीत झाले हा फार मोठा फायदा झाला. प्रथम जो नवा वाङ्मयप्रकार आपल्या परिचयाचा झाला तो म्हणजे निबंध. हा नवा वाङ्मय प्रकार आपल्याकडील नवशिक्षितांनी ताबडतोब उचलला हे अगदी योग्य असेच झाले. एक गोष्ट मात्र बिघडली. १८१८ पर्यंत आपल्याकडे झालेल्या बखरींमधील प्रौढ आणि प्रभावी मराठी गद्यशैलीची

---

* अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका, पृ. ३४

परंपरा तशीच पुढे चालू ठेवून या शैलीमध्येच नवीन वैचारिक निबंध लिहिले जावयास पाहिजे होते. म्हणजे परंपरेने चालत आलेली कमावलेली प्रौढ भाषा, आणि इंग्रजांच्या सहवासाने प्राप्त झालेला नवा वाङ्मयप्रकार, असा स्पृहणीय प्रकार दृष्टीस पडला असता. पण हे घडले नाही. आणि १८५० पर्यंत तरी नव्याने सुरू झालेल्या निबंधलेखनात विचार प्रौढ व प्रगल्भ, आणि त्या विचाराचे वाहन असलेली भाषा मात्र अगदीच सामान्य, किंबहुना अशुद्ध व रांगडी, असा चमत्कार दृष्टीस पडतो. बाळशास्त्री जांभेकरांची इंग्रजी शैली किती तरी प्रौढ व आकर्षक आहे. परंतु इंग्रजी निबंधांचा त्यांनीच स्वतः जो मराठी तर्जुमा केला आहे त्यातील भाषा अगदीच सुमार आहे. बाळशास्त्री जांभेकरांसारख्या प्रज्ञावंत पुरुषांच्या असल्या मराठी शैलीवरूनच तत्कालीन मराठी गद्याच्या स्वरूपाची कल्पना पुढच्या काळातील लोकांनी केली. लोकहितवादींनी १८४८ ते १८५० या काळात जी पत्रे लिहिली त्यांच्या भाषेतही अशुद्ध वाक्यरचना, शब्दयोजनेचा ढिसाळपणा, अर्धवट सोडलेली वाक्ये इत्यादी प्रकार विपुल आहेत. इतकेच नव्हे तर इंग्रजी विद्येत प्रवीण असलेल्या, तसेच जुन्या संस्कृत ग्रंथांशी ज्यांचा भरपूर परिचय होता, अशा लेखकाच्या लेखणीतून ही मराठी भाषा उतरली असेल असे वाटणार नाही इतकी लोकहितवादींची भाषा रांगडी आहे. १८३० ते १८५० या काळात जे निबंध लिहिले गेले त्यांच्यातील भाषेपेक्षा १८४२ मध्ये लिहिलेल्या 'हरिवंशाची बखर' या बखरीतील भाषा किती तरी अधिक प्रभावी व रसाळ आहे. या बखरीतील वाक्यरचनाही बहुतांशी शुद्ध आहे. १८५० मध्ये सुरू झालेल्या 'मराठी ज्ञानप्रसारक' या मासिकात अनेक प्रौढ निबंध आढळतात. त्यांच्यातील विषयांच्या प्रौढपणाला साजेशीच त्यांची भाषा प्रौढ आहे. शास्त्रीय विषयांचे प्रतिपादन करणारे जे निबंध आहेत त्यांची भाषाही विषयानुरूप प्रौढ आहे. 'राज्य' या विषयावर १८५६ साली या मासिकात जे निबंध प्रसिद्ध झाले त्यांचा उल्लेख करणे जरूर आहे. तथापि पदार्थविज्ञानशास्त्रासारखा गहन शास्त्रीय विषय पारिभाषिक संज्ञा वापरून व अतिशय प्रौढ शास्त्रीय भाषा वापरून मराठीतही किती आकर्षक करता येतो याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे १८६१ साली प्रसिद्ध झालेले महादेवशास्त्री कोल्हटकर यांचे 'पदार्थविज्ञानशास्त्र' हे पुस्तक होय. सदर पुस्तक चेंबर्सकृत 'मॅटर अँड मोशन' या इंग्रजी पुस्तकावरून केले आहे. तथापि इंग्रजी शब्दांचा वापर न करता अतिशय कौशल्याने मराठी भाषांतर केले आहे. भाषा सर्व दृष्टींनी चांगली आहे. वाक्यरचना अगदी शुद्ध तर आहेच, पण या गद्याला एक प्रकारचा आकर्षक डौल आहे. या ठिकाणी मराठी गद्याला पुन्हा खरी प्रौढता प्राप्त झालेली दिसेल. एकच लहानसा उतारा नमुन्यासाठी देतो.

"या आकर्षणाचा व्यापार परमाणु जेव्हां अतिसन्निहित म्हणजे एकमेकांस

अगदीं लागल्यासारखे दिसतात, तेव्हा चालू होतो आणि येणेंकरूनच पदार्थांचे अतिसूक्ष्म कण एकत्र जमून त्यांचे पिंड बनतात. हें आकर्षण किती एक पदार्थांमध्यें अन्य पदार्थांपेक्षा बलवत्तर असतें. त्यांत धातूंमध्यें तर याची शक्ति सर्वांपेक्षां विशेष असत्ये. याचा सामान्य नियम असा आहे कीं, अप्रवाही पदार्थांत स्नेहाकर्षणाची शक्ति पराकाष्ठेची असत्ये, प्रवाही पदार्थांत त्यांपेक्षां कमी आणि वायुरूप पदार्थांत फारच कमी, किंबहुना नसत्ये म्हटलें तरी चिंता नाहीं. ''

माउंट स्टयुअर्ट एल्फिन्स्टनच्या ' हिस्टरी ऑफ इंडिया ' या ग्रंथाचे मराठी भाषांतर रा. रा. विश्वनाथ नारायण मंडलिक यांनी १८६२ मध्ये प्रसिद्ध केले. या भाषांतरातील भाषा सर्वत्र अतिशय प्रौढ असूनही आकर्षक उतरली आहे. गोविंद नारायण माडगावकर यांचें ' मुंबईचें वर्णन ' १८६३ सालचे आहे. आकर्षक गद्याचा एक सुंदर नमुना म्हणून या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल. तथापि मराठी गद्याला परिणत स्वरूप प्राप्त करून दिले ते कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी. थोरल्या शास्त्रीबुवांनी जी धाटणी घालून दिली तीच पुढे धाकट्या शास्त्रीबुवांनी ' निबंधमाले 'तून अधिक आकर्षक आणि प्रभावी करून दाखविली.

रा. शं. वाळिंबे

◆ ◆ ◆

: १ :

बा ळ शा स्त्री जां भे क र

" विद्या हें बळ आहे "

लॉर्ड बेकन साहेबानें म्हटलें आहे कीं, "विद्या हें बळ आहे." या वाक्याचा खरेपणा या काळांत केवळ स्पष्ट आहे खरा; तथापि यापासून वेगवेगळे लोकांचीं आचरणें एके रीतीनें झालीं नाहींत, किंवा विद्ये विषयींची आस्था त्यांमध्यें एके रीतीची उत्पन्न झाली नाहीं. ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, विद्येचा मूळ प्रकाश पूर्व देशांतून पश्चिम देशावर पडला; आणि अशेंच निःसंशय प्रमाणावरून सिद्ध झालें आहे कीं, पृथ्वीचे या भागातील लोकांमध्यें विद्येचीं मूळ स्वरूपें हजारों वर्षांपूर्वी ठाऊक होतीं. म्हणोन युरोप खंडांत सांप्रत कळा कौशल्यें पूर्णतेस आलीं आहेत, आणि या देशांत इतका काळ गेला तरी त्यांची फार वृद्धि झाली नाहीं असें पाहून चमत्कार वाटतो.

या दोन पृथ्वीच्या भागांत विद्येची वृद्धि बरोबरीनें झाली नाहीं, याचीं दुसरीं कारणें काय असतील तीं असोत, परंतु आह्मांस वाटते कीं, साधारण विद्येचे मुख्य उपयोग या देशांतील लोकांस चांगले समजले नाहींत हें त्यांतून एक कारण आहे. याविषयीं प्रमाण इतकेंच लिहिलें पाहिजे कीं, या देशांतील विद्वान लोकांनीं न्याय व वेदांत या शास्त्रांकडे जितकें लक्ष्य दिलें तितकें उपयोगी कळा कौशल्याकडे दिलें असतें, तर त्यांचे श्रमापासून बहुत चांगल्या गोष्टी घडल्या असत्या. परंतु सर्व विद्या धर्माचे उपयोगी, किंवा वादांमध्यें जय मिळविण्याचें साधन, तिचा मनुष्याचें संसारांतील कामाशीं कांहीं उपयोग नाहीं असें त्या प्राचीन विद्वान लोकांचें मत होतें असें वाटतें, हिंदु व मुसलमान या लोकांत शिल्प, भूगोळाचें ज्ञान, इतिहास यांमध्यें परिश्रम कमी याचें कारण हें आहे.

परंतु ही गोष्ट सर्वांस संमत आहे कीं, काळ व पदार्थांची स्थितिहि बदललीं म्हणजे जुन्या रीति सोडून नव्या घेण्याचें प्रयोजन पडतें. या देशाचे स्थितीमध्यें गेले वीस वर्षांत मोठा फारफेर झाला; जापासून प्राचीन संप्रदाय बहुत मोडले; आणि जो फेरफार झाला; म्हणोन ही गोष्ट दिवसानुदिवस अधिक अधिक अवश्य होत आहे कीं, या देशचे लोकांनीं आपलें लक्ष्य संसारोपयोगी कळा कौशल्यांकडे द्यावें, त्यांचे व्यवहारांत उपयोग कसे होतात ते शिकावे,

आणि सारांश, ज्या गोष्टींनीं युरोपियन लोक या देशाचे लोकांपेक्षां श्रेष्ठता पावले आहेत, आणि ज्या गोष्टी नाहींत म्हणून या देशाची इतकी दुर्दशा झाली, त्या सर्व त्याणीं साध्य कराव्या. येथील विद्यांपासून मागले काळांत काय स्वार्थ झाले असतील ते असोत, परंतु संसारांत ज्या गोष्टी लागतात, त्यांमध्यें त्यांचा उपयोग उत्तरोत्तर कमी होत चालला आहे. लार्ड ब्रह्म् साहेबानें म्हटलें आहे कीं, विद्येचे व्यवहारांतील उपयोग मोठे कामाचे आहेत. आणि आपलें ज्ञान वाढविण्यानें द्रव्य मिळविण्यांत किंवा सुखांत कांहीं स्वार्थ होणार नाहीं असा मनुष्य कोणी नाहीं."

या रीतीची विद्या एथील लोकांस शिकवावी या लक्ष्यानें या शहरांत लोकांनीं एकत्र जमून कित्येक परोपकारांसाठीं मंडळ्या केल्या आहेत. त्या सर्वांचे श्रमापासून जे स्वार्थ आजपर्यंत झाले, आणि जे पुढें होतील ते सर्व लिहिण्याचें एथें प्रयोजन नाहीं. परंतु त्यांतून जा एके मंडळीस येथील कित्येक लोकांनीं द्रव्याची व दुसरे रीतीची मदत केली आहे, त्या मंडळीची गोष्ट आम्ही आमचे एतद्देशीय सर्व वाचणारांस कळवितों. आह्मी ही गोष्ट " शिक्षा मंडळीची " सांगीतली. ही मंडळी सुमारें दाहा वर्षांचे पूर्वीं नामदार एल्फिन्स्तन साहेबांचे अमलाखालीं उत्पन्न झाली. तिचें लक्ष्य हें आहे कीं, चांगलीं विद्येचीं मूळपुस्तकें या देशचे भाषांत करून, आणि शाळा घालून येथील लोकांस उपयोगी विद्या शिकवावी. प्रारंभीं कित्येक लोकांचें असें म्हणणें होतें कीं, या रीतीनें विद्या शिकविणें चांगलें सिद्धीस जाईल हें खचित नाहीं, म्हणोन एथील लोकांस इंग्रजी शिकवण्याचींच साधनें अधिक करून त्या द्वारें बहुत ज्ञान त्याणीं साध्य करावें अशीं युक्ति करावी. परंतु इतके वर्षांचे अनुभवावरून कळूं आलें कीं, हीं भयें केवळ निराधार आहेत, आणि सांप्रतचे रीतीनें जें शिकवावें तें पुढें विद्या वाढण्याचा मजबूद पाया सारिखें होतें. मंडळीचा मागील रिपोर्ट म्हणजे तिचे कृत्याचें वर्तमान यांत लिहिलें होतें कीं, प्रांतांत ५६ शाळा सांप्रत घातल्या आहेत, आणि सर्व ठिकाणीं मिळोन तीन हजारांवर मुलें शिकत आहेत. मंडळीच्या मुंबईतील शाळा तर फार चांगल्या चालत आहेत, त्यांतून कित्येकांत १२५ मुलें आहेत; आणि आह्मी ऐकतों कीं, मंडळीनें आलीकडे इंग्रेजी शाळा चांगले रीतीनें चालवायाची तजवीज आरंभिली आहे. अशा या गोष्टी पाहून आमचे लोकांचे ध्यानांत यावें कीं, इंग्रेज लोकांनीं आपले देशचे कित्येक लोकांचे मदतीनें त्यांचे मुलांस विद्याभ्यास होण्याकरितां जा युक्ति योजिल्या आहेत, त्या सिद्धीस जात आहेत; परंतु ही गोष्ट उघड आहे कीं, जर लोकांनीं संतोषानें मदत केली नाहीं, तर या मंडळींचीं कामें चांगलीं चालणार नाहींत. म्हणोन आह्मी मनापासून आशा धरितों कीं, या देशचे लोकांस विद्येचा

उपयोग लवकर समजावा. आणि ज्या विद्येचा आह्मी दुसऱ्यांपासून भेद करून सांगितला, तिचा तर अगत्य समजावा, आणि त्यांत जे द्रव्यवान आहेत त्याणीं जी मंडळी आह्मी या देशचे लोकांस विद्याभ्यास होऊन त्यांस प्रतिष्ठा येई असें करण्यासाठीं झाली आहे म्हणोन वर सांगीतलें, तिला सहाय व्हावें.

या विषयीं आम्हीं कलकत्त्यांतील 'रिफार्मर' वर्तमानपत्रांतून त्या पत्राचें लिहिणाराचें मत खालीं छापितों.

" आतां समय असा आला आहे कीं, सर्व राज्यांतील लोकांनीं सज्ञान दशेस चढावें, किंवा तिरस्कार आणि दुःख यांत पडावें. या काळांत संपत्ति म्हणजे सज्ञानपणा आणि विद्या व कळा यांचा अभ्यास; ह्मणजे ती यापासूनच प्राप्त होत्ये, असें झालें आहे. वास्तवीक पाहिलें असतां सर्व काळ थोडेंबहुत असेंच आहे; परंतु सांप्रत संपत्ति आणि विद्या यांचा परस्पर संबंध साधारण पाहणाराचे दृष्टीसही उघड येतो. विलायतेंतील लोकांमध्यें विद्येचा प्रसार झाला त्यामुळें त्या देशास किती श्रेष्ठपणा प्राप्त झाला याचाच आम्ही विचार करून पाहूं. विलायतेंतील जा चमत्कारिक यंत्रांनीं द्रव्य मिळाविण्यास उपाय बहुत झाले आहेत, त्या यंत्रास मूळ कळाकौशल्यांची वृद्धि, विलायतेसारिखे लहान आणि दूर देशचे लोकांनीं येऊन विलायतेपेक्षेंही मनुष्यांचे संपत्ती विषयीं चांगले हें राज्य घेतलें, आणि रक्षण केलें, हें सामर्थ्य त्यांस विद्येनें आलें नव्हे ? बरें असेच हिंदुस्थानचे लोक पुढें कोणत्ये वेळेस विलायत घेतील, ही कल्पना असंभाव्य स्वप्नासारिखी वाटत्ये याचें कारण काय ? याचें कारण हिंदुस्थानचे लोकांपेक्षा विलायतेचे लोकांत विद्या फार आहे हें नव्हे काय ? विलायत देश या देशापेक्षां आणि दुसरे बहुत देशांपेक्षें श्रेष्ठता पावला आहे. याचें कारण विद्येचें सामर्थ्य नव्हे काय ? असें असतांही आमचे द्रव्यवान मित्र अशे अखूड दृष्टीचे आहेत कीं, ते इंद्रियांचीं हजारों मलिन सुखें ज्ञानाचे स्वार्थापेक्षें चांगलीं मानितात, ते आपली संपत्ती व जमविलेलें द्रव्य फार वेडेपणाचे खेळांत घालिवतात, परंतु विद्येचे कामासाठीं एक पैसाही खरचीत नाहींत. अशा साधारण गोष्टी लिहिल्या असतां त्यांचे विरुद्ध कोठें आढळते; म्हणोन आम्ही कबूल करायास सिद्ध आहों कीं, या स्तुत्य उद्योगास आपल्या सामर्थ्याप्रमाणें मदत करणारे आमचे लोकांत बहुत आहेत. या थोड्यांची आम्ही गोष्ट लिहिली नाहीं, परंतु आमचे लोकांतून जा बहुतकरून लोकांचे डोळे विद्येचे स्वार्थाविषयीं आजून झांकले आहेत असें वाटतें, त्यांची लिहिली."

: २ :

बा ळ शा स्त्री जां भे क र

हिंदुस्थानांतील नाचतमाशे हा गुलामगिरीचा एक प्रकार आहे

मनुष्यमात्रांचें जे बरे इछितात, त्या सर्वांस हें ऐकून संतोष होईल कीं, कंपनी सरकारनें मोठ्ये उदारपणानें सेंट हेलिना बेटांताल आपले अंमलदारांस तेथील गुलाम लोकांनीं आपले धण्यापासून मोकळीक विकत घेण्यकरितां, त्या गुलामांस आगाऊ पैका देण्याची परमाणगी दिली आहे.........

......तथापि हिंदुस्थांनात हा मनुष्यांस विकत घेऊन गुलाम करण्याचा व्यापार सांप्रत चालत आहे. तो वर सांगीतले रीतीहून दुसरे रीतीनें चालत आहे; आणि त्यांतून बहुतकरून सर्व रीतींस मुसलमानांचें शास्त्र व देशचाली यावांचून दुसरा कोणता आधार नाहीं. या हिंदुस्थानांत गुलामांचे अनेक प्रकार आढळतात, त्यांचा विस्तार लिहावा असें आमचे मनांत नाहीं; परंतु या गुलामगिरीचा एक प्रकार आहे. तो नि [य] मित मनाचे सर्व लोकांस फार त्रास कारक, आणि [स] र्व लोकांचा नाश कारक आहे, म्हणोन आम्हास त्याविषयीं कांहीं विचार लिहायाचा आहे. जे ख्याली खुशाली, अविचारी, आणि हौशी लोक आहेत, आणि जांस नाच, बैठक यांपासून आनंद होतो, ते जेव्हां पाहातील कीं, आह्मी वर जा गोष्टीची इतकी निंदा केली, ती ही आहे कीं, कसबिणीचा मंडळ्या जे लोक तयार करितात, ते अशे रीतीनें मुली पैदा करितात. कोणी ही गोष्ट ठाऊक नाहीं असा नाहीं कीं, कसबिणीच्या मंडळ्या लहान मुली विकत घेऊन चालतात. आणि त्या विकत घेणारे पुरुषांचा उद्योग हाच असतो कीं, दरिद्री आणि दुःखी यांचीं घरें शोधावीं; आणि कोणी गरीब बिचारा माणूस किंवा कोणी निर्धन विधवा असेल तिला कांहीं द्यायाचें करून मुलांवरची माया दूर होई असें करावें; आणिं आपल्या अभद्र युक्ति आणि यत्न ही सिद्धीस गेलीं, म्हणजे त्या पोरास कोठें दूरचे शहरांत घेऊन जावें. तेथें तें लागलेंच विकायास कठीण पडत नाहीं, आणि जर तें पोर सुंदर बायको व्हायाजोगें असलें तर अगदीं कठीण पडत नाहीं. वर लिहिलेले माणुस कधीं कधीं लोकांचीं

मुलें चोरून नेतात हेंही असेंच प्रसिद्ध आहे. म्हणोन या खऱ्या गोष्टीं विषयीं किंवा इंग्रेजी राज्यांत हा व्यापार किती चालला आहे या विषयीं विस्तार करायाचें प्रयोजन नाहीं. हें दाखविण्याकरितां आह्मी लिहितों कीं, नाचणाऱ्या आणि गाणाऱ्या कसबिणींचे ताफे सर्व सुमाराचे मोठे शहरांत आणि मुख्यत्वें जेथें फार वस्ती आहे अशीं, मुंबई, सुरत, पुणें या शहरांत किती असतात हें पाहावें. कोणी असा विचार करावा कीं, या बायकांस कोणते उद्योगांसाठीं तयार करितात; त्या आपलें आयुष्य कोणत्ये रीतीनें घालवितात, त्यांस कोणत्या युक्ति आणि लबाड्या शिकवितात; त्या युक्ति त्यांस किती वेळ आणि कशे उघड प्रसंगीं उपयोगांत आणाव्या लागतात; व या तमाशांची अबरू किती आहे, आणि देश चालीप्रमाणें जे त्या तमाशांस जातात आणि त्या तमासगीर बायकांशीं व्यवहार ठेवितात त्यांस कोणता नियम नाहीं; कारण असें केल्यानें प्रतिष्ठा गेली असा लोकांनीं मानिलेला पुरुष कोण आहे ? आह्मी म्हणतों कीं, कोणी या गोष्टीचा विचार करावा; आणि मग आपल्या बुद्धीनें असें ठरवावें कीं, हीं कसबिणींचीं संस्थानें जा पद्धतींनीं चालतात, त्या पद्धति धर्मबाह्य आणि नाश करणाऱ्या असें आह्मी म्हटलें हें खरें किंवा नाहीं; तसाच हाही निश्चय करावा कीं, सर्व जातींचे गुलामगिरीपासून जो तोटा होतो, त्याखेरीज, या जातीचे गुलामगिरीपासून विषयी, आणि अधार्मिक लोकांचे मनोविकार फार वाईट वाढतात किंवा नाहीं; आणि अशा गोष्टी नसत्या तर जे बहुत लोक धर्मानें वागणारे, ते, या गोष्टींपासून व्यसनी आणि अधार्मिक होतात किंवा नाहीं. नाच व असे दुसरे तमासे यांस काहीं थोडे लोकांवांचून इतर सर्व लोक जा रीतीनें मानितात, ती पाहिली असतां लोकांमध्यें नीति फार कमी आहे असें स्पष्ट कळतें. नाचणाऱ्या बायका सर्व कसबिणी असतात, आणि त्यांचीं कृत्यें अभद्र असतात. जरी त्यांस आश्रय देणें म्हणजे गुलामगिरी वाढविणें हें खरें; तथापि नाचास जाण्यांत कांहीं अप्रतिष्ठा किंवा वाईटपणा असें कोणी मानीत नाहीं. मुसलमान, पारशी व तसेंच हिंदु यांमध्यें अशी चाल पडोन गेली आहे कीं, जर खर्च करावयास सामर्थ्य असेल, तर मोठे संस्कारांत आणि धर्मकृत्यांतही नाच अवश्य केले पाहिजेत; आणि हिंदूमध्यें जीं कार्यें मोठीं धर्माचीं अशी सांगीतलीं आहेत, त्यांतही नाच आणि असे दुसरे तमासे मिसळून धर्मकृत्यांत व्यवहार मिसळतात. पातकी बायकांचीं उघड अभद्र कृत्यें धर्मकृत्यांशी मिसळणें यापेक्षें मोठा वेडेपणा कोणता ?

जा आमचे देशचे लोकांत विद्या कमी, आणि जांचे याविषयींचे समज देशाचारांमुळें लहानपणीं विपरीत पडोन गेले असतात, त्यांची जेव्हां

आह्मी अशी निंदा करितों, तेव्हा जा साहेब लोकांचे समज स्वछ, आणि जांची अभिरुची चांगले ठिकाणी जडत्ये, ते साहेब लोक असे तमाशास जातात, त्याविषयीं कोणता आधार नाहीं, त्यांची आह्मी किती निंदा करावी ? लोकांचा चाली, समज, आणि वऱ्यावाईट रीती, चालूं द्याव्या हें शाहाणपण खरें; परंतु वर सांगीतलेला तोटा जांपासून होतो, त्या चाली वाढत अशा करणें हें मूर्ख· पणाचें किंवा अज्ञानपणाचें चिन्ह.

आह्मी ही गुलामागिरीची तक्रा लिहिली ही कोतवालांचे बंदोबस्तानें बंद होणार नाहीं. जी वाईट गोष्ट होण्यास ती गुलामगिरी अवश्य पाहिजे, ती गोष्ट पूर्वी बंद झाली पाहिजे, म्हणजे ही गुलामगिरी पक्की बंद होईल; परंतु तिचीं मुळें अशीं घट्ट झालीं आहेत कीं, विद्या व मोठे ठिकाणीं तसा आचार लोकांस दृष्टीस पडणें, यावांचून ती बंद होईल ही आशा व्यर्थ आहे. म्हणजे आह्मी या प्रसंगीं भले आणि समर्थ इंग्रेज व या देशचे लोक यांस मुख्यत्वें लिहितों कीं, त्यांणीं आपली मनुष्यमात्राचे कल्याणाविषयींची इछा, मनुष्यपणा, आणि नीति यांहींकरून ही गुलामगिरीची रीति चालविण्याचीं जीं साधनें आहेत तीं, आपल्यापासून उपाय होईल तवढा करून बंद करावी; जा या गुलामगिरीपासून लोकांची नीति फार भ्रष्ट होत्ये आणि हजारोंचे घरीं बुड आणि दुःख हीं येतात.

◆ ◆ ◆

: ३ :

लो क हि त वा दी

लाच व लाचेचा गुन्हा

ला च

इंग्रज लोक हल्लीं हिंदुस्थानांत राज्य करितात. हे सामान्यत: इकडील लोकांपेक्षां शहाणे, विद्वान्, ज्ञानी, माहितगार व निष्कपटी आहेत. परंतु शेंकडा पांच या सुमारानें त्यांत वाईटही असतात. तसेंच जे चांगले आहेत, ते तरी सर्व कामें करूं शकत नाहींत. कारण एकटा मनुष्य, त्यास दोन हात. तेव्हां त्यानें कितीही काम केलें तरी तो थोडेंच करील आणि त्याचे पाठीस डोळे नसतात. याजमुळें त्याचे हाताखालचे लोक चांगले सज्जन असल्याखेरीज सर्व कामें चांगलीं चालणार नाहींत व इकडील लोक लबाड म्हणून जरी प्रसिद्ध आहेत, तरी ते इंग्रजांस राजकीय कारणास्तव आणि अडचणीमुळें पुष्कळ ठेवावे लागतात. या लोकांची वर्तणूक फार वाईट म्हणून लोकांचे फार नाश होतात, व दिवसानुदिवस त्यांवर भरंवसा कमी राहतो.

हिंदु लोक लाच खातात, याचा संशय नाहीं. कंपनी सरकारचे चाकरांत हजारांत लाच न खाणारा व ईश्वरास भिऊन चालणारा क्वचित् असतो. बाकी सर्व शिपायांपासून प्रिन्सिपाल सदर अमीन पर्यंत शपथेचा व्यभिचार करितात. याचें कारण असें आहे कीं, या लोकांस ज्ञान आणि धर्म नाहीं हें एक; आणि दुसरें इंग्रज लोकांस हिंदु लोकांची परीक्षा करितां येत नाहीं. याजमुळें कोणत्याही कामावर यथायोग्य गुणानें योजना होत नाहीं. हिंदु लोक जरी मूर्ख आहेत, तरी त्यांत निवड केली, तर चांगले शहाणे व ईश्वरास भिणारे असे कांहीं कांहीं सांपडतील; परंतु सरसकट नेमणूका करतात; याजमुळे वाईट लोक पुष्कळ अधिकारावर येतात. जर असा ठराव केला कीं, इंग्रजी विद्या शिकलेले लोकांस कामावर नेमावें, तर लाचाचा कांहीं बंदोबस्त होईल. मोठे शास्त्री जरी असले, तरी त्यांचाही उपयोग नाहीं. कारण मीं एका शास्त्र्यास प्रश्न केला कीं, ‘ लाच घ्यावा किंवा नाहीं ? ’ त्यानें सांगितले कीं, लाच खाणें हा न्यायाधिशाचा धर्म आहे; परंतु खरा असेल त्याजपासून घ्यावा, असें शास्त्र आहे. ’ तेव्हा हिंदु लोकांचे शास्त्राचा या गोष्टीस कांहीं प्रतिबंध नाहीं. फक्त कायदा मात्र प्रतिबंध करतो; परंतु कायदा चुकविण्याचें सोपें आहे. जा पुरुषाचे मनांत ईश्वराज्ञेचा

निर्धार नाहीं, त्यास कायदा दिला तरी तो लाच खाल्ल्यावाचून रहाणार नाहीं. तेव्हां हिंदु लोकांचें मनच फिरलें पाहिजे. ही गोष्ट वाईट, असें त्यांस पक्कें समजल्यावाचून लाचाचा प्रतिबंध होणार नाहीं.

जरी इंग्रजांनीं भगीरथ प्रयत्न केला, तर हे लोक अडून उडून लाच खातात, हें जगप्रसिद्ध आहे. आणि वास्तविक पाहिलें, तर जो मनुष्य मुनसफाचें काम करितो, तो वेतनाइतका खर्च ठेवून पांच वर्षांत दहा हजार रुपये जवळ करितो. तसेच शिरस्तेदार आपले सर्व वेतनाइतका किंबहुना जास्तीच खर्च करून सालांत पांच हजार रुपये जवळ करितात. तसाच नाझरही सालाचे पांच हजार रुपये मिळवितो. सामान्य कारकूनही दहा वर्षें काम करतो तर तो दोन हजार रुपये जवळ करितो. तसेंच चपराशी पगाराचे दुप्पट मिळवितात. फौजदार व मामलेदारही याजप्रमाणें; जर बारीक शोध केला, तर ही सर्व बातमी लागते. आणि जरी जड्ज किंवा कलेक्टरसाहेब प्रमुख असतात; तरी त्यांचा इलाज चालत नाहीं. पहा ! एक मनुष्यानें हुकूमनामा बजावण्यास नेला, तर पहिल्यानें शिरस्तेदारचें आर्जव करावें लागतें. त्याशिवाय साहेब कांहीं करीत नाहीं. तेव्हां लोक त्यांची पूजा करून नंतर हुकुम घेतात. तो बार करणारा कारकून याजवळ देतात. तेव्हां शिरस्तेदार व कारकून एका मताचेच सिद्धसाधक असतात. ते त्यास तसदी देत नाहींत कीं, अमक्याचें काम जरूर करावें. तेव्हां त्या कारकुनास चार आणे द्यावे, तेव्हां तो बार करून मालकाजवळ देतो. मग मालक नाझराकडे जातो. तेव्हां नाझर म्हणतो कीं, 'आतां मजजवळ शिपाई नाहीं. जा, पाहिजे तर साहेबांस सांगा.'

तेव्हां सावकार तर एक वेळ खर्च करून साहेबाकडून आला असतां, तो पुनः जाईल, तर दाद लागणार नाहीं. आणि जर नाझरावर फिर्याद करील तर साहेब म्हणतो कीं, "अरे अंमलदारावर हा फिर्याद करितो ! त्याची शपथ घ्या आणि बसवून ठेवा." अशी त्याची तिकडे शोभा होते. तेव्हां कांहीं खर्च पडेल तो करावा ठीक, असें समजून नाझराची मूठ भरतो. नंतर सर्वांची पंचोपचार पूजा करून शेवटीं शिपाई जसीस मिळतो. तो मिळाला कीं म्हणतो, 'दादा, रामराम. आपणांकडे नेमणूक झाली, देवानें केलें. असें कुळ मिळालें म्हणजे आपल्यास काय कमी ?' आठ-चार आणे त्यास द्यावे, तेव्हां तो बरोबर काम करितो. नाहींतर कुळाकडे जाऊन अगोदर बातमी लावून माल पळवितो. पुढें माल जप्त केला तो लिलाव होईपर्यंत याचप्रमाणें खर्च पडतो.

शेवटीं रुपये आले म्हणजे तरी लवकर पदरीं पडत नाहींत. नाझर म्हणतो, 'जाऊं द्या, या पहिल्या तारखेस,' तेव्हां उत्तरपूजा करावी लागते.

शेवटीं पन्नास रुपयांचा दावा असला तरी चाळीस रुपये खर्च होतो. मग त्या सावकारानें म्हणावें, 'अरे रुपये नाहीं आले तर नाहीं, बुडाले तर बुडाले; परंतु कूळ पैसा देत नव्हतें त्याची तर खोड मोडली ?' एवढा मात्र आनंद मानून बसतात.

तेव्हां या रीतीनें रयतेची किती खराबी होईल बरें ? या प्रकारें इंग्रजांचा दरबारांत न्याय चालला आहे. छापी कागद, वकील, मुनसफ लूट करतात. हुकुमनामा झाला, तरी सदरीं लिहिल्याप्रमाणें व्यवस्था होते. कित्येक लोक असे आहेत कीं, शंभर रुपयांची फिर्याद करतात. तींत चारशें रुपये खर्च करितात. व शिवाय आर्जवें व नित्य खेपा. आपला रोजगारधंदा सोडून कज्जाचे पाठीस लागतात. याजमुळें बेजार झाले आहेत. असा अनर्थ सरकारी कामदार करितात. ज्या तऱ्हेनें पैसा काढून आपला नफा करितात, रयतेची दया किंवा ईश्वराचें भय किंवा धर्माचा प्रतिबंध किंवा मनाची लज्जा किंवा परलोकाची काळजी किंवा अब्रू हे कांहीं एक मनांत आणीत नाहींत. तेव्हां व्यापार आणि व्यवहार व देणें घेणें कसें नीट चालेल ? इंग्रज तर या गोष्टीस वाकब असे थोडेच आहेत ! कांहीं कांहीं पुरते आहेत; परंतु त्यांचा तरी उपाय चालत नाहीं.

यास एवढाच उपाय आहे कीं, चांगले लोक पाहून अधिकारावर ठेवावे. अधिकारावर ठेवणें याची फार चौकशी करून लोकांची निवड करावी व त्यांचे गुणाचा विचार करावा. आणि लाच न खाणारे आणि इंग्रजी जाणणारे आहेत व जे फार विद्वान् आणि विचारशील आहेत त्यास ठेवावें; तरच त्याचा बंदोबस्त होईल. नाहीं तर कदापि होणार नाहीं. मोठा शहाणा साहेब असला, तरी तो काय करील ! मराठी अर्जी असली तर ती वाचावयाला शिरस्तेदार पाहिजे; हुकुमनामा बजाविण्यास नाझर पाहिजे, शिपाई-कारकून पाहिजेत. अव्वल कज्जे फैसल करण्यास मुनसफ पाहिजेत, त्याशिवाय चालणार नाहीं. परंतु त्यांची वाईट वर्तणूक असली तर साहेब काय करतील ?

हल्लीं लोकांस असें वाटतें कीं, इंग्रजांचा रोजगार करून पैशास जय नाहीं व बरकत नाहीं; म्हणजे उघड लाच घेतां येत नाहीं; परंतु वास्तविक पाहिलें तर बरकत असेल कशी ? "हपापाचा माल गपापा जातो," अशी म्हण आहे. हे लोक शपथ खाऊन पैसा मिळवितात. तो पैसा राहील कसा ? त्यांनींच शिक्षा पाऊन तुरुंगांत श्रृंखळा-बंधनांत असावें, ही त्यांची योग्यता असते. परंतु कित्येक लोकांची ही अप्रतिष्ठा चुकते. हेंच त्यांचें पुण्य म्हणावें. त्यांचें कल्याण होईल कसें ? जरी कोणी म्हणवितो कीं, मीं पन्नास वर्षें व चाळीस वर्षें व तीस वर्षें व वीस वर्षें चाकरी केली; माझी सरकारनें प्रतिष्ठा वाढवावी; पण त्यांनीं

आपल्या मनांत विचार करून पाहिला तर समजेल कीं, कोणत्या धर्मानें आम्हीं चाकरी केली ? सरकारास फसविलें. रयतेस लुटलें, लबाड्या केल्या. त्यांत कोणाचें मीं चांगलें केलें ? जास शिक्षा होते, तो तुरुंगांत जातो. जे रहातात ते म्हणतात कीं, आमची योग्यता हीच आहे; परंतु चालेल तितके दिवस करून घ्या. पुढें काय होईल तें पाहूं ? असेंही लोक म्हणतात; परंतु त्यांची वास्तविक योग्यता पाहिली, तर जे लाचाकरितां तुरुंगांत आहेत, त्या कैदींची योग्यता आणि जे कोर्टांत मोठे अब्रूचे लोक म्हणून बसून न्याय करितात व अंमलदारी करितात, त्यांची योग्यता यांत काय अंतर आहे ? जा दिवशीं सांपडतील त्या दिवशीं त्यांचीही गति तीच होणार. याजमुळें सरकारी अंमलदाराची योग्यताही लोकांत नसते. ते कामावर असतात, याजमुळें चार लोकांस त्यांजवळ जाणें जरूर पडतें; परंतु त्यांची योग्यता प्रसिद्ध असते.

जरी हिंदु लोक हुशार आहेत तरी, या दुर्गुणानें त्यांची माती झाली व अब्रू गेली. यांची कोण लाज बाळगीत नाहीं. कामावरून गेलें म्हणजे त्यांचेकडे कोणी पहात देखील नाहीं. कारण कीं, त्यांची योग्यता सर्वांस ठाऊक असते. जर पुरुषास खरी प्रतिष्ठा असली, तर ती त्याची चाकरी गेल्यानें कमी होत नाहीं व द्रव्य आलें–गेलें, तरी त्यानें त्याची अब्रू कमी होत नाहीं. ती शाश्वत अब्रू; परंतु हे लबाड लोक जी अब्रू मिळवितात, ती मुलाम्यासारखी. ही टिकावयाची नाहीं. जे लोक लाच देतात, ते तरी मूर्खच असतात. जर सर्वांनीं कट केला कीं, सरकारचे अंमलदारास लाच द्यावयाचा नाहीं, तर त्याची खोड जाईल; पण असे चांगले कट करण्यापुरते शहाणपण जर या लोकांत असते, तर मग राज्य कां जातें बरें ?

हे लोक फार मूर्ख आहेत. याजमुळें असे प्रकार यांजमध्यें आहेत व इंग्रज तर पक्के लोक आहेत. ते म्हणतात कीं, आपआपल्यांत हे लोक लुटून खातील, तर आमचें काय गेलें ? आमची तितकी चांगलेपणाची प्रशंसा वाढेल. हेंही खरें कीं, साहेब लोकांस लोक चांगले म्हणतात व नेटिव्ह कामगारांस बहुधा वाईट म्हणतात; परंतु आतां सुधारलेले व सुशिक्षित लोक सरसावत चालले आहेत. ते इंग्रजांची बरोबरी करतील यांत संशय नाहीं.

लाचेचा गुन्हा

— धर्मशास्त्रांत लाचेचा गुन्हा नाहीं. लोभिष्टपणा नसावा असें आहे; परंतु ही गोष्ट लाचाचे गुन्ह्याविषयीं नाहीं. त्या वचनाचें लाचेवर ओढून चंद्रबळ आणिलें तर न कळे.

पेशवाईंत रामशास्त्री न्यायाधीश होते व ते धर्मशास्त्राप्रमाणें चालत होते. त्यांचा आचार असा होता कीं, सरकारचें वेतनदेखील घ्यावयाचें नाहीं. कोणाचा विडा किंवा पाणी देखील घ्यावयाचें नाहीं व धन संपादन मुळींच करावयाचें नाहीं. हा शास्त्राचा प्रतिबंध खरा; परंतु सामान्यतः लोभ धरण्याविषयीं मात्र जहाले; तथापि न्यायकर्त्यांनें आपलें नेमलें वेतन घ्यावें. त्यांत द्रव्य जमलें तरी जमवावें आणि जे आपलेकडे न्याय करण्यास येतात. त्यांपासून त्यांचे कार्य जाहलें या कारणानें सत्पक्षाचे अथवा असत्पक्षाचे धन किंवा कांहीं मोलवान वस्तु घेऊं नये; घेतली असतां त्या कर्माचें नांव असुक व त्यास शासन असुक, असा निषेध शास्त्रांत कोठें स्पष्ट नाहीं. केवळ लोभनिषेधावरून ही गोष्ट स्पष्ट होत नाहीं. मला तर स्पष्ट वचन कोठें आढळलें नाहीं. इंग्रजी भाषेंत "ब्रैब" फारशी भाषेत "रिषवंत." त्याच अनुरोधानें लोभार्थी शब्द मूळचा हिंदुस्थानी असून, हल्लीं महाराष्ट्र भाषेत "लाच" हा योजिला आहे. या दोषाचा अन्वर्थक शब्द संस्कृत भाषेत नाहीं. मला वाटतें कीं, लाचाचा गुन्हा आणि त्यास शासन हा प्रकार प्रथमच या देशांत इंग्रजांनीं चालू केला. याचे पूर्वी कधीं प्रसिद्ध नव्हता.

यास्तव कवीनें म्हटलें आहे कीं–

"रिक्तहस्तं न गन्तव्यं राजानं देवतां गुरुम् ॥"

याजवरून लोकांमध्यें काय अभिप्राय आहे, हें समजतें. लोभाचा निषेध बहुत ठिकाणीं सांपडेल; पण लाचेचा सांपडणार नाहीं. जर कोणी दुसऱ्याचा न्याय वास्तविक करील आणि वास्तविक पक्षकारानें स्वइच्छेनें कांहीं न्यायकर्त्यास दिलें तर तें घ्यावें किंवा नाहीं. याचें उत्तर शास्त्रांत कोठें नाहीं. लोभाच्या वचनावरून इतकेंच होतें कीं, न्यायकर्त्याजवळ कांहीं असूं नये. त्याणें निर्वाहा-पुरतें घ्यावें. स्वतंत्र असावें, त्याचा संसार फकिराप्रमाणें असावा, असा शास्त्राचा हेतु दिसतो.

ब्राह्मणांनीं न्याय करीत जावा, असें शास्त्रमत आहे आणि ब्राह्मणाजवळ द्रव्य कोणतेंही प्रकारें राहूं नये. त्यांणीं द्रव्याचा धिक्कार करावा आणि भिक्षा मागून रहावें, हें धर्मशास्त्रांत पुष्कळ सांपडतील. जर ब्राह्मणानें कांहीं दान घेतलें तर त्याणें असुक प्रायश्चित्त करावें, असें आहे व श्राद्धास बसला, तर असुक प्रायश्चित्त करावें असें आहे. याचें कारण दानानें व श्राद्धाचे दक्षणेनें जें त्यास प्राप्त जाहलें, ते पंधरा दिवस त्यास घरीं बसवून किंवा त्यास कांहीं दुसरा खर्च घालून ते सरवावयाचें आणि ब्राह्मणास पुनः कफल्लक करून ठेवावयाचें, हा हेतु शास्त्राचा आहे. एकास दान केलें असतां पुण्य व दुसऱ्यास दान घेतलें असतां पाप, असें शास्त्र सांगतें. याचा हेतु दुसरा कांहीं दिसत नाहीं.

धर्मशास्त्रांत न्याय करण्याचे मार्ग पुष्कळ आहेत आणि त्यांतील नेम किती एक चांगले आहेत खरे; परंतु त्यांतील किती एक धर्म आहेत, ते पांच हजार, दहा हजार वर्षांमागील लोक जे होते त्यांसच योग्य. सांप्रत काळीं ते विलक्षण दिसतात. हिंदु लोकांची समजूत मुसलमानांचे समजुतीसारखी आहे कीं, धर्मशास्त्रांत जें कांहीं ज्ञान आहे, तें संपूर्ण आहे. मुसलमान लोक म्हणतात कीं, सर्व शास्त्रांचें आणि विद्येचें मूळ किमयासुद्धां कुराणांत आहे, परंतु हें म्हणणें अविचाराचें आहे. मागील प्राचीन काळचे पदार्थांची स्तुति करण्यांची चाल पडून गेली आहे, ही चूक आहे. सांप्रत काळीं राज्याच्या रीती लोकसत्तात्मक इत्यादिक ज्या निघाल्या आहेत, त्या धर्मशास्त्रांत सांपडणार नाहींत. धर्मशास्त्राप्रमाणें राजा स्वच्छंदी आहे. तो म्हणेल ती पूर्व दिशा व करील तो विधि, परंतु हें सांप्रत काळीं चालणार नाहीं व त्याचा कांहीं उपयोग नाहीं. हल्लीं स्वतंत्र राजे असल्यामुळें जागोजाग देशोदेशीं अनर्थ जहाले आहेत, ते मनांत आणावे.

आजच्या काळीं यथास्थित उत्तम राज्य अमेरिकेंतील युनाइटेड् स्टेट येथें आहे. त्याचे खालीं विलायतेंतील मिश्र राज्य व त्याचे खालीं इतर राज्यें. एशिया खंडांतील राज्यें तर फारच दुष्ट. तेथें लोकांस पीडा फार, यास्तव राज्यांत सुख होण्याकरितां लोकसत्तात्मक राज्य जरूर असलें पाहिजे. जा देशांत कायदे होतात, त्या देशांतील लोकांची संमति त्यांस असावी आणि कायद्याप्रमाणें राज्य चालविण्यास लाचाचा बंदोबस्त मुख्यत्वेंकरून जहाला पाहिजे. पूर्वींप्रमाणें आतां धर्मशास्त्र चालवूं म्हटलें, तर चालणार नाहीं. ही गोष्ट अशक्य आहे. आतां ब्राह्मण राज्यकारभारांत, शिपाईपणांत व व्यापारांत पडून सर्व धंदे करितात. इतक्यांस भिकारी करून कंदमुळें खावयास लावून तपश्चर्या करविणें, ही गोष्ट कोणी बरी असें म्हणणार नाहीं.

तेव्हां आतां लोक आहेत त्यांचा प्रतिबंध सांप्रत काळीं कसा करावा, हा विचार केला पाहिजे. यास्तव पूर्वींचे ब्राह्मण कसेही असोत, तसें आतां होऊं शकत नाहीं. आणि पूर्वींप्रमाणें करण्याविषयी जे आग्रह धरतील ते मूर्ख आहेत. ते वृद्धांस तरुण करण्यास इच्छितात, ते कालमान पहात नाहींत. जे कालमान पहातात आणि त्याप्रमाणें वर्तणूक करितात, तेच उत्तम शहाणे. म्हातारे लोक म्हणतात, कीं, इंग्रज लोकांच्या विद्या पुष्कळ आहेत. पण आम्हांस त्यांचें काय करावयाचें आहे? आमचा आजपर्यंत काळ गेला कीं नाहीं? मागले पुरुष शहाणे होते कीं नाहीं? परंतु हें म्हणणें केवळ अज्ञानाचें. मागले कांहीं पुरुष मागले काळीचे अज्ञानी लोकांत शहाणे होते.

म्हणून ते आता शहाणे आहेत असें नाहीं. परशुरामानें पृथ्वी निःक्षत्रिय केली; पण भीष्म असतांना कांहीं झालें नाहीं. तसें, जोपर्यंत इंग्रजासारखे शहाणे लोक इकडे येत नवते, त्याच काळीं हे लोक शहाणे, बुद्धिवान् व विद्वान् होते; कारण वरिष्ठांचा अभाव होता.

परंतु आतां नवीन युद्धादिकांच्या युक्ति इंग्रजांनीं आणल्या आहेत. त्यापुढें कोणताही हिंदु राजा जय पावला नाहीं. कारण शहाण्यापाशीं वेडा टिकत नाहीं. हें केवळ प्रारब्ध नाहीं, पण शहाणपणच आहे; परंतु अज्ञानानें आपले लोक आपला पूर्वीचा थोरपणा राखण्याकरितां इंग्रज शहाणे व त्यांमध्यें विद्या विशेष हें कबूल करीत नाहींत. असो.

तात्पर्य, लाचेचा गुन्हा शास्त्रांत कोठें नाहीं आणि याविषयीं कोणी जाणता मनुष्य प्रमाण दाखवील, तर आम्ही स्वीकारावयास आळस करणार नाहीं.

: ४ :

लो क हि त वा दी

इंग्रजी विद्या

पुणें शहरांत प्रथम १८३२ सालीं इंग्रजी शाळा घातली, तेव्हां लोकांची अशी समजूत होती कीं, इंग्रजांचा स्पर्श झाला, तर स्नान करावें व इंग्रजांची भाषा शिकली, तर ब्राह्मणपणा जातो. याजमुळें त्या समयीं रॉबर्टसन साहेब कलेक्टर यांनीं आर्जवानें गृहस्थांचीं मुलें थोडीशीं जमविलीं. नंतर कांहीं दिवसांनीं पुष्कळ लोकांच्या समजुती बदलल्या आणि खुशीनें मुलें पाठवूं लागले; परंतु पहिल्या समजुतीचे ब्राह्मण अद्यापि बहुत आहेत. त्यांच्यानें लोकांस इंग्रजी शिकण्यापासून तर बंद करवत नाहीं; परंतु आपल्या मंडळींत ते असें बोलतात कीं, जे इंग्रजी शिकले आहेत, ते नास्तिक, निर्दय, अधर्मी, अमर्याद आहेत. परंतु त्यांची योग्यता पाहिली, तर ते केवळ मूर्खांचे शिरोमणि आहेत. जरी त्यांस लिहितां वाचतां येतें. तरी ते पंडित नाहींत. त्यांची समजूत इतकी क्षुद्र आहे कीं लिहिणें आणि वाचणें हीं तमाम विद्या, यापुढें त्यांस कांही कळत नाहीं. तत्रापि त्यांस वाटतें कीं, आम्ही सर्वज्ञ आहों.

आतां असे गर्विष्ठ मूर्ख लोक आहेत त्यांना उत्तर देणें योग्य नाहीं. कारण कीं, शुद्ध वेड्यांशीं वाद करणें निर्फळ आहे. जरी माझें म्हणणें असें नाहीं कीं, केवळ इंग्रजी लिहितात आणि बोलतात ते विद्वान् असें मी म्हणत नाहीं. कारण कीं जे कुलकर्णी असतात ते लिहितात. त्यांस पंडित कोणी म्हणावें ? तसेंच जे केवळ 'रायटर'च आहेत, त्यांत विद्वान् म्हणणें अयोग्य आहे; परंतु ज्यांनीं विद्येचें रहस्य जाणलें आहे व बहुश्रुत आहेत, त्यांचा मात्र पक्ष आम्हीं घेतों. आणि आम्हांस ठाऊक आहे कीं, एक इंग्रजींतील विद्वान् शंभर संस्कृतांतील पंडित आणि एक लक्ष कारकून व दोन लक्ष भट हे सारखे कदाचित् होणार नाहींत. भटांचें वर्णन पूर्वी आम्हीं केलें आहे. हल्लीं कारकुनांचें थोडेंसें करितों.

ब्राह्मण लोक कारकुनीचा धंदा फार करितात, आणि गृहस्थ म्हणवितात. परंतु वास्तविक पाहिलें, तर त्यांस कळतें काय ? संध्येचीं अक्षरें साळुंकीसारखीं किंवा राघूसारखीं पाठ करितात. मोडीचें लिहितात, वाचतात. साधारण कामकाज

कारकुनीचें करतां येतें. परंतु हे मोठे प्रतीचें मजूरदार. जसे सुतार, न्हावी, धोबी तसेच ब्राह्मण कारकून; यांत त्यांचा विद्वानपणा कांहींच नाहीं. हजारों कारकून परंतु एकानें एक ग्रंथ तरी जन्मादारभ्य रचला आहे ? शहाणपणाची गोष्ट बोलण्यास एक क्षण घालविला आहे ? असे शुंभ जे आहेत, त्यांची योग्यता किती ? ज्यानें चार शास्त्रें अध्ययन केलीं आहेत त्यांची देखील योग्यता इंग्रजींतील पंडिताशीं बरोबर नाहीं. कारण कीं, मुळी आधीं संस्कृत भाषेंत ग्रंथ आहेत किती ? ग्रंथांचे संख्येवरून विद्येची तुलना होते, हा नेम आहे. सर्व पुस्तकें जर जमा केलीं, तर फार झालें तर एक कोठडी भरेल. तेव्हां तितकीं जानें वाचलीं किंवा अवलोकन केलीं, त्याचें शहाणपण सारखें कसें होईल ? जितकें बीज तितकें पीक. जानें पायलीभर दाणे पेरलें आणि खंडीभर पेरलें, त्याचें उत्पन्न सारखें कसें होईल ?

इंग्रजीमध्यें तर कोट्यवधी ग्रंथ आहेत. त्यांत अनेक विद्या आहेत. तितक्या संस्कृतांत नाहींत. चौदा विद्या आणि चौसष्ट कला इतकी संख्या जेव्हां हिंदु लोक फार शहाणे व पराक्रमी व विद्येवर लक्ष देणारे होते व जेव्हां व्यास-वाल्मीकि होते, तेंव्हां इतकी गणना झाली आहे, परंतु इंग्रजींत एक हजार विद्या आहेत. प्रत्येक विद्येवर हजारोंच ग्रंथ आहेत. संस्कृतांत कांहीं विद्या इतक्या सूक्ष्म आहेत कीं, एक विद्येवर एक ग्रंथ जसा युद्धविद्येवर धनुर्वेद, दुसरा ग्रंथ नाहीं व धनुर्वेदही नाहींसा झाला. कोणी वाचीन म्हणेल, तर मिळावयाचा नाहीं. आणि इंग्रजींत जसें म्हटलें तसे आहेत.

याचें कारण संस्कृतांतील विद्येचे चाहाणारे ब्राह्मण होऊन गेल्यास दोन तीन हजार वर्षें झालीं. तेव्हांपासून ब्राह्मण मूर्ख झाले. विद्या म्हणजे काय, हें देखील विसरले. त्या शब्दाचा अर्थही त्यांस कळत नाहीं आणि जसे हिंदु लोक व्यासाचे वेळी विद्याप्रवीण होते, तद्वत् इंग्रज आतां आहेत. त्यांचे चित्त विद्येवर फार व ते ज्ञानी बहुत झाले, व त्यांचे ग्रंथ फार उपयोगी आहेत. हिंदु लोकांचे ग्रंथ जेवणावळीचे आहेत. तर इंग्रजी पंडित तो संस्कृतांतील पंडिताशी सारखा होईल कसा ? अशी जेव्हा पंडितांची गति, तेव्हां कारकून आणि भट हे काय पदार्थ ? हे तर कसपटें दिसतात. जो इंग्रजींतील पंडित आहे, त्यास किती विद्येचे ज्ञान असतें ? त्याची समजूत केवढी विस्तीर्ण ? आणि त्याचा विद्वानपणा केवढा ? त्याची योग्यता लोक समजत नाहींत. त्यास दूषण लावितात. इंग्रजींतील विद्वानांची अशी योग्यता आहे कीं, त्यास कोणताही विषय सांगा, त्याविशी तो ग्रंथ लिहूं शकेल. कोणत्याही विषयावर बोलूं शकेल. जें जें या पृथ्वींत आणि आकाशांत आहे, तें सर्व त्यास ठाकठकि दिसतें आणि चंद्र फिरतो, याचें आश्चर्य

त्यांस वाटत नाहीं. दगड वरती उडविला म्हणजे खालीं पडतो, याचें देखील कारण त्यांस माहीत आहे. तात्पर्य, त्यांस काणत्याही विषयीं आश्चर्य वाटत नाहीं.

कारकून हे भटाचे पंक्तीचे आहेत. मूळ हिंदु लोकांमध्यें विद्येचें मान इतकें कमी आहे कीं, त्यांस विद्या म्हणजे काय, हें अश्रुत आहे. जर कोणाची विद्या वर्णन करणें झाल्यास म्हणतात कीं, अमका केवढा शहाणा ! पत्र लिहितो ! मजकूर जुळून लिहितो. अक्षर चांगलें सुंदर. आतां हें कांहीं विद्वानाचें वर्णन झालें नाहीं. विद्वान् म्हणजे काय, जाची बुद्धि विशाल, जानें नवीन ग्रंथ ऋषींसारखे लिहावें, ते विद्वान्. हल्लीं गृहस्थांस यांतील कांहीं ज्ञान नाहीं. त्यांस धर्म म्हणजे काय, याचा अर्थ पांच हजार कारकून गोळा केले आणि पुसला तर सांगू शकणार नाहींत व संध्या कशाकारितां करितात, हेंही कोणांस ठाऊक नाहीं. असे अंधारांत जे लोक आहेत, त्यांस विद्येचें मूळ काय ठाऊक ? इंग्रजी विद्वान् पूर्वी हिंदुस्थानांत एक असतां, तर राज्य न जातें. हे भट कारकून असे मूर्ख जमा झाले, म्हणूनच हें राज्य बुडालें. जर विद्या पहिल्यासारखी असती तर, हिंदु लोकांची अशी अवस्था न होती; परंतु हीं जनावरें पाहिजे तेथें दोरीनें बांधावीं अशीं गरीब, म्हणून असें झालें. पुढें जरी हिंदु लोकांचें कल्याण झालें, तर इंग्रजी पंडितांचे हातून होईल, यांत संशय नाहीं.

कारकून व भट हे क्षीण झाले म्हणजे व इंग्रजी विद्या वृद्धिंगत झाली म्हणजे हिंदु लोक पूर्वस्थितीवर येण्यास उशीर नाहीं. हल्लींचे गृहस्थ व इंग्रजी शिकणारे विद्वान् याचें वैमनस्य असण्याचें कारण असें आहे कीं, त्यांचीं यांचीं मतें मिळत नाहींत. कारकुनांस असें वाटतें कीं, अंगरखा घालणें व गंध लावणें व आणीचा जोडा घालणें, हाच आमचा धर्म; तसें इंग्रजी विद्या-नांस वाटत नाहीं. कारण कीं, हे ज्ञानी आहेत, तेव्हां त्यांचीं मतें वास्तविक आहेत. ते म्हणतील डावे हातानें गरिबास पैसा दिला, तरी सारखाच, उजवे हातानें दिला तरी सारखाच; परंतु कारकुनास वाटतें कीं, जा हल्लीं चाली आहेत, तोच धर्म. चाली व रीति आणि धर्म यांचा भेद त्यांस कळत नाहीं. चालीस व रीतीस व धर्मास सारखेंच मानतात; कारण ते अक्षरशत्रु आहेत. व चालीविरुद्ध कोणी बोलेल, तर त्यास नास्तिक म्हणतात. नास्तिक म्हणजे काय, हेंही त्यास कळत नाहीं; परंतु ऐकीव शब्द माहीत आहेत. तसेंच निर्दय म्हणण्याचें कारण असें आहे कीं, गरिबास व विद्वानास धर्म करावा, तें जाऊस दुसऱ्यास देणें यास धर्म समजतात. शहाणे आहेत ते तसें करीत नाहींत. म्हणून त्यांस असें वाटतें कीं, हे निर्दय आहेत. जो विद्वान् आहे,

तो गरिबास धर्म करितो; परंतु ब्राह्मण,कारकून व भट यांचा अशी समजुती आहेत कीं, दांडग्या व मूर्ख भटांस धर्म करावा. अधर्मी म्हणतात कीं, याचें कारण असें आहे कीं, धर्म म्हणजे काय, हें यांस ठाऊक नाहीं, म्हणून असें म्हणतात.

वास्तविक पाहिलें, तर इंग्रजी विद्वानांप्रमाणें मला धर्मिष्ट कोणीच दिसत नाहीं. तो अनुभवेंकरून व ज्ञानेंकरून ईश्वराचें प्रतिपादन करितो. सर्वत्र तो आहे, असें त्यांस वाटतें. त्यास सर्वत्र ईश्वर दिसतो. ते त्याचे भजनांत तत्पर असतात, व जे कर्म करितात, ते ईश्वरार्पण करितात. व त्याची स्तुति करून कायावाचामनेंकरून ईश्वरास भजतात. कारण कीं, इंग्रजींत ईश्वराविषयीं अनेक ग्रंथ आहेत व इतर देशांतील जें सर्व ईश्वरी ज्ञान आहे तें सर्व इंग्रजींत आहे, व त्या ग्रंथांचे तर्जुमें त्या भाषेंत आहेत. याजमुळें शंभरपट जास्ती ज्ञान इंग्रजींत आहे. आणि अमर्याद म्हणण्याचें कारण असें आहे कीं, हिंदु लोकांची त्यांत कारकून व भट यांची मुख्यत्वेंकरून अशी चाल आहे कीं, गुलामगिरी करावी. लबाडी करावी. तोंडदेखलें बोलावें. खुशामत करावी. दुसऱ्यास बुडवावें. उगाच या-बसा इत्यादि फसविण्याकरितां मानपान करितात, आणि त्यास मर्यादा असें म्हणतात; परन्तु ही मर्यादा नव्हे. वास्तविक ज्ञानी आहेत, ते लबाडीचा व्यवहार करणार नाहींत, व गुलामाप्रमाणें कोणाची मर्यादा करणार नाहींत. ते खरेपणानेंच चालणारे. त्यांस हें कपट कशास पाहिजे ?

कारकून हे बहुधा भडवेपणांत असतात. जसा वरिष्ठ असेल व बोलेल तसें बोलावें. कोणीकडून तरी आपलें पोट भरावें. लाज राहूं न राहूं ! ईश्वराचें नांव तर त्यांचे मनांत मुळींच नाहीं. ईश्वर आहे याची खात्री असेल, तर त्याचें भय मानतील. बहुधा हिंदु लोकांमध्यें मर्यादा हा गुण नाहींच. कपटाशिवाय कोणाची कोणी मर्यादा करीत नाहींत. एखादा मोठे कामावर असला, म्हणजे त्यास पुष्कळ लोक चांगले म्हणतात. मेजवान्या करितात. परंतु हें सर्व मायावी. मनापासून नाहीं. परंतु जे विद्वान् आहेत, त्यांचा स्नेह, मर्यादा आणि माया ही अशी नसते. ते निष्कपटानें, निर्मळ अंतःकरणानें वागणारे असतात. यामुळें लोकांस अमर्यादा वाटते. त्यांची अशी समजूत आहे कीं, कोणी लबाडलुच्चा असला तर त्याचा मान करावा, त्यास थोर म्हणावें; परंतु विद्वान् हें कसें करील ? तसल्या थोरास तर लाथ मारणार, म्हणून अमर्याद म्हणतात; परंतु तसें नाहीं. आपण गर्दभ असलें, तरी घोड्यास ओळखावें, हें चांगलें.

तात्पर्य, पुण्यांतील व बाहेर ठिकाणाचा ब्राह्मणाचा मूढपणाचा समजुती लवकर जातील, तर बरें होईल. सारांश, इंग्रजी विद्वान् यांचा पक्ष आम्हीं सिद्ध केला आहे. आणि तो वास्तविक आहे. परंतु ब्राह्मणाचा मूर्ख समजुती याजमुळें ते भलतेंच समजतात.

◆ ◆ ◆

: ५ :

भा ऊ . म हा ज न

एका कुटाळ कवीचें कवन

" परमहंस मतप्रशंसा " या नांवाचें अष्टपत्री सांच्याचें एक लहानसें पुस्तक अलीकडेच गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध झालें आहे. या ग्रंथाचीं पृष्ठें चौदा आहेत, व त्याचा कवीश्वर ' रामकृष्ण अनंत जोशी पुणेंकर ' हा आहे. ग्रंथ श्लोक आर्या, अभंग, ओव्या, कटिबंध, सवाई, पदें , फकीका वगैरे प्रासांहीं बद्ध आहे.

कित्येक असामिनीं परमहंस असी आपणांस संज्ञा घेऊन ते हिंदु धर्मास विरुद्ध आचरण करीत असतात, व ते एक नवीन मत स्थापावयास पहात आहेत, असें लोकांत जघन्य झालें आहे. हें सर्वांस माहीतच आहे. तेव्हां या परमहंसमताचें खंडण करावें हा या ग्रंथाचा उद्देश दिसतो. यांत परमहंसाच्या कर्माचें जें वर्णन केलें आहे त्यांत कित्येक गोष्टी तर अशा लिहिलेल्या आहेत कीं त्या खऱ्या तर असण्याचा अगदींच संभव दिसत नाहीं. त्यांजवर ' परमहंस ' असा लोकापवाद आला आहे. (आणि हा लोकापवाद असें आम्हीं म्हणतों; कारण लोक बोलतात त्याचप्रमाणेंच जर वस्तुगत्या गोष्ट असती तर त्यांस श्रीपत शेषाद्रिप्रमाणें लोक बहिष्कृत केल्यावांचून राहते ना, व त्याणीं नयेच राहूं हें त्यांच्या धर्माभिमानास योग्य आहे.) त्यांतून कित्येक आमच्या ओळखीचे आहेत. यांजवर तर " शौच्या पाणी नको, श्वसा त्यजूं नको, कन्येसी सोडूं नको " इत्यादि वाक्यें लागू होत नाहींत, असें त्यांच्या अब्रूवरून व वर्तुणुकीवरूनहि साफ आम्हांस दिसतें. आणि ग्रंथकार ' रामकृष्ण अनंत जोशी ' याणीं क्षणभर विचार केला असतां तर हीं वाक्यें कोणत्या दिशेस लागू आहेत, हें त्यांच्या ध्यानांत सहज येतें.

आतां इतकें खरें कीं, अशा आरोपित लोकांपैकीं कित्येकांचें मत जातिभेद नसावे असें आहे व कित्येकांनीं उघडपणें स्वाभिप्राय लेखनद्वारा प्रगट केला आहे, आणि जे लोक हिंदी लौकिकांत दक्ष आहेत व जे फार सावधागिरीनें वागतात त्यांशीं तुलना केली असतां हे लोक आमळसे अविचारी आणि उतावळे दिसतात खरे, परंतु त्याचे जे अभिप्राय आहेत ते असत् आहेत असें पाश्चिम

दैशिक विद्यांच्या द्वारांत जे शिरले असतील त्यांचें मत त्यांजपुढें साक्षी भरणार नाहीं यात संशय नाहीं. परमहंसाचा आम्ही पक्ष धरितों असें कोणी समजूं नये. जे लोक हिंदुधर्माभिमानी असतील त्यांनीं युक्तीनें व सभ्य रीतीनें त्यांच्या मताचें खंडण करावें यांत आम्हांस फार संतोष होतो. पण हे मतवाले जातिभेद मानीत नाहींत त्यापेक्षां ते अन्य बीजाचे असावे ही एकच युक्ति ग्रंथकारानें लिहिली आहे तर याजवरून त्यांचें मत खंडून हिंदुधर्माचा बचाव करण्यास दुसरी युक्तिच नाहीं, असें होऊं लागेल, आणि आपले धर्मसंस्थापंक शंकराचार्य यानीं इतक्या प्रबल जैनाचे मताचें खंडन करण्यास कोणत्या प्रकारचे ग्रंथ केले आहेत व कशा प्रकारें वादविवाद केले हें सर्वांचे लक्षांत असेलच; परंतु जर कारितां 'रामकृष्ण अनंत जोशी' सारिखा एकदा कवीश्वर त्यांच्या पदरीं असता तर त्यांस एवढा आयास न पडतां 'अन्य बीज असल्यास कवि म्हणे मग निखालस बाटा रे' अशा एकाद्या महाराष्ट्र कारिकेंत जैन मताचें खंडन झालें असतें.

विद्या आणि एल्फिन्स्टन विद्यालय यांबाबत या ग्रंथकारानें जे अमूल्य स्वाभिप्राय लिहिले आहेत ते आम्हीं खालीं उतरून घेतों:—

'प्रभुराज्यधारकांनीं आणिवली । ह्या पुरांत सोसाटी ॥
मिशनरीही तद्वत झटली । अत्यंत भ्रष्टतेसाठीं ॥
नित्य सोसेटींत विद्याभ्यास । तेथें म्लेच्छांशीं सहवास ॥
आवडूं लागे कैफमनास । ज्वान मुलाला । कर्माचा लोप झाला ॥
गांजाभांग जिरणीस पडली । बरांडीवर इच्छा जडली ॥
ही उत्पत्ती कोणी कडली । ठाऊक आईला' ॥ इत्यादि.

हा कवि तर चावट आहे हें सर्व मुंबईत प्रसिद्धच आहे. आणि ह्याच्या कवनाची वास्तविक किंमत लोक जाणतच आहेत परंतु आधीं या लोकांस विद्येची अभिरुचि नाहीं. आणि तशांत अज्ञ लोकांच्या मनास सुकर्मापासून भ्रष्ट करावयास हा पाहत आहे म्हणून आम्हांस इतकें लिहिणें प्राप्त झालें. परंतु आम्हांस मोठें आश्चर्य हें वाटतें कीं, एकापेक्षां अधिक बडे लोकांनीं या ग्रंथास आश्रय दिला आहे. आणि अशी जी गांवांत बातमी उडली आहे, ती जर खरीच असली तर या असल्या नीच आणि बिभत्स कवनास एकापेक्षां अधिक बडे लोकांनीं आपला आश्रय द्यावा येणेंकरून त्यांस त्रिवार धिःकार असो.

◆ ◆ ◆

: ६ :

भाऊ महाजन

गुजराथ्यांचे महाराज

कोणाचेहि वास्तविक दोष काढून दाखविणें म्हटलें म्हणजे मोठें कठीण काम होय. जरी आपण त्यांचे हित इच्छून प्रीतीनें उपदेश केला तरी तो त्यास कडू लागेलच. तथापि परस्परांस सन्मार्गास लावण्यास प्रयत्न करीतच असावें; हा आपला धर्म आहे असें जाणून कोणाची भीड न धरितां आपलें काम बजवावें.

या मुंबईत गुजराती लोकांचे गुरु जांस साधारण शब्दें करून महाराज अशी संज्ञा आहे, त्यांचें महात्म फार वाढलें आहे. युरोप खंडांत रोमन क्याथोलीक पंथाचा मुख्य गुरु जो पोप त्याचप्रमाणें एथें चारपांच पोप आहेत. यांचा लोकांचें मन, बुद्धि, विचार, आत्मा यांवर इतका अधिकार आहे कीं, ते सर्वस्वी त्यांचे दासानुदास किंकर होऊन बसले आहेत. यामुळें त्यांस कोणताहि विचार सुचत नाहीं. सर्व देवधर्म, नीति, विद्या, ज्ञान, सुधारणूक जें कांहीं आहे तें महाराजापासीं आहे असें त्यांस वाटतें. त्या लोकांची आंधळी भक्ति इतकी आहे कीं, कित्येक गोष्टींत ते नीतीची व शुचिर्भूतपणाची मर्यादा उल्लंघून जातात. याप्रमाणें त्यांस गुरुवेड लागलें आहे. तेव्हां अशी भूल पाडणारे जे महाराज त्यांच्या गुणलक्षणांचें वर्णन करूं गेले असतां त्यांस लोक जो एवढा मान देतात तो अगदीं योग्य नाहीं. केवळ आळशी लोकांस मात्र साह्य करून देशांत दरिद्र, अज्ञान, अविचार व मूर्खपण यांची वृद्धी होण्याचीं हीं कारणें आहेत असें दिसून येईल.

एथें महाराज आहेत त्यांतून एका मोठया नामांकिताचें नित्य कर्म काय असतें याविषयीं त्यापासीं संघर्षण ठेवणाऱ्या एका मित्रानें जो वृत्तांत सांगितला तो येणेंप्रमाणें :

हे महाराज प्रातःकाळीं चार वाजतां उठतात तेव्हांपासून स्नानसंध्या, देवतार्चन यांत त्यांचे सुमारें तीन तास जातात. इतक्यांत भोळे लोक दर्शनास येऊं लागतात. त्यांची नऊ वाजेपर्यंत मोठी गर्दी जमती. नंतर लागलीच भोजनाची सिद्धता होत्ये. या भोजनांत असा एक विलक्षण प्रकार आहे कीं, भातखेरीज करून भाज्या, पक्कान्नें वगैरे सर्व पदार्थ स्वयंपाक करितात तो मात्र महाराजाच्या स्त्रियेनें

किंवा ती नसल्यास स्वत: (हिज होलिनेस) यांनीं केला पाहिजे. असो. भोजनोत्तर महाराजांची स्वारी वामकुक्षी करावयास जाती. ती दोन तासांनीं म्हणजे सुमारें ११ वाजतां गादीवर बसावयास येती. तेव्हां आर्जवी, ख्यालखुशाली, लुच्चे, तमासगीर, तालिमखानेवाले, तबलजी, सारंगे अशा प्रकारच्या हलकट पुरुषांकडून महाराजांचे मंदिर विशोभित असतें. गांवांत अमूक जिन्नस उत्कृष्ट आला आहे त्याची खरेदी करावी, अमकी कळावंतीण नामांकित आली आहे तिची बैठक अथवा नाच करावा, त्याचा खर्च अमक्या सावकाराच्या नांवीं मांडावा असे अनेक प्रकारचे विचार व मसलती होत असतात व त्याच वेळीं गंजिफा, सोंगट्या यांचे डावावर डाव चालतात. एवढ्यांत दोन प्रहरच्या आरतीचा वेळ होतो. ती झाल्यावर सायंकाळीं चार वाजतां स्वारी बाहेर फिरावयास निघते. पुण्यांतील सरदार लोकांचीहि सांप्रतकाळीं या स्वारीप्रमाणें मिजास नसेल. एथें दोन घोड्यांचा रथ, बरोबर दहा-पांच शिपाई तलवारी व सोटे बराबर घेऊन एकाद्यावर जणुं काय हल्ला करावयास जात आहेत असे मागूनपुढून धांवत असतात... ही स्वारी कधीं महालक्ष्मीकडेस, कधीं वाळुकेश्वरीं, कधीं परळास, कधीं माहिमास जात असत्ये. नंतर सायंकाळीं परत आल्यावर पुन: लोक दर्शनास येण्याची वेळ होत्ये.

ही भाऊगर्दी होऊन गेल्यानंतर भोजनोत्तर नृत्यगायनादि प्रकार चालू होतात; मग महाराज शयन करितात.

याप्रमाणें महाराजांचे दिनचर्येचें व रात्री चर्येचें वर्णन आहे. याशिवाय वाणी लोकांत अशी चाल आहे कीं, त्यांच्या घरीं लग्न, मुंज, अथवा कोणताहि उत्सव झाला किंवा व्यापारांत मोठा नफा मिळाला तर महाराजांस मोठ्या सन्मानानें घरीं निमंत्रण करून त्यांची पूजा करितात व दक्षणा देतात. ही दक्षणा गरीब यजमान असला तरी २५ रुपयांच्या खालीं नसत्ये. श्रीमंताची तर शेंकड्यावर गणती. या प्रकारचें निमंत्रण बहुतकरून प्रतिदिवशीं असतें. कनिष्ट पक्षीं म्हटलें तरी आठवड्यांतून चार-पांच होतात.

◆◆◆

: ७ :

भाऊ महाजन

भरत खंडाची प्राचीन व नवीन स्थिति

या हिंदुस्थान देशांत लोकांच्या राज्याची स्थापना होण्यापूर्वी एथील लोक अज्ञानसागरांत अगदीं निमग्न झालेले होते. या लोकांत व्यवहारोपयोगी म्हणून एकहि विद्या नव्हती असें म्हणण्यास कांहीं भय नाहीं, ज्योतिष आणि वैद्यक या व्यवहारोपयोगी विद्या आहेत व या थोड्याबहुत लोकांत आहेत हें खरें आहे. परंतु ज्योतिषाच्या व्यवहारांत जो वास्तविक उपयोग आहे त्याकडेस त्यांनीं त्या ज्योतिषाची योजना केलेली नाहीं. तर ग्रहण वर्तविणें, तिथी-मुहूर्त वगैरे सांगणें व धर्मसंबंधीं ढोंग आणि दांभिकपणा वाढवून गोरगरीब आणि अज्ञान अशा प्रजेला नागविणें या कार्याकडेस त्या विद्येचा उपयोग केलेला आहे. वैद्यक हें तर आलीकडेस बाहाडी शास्त्र होऊन गेलें आहे. या शास्त्राचा वैद्यांच्या अज्ञानामुळें उपयोगाच्या ऐवजीं गैरउपयोगच बहुधा फार होत असतो असें म्हटल्यास चिंता नाहीं. न्याय, व्याकरण, मीमांसा, वेदान्त वगैरे जीं शास्त्रें आहेत, तीं तर केवळ निरुपयोगी आणि शुष्क पांडित्याचीं आहेत. या सर्व शास्त्रांचे सिद्धान्त पाहूं लागलें असतां ते परस्परांशीं विरुद्ध असून त्यांपैकीं कित्येक नास्तिक मतें प्रतिपादक आहेत. पूर्वमीमांसा यांत वेदाला प्रामाण्य धरिलें आहे. इतकीच काय ती त्यांत आस्तिकत्वाची उगीच निशाणी आहे; नाहीं तर तें मीमांसाशास्त्र नास्तिकाचें शास्त्र असें म्हणण्यास कांहीं बाध नाहीं. या शास्त्रांत मंत्र याच देवता, याखेरीज दुसऱ्या देवता आहेत असा अर्थ नाहीं, असें मत आहे; त्या शास्त्रांत देवाशिवाय दुसरें कांहींच या ब्रह्मांडांत नाहीं; न्यायांत जीवात्मा आणि परमात्मा यांचा भेद कल्पिला आहे. सर्व गोष्टी स्वभावेंकरून घडून येतात, त्यांत ईश्वराकडेस कांहीं एक कर्तृत्व नाहीं व या मतांत पुरुषाची फुकट कल्पना केली आहे. ती केली नसती तरी सृष्टिक्रम चालण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं हें मत कांहींसें स्वभाववाद्यांच्या मतासारिखें आहे. या परस्पर विरुद्ध मतांत कोणतें तरी एक धरिलें पाहिजे. एकास सगळींच खरीं मानणें अशक्य आहेत. परंतु या लोकांनीं ही अशक्य गोष्ट शक्य करून दाखविली आहे. व हीं अशीं विलक्षण शास्त्रमतें मानणाऱ्या हिंदूंस आस्तिक म्हणावें किंवा नास्तिक म्हणावें या गोष्टीचा निर्णय ठरविण्यास कोणाचीही मती कुंठीत झाल्या-

वाचून राहणार नाहीं. याप्रमाणें एक शास्त्र नसल्यामुळें ग्रंथकर्त्यांस मनास वाटेल त्याप्रमाणें नवनवीं मतें व नवनव्या टीका करून, सगळा एकच ब्रह्मघोळ करून ठेवण्यास चांगली संधि सांपडली आहे. आणि या ब्रह्मघोळांत आतां आपणांस जो शास्त्रार्थ आवडत असेल तो सांपडण्यास व अज्ञान प्रजेची पाहिजे तशी समजूत करून त्यांस आपल्या सूत्रांत चालविण्यास कांहीं अडचण पडत नाहीं. असो.

या देशांत इंग्रज सरकारचा अम्मल बसल्यापासून या देशाची चर्या पालटत चालली आहे. उत्तरोत्तर नव्या तऱ्हेची प्रजा, नव्या तऱ्हेचे विचार, नव्या तऱ्हेचे सुधारणोपाय, नव्या तऱ्हेचीं धर्ममतें, नव्या तऱ्हेच्या विद्या, कलाकौशल्यें यांचा प्रादुर्भाव होत चालला आहे. लोकांच्या मनाची सुधारणा होण्याकरितां सावकारी आणि सरकारी शाळा स्थापिल्या आहेत, प्रस्तुतच्या वस्तुस्थितीची लोकांस माहितगारी होऊन त्यांचीं मनें जागृदवस्थेंत राहावी व सदसद्विचाराकडे लागावीं म्हणून वर्तमानपत्रें निघालीं आहेत, जागोजाग पुस्तकसंग्रहाची स्थापना होत चालली आहे, विद्येच्या विषयावर पुस्तकें निघूं लागलीं आहेत. आणि हा क्रम चांगल्याप्रकारें चालला असतां कांहीं कालेंकरून या देशाची बरीच सुधारणा होण्याचा संभव आहे.

पाद्री लोकांनीं संप्रदायाप्रमाणें प्रथमतः पुढें सरसावून मुलांच्या आणि मुलींच्या शाळा घातल्या, व हलक्या जातींच्या लोकाची स्थिति चांगली करण्याकरितांहि निराळ्या शाळा घालून त्यांस ऐहिक आणि पारमार्थिक ज्ञान प्राप्त करून देण्याविषयीं प्रयत्न चालविला आहे. यांच्या मागून सरकारनें शाळा घातल्या आहेत. सरकारी शाळांत ऐहिक ज्ञान मात्र शिकवितात, कोणताहि धर्म शिकविण्यास त्या शाळांत मनाई आहे आणि वस्तुतः पाहतां ही गोष्ट रास्त आहे.

मेघ समुद्राचें पाणी आपल्या किरणांहीं शोषण करून ते पुनरपि समुद्राप्रत पोंचवितो, त्याप्रमाणें या शाळेंत शिकलेले लोक द्रव्याचा, ज्ञानाचा, आणि काळाचा कांहीं तरी अंश आपल्या स्वदेशीय ज्ञानार्थी लोकांस पोहचवितील असी आशा जसी सफळ व्हावी म्हणून आशा आहे तेवढी होईल असा रंग दिसत नाहीं. या शाळांत शिकलेल्या लोकांमध्यें गर्विष्ठ, स्वार्थी, नास्तिक, आणि अर्ध्या हळकुंडानें पिवळीं झालेलीं असींच पुष्कळ उदाहरणें आढळण्यांत येतात. इंग्रेजी भाषा, विद्या आणि विचार यांचा त्यांस परिचय होऊन त्यांची स्वधर्मावरून श्रद्धा उडत चालली आहे, व त्यांस दुसरा कोणताच अवलंब नसल्यामुळें त्यांची स्थिति तरंगल्याप्रमाणें झाली आहे. लोकांस इंग्रजी

विद्येच्या योगानें जें चांगले विचार उत्पन्न व्हावे ते न होतां, त्यांस पैका पुष्कळ मिळवून इंग्रेज लोकांप्रमाणें दोन घोड्यांच्या चारटांत बसून फिरावें, त्यांच्यासारखीं सुखें भोगावीं अशी अत्युत्कृष्ट इच्छा सफळ होणें बहुतांच्या नशिबांत येत नाहीं. यामुळें त्यांच्या आंगी स्वदेशाभिमान उत्पन्न होऊन इंग्रेजाच्या, इंग्रेजाचा राज्याचा तिरस्कार करूं लागतात. आणि कदाचित् दैवयोगेंकरून त्यांस शें दोनशें रुपये दरमाहा झाला असतां दरिद्रदशेंतील आपला पूर्वींचा स्वदेशाभिमान पेटींत टाकून ठेवून खुशाल जुन्या लोकांप्रमाणें वर्तणूक करूं लागतात. मग त्या जुन्या लोकांत आणि या नवीन लोकांत भेद म्हणून इतकाच राहतो कीं, जुन्या काळाचे भाविक लोक आपल्या द्रव्याचा निदान कांहीं ना कांहीं तरी अंश त्यांच्या समजुतीप्रमाणें धर्मकृत्यास लावीत असतात आणि हे लोक अगदी शठ असतात. भटांस देऊन कांहीं उपयोग नाहीं म्हणून ते त्यांच्या कधीं उपयोगास पडत नाहींत; आणि विद्येच्या कार्यांस व देशसुधारणेच्या कामास त्यांस सामर्थ्य नाहीं म्हणून ते कांहीं सहाय्य करीत नाहींत. स्वशरीरसुखाकडेस आणि पोकळ डामडौल आणि फुशारकी या कृत्यांस जितका पैसा अवश्यमेव लागणार तितकाच मात्र त्यांचा खर्च असतो, आणि अशाच प्रतीची जर करितां नवीन विद्वज्जन प्रजा होऊं लागली तर असल्या लोकांपासून या देशाचें काय कल्याण होणार आहे, हें उघडच आहे.

◆◆◆

: ८ :

भाऊ महाजन

आनंदनाम संवत्सराचें वास्तविक वर्षफल

तारीख २९ (मार्च) सन १८५४ बुधवार या रोजीं हिंदुलोकांचें नवें वर्ष निघालें. या वर्षाचें नांव आनंद असें आहे. त्यापासून लोकांस बरेंवाईट काय फळ प्राप्त होईल याचें भविष्य जोशानें पंचांगांत लिहिलें आहे. तें श्रवण करण्यास भोळे हिंदू लोक प्रतिपदेच्या दिवशीं मोठ्या उत्कंठतेनें देवळांत किंवा एखाद्या श्रीमानाच्या घरीं अथवा दुसऱ्या एखाद्या प्रसिद्ध ठिकाणीं जिकडे तिकडे एकत्र जमले असतील. जे वृद्ध व जुन्या समजुतीचे आहेत ते या भविष्यावर विश्वास ठेवितात. परंतु जे सुशिक्षीत व सुधारलेले ते हें सर्व ढोंग आहे असें मानितात, कारण भविष्य सांगणें हें ईश्वरानें या भटांच्या स्वाधीन केलें नाहीं. या वर्षांत काय काय होईल याविषयीं ब्राह्मणानें जें सांगितलें याचा विचार न करितां सुधारलेल्या लोकांच्या ज्योतिषावरून मी हें पुढील भविष्य लिहितों, तें ज्यांनीं भटाचें भविष्य ऐकलें असेल त्यांनीं त्यासीं ताडून पाहावें व कोणत्या गोष्टी निश्चयेंकरून घडून येण्याजोग्या दिसतात यांचा विचार करावा.

१. या वर्षीं पश्चिम हिंदुस्थानांत विद्येची वृद्धि विशेष होईल. कारण सरकारनें या कामांत पूर्वीपेक्षां अधिक द्रव्य दिलें आहे. तसेंच चहूंकडे पुस्तकगृहें, ज्ञानप्रसारक मंडळ्या इत्यादि स्थापित झाल्या आहेत व मराठी भाषेंत नवीन वर्तमानपत्रें दोन निघूं लागलीं व आणखी एकदोन निघणार आहेत. यावरून आनंदनाम संवत्सरांत विद्यावृद्धि होऊन बहुतांश आनंद वाढेल.

२. या वर्षीं व्यापारहि बराच वृद्धिंगत होईल. कारण आपल्या देशांत लोखंडी रस्ता सत्वर तयार होत आहे. व इलेक्ट्रिक टेलिग्राफहि लवकरच चालू होईल. तेणेंकरून बातमी चहूंकडे त्वरित पोहोंचेल व एका देशांत अन्नसामोग्रीचा तोटा पडला असतां दुसऱ्या देशांतून तिकडेस धान्यादि पदार्थ लवकर पाठवितां येतील.

३. या वर्षीं पाण्याचा मोठा तोटा पडेल, त्यामुळें सरकार किंवा सावकार मुंबईस परस्थळाहून पाणी आणण्याचा बेत करतील असें अनुमान होतें.

४. सरकार जर दारूचीं दुकानें न काढील (काढून टाकील) तर देशांत दरिद्र, दुःख, घातपात, रोग इत्यादिकांची वृद्धि होईल.

५. जे आळशी लोक उद्योग न करितां वडिलोपार्जित द्रव्याचा व्ययच करीत सुटतील ते लवकरच दिवाळें काढतील व भिकारी होतील.

६. जे स्वदेशाच्या सुधारणुकेस साह्य न करितां वाईट चालीची आवड धरून अविचारानें चालतील ते लज्जा पावतील.

७. ब्राह्मणलोक आपल्या महत्त्वाचा अभिमान न सोडतां आम्ही भूदेव असेंच मानीत राहतील, तर शूद्र व अतिशूद्र देखील त्यांच्यापेक्षां ज्ञानी व सन्माननीय होतील.

८. या वर्षीं बहुतकरून भरतखंडाच्या पूर्वेस, वायव्येस व पश्चिमेस महायुद्धें होतील व त्यांपासून या पृथ्वींत पुष्कळ रक्तपात होईल. शेकडों कुटुंबें उघडीं पडतील, सहस्रावधी स्त्रिया विधवा होतील व बाळकें पोरकीं होतील. हीं अनर्थांची चिन्हें आतांच दिसूं लागलीं आहेत.

९. या वर्षीं पृथ्वीवर बहुत ठिकाणीं खिस्ती धर्माची वृद्धि होईल व अन्य धर्मांचा क्षय होत जाईल.

१०. मंत्र, जादू, जोशीपण, भूत, प्रश्न, शकुन, मूर्तिपूजा, जातिभेद इत्यादि गोष्टींवर विश्वास न ठेवणारे या वर्षीं पुष्कळ होतील.

याप्रमाणें १० कलमें लिहिलीं आहेत. त्यांतील गोष्टी घडून येतील, असें सांगण्याप्रमाणें हीं आहेत. याशिवाय दुसऱ्या भविष्य गोष्टी सर्व जगासंबंधीं थोडक्यांत सांगतों. त्या येणेंप्रमाणें—

जो कोणी परमेश्वराचें भय धरून त्याच्या आज्ञा मानून चालेल त्याचें कल्याण होईल. ज्या कुटुंबांत परस्परांमध्यें प्रीती व सद्धर्म आहे तें कुटुंब सुखानें नांदेल. ज्या गांवांतील लोक दुराचरणाचा त्याग करून सरकारचे कायदे मानून चालतील, व विद्यावृद्धि करून शहाणे होतील, ते सधन व अब्रूवान होतील.

जो देश एकमतानें वागेल, वर्तमानपत्रांस आश्रय देईल, इतर देशांशीं मोठा व्यापार वाढवील तो फार सुधारेल. जीं राज्यें नीति-न्यायानें राज्य करतील, दुर्बळास जाचणार नाहींत व प्रजेच्या हितार्थ सर्वकाळ उद्योग करितील व महतेच्छा न धरितां आहे तेवढ्यांतच तृप्त होतील तर तीं बहुत दिवस टिकतील.

या वर्षी राजा परमेश्वर आहे. तो कधींहि बदलत नाहीं. त्यास मंत्री नको; कोशाधीप तोच, छत्राधीप तोच, रसाधीप तोच, अग्रधान्याधीप तोच, पाश्चिम धान्याधीप तोच. व्यवहारेश तोच, सर्वेश्वर तोच आहे. बुध, शुक्र, चंद्र, रवी, गुरु हे सर्व त्याचे सेवक आहेत. त्यांच्या हातीं काडीचीहि सत्ता नाहीं. ते केवळ निर्जीव पदार्थ होत. त्यांवर विश्वास ठेवून फळ नाहीं. त्या सर्वांचा व आपला उत्पन्नकर्ता जो परात्पर सर्वशक्ति, सर्वज्ञ, परम पवित्र, अत्यंत न्यायी, महा दयाळू, सदा वंदनीय ईश्वर त्याचीच भक्ति करावी म्हणजे या आनंद संवत्सराच्या ठायीं आनंदच होईल.

◆◆◆

: ९ :

कृष्णशास्त्री चिपळूणकर

योग्य अभिमान

कामक्रोधादि बहुतेक अंतःकरणवृत्तींविषयीं असें आहे, कीं त्या वृत्ती आपल्या स्वाधीन ठेवून त्यांची यथायोग्य योजना केली असतां, त्या मनुष्याचें सुख वाढवितात, व त्यास शोभा आणितात. पण त्याच वृत्ती उच्छृंखल होऊन त्यांच्या स्वाधीन मनुष्य झाला असतां, त्या त्याच्या दुःखास व अप्रतिष्ठेस कारण होतात. ह्याप्रमाणें एकच अंःतकरणवृत्ति अवस्थाभेदेंकरून गुण होते, किंवा दोष होते. अभिमानाची गोष्ट वर सांगितल्याप्रमाणेंच आहे. अभिमान म्हणजे थोरपणाची बुद्धि. हिचे विषय अनेक असतात. आपल्या देशाच्या थोरपणाविषयीं जी बुद्धि तीस स्वदेशाभिमान म्हणतात. तसाच जात्यभिमान, कुलाभिमान, धर्माभिमान, असे अभिमानाचे पुष्कळ प्रकार आहेत. मनुष्याच्या ठायीं देशांदिकांविषयीं अभिमान असावा, हें योग्य आहे; व हा अभिमान अंगीं असणें मोठा गुण आहे. ह्या अभिमानाच्या योगानें मनुष्याची आपल्या देशांत विद्या, कला, कौशल्य, संपत्ति, सौख्य, वगैरे वाढवण्याविषयीं प्रवृत्ति होते व वाढवण्याच्या कामांत अनेक प्रकारचे कष्ट पडले, तरी तो सुखानें सोसतो व अनेक प्रकारचीं संकटें आड आलीं, तरी तो तीं जुमानीत नाहीं. दुसऱ्यांनीं आपल्या देशाचा नाश करण्याचा किंवा अपमान करण्याचा प्रसंग आणिला असतां, त्याचें निवारण करण्याकरितां स्वदेशाभिमानी पुरुष मोठ्या संतोषानें आपले सर्वस्व खर्चावयास राजी होतो इतकेंच नाहीं, तर त्या कामाकरितां प्राणत्याग देखील तो मोठ्या संतोषानें करितो. देशाभिमान हा परिसासारिखा आहे. त्याचा संबंध ज्या ज्या गोष्टीस होतो, ती ती गोष्ट त्याच्या संबंधानें उत्तम व सुखावह होते; त्याच्या संबंधानें हालांचा हालपणा जातो; संकटांचें प्रतिबंधकत्व नाहींसें होतें; धननाश, प्राणनाश हे हितावह व सुकृतानें प्राप्त होणारे पदार्थ असे वाटूं लागतें. असे प्रसंग येऊन आपल्या हातून देशाची चाकरी घडावी, असा स्वदेशाभिमानी मनुष्यांचा नवस असतो.

हा स्वदेशाभिमान नुसता असून उपयोग नाहीं. त्याची योग्य योजना करावयास मनुष्याच्या अंगीं युक्तायुक्त विचार पाहिजे. आपल्या देशांतल्या

वास्तविक दोषांचा अभिमान मनुष्यास असूं नये, व आपल्या देशाचें बरें करण्याकरितां, किंवा त्यास थोरपणा आणण्याकरितां किंवा तो वाढविण्याकरितां त्यानें अयोग्य व नीच उपायांचें अवलंबन करूं नयें; आपणांस आपला देश जसा प्रिय व त्याचा उत्कर्ष व्हावा, असें आपणास जसें वाटतें; तसा दुसऱ्यास त्याचा देश प्रिय असतो, व त्यास त्याच्या देशाची बढती होण्याची इच्छा असते, असें सर्वांनीं मनांत आणून, दुसऱ्याचा उपमर्द करण्यास प्रवृत्त होऊं नये. अन्यायकर्म स्वभावतः वाईट होय; मग तें मनुष्यानें स्वहितार्थ किंवा स्वदेशहितार्थ केलें तरी त्यांत त्यास चांगलेपण नाहीं. स्वदेशाचा अभिमान हा गुण आहे; म्हणून त्यावरून परदेशाचा द्वेष करणें गुण होत नाहीं. आपल्या देशांतलें वास्तविक सुख व त्याची वास्तविक योग्यता वाढण्यास दुसऱ्या देशांत त्या गोष्टी कमी होण्याची अगदीं गरज नाहीं. खरा आनंद व खरी योग्यता हे पदार्थ सापेक्ष नाहींत. साखरेची गोडी, गुलाबाच्या फुलांचें सौंदर्य, मोतियाच्या फुलांचा सुवास, इत्यादि गुणांनीं मनुष्यास सुख होण्यास व त्या पदार्थांस योग्यता येण्यास दुसऱ्या पदार्थांची अपेक्षा नाहीं. ह्याचप्रमाणें एका देशांत विशेष धन होण्यास व त्या देशांतलें चातुर्य व ज्ञान वाढण्यास दुसऱ्या देशांत त्या गोष्टी कमी असण्याची काय गरज आहे? योग्य देशाभिमान वाहणारा पुरुष आपल्या देशाचा वास्तविक उत्कर्ष इच्छितो, दुसऱ्याचा अपकर्ष तो इच्छित नाहीं.

देशाभिमान वाहणाऱ्या व स्वदेशाच्या हिताकरितां प्राणत्याग करण्यास उदार झालेल्या पुरुषांचीं मोठमोठीं उदाहरणें युरोपखंडाच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासांत फार आढळतात. प्राचीन काळचे ग्रीक लोक, रोमन लोक, अर्वाचीन काळचे स्वित्सर्लंदांतले वगैरे लोक स्वदेशाभिमान बाळगणें मोठा गुण लेखीत असत. ह्या लोकांत आपल्या देशाच्या कल्याणाकरितां, ज्यांनीं बहुत दुःखें सोसलीं आहेत, मोठमोठ्या सुखास व ऐश्वर्यास लाथ मारिली आहे व प्रसंगीं हर्षानें प्राण खर्चिले आहेत, असे पुष्कळ पुरुष आढळतात. अशा पुरुषांचा त्या लोकांत पराकाष्ठेचा मान असे. जिवंतपणीं त्यांस पुष्कळ चाहत; व मेल्यावर त्यांच्या कृत्यांचीं गीतें होत, व तीं लहानमोठ्या सर्वांच्या तोंडीं असत. देशाभिमान वागविणारा पुरुष अति थोर, व तो अभिमान ज्याच्या अंगीं नाहीं तो अति नीच अशा प्रकारच्या गोष्टी मुलांस समजावयास लागल्यापासून त्यांच्या कानीं पडत व त्यांस त्या गोष्टी नेहमीं शिकवीत, व देशाभिमानी पुरुषांची प्रतिष्ठा त्यांच्या नजरेस पडे, इत्यादि अनेक कारणांनीं तीं अंतःकरणवृत्ति त्याचे ठायीं दृढ होत असे. आपल्या ह्या देशाच्या इतिहासांत देशाभिमानाचीं फार उदाहरणें सांपडत नाहींत; परंतु त्यावरून ती वृत्ति अगदीं नाहीं असे म्हणतां येत नाहीं. ती वृत्ति रूपांतरानें पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडते.

ज्यास आपल्या विशेष गांवांचा अभिमान आहे, व त्या गांवांचा उत्कर्ष होण्यास झटणारे, असे लोक ह्या देशांत पुष्कळ होते, व अद्यापि आहेत. पुरंदऱ्यांस सासवडचा, रास्त्यास वाईचा, पटवर्धनांस सांगली, मिरज, वगैरे आपापल्या गांवांचा मोठा अभिमान असे; इतकें तर काय, हल्लीं बहुतेक गांवच्या कुळंब्यांस त्या त्या गांवचा मोठा अभिमान असतो. ह्या लोकांची ही वृत्ति अशी संकुचित होण्यास अनेक कारणें झालीं आहेत. हा देश पराकाष्ठेचा मोठा पडला, त्यांत तो फार दिवस परकीय लोकांच्या हाताखालीं होता व ह्या देशाचे लोकांस राज्यकारभाराकडे लक्ष देण्याचा प्रसंग प्रायः नसे. या सर्व गोष्टींमुळें आपल्या गांवांच्या पलिकडल्या गोष्टी त्यांस परकीय वाटून ते त्यांविषयीं उदासीन असत. हल्लीं सर्व एका सत्तेखालीं येऊन सर्व कारभार वगैरे एका रीतीनें चालूं लागला आहे; लोखंडी रस्ते वगैरे होऊन निरनिराळ्या लोकांचें विशेष दळणवळण होऊन विशेष संबंध होण्याचा रंग आला आहे. तसेंच बहुतकरून सर्वांस एकाच प्रकारची विद्या व शिक्षा प्राप्त होत आहेत व इंग्रजी ग्रंथांच्या अभ्यासानें स्वदेशाभिमान असणें मोठें भूषण आहे असें वाटावयास लागलें आहे. ह्या सर्व कारणांवरून आपल्या सर्व हिंदुस्थानच्या लोकांस एकत्व प्राप्त होऊन स्वदेशाभिमान उत्पन्न होईल, अशी आशा आहे.

देशाभिमान व जात्यभिमान कधीं कधीं एकच झाल्यासारखें होतात. ह्या स्थळीं ब्राह्मण, शूद्र इत्यादि धर्मकृत जाति घ्यावयाच्या नाहींत; तर भाषा, धर्म, रीतीभाती, इत्यादि गोष्टी ज्यांच्या सारख्या व इतर लोकांच्यापेक्षां भिन्न असतात, त्या लोकांची एक जात असा अर्थ घ्यावयाचा; किंबहुना ब्राह्मण शूद्र वगैरे जाती सुद्धां मुळीं वर सांगितलेल्याच कारणांनीं झाल्या, असें किती एक लोकांचें मत आहे. आतां तें मत खरें किंवा खोटें ह्याचा विचार आम्ही येथें करीत नाहीं. अशा प्रकारचा जात्यभिमान बहुतेक सर्व लोकांत सांपडतो. ग्रीक लोकांतला देशाभिमान कांहीं अंशीं जात्यभिमानासारखा होता. त्या लोकांस त्या देशांतल्या सर्व लोकांचा अभिमान होता, असें म्हणतां येत नाहीं. त्याच देशांतले जुने जे लोक होते, व ज्यांस, त्यांनीं दास केलें होतें, त्यांस त्या राज्यांत फारच दुःख व इजा असत. तशीच रोमन लोकांची गोष्ट कांहीं अंशी अशीच होती. तसाच ऐर्लंदांतल्या इंग्रज लोकांचा व युनैतेड्स्तेतच्या लोकांचा देशाभिमान जात्यभिमानस्वरूपच आहे.

स्वाभिमान म्हणून अभिमानाचा एक योग्य प्रकार सांगितला; त्याचें थोडेसें विवरण करितों. ज्या अभिमानानें आपल्या अंगचा थोरपणा वाढण्याची मनुष्यांची प्रवृत्ति होते, व दुसऱ्यानें केलेला तिरस्कार व उपमर्द साहत

नाहींत, त्या अभिमानास स्वाभिमान म्हणावें. मनुष्याच्या हा गुण अंगीं असणें फारच आवश्यक आहे. ज्याच्या अंगीं हा गुण नाहीं, ज्यास अपमानापासून व उपमर्दापासून वाईट वाटत नाहीं, तो मनुष्य अगदीं निर्माल्य व कवडीचा माल होय. रामशास्त्री म्हणून थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दींत व सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत एक मोठा विद्वान् व निःस्पृह ब्राह्मण होता. ह्या दोन राज्यांत त्याच्याकडे न्यायाधिशाचें काम होतें. ह्या ब्राह्मणाचें दरबारी लोकांत व बाहेरच्या लोकांत जितकें वजन होतें, इतकें वजन त्या वेळीं दुसरें कोणाचें नसेल. थोरला माधवराव पराकाष्ठेचा कडक व पराकाष्ठेचा आग्रही असतांहि, तो रामशास्त्री ह्यांस वचकत असे, त्यांचा शब्द तो कधीं मोडीत नसे. असा हा पुरुष इतक्या योग्यतेस वाढण्यास स्वाभिमान कारण झाला. त्याची गोष्ट अशी सांगतात कीं, तो पूर्वीं कोणी एका गृहस्थाच्या घरीं शिष्येगिरीच्या चाकरीस होता. त्या वेळेस त्याचें वय एकुणीस वीस वर्षांचें होतें. त्या गृहस्थास चौकडे करावयाचे होते, त्याकरितां त्यानें कितीएक मोत्यांच्या मोठमोठ्या जोड्या आणविल्या होत्या. ह्या जोड्यांची परीक्षक लोक परीक्षा करीत असतां, तो गृहस्थ पाय धूत होता व रामा शिष्या त्याच्या पायांवर पाणी घालीत होता; परंतु त्या वेळीं रामाचें लक्ष्य मोत्यांच्या जोड्यांकडे जाऊन पाणी यजमानाच्या पायांवर पडावें, तें मोरीत पडूं लागलें. तेव्हां यजमानानें कांहींसें रागावून "तुझें मन शुद्धीवर नाहीं; कोठें गेलें आहे." म्हणून विचारिलें असतां, रामानें प्रांजळपणें उत्तर केलें कीं, महाराज; माझें मन मोत्यांच्या, जोडीकडे गेलें होतें. मला वाटतें कीं, आपण असल्या मोत्यांचा चौकडा घालावा. त्या वेळीं यजमान हंसून म्हणाला कीं, ज्यानें सभा जिंकिली आहे, अशा विद्वानास किंवा ज्यानें तरवार गाजविली आहे, अशा शिपायास चौकडा शोभतो; शिष्यास शोभत नाहीं. असें यजमानाचें भाषण ऐकून रामानें काशीस जाऊन विद्याभ्यास करण्याचा निश्चय केला, व त्याचा दृढनिश्चय पाहून यजमान चांगला, उदार व परोपकारी होता, त्यानें द्रव्यद्वारें त्यास सहाय्य केलें. नंतर रामानें काशीस जाऊन विद्येविषयीं इतका परिश्रम केला, कीं रामा शागिर्दाचे महाविख्यात रामशास्त्री झाले. असो. हें सर्व कृत्य स्वाभिमानाचें होय. ह्या प्रकारचीं उदाहरणें मराठ्यांच्या राज्यांत व मुसलमानांच्या राज्यांत पुष्कळ झालीं आहेत.

स्वाभिमान अयोग्य रीतीनें वाढला म्हणजे त्यास गर्व असें नांव प्राप्त होतें. गर्व हा मोठा दोष आहे. ह्याच्या योगानें मनुष्याचा स्वतःचा अनेक प्रकारें नाश होतो, व दुसऱ्यांस पुष्कळ दुःख होतें. स्वाभिमान असून, ज्याच्या अंगीं युक्तायुक्त विचार असतो, तो मनुष्य गर्व करीत नाहीं. त्यास विचारा-

च्या योगानें कळतें, कीं आपला उपमर्द लोकांनीं केला असतां, आपणांस जसें दुःख होतें; तसेंच आपण दुसऱ्याचा उपमर्द केला असतां, त्यासहि होईल. तसेंच दुसऱ्याचा उपमर्द करून आपल्या अंगीं वास्तविक थोरपणा येत नाहीं, हेंहि तो समजत असतो; पण कधीं कधीं योग्य स्वाभिमान बाळगणाऱ्या मनुष्या-सहि मूर्ख व स्वतः गर्विष्ठ असे लोक गर्वाचा दोष लावितात. ज्या मनुष्यास स्वाभिमान असतो, त्यास दुसऱ्याची मिथ्या स्तुति करून आपणांकडे नीचपणा घेण्याचा व दुसऱ्याची नीचपणें खुशामत करण्याचा वगैरे त्रास असतो. तो दुसऱ्याचें हलकें उत्तर सोशीत नाहीं. ह्यावरून मूर्ख लोक त्यास गर्विष्ठ म्हणतात; पण दुसऱ्याचा उपमर्द करणें हें गर्वाचें वास्तविक लक्षण होय आणि वास्तविक विनय म्हटला म्हणजे आपल्या गुणांचा डौल न मिरवणें, दुसऱ्यास योग्य मान देणें व योग्य रीतीनें मृदु भाषण करून दुसऱ्याचें मन संतुष्ट करणें हाच होय. ह्यावरून वास्तविक स्वाभिमान व वास्तविक विनय यांचा विरोध आहे, असें आम्हांस वाटत नाहीं.

ज्या मनुष्यांत स्वाभिमान असतो, त्यास पराधीनपणाची मोठी लाज असते. ज्या गुणानें किंवा कसबानें आपला निर्वाह आपणांस करितां येईल, दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावयाची गरज लागणार नाहीं, असा गुण किंवा असें कसब संपादण्याविषयीं स्वाभिमानी पुरुष झटत असतो. जो पराधीन झाला त्याचा स्वाभिमान सुटत जातो. जो आज एक प्रकारचा अपमान सोसतो, त्याच एकच प्रकारचा अपमान होऊन रहात नाहीं. एक वेळ अपमान सोसला म्हणजे, दुसऱ्यांदा होतो; दुसऱ्यांदा सोसला म्हणजे तिसऱ्यांदा ह्याप्रमाणें त्याचा अधिकाधिक अपमान होऊन शेवटीं त्यास कोणत्याहि गोष्टीची शरम वाटेनाशी होते. श्रीमंतांच्या घरीं आश्रित मनुष्यांत वर सांगितलेल्या प्रकारचीं निर्लज्ज मनुष्यें पुष्कळ असतात. अशीं मनुष्यें जन्मास येऊन न आल्यासारखींच होत; किंबहुना मनुष्यजातीस तीं केवळ कलंक असें म्हटले तरी चालेल. तर अशी अवस्था नाहींशीं होण्यास वास्तविक उपाय हाच, कीं प्रत्येक मनुष्यानें, लोकांत ज्याची चहा आहे, असा कांहीं तरी गुण शिकत जावा; व स्वाभिमान असणें हें चांगलें, तो ज्यास नाहीं, तो मनुष्य अगदी गैर; अशी लोकांत साधारण समजूत झाली पाहिजे.

अभिमानाच्या सर्व प्रकारांत उत्तम प्रकार म्हटला म्हणजे सत्याभिमान. मनुष्यास सत्य म्हणून जी गोष्ट वाटते, ती निर्भयपणें बोलणें व त्या गोष्टीस कोणी दूषण दिलें असतां, त्याचें निवारण करणें, इत्यादि कृत्यांविषयीं मनुष्याची प्रवृत्ति सत्याभिमानानें होते. आपणांस जीं मतें किंवा ज्या गोष्टी खऱ्या वाटत

असतात, त्या कोणा एकास आवडत नाहींत; ह्याकरितां त्यापुढें त्या गोष्टी किंवा तीं मतें जो जो चोरितो, किंवा त्यांची निंदा ऐकतो, व कधीं कधीं आपण स्वमुखें निंदा करितो; तो मनुष्य मोठा नीच व पातकी समजावा. आतां हीं मतें किंवा गोष्टी वास्तविक खोट्या असल्या तरी, त्यास जोंपर्यंत खऱ्या वाटत आहेत, तोंपर्यंत त्यांची निंदा करण्यांत त्याला पातकच आहे, ह्यांत संशय नाहीं. ह्या स्थलीं पदार्थगत खरेपणा उपयोगी नाहीं; मनुष्यास खरें जें भासतें तेंच, "खरें" ह्यां शब्दानें समजलें पाहिजे. पहा, एका मनुष्यानें वास्तविक चोरी केली आहे; पण ती दुसऱ्या एका मनुष्यास ठाऊक नसतां, व उलटें त्यानें ती केली नाहीं, असें त्यास वाटत असतां, तो दुसरा मनुष्य पहिल्या मनुष्यानें चोरी केली म्हणून जर शपथपूर्वक साक्ष देईल; तर त्यास खोटी शपथ वाहिल्याचा व खोटी साक्ष दिल्याचा दोष येणार नाहीं काय? तो जी गोष्ट म्हणतो, ती वस्तुगत्य खरी आहे, तरी तेणेंकरून त्याचा दोष व नीचपणा हे तिळमात्रहि कमी होत नाहींत. ह्याप्रमाणेंच मतांची गोष्ट आहे. जें मत आपणांस खरें वाटतें; त्याचा सर्वकाळ अभिमान धरणें आपणांस अवश्य आहे; त्याची निंदा करितां उपयोगी नाहीं. आतां आपली मतें खोटीं असण्याचा संभव जर आपणांस वाटत असेल; तर त्यांचा आपण नेहमीं विचार करावा; परंतु जोंपर्यंत त्यांच्या खोटेपणाविषयीं आपली खातरी झाली नाहीं; तोंपर्यंत त्यांस खोटें म्हणणें फार वाईट होय.

सत्याभिमानी पुरुषांच्या गोष्टी युरोपाच्या इतिहासांत पुष्कळ सांपडतात. धर्मांतील मताविषयीं व लौकिक शास्त्रांतील मताविषयीं प्रामाणिक व सत्यपक्षपाती पुरुषांनीं अनेक दुःखें भोगिलीं आहेत, व कधीं कधीं जीव सुद्धां दिला आहे; पण त्यांस ज्या गोष्टी खऱ्या वाटल्या, त्याचा त्याग त्यांनीं कधीं केला नाहीं; व ज्या खोट्या वाटल्या, त्याचा अंगिकार केला नाहीं. आतां त्यांनीं धर्मासंबधीं ज्या मतांविषयीं इतकी इजा सोसली, तीं मतें वास्तविक खोटीं असलीं तरी त्या पुरुषांच्या अंगचा सत्याभिमान व सत्यप्रीति ही कमी म्हणतां येत नाहींत; कारण त्यांनीं जो अभिमान धरिला, तो ती खोटी समजून धरिला नाहीं; तर खरी समजून धरिला. पहा, आपल्यापेक्षां अगदी विरुद्ध मतें ज्यांस खरी वाटताहेत आणि आपलीं मतें ज्यांस खोटीं वाटताहेत, असल्या पुरुषांनीं आपल्या स्वतःच्या मतांचा अभिमान धरून त्या मतांबद्दल दुःख भोगिलें असतां, आपणांस त्यांस सत्याभिमानी समजून त्यांची स्तुतिच केली पाहिजे. सर्वज्ञ म्हटला म्हणजे एक ईश्वरमात्र होय; त्याला मात्र सर्व गोष्टींचें यथार्थ ज्ञान आहे. आपण सर्व मनुष्यें बुद्धीनें वगैरे कोतीं आहों. आपणांस अनेक प्रकारच्या भ्रांति होण्याचा संभव आहे. आपणांस आज ज्या गोष्टी खऱ्या वाटत असतात, त्याच उद्यां कधीं कधीं खोट्या असें नजरेस येतें; व

कधीं कधीं ह्याच्या विपरीत होते. तसेंच एका मनुष्यास एका गोष्टीविषयीं किती माहिती असली, तरी दुसऱ्या अनेक गोष्टींविषयीं त्यास अगदीं अज्ञान असतें. तेव्हां अशी अल्पज्ञ सर्वकाळ भ्रांति पावणारीं जीं आपण मनुष्यें, ह्यांनीं एकमेकांच्या विरुद्ध मतांविषयीं द्वेष करून एकमेकांस दुःख देणें हें मोठें मूर्खपणाचें व दुष्टपणाचें कृत्य आहे.

स्वाभिमान पुरुषांत राहण्याविषयीं व तो वाढवण्याविषयीं स्वतंत्रता जशी कारण आहे, तशीच ती त्याचे ठायीं सत्याभिमान रहाण्यासहि कारण आहे. जो मनुष्य दुसऱ्याचा मिंधा असतो, व दुसऱ्याच्या जिवावर पोट भरितो, तसल्या मनुष्याच्या अंगीं सत्याभिमान राहत नाहीं. मतभेदास्तव द्वेष करणें वास्तविक पाहतां वाईट खरें, तथापि अशा समजुतीनें वागणारे लोक फार थोडे. ह्यास्तव परोपजीवि मनुष्यास आपलीं मतें आपल्या यजमानाच्या मतांशीं विपरीत असल्यास त्यास तीं गुप्त राखावी लागतात, व बाहेरून यजमानाच्याच मताची चहा करावी लागते व प्रसंगच पडल्यास आपल्या स्वतःच्या मताची निंदा करावी लागते. मग तो असें करूं लागल्यास त्याच्या अंगीं सत्याभिमान व सत्यप्रीति हे गुण कसे वाढतील बरें ? कदापि वाढणार नाहींत.

आतां सत्याभिमानास स्वतंत्रता जशी कारण आहे, तसेंच सत्याभिमान धरणें चांगलें अशी लोकांत सामान्य समजूत असणेंहि कारण आहे, सत्याभिमानी पुरुष, थोर व स्तुत्य, व तोंडपुजे ढोंगी व नीच व निंद्य, असें पुष्कळ लोकांस वाटूं लागलें पाहिजे. असें झालें म्हणजे लोकांत तो गुण विशेष वाढत जातो. आतां अभिमानापासून मनुष्यामात्राचें हित किती झालें, हा विषय मोठा आहे, पण विचार केल्यास समजण्यास सुलभ आहे; ह्यास्तव त्या विषयाचें निरूपण ह्या स्थलीं केल्यास हा धडा फारच मोठा होईल; ह्यास्तव तें निरूपण येथें करीत नाहीं.

◆◆◆

: १० :

कृष्णशास्त्री चिपळूणकर

वाक्चातुर्य

मोठ्या सभेंत उभें राहून सुरस व सयुक्तिक भाषण करून ऐकणाऱ्याचें मन वश करून घेणें, ही मोठी उपयोगी व फार कठिण कला आहे. ही कला पुरी साधण्यास अनेक गोष्टींचें आनुकुल्य असावें लागतें; वाणी गोड असली पाहिजे; तसेंच ज्या विषयावर बोलावयाचें, तो चांगला अवगत असून तो सुबोध करण्याची शक्ति पाहिजे; तसेच ज्या लोकांत भाषण करावयाचे, त्यांची अक्कल किती आहे, त्यांच्या समजुती कशा आंहेत, त्यांचे रागद्वेष कोणकोणत्या गोष्टीं-विषयीं आहेत; हें सर्व बोलणाऱ्यास समजलें पाहिजे; तसेच त्याची मुद्रा व शरीर हींहि भव्य असलीं पाहिजेत; व बोलतांना भाषणांतील रस त्यास मुखचर्येनें व अंगविक्षेपानें लोकांस दाखवितां आला पाहिजे.

आतां ह्या गुणांपैकीं कितीएक गुण स्वाभाविक आहेत, व कितीएक अभ्यासानें यावयाजोगे आहेत; हें वाचणाऱ्याचे लक्षांत सहज आलें असेल; पण जे स्वाभाविक आहेत, त्यांतले सुद्धां किती एक मूळचे कमी दिसत असतां अभ्यासानें ते वाढतात. ही वक्तृत्वकला प्राचीनकाळच्या ग्रीक लोकांत व रोमन लोकांत फारच वाढली होती. ती वाढण्याचें एक मुख्य कारण असें होतें कीं, त्या दोन्ही लोकांत कितीएक वर्षें प्रजासत्ताक राज्य होतें, कोणास मोठा अधिकार मिळावयाचा तो प्रजेच्या बहुमतानें मिळे व कोणास कांहीं नवा फेरफार करणें झाला, तर पुष्कळ लोकांचा रुकार पडल्यावांचून तो घडत नसे. सारांश, राजसत्ताक राज्यांत अब्रू, संपत्ति, अंमल हीं प्राप्त होण्यास जशी राजाची कृपा लागते, तशी त्या गोष्टी प्राप्त होण्यास बहुलोकसमाजाची कृपा व अनुकूळता हीं लागत असत; आणि ज्यास चांगलें, सुरस व स्पष्ट भाषण करून आपला पक्ष सबल व चांगला भासवून देतां येई, त्याचा पक्ष लोकांस मान्य होई, ह्या कारणानें वक्तृत्वाची कला त्या राज्यांत पुष्कळ शिकत, तेणेंकरून ती फारच वाढली. ह्याचप्रमाणें हल्लीं इंग्लंड व फ्रान्स इत्यादि देशांत लोकांच्या सभा आहेत. त्या सभांत राजकीय कारभाराच्या गोष्टींचा विचार होतो; व ज्यास आपल्या पक्षाचें चागलें उपपादन करितां येतें, त्याचा पक्ष बहुतकरून लोकांस रुचून तो सिद्धीस जातो, ह्यामुळें त्या लोकांतहि सुरस, सयुक्तिक व स्पष्ट अशा रीतीनें

बोलण्याच्या कलेचा पुष्कळ लोक अभ्यास करितात. प्राचीन काळीं ग्रीस देशांत डिमास्थनीस म्हणून मोठा प्रसिद्ध वक्ता झाला होता. त्याच्या भाषणांत आवेश फार असे. असें सांगतात कीं, तो बोलावयाचा असला म्हणजे हजारों लोक त्याचें भाषण ऐकण्याकरितां दुरून येत असत. तसाच रोमन लोकांस सिसरो म्हणून एक महा नामांकित वक्ता होऊन गेला; त्याच्या भाषणांत माधुर्य गुण अप्रतिम असे. तसाच व अर्वाचीन काळीं इंग्लंडांत विलियम पिट् म्हणून एक वक्ता होऊन गेला; त्याची वक्तृत्व गुणाविषयीं फारच प्रशंसा करितात.

वक्तृत्वाचा गुण असणें फार उपयोगी व मोठें भूषण आहे. मनुष्यास पुष्कळ ज्ञान आहे, अनेक गोष्टींचीं माहिती आहे; पण आपल्या मनांतला सर्व भाव दुसऱ्याच्या मनांत आणून देतां येत नाहीं; तर त्या ज्ञानाचें व त्या माहितीचें स्वरूप होऊन आपल्या गुणानुरूप प्रतिष्ठा त्यास कदापि प्राप्त व्हावयाची नाहीं. एका मोठ्या करंड्यांत हजारों रुपयांची उंची कस्तुरी झांकून ठेविली आहे, पण तिचा वास्तविक मनोरम गंध बाहेर पडत नाहीं; तर त्या करंड्यास मोलाचा करंडा असें कोण म्हणेल ? कोणी म्हणणार नाहीं. लोकांस जी एकमेकाची अक्कल व हुशारी हीं कळतात, तीं एकमेकांच्या लिहिण्यावरून व मुख्यत्वें बोलण्यावरून कळतात. ह्यास्तव लोक ज्याची विद्वत्ता व बुद्धीहि कमी, परंतु वक्तृत्व ज्याचें चांगलें, त्यास वास्तविक विशेष विद्वान् व विशेष बुद्धिवान् पण वक्तृत्व गुणांत कमी, अशा पुरुषापेक्षां विशेष समजतील व त्यास विशेष मान देतील. आणि असें करण्यांत त्याजकडे तादृश दोषहि नाहीं. कारण लोक जे कोणास कमी जास्ती मानितात, ते त्यांच्या अंगीं वास्तविक जे गुण असतात, त्यांवरून मानित नाहींत, तर त्याचे जे गुण दिसतात त्यांवरून मानितात. तेंव्हा ज्याच्या अंगीं वास्तविक गुण फार पण दिसणारे गुण थोडे, तो आपल्या गुणांच्या मानानें योग्यता पावणार नाहीं हें स्पष्टच आहे.

आणखी दुसरी लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे, ती ही कीं, मनुष्यें दुसऱ्याचे अंगचें ज्ञान समजण्याविषयीं मोठासा प्रयत्न करीत नाहींत. ह्या गोष्टींचीं कारणें अनेक आहेत. साधारण मनुष्यांस स्वतःच्या अज्ञानामुळें ज्ञानाची फारशी गोडी नसते. व त्यांची वास्तविक योग्यताहि त्यांस कळत नसते. तेव्हां जी वस्तु त्यांस तादृश सुख देत नाहीं व जी फारशी हितकारक वाटत नाहीं ती प्राप्त होण्याविषयीं अर्थात् तीं फारशी मेहनत घेत नाहींत. तसेंच दुसऱ्याचा गुण कबूल करून त्याची चहा करण्याची लोकांस मोठी हौस आहे असें नाहीं; किती एकांचे ठायीं उलटा मत्सर असतो. तेव्हां दुसऱ्याचें वास्तविक स्वरूप समजण्याचे ते काय म्हणून

श्रम करतील ? तर ह्यावरून असें स्पष्ट सर्वांच्या ध्यानांत येईल, कीं आपण गुणी व विद्वान् असलों म्हणजे झालें; ते गुण व विद्वत्ता दाखवण्याविषयीं श्रम करण्याची आपणांस काय गरज आहे; हा अभिमान व्यर्थ आहे. लोकांत आपली मान्यता व्हावी, अशी जर इच्छा आहे तर आपल्या मनांतल्या उत्तम कल्पना सुरस व स्पष्ट व सुगम करून लोकांच्या अंतःकरणांत भरवून देतां येण्याची कला आपणांस शिकणें अवश्य आहे.

आतां कोणी परमार्थपर असतील, व त्यांस लौकिकाची पर्वा नसेल तर त्या पुरुषांस सुद्धां परोपकार करितां येण्याकरितां वाक्चातुर्य संपादिलें पाहिजे. आपणांस ज्या चांगल्या गोष्टी समजतात त्या बहुतांस कळवून द्याव्या, व तेणेंकरून आपल्या हातून होईल तितक्यांस कल्याणाच्या पंथास लावावें; हा सर्वांचा धर्म होय. कोणी आडवाटेनें काट्यांत किंवा वाघाच्या जाळीकडे जात आहे, किंवा जवळ सुंदर पाण्याचा तलाव असून तो ठाऊक नसल्यामुळें कोणी तान्हेनें मरत आहे; असें पाहून दयाळू व ज्ञाता पुरुष त्या अज्ञान मनुष्यास नीट वाटेस लाविल्यावांचून किंवा पाण्याचा रस्ता दाखविल्यावांचून राहील ? कधीं राहणार नाहीं; पण त्याच्या हातून परोपकार होण्यास त्यास त्या अज्ञान मनुष्यास आपला अर्थ समजावून दिला पाहिजे, व त्याच्या मनांत आपल्या सांगण्याचा खरेपणा बिंबविला पाहिजे. ज्ञात्यांस ज्या बहुत चांगल्या गोष्टी ठाऊक असतात, त्या अज्ञानांस समजून त्यांस खऱ्या वाटल्या असतां, त्यांपासून त्यांचे अनेक प्रकारें कल्याण व्हावयासारखें असतें; परंतु अज्ञानांस ज्ञान प्राप्त होऊन त्यांची खात्री होण्यास, ज्ञात्यांस, त्यांस स्पष्ट समजेल, त्यांस रुचेल, त्यांच्या अंतःकरणांत ठसेल, असा उपदेश करितां आला पाहिजे. ह्याकरितां धर्मोपदेशक, शिक्षक, इत्यादिकांचे ठायीं वाक्चातुर्य हा गुण असणें अत्यंत आवश्यक आहे.

ह्या देशांत विशेषेंकरून प्रस्तुतकालीं त्या कलेची फारच गरज आहे. ज्या देशांत लिहिण्यावाचण्याची कला पुष्कळ वाढली आहे, जेथें दरवर्षीं हजारों नवीन ग्रंथ होतात व लक्षावधि लोक ते वाचतात, त्या तसल्या देशांत वक्त्याचें काम पुस्तकें पुष्कळ अंशीं करितात. पण आपल्या देशांत वाचतां येतें, असे लोक सरसकट शेंकडा दोनचार कदाचित् निघतील व वाचण्याचा ज्यांस नाद असा हजारांत सुद्धां एक नियमानें सांपडणें विरळा. अशा हल्लींच्या स्थितींत सर्वांस समजेल व आवडेल; असें भाषण करणारे उत्तम प्रकारचे वक्ते फारच आवश्यक आहेत. अशा वक्त्यांनीं जितकें काम होईल, तितकें केवळ पुस्तकांनीं व्हावयाचें नाहीं, असें मला वाटतें.

ग्रीक लोकांत व रोमन लोकांत जे मोठे वक्ते होऊन गेले, त्यांनीं आपल्या भाषेंत जीं प्रौढ आवेशयुक्त व मधुर भाषणें केलीं, त्यांतलीं पुष्कळ अद्यापि उपलब्ध आहेत, व इंग्लिशांतहि बहुत नामांकित बोलणारे लोक झाले त्यांच्याहि भाषणांचीं पुस्तकें इंग्रजी भाषेंत आहेत; त्या भाषणांपैकी किती एकाचें भाषांतर करून त्यांतली खुबी, अर्थरचना चातुर्य व आपल्या लोकांस कळवावें, असें फार मनांत येतें. पण ती गोष्ट सिद्धीस जाण्यास सांप्रत मोठमोठ्या अडचणी बहुत आहेत. त्या लोकांच्या भाषा व आपली मराठी भाषा ह्यांच्यामध्यें भेद फार मोठा आहे. त्या भाषा फार प्रौढ, फार दिवसांपासून कमाविलेल्या अशा आहेत. आपली भाषा कोती व तींत ग्रंथ फारच थोडे, तेव्हां भाषांतर करतांना त्या भाषणाचा रस व खुबी हीं बहुत करून नाहींशी होतात. ह्याखेरीज तीं बहुतेक भाषणें, कांहीं विशेष प्रसंगांस लक्षून आहेत; ह्यामुळें त्या लोकांचा इतिहास व सामान्य समजुती, ह्यांची चांगली माहिती असल्यावांचून त्यांचें भाषांतर वाचणाऱ्यास स्पष्टपणें कळावयाचें सुद्धां नाहीं; मग तें वाचून त्याच्या मनांत रसाविर्भाव कोठून होणार ? तथापि कांहीं एकदोन भाषणाचें भाषांतर करून कांहीं थोडा तरी त्या लोकांतल्या त्या वक्तृत्व गुणाचा मासला दाखवितां आला तर यत्न करून पहावा, असें मनांत आणून हीं पुढील एकदोन भाषणें लिहिलीं आहेत.

◆◆◆

: ११ :

कृष्णशास्त्री चिपळूणकर

मराठी व्याकरणासंबंधानें कांहीं विचार

हल्लीं मराठी शाळेंत जे विषय शिकवितात, त्यांपैकीं व्याकरण हा एक मुख्य विषय आहे. परंतु या विषयास मुख्यत्व जें आलें आहे. तें बहुत करून जबरीनें आलें आहे; विद्यार्थी व शिक्षक यांच्या मनांत या विषयाचें महत्त्व बिंबून तें आलें आहे, असें आम्हास वाटत नाहीं. अभ्यासाच्या विषयांत व्याकरणाची गणना आहे व परीक्षेंत तो विषय येतोच तेव्हां तो शिकलाच पाहिजे म्हणून विद्यार्थी शिकतात व शिक्षक शिकवितात. एरवीं तो विषय त्यांस तादृश महत्त्वाचा वाटतो असें दिसत नाहीं. वास्तविक पाहिलें असतां वरील स्थिति कांही अंशीं स्वाभाविकच आहे. लिहिणें, वाचणें, हिशोब या सारखा व्याकरणाचा उपयोग साधारण मनुष्याच्या लक्षांत येण्यासारखा नाहीं. गणित, भूमिति, समीकरणें, यांसारखी सूक्ष्मबुद्धी व कल्पकपणा दाखवून प्रतिष्ठा मिळविण्याजोगाही तो विषय नाहीं. आतां ज्यांच्या विवरणास व व्यवस्थेस सूक्ष्म बुद्धी व प्रौढ कल्पना पाहिजेत, असे विषय व्याकरणांतही आहेत खरें; तथापि व्याकरणासारख्या विषयांत बुद्धी व कल्पना ही चालवायास दुसऱ्या किती एक विषयांची माहितगारी विशेष असावी लागते, तसें गणितांत वगैरे नाहीं. तसेंच गणितादि विषयांचें स्वरूप असें आहे कीं, त्यांतील उपपत्ति इतकी उघड असते कीं, ती नाकबूल करण्यास जागाच उरत नाहीं; परंतु व्याकरण, इतिहास इत्यादि विषयांचें स्वरूप असें आहे कीं, त्यांत तसली उपपत्ति प्राय: संभवतच नाहीं. पहा, काटकोन त्रिकोणांतील काटकोनासमोरच्या बाजूचा वर्ग दुसऱ्या दोन बाजूंच्या वर्गा-बरोबर असतो. या भूमितींतल्या सिद्धांताची उपपत्ति उघड करून वादीच्या गळ्यांत घालता येते, तसा प्रजाकसत्ताक राज्यप्रकार इतर राज्य प्रकारांपेक्षां चांगला किंवा वाईट हा इतिहासांतला सिद्धांत किंवा "त्यानें तिला मारिली" हा प्रयोग अशुद्ध किंवा शुद्ध हा व्याकरणांतला सिद्धांत, यांची उपपत्ति वादीच्या गळ्यांत घालून त्यास निरुत्तर करतां येईल असें कोण म्हणेल ! व्याकरणरूप विषयाचें महत्त्व वाढत नाहीं, याचें आणखी एक कारण असें दिसतें कीं, तो विषय चित्तवेधक नाहीं. इतिहास, चरित्रें, काव्यें यांत सुंदर व चमत्कारिक गोष्टी

असल्यानें त्यांनीं मनोरंजन होतें. तसेंच पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, यंत्रशास्त्र, यांत तितक्या मनोरंजक गोष्टी नसल्या तरी सृष्टींतील अनेक चमत्कार समजून मनास मौज वाटते. परंतु व्याकरणांत तसें काय आहे ? त्यांत शब्दांचा व त्यांच्या अवयवांच्या घटनेचा सदा विचार असणार. त्यापासून ती करमणूक कोणती होणार आहे ? आतां कधीं कधीं असें आढळतें कीं, विषय तादृश मनोरंजक नसला, तरी तो फार उपयोगी असल्यानें त्याच्या अभ्यासाकडे लोकांचें मन लागतें. वैद्यक अशा प्रकारचें उदाहरण आहे. रोगांच्या गोष्टी मनोरंजक नाहींत इतकेंच नाहीं, तर त्या उलट्या त्रासदायक व किती ठिकाणीं किळस आणणाऱ्या सुद्धां आहेत; परंतु त्या ज्ञानाचा उपयोग अतिशय असल्यामुळें लोक वैद्यकाचा अभ्यास करतात. हाही गुण लोकांच्या मनांत एकदम भरावयासारखा मराठी व्याकरणांत नाहीं. मराठी व्याकरणांत उपयोगरूप गुण मुळींच नाहीं, असें आम्ही म्हणत नाहीं. परंतु त्याचा तो गुण साधारण मनुष्याच्या लक्ष्यांत लवकर येईल असें आम्हास वाटत नाहीं. ज्याची जन्मभाषा नव्हे, त्यास ती येण्यास तिच्या व्याकरणाचा जसा उपयोग उघड पडतो, तसा तो, ज्याची जन्मभाषा आहे, त्यास पडत नाहीं. मराठी लोकांस संस्कृत अगर इंग्रजी वगैरे भाषा येण्यास त्या त्या भाषांच्या व्याकरणाचें ज्ञान जसें अवश्यक आहे, तसें त्यांस मराठी भाषा येण्यास तिच्या व्याकरणाचें ज्ञान अवश्यक पाहिजे असें म्हणतां येत नाहीं. व्याकरणाच्या योगानें विभक्तींचे व क्रियापदांचे वगैरे प्रत्यय व ते जोडण्याचे नियम वगैरे समजले असतां परकीय भाषा शिकणारास तितके शब्द अधिक समजलेसे होतात. परंतु जन्मभाषेच्या संबंधानें पाहतां वरील म्हणणें खरें भासत नाहीं. जन्मभाषा मनुष्यास व्याकरणाही पेक्षां उत्तम जें साधन, म्हणजे अनुकरण त्याच्या मदतीनें प्राप्त झाली असते. भाषा येण्यास व्याकरणापेक्षां अनुकरण हें उत्तम साधन ही गोष्ट किती एक वाचणारास कदचित् समजली नसेल; व तो विषय चमत्कारिक व समजून घेण्याजोगा आहे, यास्तव त्याविषयीं थोडेसें लिहितों.

मनुष्यास जन्मभाषा जी येती ती, लहानपणापासून बोलतांना ऐकल्यानें त्यास येती. जे जे शब्द व वाक्यें लोक बोलतांना त्याच्या कानीं पडतात. त्यांचें तो अनुकरण करतो, म्हणजे तेच शब्द व वाक्यें तो स्वतः बोलूं लागतो आणि या रीतीनें सर्वांस आपापल्या जन्मभाषा येतात. या अनुकरणानें भाषा जशी पूर्णपणें येती, तशी व्याकरणाच्या ज्ञानानें कदापि यावयाची नाहीं. व्याकरण हें भाषेंतील व्यापक नियम काढून त्यांच्या सहाय्यानें भाषा शिकवितें; परंतु कोणत्याही भाषेंत व विशेषतः चालू भाषेंत वास्तविकपणें व्यापक असे नियम असत नाहींत. या नियमास अनेक अपवाद असतात, म्हणजे अनेक ठिकाणीं ते नियम मोडतात. उदाहरण, धातूच्या मूळ रूपाला "ला" प्रत्यय जोडला

असतां भूतकाळचें क्रियापद होतें, असा सामान्य नियम आहे; जसें, निजला, बोलला, उठला, इत्यादि. परंतु केला, मेला, झाला, उडाला, निघाला, इत्यादि रूपांत वरील नियम चालत नाहीं. तसेंच कांहीं अकारांत स्त्रीलिंगी शब्दांस विभक्ति लागण्याचे पूर्वीं शेवटच्या अकारास ईकार होतो; जसें, चूल, चुलीस; मूल, मुलीस; चूक, चुकीस, इ०. परंतु किती एक त्याच प्रकारच्या दुसऱ्या शब्दांत अकारास एकार होतो; जसें वाट-वाटेस, भूक-भुकेस, वेळ-वेळेस, इ०. याप्रमाणें शेंकडों उदाहरणें देतां येतील. आतां कोणत्या धातूच्या व विशेषणाच्या संबंधानें कोणत्या विभक्तीचा प्रयोग करावा वगैरेंविषयीं तर व्याकरणांत सांगितलेले नियम फारच मोघम असतात. याप्रमाणें व्याकरणांतील नियम पूर्ण व अव्यभिचारी नसल्यामुळें नवीन शिकणारास त्यांच्यानें बिनचूक वाट दाखवितां येत नाहीं. कोणी केवळ व्यापार करण्याच्याच आधारानें जर एखादी भाषा बोलूं अगर लिहूं लागेल, तर त्यास आपला अभिप्राय दुसऱ्यास कितपत समजवितां येईल व तो उपहासास कसा प्राप्त होईल हें सुज्ञविचारी वाचणारांच्या सहज ध्यानांत येईल. कोणास कोणतीही भाषा उत्तम प्रकारें लिहितां व बोलतां यावयास, ती ज्यांची जन्मभाषा आहे, त्यांशीं नेहमीं भाषण करण्याची व त्या भाषेंतील उत्तम ग्रंथ वाचण्याची संवय जशी निश्चित कारण आहे, तसें दुसरें नाहीं. व वर सांगितलेलें कारण हें मागें वर्णिलेल्या अनुकरणाचाच एक प्रकार होय. यावरून अनुकरणाच्या योगानें ज्यास भाषा आली आहे, त्यास केवळ भाषा येण्याच्या संबंधानेंच पाहतां व्याकरण ज्ञानाची तादृश अपेक्षा आहे असें सिद्ध होत नाहीं.

याप्रमाणें मराठी व्याकरणाचें महत्त्व मराठी लोकांच्या मनांत न भरण्याची कांहीं कारणें वर दाखविलीं. तथापि त्या विषयाचा वास्तविक उपयोग नाहींसा झाला असें क्षणभरही कोणी समजूं नये. ज्याची जी जन्मभाषा आहे, त्यास ती लिहितां व बोलतां येण्यास त्या भाषेचें व्याकरण कळण्याची तादृश गरज नाहीं खरी, तथापि बोलणें व लिहिणें हीं कलेदाखल येण्यास व्याकरणाचें ज्ञान पाहिजे. ज्यास व्याकरण ठाऊक सुद्धां नाहीं त्यास सुद्धां स्वभाषा साधारण व्यवहारापुरती बोलतां किंवा लिहितां यावयास अडचण पडत नाहीं; परंतु ज्यास उत्तम वक्ता किंवा प्रौढ ग्रंथकार व्हावयाचें असेल, त्यास स्वभाषेच्या सुद्धां व्याकरणाचें ज्ञान फार उपयोगी पडतें. गाणारास जसें गायनशास्त्र, तसें वक्त्यास व ग्रंथकर्त्यास व्याकरण आहे. आतां उत्तम प्रकारची अनुकरणशक्ति व गळ्यांतून हवे ते सूर काढण्याचें सामर्थ्य हीं असलीं म्हणजे गायनशास्त्राच्या ज्ञानावांचूनही मनुष्यास जसें गाणें कधीं कधीं येतें, तसें मोठे बुद्धिवान असतात ते व्याकरणज्ञानावांचूनही कधीं कधीं मोठे वक्ते, व ग्रंथकार होतात. परंतु

सामान्यपणें पाहतां वाग्देवीचे असले आवडते कंठमणी या दुनर्येत थोडेच निपजतात. बहुतेकांस म्हटलें म्हणजे बहुत दिवस उपासना केल्यावांचून व श्रम भोगल्यावांचून ती प्रसन्न होत नाहीं. आतां उत्तम प्रकारें भाषा बोलतां किंवा लिहितां येण्यास केवळ व्याकरणज्ञान पुरें नाहीं; दुसऱ्याही पुष्कळ साधनांची गरज आहे; व्याकरणज्ञान हें त्या आवश्यक साधनांपैकी एक आहे, असें विचार केला असतां सर्वांस कबूल करावें लागेल. व्याकरण म्हणजे भाषेचें शास्त्र होय. यांत भाषा घटक जे शब्द त्यांची उत्पत्ति, घटना, जाति, परस्परांशीं संबंध वगैरे विषयीं विवेचन असतें. तेव्हा भाषेची रचना कशी होते याची उपपत्ति समजण्यास या शास्त्राचा उपयोग उघडच आहे.

आतां व्याकरणांत शब्दांची घटना, जाति व परस्परांशीं संबंध वगैरेंचें निरूपण असते म्हणून सांगितलें. त्या निरूपणापैकीं कितीएक भाग सर्व भाषांतील शब्दांस सारखा लागू असतो. सर्व मनुष्यांची विचारशक्ति सामान्यरूपानें सारखीच आहे व विषयग्रहण करणारें मनुष्यांचें मन व त्या मनास भासणारे बाह्य विषय, या सर्वांचा सामान्य स्वभावही सर्व ठिकाणीं व सर्व काळीं सारखाच आहे. यामुळें बहुतेक सर्व भाषांत शब्दांची विशेष स्वरूपें जरी निरनिराळीं असलीं तरी त्यांचा घटनाप्रकार, त्यांच्या जाति, त्यांचे परस्परांशीं संबंध व त्याचें अर्थबोधन करण्यांत प्रयोजन हीं प्रायः सारखींच किंबहुना अभिन्नहीं असतात, असें म्हटल्यास चालेल. यावरून बहुतेक भाषा विशेष शब्दांच्या दृष्टीनें भिन्नभिन्न असल्या तरी व्याकरण दृष्टीनें त्या सारख्या किंवा अभिन्न आहेत. असें म्हणण्यास चिंता नाहीं. आणि असें असल्यामुळें एका भाषेचें व्याकरण चांगले समजलें असतां, ते तत्सजातीय इतर भाषा शिकण्यास मोठें साधन होतें हें स्पष्टच आहे. नाम, विशेषण, क्रियापद, इत्यादि भेद सर्व भाषांत असले पाहिजेत व अर्थबोध करण्यांत त्यांचें प्रयोजनही सारखेंच असतें. कोणत्याही भाषेंतलें वाक्य घेतलें तरी त्यांत कांहीं पदार्थांवर कसलें तरी विधान असलेंच पाहिजे. जसें " रामा गेला " " गोविंदा धांवतो " इत्यादि वाक्यांत रामा व गोविंदा यांवर यथाक्रम भूतकाळाचें गमन व वर्तमानकाळाचें धांवणें यांचें विधान आहे. याप्रमाणें इतर वाक्यांत जाणावें. आतां ज्यावर विधान करावयाचें म्हणजे ज्याविषयीं सांगावयाचें, तो पदार्थ दाखविणारा शब्द नाम होय, व ज्याचें विधान करावयाचें म्हणजे, जें सांगावयाचें, तद्दर्शक शब्द क्रियापद होय. आतां ज्या पदार्थांविषयीं सांगावयाचें, तो कोणत्या प्रकारचा आहे. म्हणजे कोणत्या गुणानें युक्त आहे, हें दाखविण्याकारितां जो शब्द योजावा लागतो, त्यास विशेषण म्हणतात. यावरून हें ध्यानांत येईल कीं, मनुष्याच्या मनांत बाह्य पदार्थांविषयीं जसा बोध होतो व तो बोध दुसऱ्याच्या

मनांत आणण्याविषयीं मनुष्य ज्या रीतीनें यत्न करतो, त्या प्रकारावरून भाषेंतील शब्दांच्या निरनिराळ्या जाति झाल्या आहेत व त्या मनुष्यस्वभाव सर्वत्र सारखा असल्यामुळें सर्व लोकांच्या भाषांत असल्याच पाहिजेत. या वरील संक्षिप्त उपपादनावरून कोणत्याही प्रौढ भाषेचें व्याकरण शिकलें म्हणजे सामान्य मानवी भाषेचे सामान्य नियम शिकल्याप्रमाणें आहे, ही गोष्ट उघड होते.

हल्लींच्या काळांत मनुष्यास साधारण विद्वान लोकांत आपलें नांव गणलें जावें अशी इच्छा असल्यास, ती इच्छा पूर्ण होण्यास स्वभाषेपेक्षां निराळ्या एक-दोन भाषा तरी थोड्याबहुत शिकल्या पाहिजेत. इंग्रजी भाषेचें ज्ञान किती आवश्यक आहे व त्यापासून किती उपयोग आहे हें तर अगदीं साधारण मनुष्यास सुद्धां समजत आहे. तसेंच आपल्या देशांतील सर्व उत्तम ज्ञान जींत सांठविलें आहे. त्या संस्कृत भाषेची माहिती आपणांस सुशिक्षित म्हणविणाऱ्या प्रत्येक हिंदूस आवश्यक आहे, हेंही विचारी वाचणारांस सहज समजेल. तसेंच या विस्तीर्ण हिंदुस्थान देशाच्या निरनिराळ्या भागांतील लोकांचा व्यापारादि अनेक कारणांनीं संबंध होऊन त्यांत उत्तरोत्तर अधिकाधिक दळणवळण वाढत चाललें आहे. तेव्हां मराठी, गुजराथी, बंगाली, कानडी, तैलंगी वगैरे निरनिराळ्या प्रांतांतील लोकांस परस्परांच्या भाषा समजण्याची गरज व उपयोग हीं अधिक वाढत चाललीं आहेत, व या भाषांपैकीं कोणत्याही एकीचें व्याकरण चांगलें आल्यास इतरांचें व्याकरण व तद्द्वारा त्या इतर भाषा समजण्यास फार उपयोग आहे.

याखेरीज स्वभाषेचें व्याकरण शिकविण्यापासून असा एक लाभ आहे कीं, तो अभ्यास शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची विचारशक्ति व तर्कशक्ति या वाढण्यास कारण आहे. आपण जी भाषा बोलतों तद्घटक शब्दांच्या जाती किती, त्या जातींचीं लक्षणें काय, त्यांचा परस्पर संबंध कोणता, ते ते शब्द कसे साधावे, त्यांच्या साधनिकेचे नियम कोणत्या रीतीनें बांधावे इत्यादि विषयांच्या अभ्यासानें बुद्धि विचारक्षम होते व वाढते. याप्रमाणें व्याकरणाच्या अभ्यासापासून वास्तविक विचार करून पाहतां पुष्कळ नफे आहेत.

तेव्हां मोठा मनोवेधक नव्हे खरा, परंतु खरोखर मोठा उपयोगी असा जो हा विषय, म्हणजे मराठी व्याकरण, त्याविषयीं कांहीं निबंध लिहावे असा विचार करून आज हा प्रथम निबंध आमच्या प्रिय वाचणारांस सादर केला आहे. या विषयावर मराठींत विद्यमान ग्रंथ फार नाहींत; लहानमोठे तीन चार ग्रंथ आहेत. पहिलें बालव्याकरण. हा ग्रंथ मूलारंभीं शिकणाऱ्या मुलांकरितां असल्यामुळें फारच लहान आहे. व त्यांत मूळ विषयाचें दिग्दर्शन सुद्धां पुरें

नाहीं. दुसरा ग्रंथ गंगाधरशास्त्री फडके यांचें व्याकरण. हें व्याकरण पहिल्यापेक्षां मोठें असून त्यांत विषयसंग्रहही पुष्कळ आहे व त्या विषयाचें विवरणही बरेंच केलें आहे. तथापि या ग्रंथांत कांहीं विषय सोडले आहेत व ज्यांचें उपपादन केलें आहे, त्यांचें तें उपपादन किती एक अंशीं न्यून आहे; व किती एक ठिकाणीं दूषणग्रस्तही आहे. आतां तिसरा व सर्वांत मोठा ग्रंथ दादोकृत मराठी व्याकरण. या ग्रंथांत दुसऱ्याही पेक्षां अधिक विषयसंग्रह आहे व त्यांचें उपपादन विशेष विस्तार करून केलें आहे. तथापि याही ग्रंथांत आम्हांस पुष्कळ न्यूनता दिसतात. तथापि या ग्रंथांत जे अनेक गुण आहेत त्यांबद्दल त्यांस आम्ही मोठ्या संतोषानें चाहतो व त्याच्या योगानें विद्यावृद्धीस जें पुष्कळ सहाय झालें व अद्यापि होत आहे त्याबद्दल त्या ग्रंथकर्त्यांची प्रशंसा करणें व त्यांचे आभार मानणें अवश्य आहे असें आम्ही समजतों. मराठी व्याकरणरूप विषयास पूर्णता आणण्याविषयीं रावबाहादूर दादोबा पांडुरंग यांनीं बहुत शोध व पुष्कळ विचार केल्याची साक्ष त्यांचा ग्रंथ स्पष्टपणें देत आहे. त्या श्रमानें त्यांनीं पुढील ग्रंथकर्त्यांचे श्रम हलके केले यांत संशय नाहीं व या मदतीबद्दल पुढील मराठी व्याकरण कर्त्यांनीं रावबाहादूर यांचे उपकार मानणें अवश्य आहे. आम्ही पुढें जे निबंध लिहिणार आहों त्यांत आमचा व दादोबा पांडुरंग यांचा बराच मतभेद पडलेला दिसणार आहे व त्यांच्या मताविरुद्ध लेख येणार आहेत; तर तसें झालें तरी त्या ग्रंथकाराचे श्रम व योग्यता आम्ही ओळखीत नाहीं व त्याच्या त्या गुणांबद्दल आम्ही त्यांस योग्य मान देत नाहीं असें वाचणारांनीं अगदीं मनांत आणूं नये. म्हणून या प्रसंगीं त्यांविषयीं आमच्या मनांतील सन्मानबुद्धि आम्हीं स्पष्ट केली आहे. चौथा ग्रंथ रा. गंगाधर रामचंद्र टिळक यांचें लघुव्याकरण. हा ग्रंथ वर सांगितलेल्या दोन ग्रंथांचा व विशेषें-करून दादोकृत व्याकरणाचा फार थोडा केवळ संक्षेप आहे. यांत वर सांगितलेल्या ग्रंथांचे गुण नसतां त्यांतील किती एक दोष मात्र आहेत. शाळेंतील मुलांस जुन्या चालीप्रमाणें व्याकरणांतील कांहीं ढोबळ गोष्टी सांगण्यास टिपणादाखल हा ग्रंथ उपयोगी पडला तरी मराठी व्याकरणरूप विषयाचें विशेष व्यक्तीकरण होण्यास हा ग्रंथ अगदीं कारण नाहीं.

: १२ :

बा बा प द म न जी

यमुनाबाईच्या नवऱ्यास पत्र

विनंति विशेष,

आतां मीं एथें अधिक दिवस राहावें अशी माझी इच्छा नाहीं, मी आपल्याकडेस लवकरच येण्याचा बेत करीत आहें. माझी प्रिय आई माझी वाट पाहत असेल. तुम्ही तिचा शोध समाचार घेतां हें ऐकून मी तुमचा फार आभार मानितों. ती आतां एवढ्या चांगल्या स्थितींत आहे हें पाहून मला फार आनंद वाटतो, आणि जेव्हां मीं आपल्या पूर्वस्थितीचा विचार करितों तेव्हां माझ्या नेत्रांत अश्रु आल्याशिवाय राहत नाहींत. जर मी तसाच राहिलों असतों तर आजपर्यंत माझें काय बरें झालें असतें ! माझ्या लोकांनीं माझा काय परामर्श घेतला ? त्या पंढरपुरांत मी लंगोटी घालून उघडा बोडका फिरत असें, तेव्हां माझी विचारपूस कोणी केली नाहीं. लोकांपुढें हात पसरून भीक मागून पैसा अधेला मिळवावा, आणि कोणीं न दिला तर त्याला शेंकडों लबाड्या सांगाव्या, कधीं कधीं मीं चोरी करावी आणि दिवसभर गाईच्या गोऱ्ह्याप्रमाणें इकडे तिकडे भटकावें हाच माझा उद्योग होता. माझ्या प्रिय आईच्या पूर्वस्थितीचा विचार मनांत आला म्हणजे मला फार दुःख वाटतें, आणि तिच्यासारिख्या सहस्रावधी विधवा आज या हिंदुस्थानांत दुःखसमुद्रांत बुडाल्या आहेत, त्यांची स्थिति पाहून माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागतात. आमचे लोक कधीं जागृत होतील आणि त्यांस आपलें कर्तव्य कर्म कधीं समजूं लागेल ? अशा विधवांचीं दुःखें त्यांचे मनीं कधीं भेदतील, आणि ते त्यांचीं बंधनें केव्हां तोडतील ? मी पंढरपूर सोडल्यापासून त्या गांवांत सुधारलेल्या मताचे कित्येक लोकांनीं एक अनाथगृह स्थापन केलें आहे हें ऐकून मला आनंद वाटतो, आणि तेथें विधवांचा कळवळा बाळगिणारे कित्येक लोक आहेत हें सुचिन्हच होय.

माझ्या प्रिय आईला व माझ्या परोपकारी ताईला वैधव्यामुळें जीं दुःखें सोसावीं लागलीं तीं मला चांगलीं माहीत आहेत, त्यावरून समजतें कीं, या दुष्ट चालीनें ब्राह्मण, शेणवी, सोनार, परभू यांचें व दुसऱ्या हिंदूंचें अंतःकरण फार कठोर व निर्दय केलें आहे. तर हे लोक आपण होऊन कधीं तरी ही चाल

मोडतील काय ? नाहीं, नाहीं, अशी आशा धरणें व्यर्थ आहे. जें कांहीं करायचें तें आमच्या नव्या शिकलेल्या तरुणांनींच पुढें होऊन आतां केलें पाहिजे. पुढें वेळ येईल अशी वाट पाहात त्यांनीं बसूं नये. कोणत्याही सुधारणुकेच्या कामास प्रारंभीं अडचणी आल्याशिवाय राहणार नाहींत, तरी त्यांस तोंड देऊन धैर्यानें पुढें पाऊल टाकलेंच पाहिजे. आजपर्यंत जगांत जे मोठमोठे सुधारणुकेचे पुढारी झाले त्यांस अविचारी व अज्ञानी लोकांकडून निंदा, छळणूक, बंदीखाना व मरण देखील भोगावें लागलें, तरी त्यांनीं आपल्या रक्तानें आपल्या कामाचा पाया मजबूत घालून आपल्या मागून होणाऱ्या लोकांस त्यावर इमारत रचायास सुलभ उपाय करून ठेविला, आणि आतां त्यांच्या श्रमाचें व उद्योगाचें फळ लक्षावधि लोक अनुभवून सुख भोगीत आहेत.

तर त्यांच्या सारिखी कीर्ति व वैभव व सुख मिळविण्याची शक्ति व साधनें आपल्या सुधारणुकेच्या पुढाऱ्यांस नाहींत कीं काय ? त्यांस धैर्य देण्यास व सहाय्य करण्यास पुष्कळ लोक मनापासून खुशी आहेत. आपल्या बलिष्ठ व उत्कृष्ट सरकारनें तर या कामास मदत व्हावी म्हणून एक कायदा केला आहे. तसेंच एथील सर्व वर्तमानपत्रेंही या कामास अनुकूल आहेत, आणि एथील सर्व विद्यालयांत जे विचारशील विद्यार्थी आहेत ते सर्व ही चाल सर्वत्र प्रचारांत येण्याची चातकाप्रमाणें वाट पहात बसले आहेत. तर आतां कोणत्या गोष्टीची हरकत आहे ? जे सुज्ञ, संभावित, अधिकारी आहेत त्यांपासूनच यांस सहाय्य मिळेल इतकें नाहीं, तर सर्व प्रकारच्या चांगल्या कामावर संतोष दृष्टीनें पाहणारा व त्याला आशीर्वाद देणारा असा जो कृपासागर परमेश्वर तो त्यांस सहाय्य करील. असें असतां जर एथले थोर, श्रीमान, संभावित, व स्वतंत्र गृहस्थ स्वस्थ बसतील आणि आपल्या विधवांस चिंताग्नींत जाळतील तर त्यांचा अपराध मोठा वाढेल यांत संशय नाहीं.

ह्या मुंबई शहरांत पुनर्विवाहास अनुकूल अशा मताचे लोकांची संख्या बरीच आहे. एथें पुनर्विवाहोत्तेजक मंडळीही आहे. तिची स्थापना झाल्यास पंधरासोळा वर्षें झालीं. तिचे स्थापक व पुरस्कर्ते रा० रा० विष्णुशास्त्री पंडित हे होते. ते जिवंत असतांना ह्या मंडळीचें काम बऱ्याच आवेशानें चाललें होतें. महाराष्ट्रब्राह्मणांत कित्येक पुनर्विवाहही झाले; परंतु ते निवर्तल्यापासून ह्या मंडळीचें पाऊल फारसें पुढें पडत नाहीं. तिजविषयीं वर्त्तमानपत्रांतून वारंवार मजकूर येत असतो कीं, ही मंडळी आपलें कर्त्तव्य बरोबर बजावीत नाहीं. गुजराथी लोकांत ह्या कामाची बरीच वृद्धि होत आहे असे दिसतें. नुकताच एक विवाह त्यांजमध्यें झाला. त्याविषयीं सुबोधपत्रिकेंत जो मजकूर आला

आहे तो आपणांस पाहण्याकरितां पाठविला आहे. पत्रिकाकारानें ह्यासंबंधानें फार उत्तम विचार प्रकट केले आहेत तेही आपण वाचालच.

विधवांचे वपनाविषयींही लोकांचे विचार कसे बदलत चालले आहेत हें समजण्याकरिता आर्यपत्रिकानामक पत्राचा एक अंक आपणाकडे पाठविला आहे तो पाहावा.

मी पंढरपुरांत असतांना बडवे वगैरे लोकांमध्यें जो अनाचार चालत असे तसाच अद्याप चालत आहे याविषयीं एक पत्र सुबोधपत्रिकेंत छापलें आहे. तेंही आपणांकडे पाठविलें आहे.

माझेंही मत सुबोधपत्रिकाकारांप्रमाणेंच आहे. या कामासाठीं ईश्वरभीरु, सदयांतःकरण, उदारबुद्धीचे व आस्थापूर्वक काम करणारे अशा चतुर पुरुषांची योजना करून त्यांच्या खांद्यावर हें मोठ्या जोखमाचें काम दिलें पाहिजे. या गृहस्थांनीं सभेच्या तर्फेनें चहूंकडे अशा जाहिराती लावाव्या कीं, ज्या तरुण विधवांस पुनः लग्न करण्याचें असेल त्यांनीं या सभेस कळवावें, म्हणजे त्यांच्या इच्छेप्रमाणें सर्व तजवीज केली जाईल. या सभेच्या शाखा पुणें, सातारा, नगर, बेळगांव, नासिक, नागपूर, औरंगाबाद, भोपाळ, बडोदें, अमदाबाद, सुरत, इत्यादि प्रसिद्ध ठिकाणीं स्थापाव्या, आणि प्रत्येक सभेंत मोठमोठ्या हुशार गृहस्थांस व्यवस्थापक मंडळीचे सभासद नेमावे. त्यांनीं हें काम आम्ही चालवूंच चालवूं असा मनोनिग्रह करून दररोज आपलें पाऊल पुढें पडूं द्यावें.

या कामाला द्रव्याचें सहाय्य अवश्य पाहिजे, तें करण्यासाठीं कोणीं मागें सरूं नये. गोरगरीब, श्रीमान या सर्वांनीं एकमत व एकनिश्चय करून आपल्या उत्पन्नाचा दहावा भाग दरमहा या कामाकडेस द्यावाच द्यावा, त्यांत कधीं कसर करूं नये. परवां काबूलच्या लढाईंत जे शूर सरदार, शिपाई मरण पावले त्यांच्या बायकापोरांचा चरितार्थ चालण्याकरितां इंग्रज सरकारच्या सर्व राज्यांत पैसा जमा झाला, तेव्हां आमच्या लोकांनीं आपल्या गरिबींतून थोडा पैसा दिला काय ? याप्रमाणें परक्यांस आपले लोक वारंवार साह्य करतात तर आपल्या देशबंधूंच्या विधवा स्त्रिया व पोरकीं पोरें यांस दुःखसमुद्रांतून काढण्यासाठीं त्यांनीं कां देऊं नये ?

या पैशाचा उपयोग मोठ्या शहाणपणानें केला पाहिजे. ज्या विधवा मुलींचे आईबाप गरीबीमुळें, किंवा जातीच्या भयामुळें, त्यांचीं लग्नें करण्यास समर्थ नसतील यांस द्रव्यद्वारें या मंडळीनें सहाय्य करण्याचें आश्वासन द्यावें, आणि या बाबतींत कोणाचा खटला सरकारांत नेला तर त्यास देखील द्रव्यद्वारें

आश्रय द्यावा. आणखी पैशाची व्यवस्था अशी करावी कीं, पुनर्विवाह प्रकरणीं लहान लहान पुस्तकें, व नवीन कायद्याच्या प्रति छापून गांवोगांवीं वांटाव्या आणि पगार देऊन किंवा जे उदार मनानें पैसा घेतल्याशिवाय करूं इच्छितील त्यांनीं, आपापल्या गांवीं राहून या मंडळीच्या तर्फेनें कोणत्या विधवा लग्न करावयास इच्छित आहेत त्यांचा तपास ठेवावा. या कामासाठीं बायकांचीही मदत घ्यावी, म्हणजे त्यांचें मनोगत समजेल; मग ते मुख्य सभेच्या कमिटीस कळवावें.

याप्रमाणें नीट अक्कलहुशारीनें व व्यवस्थेनें काम चालविलें असतां या देशांत पुनर्विवाह सर्वत्र चालू होण्यास काहीं हरकत पडणार नाहीं, असें मला वाटतें. आणखी या मंडळीनें आपल्या सर्व कामकाजांत लोकांस असें दर्शविलें पाहिजे कीं, जें कांहीं आपण करितों तें केवळ लोकांच्या बऱ्याकरितांच मात्र करितों, यांत कोणत्याही प्रकारची स्वार्थेच्छा म्हणून नाहीं. स्वार्थ काय तो स्वदेशकल्याण व्हावें हाच. जे त्यांस या कामास अडथळे करितील त्यांशीं प्रीतीनें व सलूख्यानें वागून त्यांची चांगली समजूत करावी, आणि त्यांच्या कन्या व बहिणी विधवा राहिल्यानें जे अनर्थ होतात ते त्यांस उघड करून दाखवावे, आणि त्यांच्या लग्नामुळें त्यांस व त्यांच्या कुटुंबास व देशास जें सुख होईल तें त्यास सांगावें.

ह्या मंडळीच्या तर्फेनें '**पुनर्विवाह**' या नांवाचें एक वर्तमानपत्र निघत जाईल तर त्याचा फारच उपयोग होईल.

सांप्रतकाळीं आपलें लग्न व्हावें असें इच्छिणाऱ्या पुष्कळ बालविधवा गांवोगांवीं आहेत, परंतु त्यांस अशा प्रकारची आश्रयाची जागा नाहीं म्हणून मात्र त्या प्रसिद्धपणें बोलत नाहींत; परंतु माझ्या मित्रांकडून जीं पत्रें मला आलीं आहेत त्यावरून समजतें कीं, त्यांच्या मनांत आपलें लग्न करून घेण्याचें आहे.

हें काम चालविण्यासाठीं त्यांनीं विलायतेंतील व विशेषेंकरून, इंग्लंड, स्काट्लंड, ऐर्लंड आणि अमेरिका एथील खिस्ती लोकांच्या धर्मसंबंधी मंडळ्यांचीं कामें कशीं चालतात तीं लक्षांत आणावी. त्यांस तेथें राजाश्रय आहे असें नाहीं; तर त्या स्वतः श्रम करून व सभा जमवून लोकांस आपला उद्देश कळवितात, मोठमोठालीं रसिक व मनांत ठसण्याजोगीं भाषणें व व्याख्यानें करून प्रमाणें दाखवून त्यांची खातरी करून देतात कीं, अमुक असुक काम केलेंच पाहिजे. मग ते लोक आपल्यामध्यें इतकें द्रव्य जमवितात कीं, त्यांच्या योगानें हजारों उपदेशक शेंकडों ठिकाणीं पाठविले जातात. मोठमोठ्या शाळांचा खर्च चालतो, भजनस्थळें बांधलीं जातात. आणि परोपकाराचीं दुसरीं बहुत कामें करण्यास त्यांस शक्ति येते.

आतां इतके कोट्यावधि रुपये कोणी मोठमोठे शेट सावकार देतात असेंही नाहीं, तर साधारण लोक व गोरगरीब आपापल्या मिळकतींतून सतत देतात. दमडी दमडी देखील जमा करण्यास ते लाजत नाहींत. लहान लहान मुलांच्या मंडळ्या अधेला, पैसा करून शेंकडों व हजारों रुपये दोनचार वर्षांत जमवितात. तर त्याप्रमाणें एथें होण्यास काय हरकत आहे? अखंड श्रम मात्र केले पाहिजेत.

तेथील मंडळ्यांचे सभासद त्या कामांत आपलें सर्व मन घालितात. आणि जसें काय आपल्या घरचें व स्वहिताचेंच काम आहे असें समजून तें चालवितात. म्हणूनच खिस्ती मंडळीचीं मिशनें (त्यांवर जी ईश्वरी कृपा आहे तिजविषयीं तर मी कांहीं बोलत नाहीं, केवळ मनुष्याच्याच दीर्घ प्रयत्नाची गोष्ट सांगतों) आज सर्व पृथ्वीवर पसरलीं आहेत, आणि त्यांचा प्रतिवर्षीं लक्षावधि रुपयांचा खर्च व काम मोठ्या राजकारभाराप्रमाणें चाललें आहे.

तर पुनर्विवाहासंबंधीं सभेनेंही आपलें काम करण्यास त्याचा कित्ता घेतला पाहिजे.

सर्व लोकांस मोठेपणा मिळविण्याचा इच्छा आहे; आणि त्यांत विशेषें-करून आमच्या लोकांस तर त्याची फारच असोशी लागली आहे. सरकारानें आह्मांस मोठे हुद्दे द्यावे, मोठे पगार द्यावे, म्हणून वर्तमानपत्रद्वारें व बांबे असो-शिएशन इत्यादि सभांच्या द्वारें बहुत गाऱ्हाणीं विलायतेपर्यंत पोहचवितात; परंतु खरा मोठेपणा व खरें नांव मिळविण्याचा मार्ग हा नव्हे. सरकारची चाकरी धरून मोठे पगार मिळविणें यांत कांहीं वाईट आहे नसें नाहीं, उलटें त्यापासून एखादें काम करण्यास वजन व अधिकार मिळतो; परंतु केवळ हजारपांचशें रुपये पगाराची थैली भरून घरीं आणतां आली किंवा मोठी विद्या संपादन करून ती आपल्यापाशींच ठेविली तर त्यांत मोठेपणा आहे असें नाहीं. मोठमोठीं घरें बांधिलीं व मोठे बागबगीचे केले, आणि हजारों रुपये खर्च करून लग्नसमारंभ केला म्हणजे त्यांत मोठेपणा आहे असेंही नाहीं.

याशिवाय जरी कोणी एतद्देशीय गृहस्थ मुंबईच्या गवर्नराचें काम चालवूं लागला तरी त्याच्या अंगीं मोठेपणा येईल असेंही नाहीं, कारण आजपर्यंत जे गवर्नर होऊन गेले ते सर्व थोर मनुष्यांत गणले आहेत असें नाहीं; एल्फिन्स्तन साहेबांसारिखे गृहस्थ त्यांत थोडेच होते. तर मोठेपणा, खरा मोठेपणा मिळ-विण्याची ज्यास इच्छा आहे त्यानें लूथर, कोलंबस, हावर्ड, उइलबरफोर्स,

इत्यादिकांनीं जशीं स्वदेशहिताचीं व जगाच्या कल्याणाचीं कामें केलीं तशीं कामें केलीं पाहिजेत. यावरून त्याच्यासारिखीं सर्व कामें आपल्या लोकांच्या हातून घडतील किंवा घडलींच पाहिजेत असें समजूं नये, परंतु त्यांनीं जे हेतु व जे उद्देश धरून आपल्या मनापासून ज्या कामास हात घातला तें सिद्धीस नेलें, व लोकांचें भय किंवा मोठाल्या अडचणी यांजकडेस पाहून धैर्य सोडिलें नाहीं, त्याप्रमाणें एथल्या लोकांनीं स्वदेशकल्याणाचीं कामें करण्यास झटावें. आणि त्या कामां-पैकीं **विधवांचा पुनर्विवाह न करण्याची क्रूर व घातकी चाल बंद करून त्यांस पुरुषाप्रमाणेंच दुसरें लग्न करण्याचा हक्क देणें हें एक मोठें व अत्यावश्यक काम आहे.** जे कोणी हें आपले कर्तव्य समजून या कामाचे पुढारी होतील, त्यांचीं नावें **जगांतील महापुरुषांत** गणिलीं जातील. अशा पुरुषांस या हिंदुस्थानांतील सहस्रावधि विधवा स्त्रिया आशीर्वाद देतील, शतावधि कोमळ बाळें मोठीं झाल्यावर म्हणतील कीं, जर आमच्या आया विधवा राहिल्या असत्या तर कदाचित् आह्मी आमच्या बाळवयांतच गुदमरून मेलों असतों, अथवा घाणीनें भरलेल्या गल्लींत अथवा नळांत फेंकले जाऊन आमचीं कोंवळीं कंवठीं फुटून आमचा जीव गेला असतां, आणि कावळ्या कुत्र्यांनीं आमचे डोळे, नाक, कान, तोंड तोडून खाल्ले असते; अथवा जरी कदाचित् आह्मीं त्या क्रूर मरणाच्या जबड्यांतून सुटून जगलों असतों तरी आह्मांतून ज्या मुली आहेत, त्यांतून कित्येकांची कसबिणीच्या घरीं पातकांत वाढण्यासाठीं विकरी झाली असती, आणि आह्मी जे मुलगे आहों त्यांपैकीं कांहीं शिनळ रांडकीचा पोर, असा डाग कपाळास लावून गांवांत भीक मागत किंवा दुर्व्यसनी होऊन भटकत राहिलों असतों; परंतु आतां देवाच्या दयेनें ह्या पुरुषांकडून आह्मांस आमचें जीवित्व व सांप्रतची सुखस्थिति प्राप्त झाली आहे अशारीतीनें ते आपणांवरून टळलेल्या महा अनर्थाचा विचार करून या परोपकारी लोकांस आशीर्वाद देतील. आणि त्यांचीं नांवें पिढ्यानपिढी कृतज्ञ लोकांच्या स्मरणांत राहतील.

◆◆◆

८८

: १३ :

बा बा प द म न जी

माझा परमहंस मंडळींत प्रवेश व त्याचे परिणाम

मीं जरी कित्येक सुधारलेलीं मतें अवलंबिलीं होतीं तरी मी आपल्यास "सुधारलेला" म्हणवीत नसें व सुधारलेल्यांच्या मंडळींत मोडावयास इच्छित नव्हतों, कारण त्या काळांत "सुधारलेला" हा शब्द मुंबईंत व विशेषेंकरून पुण्यांत फार निंद्य असे. "सुधारलेला" ह्या शब्दाची व्याख्या जातीचे आचार मोडणारा, मद्यमांस खाणारा व चौपायीं उडणारा अशी जुन्या समजुतीचे लोक करीत, ती मला आवडत नसे. तरी मागल्या प्रकरणांत सांगितलेल्या माझ्या मित्रांच्या सहवासानें माझा प्रवेश परमहंसमंडळींत झाला. हे मित्र त्या मंडळीचे सभासद असून गुप्त रीतीनें दुसऱ्यास तींत आणण्याचे प्रयत्न करणारे होते. एके दिवशीं ह्यांनीं माझ्याशीं (व माझ्या मताच्या एका मित्राशीं) जातिभेदाविषयीं फार निकरानें वाद केला, आणि जेव्हां जातिभेद खोटा आहे व तो मोडावयास सिद्ध आहों असें आम्हीं कबूल केलें, तेव्हां ते म्हणाले कीं, आतांच आमच्या देखत तुम्ही तो मोडाल काय; आम्हीं म्हटलें, "होय." परंतु खरोखर तो मोडण्यास ते सांगतील असें आम्हांस वाटलें नाहीं. पण आमचें संभाषण होत असतां त्यांतून एक जण मुकाट्यानें बाहेर जाऊन थोड्याच वेळानें कांही बिस्कुटें घेऊन आला व तीं आमच्यापुढें ठेवून म्हणाला कीं, "जर तुम्हांला जातिभेद खोटा वाटतो, तर हीं खा पाहूं." आम्हीं म्हटलें, "प्रथम तुम्हीं खा. मग आम्ही खाऊं." तेव्हां त्यांनीं त्यांतून कांहीं खाल्लीं मग आम्हांसही खाणें प्राप्त झालें. परंतु त्या वेळीं माझी जी गाळण झाली, ती सांगतां पुरवत नाहीं. माझ्या अंगास कंप सुटून चळचळा घाम आला, व आतां घरीं गेल्यावर आई घरांतून हांकून लावील असें वाटूं लागलें. जसा कांहीं एखाद्यावर डोंगर कोसळून पडतो, तशी माझी गत झाली. आतां मी कुटुंबाच्या सर्व माणसांस मुकलों व जातींतून उठलों, परागंदा झालों, सर्वजण मला 'बाट्या' म्हणतील असें वाटूं लागलें; कारण तोंपर्यंत मीं कधीं पावाबिस्कुटें खाल्लीं नव्हतीं. माझा दुसरा मित्रही फार चकित झाला, त्यानेंही धीर धरून एकदोन बिस्कुटें खाल्लीं. त्याजवरही हा

पाहिलाच प्रसंग होता, म्हणून त्याच्या घशाखालीं तीं उतरण्यास त्याला बराच प्रयास लागला. मग आम्हांस ग्लासांत पाणी आणून दिलें. ही गोष्ट मनीस्कुलांत झाली. त्या वेळीं शाळा सुटली होती. ह्याप्रमाणें जातिभेद गुप्तरूपानें प्रथम हिंदु मित्रमंडळींतच मी मोडला. जरी माझें त्या काळीं कित्येक खिस्ती लोकांच्या घरीं जाणें-येणें होतें तरी मला कोणी खाण्यापिण्याविषयीं आग्रह केला नाहीं. सांप्रतच्या काळांतही सुधारलेले हिंदु लोक आपसांत गुप्त रीतीनें अशाच प्रकारें जातिभेद मोडीत आहेत, त्याकरितां त्यांस खिस्ती लोकांची मदत लागत नाहीं.*

घरीं आल्यावर ही गोष्ट कोणास कळली नाहीं, असें समजून माझें मन शांत झालें. पुढें ह्या मित्रांनीं मला व माझ्या मताच्या दोघां तिघां मित्रांस परमहंस मंडळीविषयीं सांगून एके रात्रीं आम्हांस तिच्या सभेंत नेलें. तेथें मोठमोठे अनेक जातींचे विद्वान् व संभावित हिंदु गृहस्थांचा बराच मोठा समुदाय पाहून आम्हांला फार आनंद वाटला, व आमच्या मताचे इतके लोक आहेत असें पाहून धैर्यही आलें.

ह्या मंडळीचीं मुख्य मतें अशीं होतीं कीं, जातिभेद मानूं नये, विधवांच्या पुनर्विवाहाविषयीं संमति असावी व मूर्तिपूजा करूं नये; बाकीचे धर्मसंबंधी विचार कसेही असोत, त्याविषयीं कांहीं निर्णय केला नव्हता. आणि मंडळीची संख्या मोठी वाढेपर्यंत हीं मतें गुप्त ठेवावीं, म्हणजे मंडळीची परिस्फुटता करूं नये, परंतु मंडळी वाढविण्याकरितां प्रयत्न करावे. ही एक मंडळींत मिळण्याची अट होती, हिच्या सभा गुप्त रीतीनें भरत. मंडळींत प्रवेश करणारास तिचे नियम वाचून दाखवीत व त्यानें त्यास आपली सम्मति दर्शविल्यावर तो ओंजळीत

* दा० उइलसनसाहेबांनीं मी हिंदु असतांना जात मोडण्याच्या संबंधानें एकदा आम्हांला वर्गांत जो उपदेश केला, तो सांगणें अवश्य दिसतें. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, कोणीही हिंदूनें उगीच खाण्यापिण्याकरितां आपली जात मोडूं नये, तर जातिभेद पाळणें पाप आहे व ईश्वराला तें आवडत नाहीं अशी ज्याची खातरी झाली असेल त्यानेंच तो मोडावा, म्हणजे त्याबद्दल त्याचा छळ झाला असतां तो सोसण्यास त्याला ईश्वर शक्ति देतो. अशा श्रेष्ठ तत्त्वरूप कुऱ्हाडीनें ह्या जातिरूप वृक्षावर प्रहार करणारे किती थोडे आहेत. मी खिस्ती झाल्यावर त्याच दा० उइलसनसाहेबांच्या बंगल्यांत दुसऱ्या दोनतीन खिस्ती भावांसह राहत असतां पुष्कळ तरुण हिंदु आमच्या बिऱ्हाडी येऊन आम्हांला बीफ कसें लागतें तें खाऊन पाहूं द्या असें म्हणत. आणि कांहीं खाणें झालें तर दारें बंद करून खात. बीफ (Beef) गोमांस.

पाणी घेऊन खालीं सोडी. नंतर एक दुधाचा प्याला आणून प्रथम अध्यक्षानें व दुसऱ्या कित्येकांनीं तोंडास लाविल्यावर त्यास प्यायास देत, आणि रोटीचा (पावाचा) तुकडा खावयास देत. ह्याप्रमाणें प्रवेशक विधि करून मला व माझ्या मित्रास मंडळींत घेऊन आमचीं नांवें सभासदांच्या पटावर मांडलीं * सभेच्या आरंभीं व शेवटीं मराठींत प्रार्थना वाचीत, त्या रावबहादूर दादोबा पांडुरंग यांनीं रचलेल्या होत्या. सभेचे अध्यक्ष त्या वेळीं रा. ब. रामचंद्र बाळकृष्णजी (राम बाळकृष्ण) कस्टम खात्याचे दफतरदार हे होते. रा. ब. दादोबा पांडुरंग व रा. रा. भाऊ महाजन हे जरी मंडळीच्या मताचे व मंडळीचे पुरस्कर्ते होते तरी ते कधीं सभेंत येत नसत. आलेच तर दुसऱ्या खोलींत बसत, व सभा विसर्जन झाल्यावर अध्यक्षाची व कांहीं निवडक मंडळीची भेट घेत. रा. ब. दादोबांचे बंधु रा. रा. दाक्तर आत्माराम पांडुरंग हे ह्या मंडळीचे सभासद होते, पण ह्यांची वर्तणूक अशा प्रकारची नव्हती. ते सभेस येत इतकेंच नाहीं, तर आपल्या घरीं सभा भरवीत.

मंडळीची वृद्धि करण्याचे कामीं कित्येक गृहस्थ फार आवेशी असत. त्यांत राबर्ट मनीस्कुलांतील मराठी शिक्षक रा० रा० भिकोबा दादा व त्यांचे बंधु रा० रा० सखाराम लक्ष्मण हे विशेष आवेशी होते. त्यांखेरीज रा० रा० लक्ष्मणशास्त्री हळवे, रा० बाळभास्कर शिंत्रे, रा० रा० मदन श्रीकृष्ण (हे पुढें पुण्यांत स्मा०

---

*या मंडळीविषयीं Political Rishi या सहीचीं पत्रें लिहिणारानें १८८५ च्या इंदुप्रकाशांत कांहीं माहिती दिली आहे, तींत असें लिहिलें आहे कीं, तिच्या प्रवेशक संस्कारांत रोटी व मुसलमानाचें पाणी देत असत. आणखी असें सांगितलें आहे कीं, या मंडळीचे सभासद आरंभीं इतके आवेशी व धैर्यवान् होते कीं, त्यांनीं एकदा कोटांतून रोट्या हातांत घेऊन रस्त्यांत त्यांची मिरवणूक करीत उघड रीतीनें त्या गिरगांवांतील आपल्या सभास्थानांत आणिल्या. हें कोणत्या वर्षीं झालें हें सांगितलें नाहीं व मी जेव्हां त्या मंडळींत होतों तेव्हां मला ही गोष्ट समजली नाहीं, निदान समजल्याची मला आतां आठवण नाहीं. आणखी ऋषींच्या पत्रांत असा मजकूर आहे कीं, सभासदांचें गुह्य फुटण्याच्या अगोदर कोणी एकानें मंडळीचें रजिष्टर बुक चोरून नेलें, त्यांत सर्व सभासदांचीं नांवें होतीं. या मंडळीचे संख्येविषयीं " ऋषि " म्हणतात कीं, ती सुमारें एक हजार असावी. तिच्या शाखा पुणें, सातारा, अहमदनगर, बेळगांव, रत्नागिरी, इ० स्थळीं होत्या.परंतु मी ज्या दिवशीं तींत मिळालों त्या दिवशीं सुमारें ५०–६० लोक हजर होते. एक हजार संख्या जमली म्हणजे आपलें मत प्रगट करावें असें तोंडानें बोलत मात्र असत.

का० को० चे जज्ज असतां परमहंस मत सोडून देव मामलेदाराचे शिष्य झाले !), रा० रा० मोरोबा विनोबा इ० मंडळी मोठी आस्थेवाईक होती.

ह्या मंडळाचा असा बेत होता कीं, तिला एक हजार सभासद मिळाले म्हणजे लौकिकांत आपलीं मतें प्रसिद्धी करावीं. परंतु असा काळ येण्याच्या पूर्वींच तिची दुसऱ्या रीतीनें प्रसिद्ध झाली. ह्या प्रसिद्धीचा प्रस्तुत वृत्तांताशीं संबंध असल्यामुळें तिजविषयीं एथें सांगितलें पाहिजे.

एका दिवशीं ह्या मंडळीच्या सभेस कोणी नवीन तरुण गृहस्थ येऊन नेमा-प्रमाणें शपथा वगैरे घेऊन तींत मिळाला. आणि कांहीं दिवसांनीं त्यानें सर्व सभासदांचीं नांवें फोडून असें प्रसिद्ध केलें कीं, ते सर्व ख्रिस्ती होणार असून अमुक दिवशीं त्यांचा बाप्तिस्माही होणार आहे. ही बातमी शहरांत पसरतांच मोठा गवगवा झाला. मिशन शाळेंत जाणाऱ्या मोठमोठ्या हिंदु मुलांस त्यांच्या आईबापांनीं भराभर शाळेंतून काढलें; कित्येकांस मुंबईच्या बाहेर पाठविलें.* वर्तमानपत्रांतून ह्या गोष्टीची चर्चा चालली; ह्याच गडबडींत कित्येक बडे लोकांच्या आश्रयाखालीं एका मनुष्यानें परमहंस मंडळीविषयीं निंदात्मक कवन छापून प्रसिद्ध केलें. त्यांतून मासल्याकरितां एक उतारा देतों :—

'प्रभुराज्यधारकांनीं आणिवली ह्या पुरांत सोसाटी । मिशनारीही तद्वत झटती अत्यंत भ्रष्टतेसाठीं । नित्य सोसेटींत अभ्यास । तेथें म्लेच्छांसीं सहवास । आवडूं लागे कैफ मनास । ज्वान मुलाला ॥ कर्माचा लोप झाला । गांजा भांग

*अशा प्रसंगीं शाळेंतून काढलेल्या विद्यार्थ्यांतून फ्री चर्च विद्यालयांतील कित्येक विद्यार्थ्यांनीं मला पत्रें पाठविलीं, त्यांपैकी एक इंग्रजी पत्र माझ्यापाशीं पेनूसलीनें लिहिलेलें अद्याप आहे. त्यांतून कांहीं मजकुराचें भाषांतर खालीं दिलें आहे :—

"मला लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं, तुमच्या संगतीपासून दूर राहणें मला प्राप्त झालें आहे, इतकेंच नाहीं, तर जुलमानें मला दूर ठेविलें आहे; ही वेळ केव्हां टळेल हें मला ठाऊक नाहीं. मला आपल्या धन्य शाळेपासूनच दूर राहणें प्राप्त झालें आहे असें नाहीं, तर कोणत्याही गुप्त किंवा प्रसिद्ध सभेस जाण्याची मला मनाई झाली आहे. कांहीं चिंता नाहीं. ज्यांचें धर्मसंबंधीं उपदेशापासून कल्याण होतें असे जे सर्व मजसारिख्या अवस्थेंत आहेत त्यांस असेंच दुःख सोसावें लागतें. तुम्ही प्रापंचिक विद्या व धर्मसंबंधीं शिक्षण प्राप्त करून घेत असतां देव तुमचें सहाय करो आणि जसा मला अटकाव झाला आहे तसा तुम्हांस न होवो."

रा० के० मुंबई, २९।९।५१.

जिरणीस पडली । बरांडीवर इच्छा जडली ! ही उत्पत्ति कोणीकडली । ठाऊक आईला ।। तदनुसार बुद्धि मुलाला । राज्याधिशांनीं मुंबईत । विद्यालय केलें विख्यात । अनेक स्थळींचे विद्यार्थी येत । अभ्यासार्थ या ग्रामीं । जे जन पूर्वी योग्यतावान । ते जरी सर्व झाले द्रव्यहीन ।। तथापि हें विद्यालय अव्हेरून । स्वदेश विद्या करविती ।। आचारी पाणके आगंतूक । इतर व्यवसाई होते अनेक । तयांसी वाटून हे कौतुक । मुलगे धाडिले या स्थळीं ।।

ह्या ताकपिऱ्या कवीची प्रभाकरकर्त्यांनीं चांगली खबर घेतली.* ह्याच धांदलींत गंगाधरशास्त्री फडके ह्यांनीं हिंदुधर्मतत्त्व नामक ग्रंथरूप झेंडा फडकविला, त्याजवरही वर्तमानपत्रांतून पुष्कळ गोळीबार झडले.

ह्याप्रकारें ह्या मंडळीच्या नांवाचा पुकारा झाल्यावर तिला आपल्या सभा फारच गुप्त रीतीनें भराव्या लागल्या. एकाच जागीं मंडळी जमत नसे. तिच्यांत (पुढें लिहिल्याप्रमाणें) मी जाणें सोडल्यावर मला तिजविषयीं फारसें समजत नसें, व समजण्याजोगें तींत कांहीं होतही नव्हतें. तरी तिजविषयीं माझ्या कधींमधीं लिहून ठेवण्याच्या रोजनिशींत एक लेख मिळतो. तो येथें दाखल करितों. तो असा कीं "ह्या मंडळींनें कलकत्त्याचे रेव० बिहारी लालसिंघ हे विलायतेहून परत आल्यावर त्यांस चहाची मेजवानी केली. त्या प्रसंगीं सुमारें ५०–६० मंडळी होती. परंतु रा० ब० दादोबा पांडुरंग यांनीं तेथें चहा घेतला नाहीं." [१८६०].

याप्रमाणें परमहंस मंडळीचा बोभाटा झाल्यानें मजविषयीं जी गोष्ट घडली ती अशी कीं, माझ्या (हिंदु) सासऱ्यास मी ह्या मंडळींत आहे, असें समजून त्यांनीं माझ्या वडिलांस मी अमुक तारखेस खिस्ती होणार असें लिहून पाठविलें. त्या वेळीं ते साताऱ्याजवळच्या उडतारें गांवीं नदीस पूल बांधण्याच्या कामावर होते. त्यांस ही बातमी पोंचतांच त्यांनीं मला बोलविण्याकरितां गडी पाठविला. त्यापाशीं मला जें पत्र दिलें होतें त्यांत मातोश्री फार आजारी आहे व तिच्याकरितां दोन वैद्य वांईहून आणिले आहेत असें लिहिलें होतें. हें पत्र वाचतांच मी शाळेंतून रजा घेऊन निघालों. जातेवेळीं सातारा येथें फ्री चर्च मिशनाचे मिशनेरी रेव० एटकिनसाहेब ह्यांस एक पत्र दा० उइलसनसाहेब यांजपासून सहज मागून घेतलें. तसेंच पुण्यांतील परमहंस मंडळीच्या शाखेची

* ह्या निंदात्मक चोपडीचें "परमहंसमतप्रशंसा" असें नांव होतें. तिचा कर्ता कसबिणीस लावण्या शिकविणारा हलकट ब्राह्मण होता.

[प्रभाकरकर्त्यांनीं त्याची जी हजेरी घेतली ती 'एका चटोर कवीचें कवन' या नांवानें पृ. १८–१९ वर पाहावयास सांपडेल.] संपादक.

ओळख करण्याकरितां मुंबईच्या मंडळींतील कोणा मित्रांचें पत्र घेतलें होतें, तेथें गेल्यावर सभासदाच्या नात्यानें कित्येकांस भेटलों. पुढें मार्गांत गड्यानें मला सर्व खरा मजकूर सांगितला, म्हणजे आई आजारी नाहीं इतकें सांगितलें, परंतु कोणत्या कारणावरून मला बोलाविलें होतें हें त्याला माहीत नव्हतें. तरी मीं तर्क केला कीं, हे सर्व मुंबईत झालेल्या गवगव्याचें फळ आहे. त्या वेळीं माझ्या मनांत प्रसिद्ध रीतीनें ख्रिस्ती होण्याचें नव्हतें, व तितका माझा विश्वासही दृढ नव्हता, तरी मूर्तिपूजेवर श्रद्धा नसल्यामुळें ती एकदम सोडून द्यावी, व ख्रिस्ती लोकांत जाऊन मिळावें असें मनांत येऊं लागलें.*

त्या काळीं माझा धर्म परमेश्वराची प्रार्थना करणें व त्याच्या सृष्टींतील कृत्यांचें चिंतन करणें इतकाच होता. धर्मसंबंधीं विशेष महत्त्वाच्या व अगत्याच्या सिद्धांतांविषयीं मीं कांहीं नियम केल्याचें मला आठवत नाहीं. मीं बरोबर इंग्लिश बैबल व स्टमर्स मेडिटेशन्स हीं पुस्तकें घेतलीं होतीं, दुसरींही कांहीं असतील, परंतु त्यांची आठवण नाहीं. बैबलांतील गीतें वाचण्याची मला फार गोडी असे. तीं मीं रानांत जाऊन वाचावीं.

उडताऱ्यास घरीं पोंचल्यावर (सप्टेंबर १८५१) माझ्या मातापितरांस फार आनंद झाला. त्यांनीं मला महादेवाच्या देवळांत नेलें. बरोबर कित्येक मंडळी होती, त्या सर्वांनीं "देवदर्शन" घेतलें, म्हणजे शिवस्तुतीचा श्लोक म्हणून लिंगापुढें हात जोडून उभें राहून व बोकडासारखा शब्द करून देवालयास प्रदक्षिणा वगैरे घातल्या; परंतु मीं तसें कांहीं केलें नाहीं. शिवापुढें ठेवण्याकरितां माझ्या हातांत नारळ दिला, पण मीं तो परत केला. हें सर्व माझ्या वडिलांनीं लक्ष्य लावून पाहिलें, परंतु त्या वेळीं मला कांहीं बोलले नाहींत. घरीं आल्यावर पेढे वांटले. मग सर्व मंडळी घरोघर गेल्यावर व भोजन झाल्यावर माझी आई रडूं लागली व मला बोलावून आणण्याचें कारण माझ्या बापानें मला सांगितलें. नंतर ख्रिस्ती धर्माविषयीं व परमहंस मंडळीविषयीं पुष्कळच बोलणें झालें. माझे वडील मजवर फार रागावले, व मला परत मिशन शाळेंत पाठवायाचें नाहीं असें म्हणाले. ह्या सर्व संभाषणावरून ख्रिस्ती धर्माच्या पक्षानें बोलण्याचा मला फारच आवेश आला व नवी शक्ति मिळाली आणि असें वाटूं लागलें

* ह्या काळांत मूर्तींविषयीं माझ्या मनांतील भय अगदीं उडून गेलें होतें. सातारच्या वाटेनें जात असतां एका ठिकाणीं रस्त्याच्या बाजूस एक देऊळ लागलें, त्यांत शेंदरानें माखलेले दोन दगड होते, ते मीं उचलून रस्त्यावर आणून ठेविले !

कीं, तेव्हांच सातार्‍यास जाऊन बाप्तिस्मा घ्यावा. माझ्याशीं धर्मसंबंधीं भाषण व वाद करण्याचा माझ्या वडिलांस हा पहिलाच प्रसंग. ते बहुत काळ आदनास होते व मी मुंबईस एकटाच होतों, त्यामुळें त्यांस माझीं सुधारलेलीं मतें माहीत नव्हतीं, आणि "सुधारणूक" व ख्रिस्ती धर्म यांजमध्यें काय भेद आहे हेंही ते जाणत नव्हते. ख्रिस्ती होणें म्हणजे अत्यंत नीच व भ्रष्ट होणें असें त्यांस वाटलें. ते मला म्हणाले कीं, भंग्याची टोपली उचलणें व ख्रिस्ती होणें हें एकच. त्यांचा समज पुढें कसा बदलत चालला हें दाखविण्याकरितां ही गोष्ट एथें सांगणें प्राप्त आहे.

उडतार्‍यास सुमारें मी दोन महिने होतों. त्या काळांत मी तेथें चाललेल्या सरकारी इंजनेर खात्यांतील कामाची बरीच माहिती करून घेतली; त्यावरून सुतार, गवंडी, बिगारी यांच्या कामाची देखरेख करणारे ब्राह्मण कारकून कसा जुलूम करीत व त्यांजपासून कसा पैसा खात, व सरकारचेंही कसें नुकसान करीत हें मला बरेंच समजलें. तसेंच त्या खात्याचा जो मुख्य अधिकारी इंजनेर साहेब होता तो कोणत्या गुणांचा होता हेंही माझ्या कानांवर आलें. तेणेंकरून मला फार वाईट वाटलें, व त्या गरीब कामगारांचा कैवार घेऊन त्यांची दाद लागावी व इंजनेर साहेबांचीही कानउघडणी करावी ह्या हेतूनें मी त्याला एक बरेंच लांबलचक पत्र लिहिलें. त्यांत बैबलांतील पुष्कळ बोधकारक ओव्या उतरून घेतल्या होत्या, त्यांपैकीं उपदेश ४:१, ही ओवी उतरून घेतल्याचें मात्र मला आठवतें. हें पत्र प्रथम रा० गोविंदजी नारायण यांस पाहाण्यास व त्यांची मसलत घेण्यास पाठविलें. त्यांनीं तें फार पसंत केलें, पण त्या साहेबांस पाठविल्यानें कांहीं उपयोग होणार नाहीं असें सांगितल्यावरून तें तसेंच राहिलें.

वर सांगितलेल्या दोन महिन्यांत आमच्या घरीं सणावाराच्या निमित्तानें बरींच धर्मकृत्यें झालीं, परंतु तीं मला कांहीं गोड लागलीं नाहींत. आमच्या कुळाचाराप्रमाणें एकदां शक्तिपूजाही झाली, त्या वेळीं केवळ एकच ब्राह्मण पूजेस आला होता व घरचीच मंडळी होती. नैवेद्याकरितां उत्तम प्रकारचीं अन्नें व मांसें व मिष्ट पदार्थ सिद्ध केले होते, परंतु मला त्या सर्वांचा अगदीं कंटाळा आला. ब्राह्मणाच्या हातून मी प्रसाद वगैरे कांहीं घेतला नाहीं, केवळ तिरस्कारानें त्याला व त्याच्या पूजेला पाहात बसलों होतों; इतका मला शाक्त लोकांचा वीट आला होता. त्याविषयीं पुढें मी पुण्याच्या ज्ञानप्रकाशास एक पत्र पाठविलें. जो ब्राह्मण इंजनेर खात्यांतील गरीब कामगारांवर जुलूम करून त्यांजपासून पैसे खात असे, तो आमच्या घरीं उपाध्येपण करायला येई, त्याला पाहून तर मला फार राग यावा.

ते दिवस आमच्या विद्यालयाच्या वार्षिक परीक्षेचे असून मला बक्षिसें मिळविण्याची मोठी आशा होती, म्हणून मुंबईस परत जाण्याची मला मोठी उत्कंठा लागली, परंतु माझ्या वडिलांनीं बहुत दिवस माझ्या बोलण्याकडे लक्ष दिलें नाहीं. शेवटीं त्यांनींच अशी तोड काढली कीं, मी त्यांच्या जीवंतपणीं ख्रिस्ती धर्म प्रसिद्ध रीतीनें स्वीकारणार नाहीं, अशी जर बैबलावर हात ठेवून शपथ घेतली, तर मला मुंबईस परत जाण्याची परवानगी मिळेल. ह्या तोडीस मी अज्ञान, अशक्त व अल्पविश्वासी असतां मान्य झालों. परंतु ही एक अट धरिली कीं घरांत किंवा बाहेर मी मूर्तीची पूजा करणार नाहीं, व सोवळ्या ओवळ्याचा विचार बाळगणार नाहीं; आणि त्यांनीं घरांत मूर्ति ठेवूं नयेत. ह्या गोष्टीस ते मान्य झाले. त्यांनीं माझ्या चुलत्यांस बेळगांवाहून बोलावून आणिलें, व त्यांस ह्या सर्व गोष्टी सांगून त्यांच्या समक्ष मजकडून शपथ घेवविली आणि माझ्या मर्जीस्तव आपल्या देव्हाऱ्यांतील सर्व देव त्यांच्या स्वाधीन केले. मीं घरांत पाहिजे तर बूट घालून जेवावें, कोणतेंही धर्मकृत्य करूं नये, परंतु बाहेरून जनाचाराप्रमाणें चालावें, असें मला सांगितलें. हें सर्व एकदम झालें नाहीं. वारंवार उभयतांनीं मला रानांत न्यावें व माझें मन वळविण्याचा मला नरमगरम गोष्टी सांगून प्रयत्न करावा.

उडतारें सोडण्याचे पूर्वीं मीं पुण्याच्या ज्ञानप्रकाशास एक पत्र पाठविलें होतें तें त्याच्या कर्त्यांनीं कृपा करून प्रसिद्ध केलें. यांतील विषय "भरतखंडाची स्थिति" हा होता. हें पत्र १५ डिसेंबर १८५१ च्या ज्ञानोदयांत इंग्लिश भाषांतरासहित आहे. त्याचा शेवटचा भाग येथें उतरून घेतों :—

"मला वाटतें कीं, आतां कलियुग होऊन गेलें किंवा त्याचा अंतकाळ जवळ आला आहे व सत्ययुगाच्या प्रथम दिवसाचा अरुणोदय झाला आहे. ईश्वरी कृपेनें ज्ञानसूर्य लवकरच उदयातें पावो. त्या वेळीं जे दिवाभीत आहेत त्यांस मात्र रात्र होईल. ते गिरिकंदरीं व कपाटीं जाऊन बसतील, ज्यांस अज्ञानाची मोडशी होऊन विद्येची अभिरुची लागत नाहीं, ज्यांस राज्यांत आबादानी नकोशी वाटून दंगा, लूट हीं आवडतात ते ह्या युगास कलियुग असें म्हणतील. बरें तर तसें कां होईना. असें निर्दोष कलियुग आम्हांस आवडतें. यांच्या म्हणण्याप्रमाणें ह्याची अशीच वृद्धि व्हावी व वर्णसंकर व्हावा म्हणजे कोणी कोणाचा द्वेष करूं नये, ब्राह्मणांनीं महारांस तुच्छ मानू नये व महारांनीं ब्राह्मणांशीं वैर करूं नये; व शूद्रांनीं ब्राह्मणांस हात दाखवीन असें म्हणूं नये; हिंदूंनीं सर्व पृथ्वींतील देशांत व्यापारास जावें, तेथील लोकांशीं सख्यत्व करावें, त्यांची विद्या, कसबें शिकावीं, अडाणी समजुती सोडाव्या व स्वदेशांत परदेशांतील यंत्रें व हरएक हुन्नर आणावे. काशीपासून लंकेपर्यंत सर्वांच्या

मनांत वर्तमानपत्रद्वारें एक सूत्र खेळत असावें. एकाचें दुःख तें सर्वांचें व एकाचें सुख तें सर्वांचें असें सर्वांनीं मानीत जावें. याप्रमाणें फार चांगला वर्णसंस्कार झाला, म्हणजे सर्वांस सुख प्राप्त होईल. अशा वर्णसंकराचीच सर्व सूज्ञ लोक मार्गप्रतीक्षा करीत आहेत."

इतकें झाल्यावर मी मुंबईस परत येऊन (दिसेंबर १८५१) पुनः फ्री चर्च विद्यालयांत जाऊं लागलों. उडतारें एथें झालेलें वर्तमान मीं आपल्या ख्रिस्ती मित्रांस कळविलें; त्यांनीं मीं जें वचन आपल्या आईबापांस दिलें होतें तें अयोग्य होतें असें मला सांगितलें, व पुढें माझीही त्याविषयीं खातरी झाली. नंतर कांहीं दिवसांनीं मी आपल्या तीर्थरूपांस त्याप्रमाणें लिहून कळविलें, व माझी शपथ हेरोद राजाच्या शपथेप्रमाणें अयोग्य होती, व ती पाळण्यास मी बांधलेला नाहीं असें सांगून तिजपासून मी मोकळा झालों. ह्या गोष्टींसंबंधीं बराच पत्रव्यवहार झाला, परंतु त्यांपैकीं उभयपक्षांकडील एकही कागद माझ्यापाशीं आतां राहिला नाहीं व कांहीं टिपणही सांपडत नाहीं. माझें सर्व लक्ष्य शिकण्याकडे व बक्षिसें मिळविण्याकडे होतें. वर सांगितलेल्या शपथेपासून मुक्त होण्यास मला बराच काळ लागला. ह्या दोषाविषयीं माझी खातरी करण्याच्या कामीं रेव० दा० मरे मिचल साहेब ह्यांनीं पुष्कळ श्रम घेतले. वारंवार त्यांनीं ह्याविषयीं मला बोलून, व शास्त्रवचनें दाखवून हे माझे दोष माझ्या पदरीं घातले.

उडताऱ्याहून परत येण्याच्या अगोदर एक गोष्ट घडून आली तिजवरून देवानें मला पुष्कळ बोध केला; ती अशी कीं, माझी मातोश्री आजारी होती अशा ज्या बाहण्यानें मला बोलावणें पाठविलें होतें, त्याचप्रमाणें ती मी तेथून निघण्यापूर्वीं खरोखर आजारी झाली, व वांईहून एका वैद्यास आणावें लागलें!

ज्या मंडळींच्या संबंधामुळें मजवर व इतर तरुण विद्यार्थ्यांवर इतकीं संकटें आलीं व लोकांत मोठा गवगवा झाला तिला मीं लागलेंच सोडलें असें नाहीं, तिच्या सभांस मी पूर्वींप्रमाणें जाऊं लागलों. ह्या सभा आतां पूर्वींपेक्षां विशेष गुप्त रीतीनें व सावधागिरीनें होऊं लागल्या. शत्रूंस त्यांचा पत्ता लागूं नये म्हणून सभेच्या जागा वारंवार बदलत व नवीन मनुष्यास मंडळींत घेण्यापूर्वीं फार चवकशी करीत.

ह्या सभेंत कांहीं विशेष कामें होत नसत, प्रार्थना वाचून झाल्यावर इकडच्या तिकडच्या गोष्टी होत. यास्तव कित्येक सभासदांनीं असें सुचविलें कीं, प्रत्येक सभेस कांहीं नियमित विषयावर संभाषण व्हावें, अथवा कोणी कांहीं

निबंध लिहून आणून वाचावा व त्यावर चर्चा व्हावी. त्याप्रमाणें क्रम चालू झाला. एका सभेस माझी पाळी आली. तेव्हां मी अक्रुरानें गोपीस शिकविलेलें ब्रह्मज्ञान यावर कांहीं लिहून आणून वाचलें. * त्याच वेळीं पुण्याहून कांहीं विद्वान मंडळी आली होती, तींतून कित्येकांनीं माझ्या निबंधावर चर्चा चालली असतां नास्तिक मत स्वीकारून कांहीं विचार प्रदर्शित केले, तेणेंकरून मला व माझ्या एकदोन मित्रांस फार वाईट वाटलें. त्यांत आणखी एक विशेष गोष्ट ही घडली कीं, आमचे सुविचारी, सूज्ञ, विद्वान् व बहु सन्मान्य सभाध्यक्ष रावबहादुर रामचंद्र बाळकृष्णजी यांनींही ह्या पुणेकर नास्तिकांचाच पक्ष स्वीकारला, तें पाहून तर आम्हांस अतिशय वाईट वाटलें. दुसऱ्या वेळीं त्यांस आम्हीं असें करण्याचें कारण विचारलें, तेव्हां ते म्हणाले कीं, केवळ वाद चालवावा इतक्याच बुद्धीनें मी त्यांचा पक्ष स्वीकारिला, मी नास्तिक नाहीं हें तर तुम्हांस ठाऊकच आहे. हें सर्व जरी खरें होतें तरी त्या रात्रीच्या वादाचा माझ्या मित्रांस व मला इतका कंटाळा आला कीं, तेव्हांपासून आम्हीं ती मंडळी सोडून देण्याचा निश्चय केला. वास्तविक पाहतां ह्या मंडळीच्या मतांपासून आत्म्याच्या तृष्णा तृप्त होण्याजोगें तींत कांहींच नव्हतें, केवळ जुन्या मतांस कंटाळलेल्या लोकांस क्षणभर टेंकण्याची मात्र ती जागा होती. पापाची क्षमा कशी होईल, तारणारा कोण, शांति देणारा कोण, इ० अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींचा परमहंस मंडळीचे लोक मुळींच विचार करीत नसत, व त्या विचाराची कोणास गरज वाटत होती असें मला दिसून आलें नाहीं.

ह्या मंडळीकरितां कोणी एका गृहस्थानें बहुत दिवसांमागें एक मराठी पुस्तक रचिलें होतें, परंतु तें तेव्हांच छापलें नव्हतें. माझा कल ख्रिस्ती धर्माकडे आहे असें माझ्या कित्येक मित्रांनीं जाणून त्यांनीं तें मला वाचायास दिलें. त्यांत जातिभेद, मूर्तिपूजा, इ० गोष्टींचा निषेध केल्यावर कोणताही धर्म ईश्वरदत्त नाहीं, व कोणतेंही शास्त्र ईश्वरप्रणीत नाहीं असें प्रतिपादन करण्याचा यत्न केला होता. हें पुस्तक वाचल्यावर परमहंस मंडळीविषयींची पूज्यबुद्धि माझ्या मनांतून नष्ट झाली. कारण ईश्वरानें मनुष्यास शास्त्र दिलें नाहीं, असें मत मी कधींच बाळगिलें नव्हतें. जरी हिंदु धर्मावरील माझा विश्वास उडत चालला होता, तरी वेद हे ईश्वरप्रणीत आहेत असें मी बहुत दिवस समजत होतों; त्यांत काय आहे हें

---

* हा निबंध ता० १ आगष्ट १८५३ सालच्या ज्ञानोदयांत छापिला आहे, व त्यावर तो वाचल्याची १० डिसेंबर १८५२ ची तारीख आहे.

जरी मला ठाऊक नव्हतें, तरी मूर्तिपूजा नाहीं असें लोकांच्या सांगण्यावरून मला समजलें होतें. ह्याविषयी विशेष पुढें सांगण्यात येईल.*

परमहंस मंडळीचा संबंध सोडल्यावर मीं व माझ्या कित्येक मित्रांनीं मिळून "सत्यशोधक" या नांवाची एक लहानशी सभा स्थापिली, तींत माझ्या मताचे म्हणजे देवानें मनुष्यास शास्त्र दिलें आहे व तें कोणतें याचा शोध करावा असें मत बाळगिणारे कित्येक तरुण होते. आम्ही प्रति रविवारीं एकत्र मिळून प्रार्थना करून धर्मसंबंधीं विषयांची चर्चा करावी, बैबलाचे कांहीं भाग वाचावे आणि इतर धर्मांचाही शोध करावा. ह्या सभेपुढें मी वाचलेलें एक 'सर्मन' (उपदेश) माझ्यापाशीं बहुत दिवस होतें.

ह्याच काळाच्या सुमारास मला विद्वान् प्रोफेसर एच्. एच्. उइल्सनकृत ऋग्वेदाच्या प्रथम अष्टकाचें इंग्लिश भाषांतर मिळालें, तें वाचून वेदाविषयीं माझ्या मनांत ज्या कल्पना होत्या त्या अगदीं बदलल्या. त्यांत ईश्वरी शास्त्राचें कांहींच लक्षण दिसून आलें नाहीं, इतकेंच नाहीं, तर अग्नि, सूर्य, इंद्र, इ० ची जी भक्ति सांगितली आहे ती एक प्रकारची मूर्तिपूजाच होय अशी माझी खात्री झाली. वेदांतील ऋषींचीं स्तोत्रें बैबलांतील दावीदाच्या गीतांपुढें सूर्यापुढें जसे काजवे त्यांप्रमाणें निस्तेज दिसूं लागलीं.

हा शोध चालला असतां ज्ञानोदयांत वेदाच्या अनादित्वाविषयीं कलकत्ता रिव्यूंतून घेतलेला एक फार उत्तम निबंध माझ्या वाचण्यांत आला, त्यांत वेदाच्या अनादित्वाविरुद्ध प्रमाणें इतकीं सबळ होतीं कीं, त्यांकडून वेदावरील माझा विश्वास जो उडून गेला तो पुनः कधींच परत आला नाहीं.

प्रोफेसर उइल्सन यांच्या ऋ० वेदाचे भाषांतराचा केवळ पहिलाच भाग मी वाचला असें नाहीं, तर दुसरा भाग जेव्हां विलायतेहून आला तेव्हां तोही

---

* वर सांगितलेलें हस्तलिखित पुस्तक पुढें (१८६८) "धर्मविवेचन" ह्या नांवानें छापून प्रसिद्ध झालें. त्याच्या प्रस्तावनेंत जें लिहिलें आहे तें वरील मजकुरास जुळतें म्हणजे ज्या वेळीं मी तें पाहिलें त्यावेळीं तें छापलेलें नव्हतें. तो लेख असा:— ग्रंथकर्त्यांच्या संग्रहीं तो ग्रंथ तसाच पुष्कळ वर्षें पडून राहिला होता. ह्या ग्रंथाची हस्तलिखित प्रत वाचल्यावर कांहीं वर्षांनीं (१८५८) मीं "निःशास्त्रवादपरीक्षा" नामक एक पुस्तक लिहिलें, तें यांतील मतांस उत्तररूप आहे. तें माझ्या वडिलांनीं समग्र वाचून पाहिल्यावर आपणास फार संतोष झाला असें बोलून दाखविलें. कारण कोणतेही भाविक हिंदु निःशास्त्रवाद कबूल करीत नाहींत, व कोणींही तो कबूल करूं नयेच.

विकत घेऊन वाचला. (दोन्ही भागांस १२ किंवा १४ रु० दिले असतील) आणि त्या ग्रंथारंभीं जो मोठा उपोद्घातरूप निबंध होता तोही मी लक्ष्य लावून वाचला, इतकेंच नाहीं, तर वेदावरील विश्वास उडाल्यानंतर त्यासंबंधीं इतर ग्रंथ काळजीनें जसे मीं वाचले व शोध केला तसा पूर्वी कधीं केला नाहीं. वेदाच्या अनादित्वाविरुद्ध जीं प्रमाणें मला सांपडलीं यांजविषयीं कित्येक विद्वान् शास्त्री व पंडित यांच्याशीं मीं भाषणेंही केलीं. परंतु त्यांच्या प्रत्युत्तरांवरून माझें कांहींच समाधान झालें नाहीं. याप्रमाणें आश्चयार्थ हिंदुधर्माचा जो शेवटचा खांब मी धरिला होता तो मोडून पडला. तरी मनुष्यास ईश्वरानें शास्त्र दिलें आहे, ही कल्पना माझ्या मनांतून कधीं गेली नाहीं, ह्या गोष्टीमुळें मी परमेश्वराचे महत् उपकार मानतों, कारण जर अशी माझ्या मनाची स्थिति झाली असती तर कोणत्या दुष्परिणामास मी पोचलों असतों हे माझ्यानें सांगवत नाहीं.*

◆ ◆ ◆

---

* एका जुन्या कागदावरून असें समजतें कीं, सुमारें सहा महिनेपर्यंत मी धर्मविषयीं निष्काळजी होतों. एका मित्राच्या सहवासानें कोणतेंच शास्त्र ईश्वर-प्रणीत नाहीं, अशी कुकल्पना माझ्या मनांत घोळूं लागली होती. परंतु प्रभूनें तिला फार दिवस तेथें राहूं दिलें नाहीं. हा केवळ संगतीचा गुण होता. जगांत कोणतें तरी ईश्वरदत्त शास्त्र आहे अशी माझी खात्री पहिल्यापासून होतीच व तिचें वजन मजवर अधिकाधिक पडत चाललें.

: १४ :

गो विं द ना रा य ण मा ड गां व क र

मुंबई शहरांतील कांहीं उपक्रम

सरकारास खर्चांत न पाडतां इमारती व वाडे बांधून शहरास शोभा आणण्यास आजपर्यंत इंग्रज लोकांनीं जे जे उद्योग केले ते स्तुत्य आहेत. अशा कारणांस द्रव्य जमविण्याची त्यांची जी युक्ति ती पाहून मन केवळ दंग होऊन जातें. पाहा ! टौनहालासारिखी विशाळ व उपयोगी इमारत बांधायास यांणीं कोणती युक्ति लढविली. इसवी सन १८११ मध्यें सर जेम्स मेकिन्टाश् हे लिटररी आणि सायंटिफिक् नांवाच्या एका विद्यासंपादक मंडळीचे अध्यक्ष होते. आणि ही त्यांणींच उपस्थित केली होती. त्यांणीं एथील कित्येक नामांकित गृहस्थांचे सूचनेवरून असा उपक्रम काढिला कीं, मुंबई शहरासारिख्या चढते कळेस आलेल्या शहरांत विद्वान् व संभावित लोकांस सभा भरविण्यास, पुस्तकालयाची स्थापना करण्यास किंवा प्रसिद्धपणें कोणत्याही नात्यानें सभा भरण्यास एक विस्तीर्ण इमारत असली पाहिजे. परंतु ती उभारायास पुष्कळ द्रव्य पाहिजे. तर यास अशी युक्ति आहे कीं, सरकारी नात्यानें द्रव्यावर सोडती काढाव्या आणि त्या सोडतींच्या चिट्या विकून त्यावर जो नफा राहील तें द्रव्य ही इमारत बांधायास खर्चावें. त्यांच्या ह्या भाषणास व लाभदायक युक्तीस सगळ्यांनीं माना डोलविल्या. मग सरकारांतून रुकार मिळाल्यावर कांहीं दिवसांनीं पहिली सोडत काढिली. त्यावेळीं पुष्कळ टिकिटा खपल्यामुळें द्रव्य पुष्कळ जमा झालें व कांहीं टिकिटा विकल्यावांचून मालकांपाशीं राहिल्या होत्या, त्यापैकीं एकीच्या नंबरास जो मुख्य पन्नास साठ हजारांचा लाट तोच आला. व दुसरे एक दोन लहान लहान लाटही घरखात्यांत आल्यामुळें ह्या मंडळीच्या हातीं पहिल्याच खेपेस लक्ष दीडलक्ष रुपये जमले. यावरून मंडळीस इतका भरंवसा आला कीं, अशा दोन तीन खेपा सोडती काढिल्या असतां जें द्रव्य ही इमारत बांधायास पाहिजे तें जमा होऊन कार्य सिद्धीस जाईल. परंतु दुसऱ्या खेपेस जी सोडत काढिली ती विषयीं लोकांत कांहीं वैमनस्य पडल्यामुळें पुष्कळ टिकिटा खपल्या नाहींत. तथापि त्या प्रसंगींही या मंडळीस सुमारें तीस हजार रुपये नफा झाला. पुढें सोडतीचें प्रकरण बंद पडलें.

पूर्वीं एथें सोडती काढण्याचा व्यापार फार असे, यांत फार तर्केंही होत. कोणी सोन्यारुप्याच्या डागिन्यांवर, कोणी जरी साड्या, लुगडीं व पागोटीं यांवर, कोणी घरांवर, वाड्यांवर, घड्याळांवर, पैशावर अशा म्हटल्या त्या मालावर सोडती काढीत. यांत एकाचे दोन इतका नफा होत असे, म्हणून लोक या धंद्यावर तुटून पडत. कधीं कधीं सरकारी सोडती निघत. यांत हजारों लोकांच्या द्रव्याचा नाश होऊन एकाद्या कोणास तरी लाभ होई. हा धंदा जुगाराचाच प्रकार आहे, असें लक्षांत आणून हल्लीं सरकारनें बंद केला. यामुळें लोकांचें पुष्कळ कल्याण झालें. कित्येक सोडती भरण्याची चट लागून जमीनदोस्त होत.

सुमारें वीस वर्षांमागें (सन १८४० च्या सुमारास) एका गरीब गुजराथी कुंभारानें सोडतींत सवाशें रुपये भरले होते, त्यास पाऊण लक्ष रुपयांचा लाट आला. परंतु तो मनुष्य अविचारी आणि उडाऊ असल्यामुळें तें त्याचें सर्व द्रव्य वर्ष दीड वर्षांच्या आंत जाऊन तो कर्जबाजारी झाला. आणि शेवटीं पंचवीस तीस रुपयांच्या देण्यासाठीं तुरुंगांत जाऊन पडला. आणि हाल अपेष्टा होऊन तो अल्पकाळांतच मरण पावला. अशा प्रकारें प्राप्त झालेल्या द्रव्याचा परिणाम बहुधा असाच होतो. इंग्रजींत अशी एक म्हण आहे. "वर्षांच्या आंत श्रीमंत होतो तो सहा महिन्यांपूर्वीं भिकारी होतो."

आणखी एक गोष्ट या सोडती प्रकरणीं ऐकण्यांत आली. परंतु ती केव्हां घडली हें कांहीं बराबर समजत नाहीं. एका भंग्यास एक लक्ष रुपयांचा सोडतीचा लाट आला, आणि जेव्हां तो तें द्रव्य आपल्या स्वाधीन करून घेण्यास किल्ल्यांत गेला, तेव्हां त्या रुपयांचे तोडे पाहून त्याला हर्षवायु झाला आणि लागलाच मरण पावला. रुपयांचे तोडे व घरदार जिकडच्या तिकडेसच राहिले. एकादे वेळीं एकदम श्रीमंत होण्याचे प्रयत्न केले असतां त्याचा परिणाम या प्रकारचा होतो.

कंपनी सरकाराकडून टौनहाल् बांधण्यास जागा मिळाल्यावरून हा वाडा कोणत्या प्रकारचा असावा याचा नकाशा काढिला. व इंजनेर वगैरे जमवून सर्व तयारी केली. आणि जरी द्रव्य विपुल नव्हतें तरी त्या वाड्याचें काम सुरू केलें. कंपनी सरकारनें ह्यास १०,००० रुपये वर्गणी दिली. हें काम सन १८२१ माहे सेप्टेंबर या महिन्यांत सुरू केलें. ह्या कामाची चौकशी करण्यासाठीं सरकारनें कपतान हाकिन्स यास नेमिलें होतें.

पुढें सन १८२३ त ह्या मंडळीची खर्चीं खुटली आणि जरी ह्या इमारतीस यांणीं सुमारें दोन लक्ष रुपये खर्चिले होते तरी दुसरे अजमासें तीन लक्ष रुपये खर्च होतील तेव्हांच ही पुरी होईल असा निर्णय झाला. त्या वेळीं

हें काम कंपनी सरकारानें मनावर घ्यावें असें मंडळीनें बोलणें लावल्यावरून कंपनी सरकारानें लंडन शहरांतील मुख्य कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांस लिहून कळविलें. त्यांस त्यांनीं उत्तर दिलें कीं, त्यांतील बहुतेक जागा सरकारी हपिसें घालायास देण्याकरितां हे गृहस्थ कबूल असले तर तें काम पत्करून ही इमारत पुरी करावी. असा करार झाल्यानंतर कंपनी सरकारनें ह्या कामाचा पत्कर घेऊन ह्या प्रीत्यर्थ द्रव्य खर्चायाचा निर्धार करून सन १८२६ सांत काम सुरू केलें आणि ही इमारत सरासरी तडीस नेली. परंतु ज्यारीतीनें पूर्वीं बेत केला होता त्यारीतीनें ही इमारत तयार झाली नाहीं. तींत कांहीं व्यंग पडलें. ही इमारत २६० फुटी लांब आणि १०० फुटी रुंद आहे. ही इमारत तयार होण्यास १५ वर्षें लागलीं. हिच्या सदरेच्या दक्षिणभागीं मौंटस्टुअर्ट एल्फिन्स्तन् साहेबाचा पुतळा आहे व उत्तरेस सर जॉन मालकम् व नामांकित व्यापारी सरचार्ल्स् फार्बस् या साहेबांचे पुतळे आहेत. व त्यांच्या समोर सर जमशेटजी जिजीभाई ह्या कीर्त्तिमान्, दानशूर, व प्रख्यात व्यापाऱ्याचा पुतळा आहे. व दुसरे दोन नामांकित इंग्रजांचे आहेत. ही इमारत तयार करण्यास सगळे पांच लक्ष रुपये खर्च झाले. त्यांपैकीं कंपनी सरकारास ३,८६,१६५ रुपये खर्चावे पडले. व बाकीचे पहिल्या मंडळीनें खर्चिले होते.

एथें कौन्सल, दरबार व दुसऱ्या सरकारी व सावकारी नात्यानें सभा भरत असतात. यांत जागोजागीं सरकारी हपिसें आहेत. व दुसऱ्या परोपकारी मंडळ्यांचीं स्थानें आहेत. ही इमारत कर्नल कौपर आणि कर्नल वाडिंग्टन् ह्या कुशल इंजनेरांनीं सिद्धीस नेली.

आग्रिहार्टिकल्चरल् सोसायटी व जिओग्राफिकल् सोसायटी या प्रख्यात दोन मंडळ्यांचीं हपिसें टौनहालांत आहेत. आग्रिहार्टिकल्चरल् सोसायटीचा उद्देश हा आहे कीं, माळ्यांस बागेचें काम चांगल्या प्रतीचें शिकवावें; युरोप खंडांत व इतर देशांत अनेक तऱ्हांच्या नवीन वनस्पती आहेत, त्यांचें बीं आणून विकावें. या परोपकारी कृत्यावरून युरोपखंडांतील वनस्पति या देशांत पुष्कळ होऊं लागल्या. मोठमोठाले रमणीय बाग तयार होऊं लागले. कोब, सालिट, फ्रेंचबीन्स, सलगम, आलकोल, फूलकोब, पार्स्निप, लूसर्न इत्यादि युरोपखंडांतील भाज्यांचें बी ही मंडळी युरोप खंडांतून आणून विकते. व कोणी माळी उत्तम प्रकारचीं फळें व नवीन वनस्पति लावून तिची चांगली मरामत केली तर त्यास हरप्रकारें मदत करीत असे. कांहीं वर्षांमागें कोणी माळयास बैलांची जोडी, कोणास विलायती नांगर, कोणास विलायती घोंगडी, कोणास दुसरी

आउतें असें बक्षीस देत असत. परंतु हल्लीं त्यांणीं हें उत्तेजन देणें बंद कां केलें तें समजत नाहीं.

जिओग्राफिकल् सोसायटीचा हा उद्देश आहे कीं, भरतखंडांत ज्याज्या ठिकाणीं नवीन गोष्टी घडून आल्या असतील व जमिनीसंबंधी कांहीं नवा प्रकार घडून आला असेल त्याचें वर्णन करावें व नवीन धातूंच्या खाणी, वनस्पति, जनावरें, वगैरे यांचा शोध करून त्यांचा वृत्तांत लिहून सभेपुढें वाचावा. त्यांचे मासले आणून सभेच्या हपिसांस जमवावे आणि असे तयार झालेले वृत्तांत एकत्र करून त्यांचें पुस्तक प्रतिवर्षीं छापावें. त्या मंडळीच्या खात्यांत अनेक तऱ्हांच्या पदार्थांचें सांठवण करून ठेविलें आहे. ह्या सभेचे सभासद इंग्रज व एतद्देशीय विद्वानांपैकीं पारशी व हिंदु बरेच गृहस्थ आहेत. ह्या सभांकडून शिल्पशास्त्रास व कृषिकर्मास मोठी मदत झाली.

टौनहालाच्या उत्तरेकडील दरवाजानें वर जावें म्हणजे पुढच्या विस्तीर्ण भागांत प्रख्यात "धि बांबे ब्रांच ऑफ् धि रायल एशियाटिक् सोसायटी" नांवाचें प्रख्यात पुस्तकालय आहे. मुंबईतील अनेक चमत्कारिक स्थळें व वस्तु· पाहून जो आनंद होतो, त्याच्या सहस्रपट हें पुस्तकालय पाहिल्यानें होतो. ह्या पुस्तकालयांत जाऊन मध्यभागीं उभें राहून चहूंकडे दृष्टि फिरवून पाहावें म्हणजे वरखालीं, आसपास, जिकडे तिकडे अनेक भाषांच्या ग्रंथांच्या रांगा रचलेल्या दृष्टीस पडतात. एके बाजूस संस्कृत पुस्तकांचा ढीग केलेला आहे. दुसऱ्या बाजूस मराठी, गुजराथी, अरबी, हिंदुस्थानी, कानडी, अशा भरत खंडांतील अनेक भाषांतील हजारों ग्रंथ दृष्टीस पडतात. एके कोठडींत अनेक तऱ्हांच्या पुरातन वस्तु ठेविल्या आहेत. इंग्रजी ग्रंथांची संख्या पाहून तर नवीनच जाणाऱ्याचें मन चकभूल होऊन जातें. या पुस्तकालयांत सुमारें एक लक्ष लहानमोठे असे ग्रंथ आहेत. आणि त्यांची देखरेख ठेवण्यासाठीं पांच दहा मनुष्यांची नेमणूक केलेली आहे. ह्या पुस्तकालयाच्या वर्गणीदारांस तेथें बसून ग्रंथावलोकन करण्यासाठीं सर्व प्रकारची सोई केली आहे.

आतां पाहा ! हे इतके अनेक विषयांवर ग्रंथ रचण्यास त्याच्या प्रत्येक कर्त्यास किती श्रम पडले असतील, त्याला किती रात्री जागरण करावें पडलें असेल ? किती वर्षेंपर्यंत अध्ययन करावें लागलें असेल ? किती काळपर्यंत प्रापंचिक सुखाचा त्याग करावा पडला असेल ? किती द्रव्य खर्चावें लागलें असेल ? व शरीराचे किती हाल करून घ्यावे पडले असतील ? हे कोणाच्यानें सांगवेल. कारण एक विद्वान् असें म्हणतो.

॥ विद्वानेव विजानाति विद्वज्जनपरिश्रमं ॥
॥ नहि वंध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनां ॥

एका प्राकृत कवीचें असें म्हणणें आहे.

समुद्रांत मासा निद्रा घेतो कैसा ॥
जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे ॥

ज्या ज्या विषयावर आपणांस ग्रंथ पाहिजे तो तो ह्या पुस्तकालयांत सांपडतो. यास्तव जे विषय निरनिराळ्या स्थानीं आहेत ते ह्या एका ठिकाणीं भरले आहेत, असें म्हणावयास काय चिंता आहे? ह्या पुस्तकालयांत एक लक्ष पुस्तकें आहेत. असें म्हणतांच आम्हांला एक लक्ष विद्वान् कलाकौशल्य ज्ञात्यांचें व परोपकारी गृहस्थांचें स्मरण होतें. आणि ह्या एक लक्ष समुदायामध्यें कोण कसे होते, त्यांचे आचरण कसें होतें. व एवढें ज्ञान संपादन करून घेण्यास त्यांणीं कोणकोणत्या प्रकारचे परिश्रम केले हे विचार सहज उत्पन्न होतात. एथें जातांच आम्हांस व्यास, वाल्मीक, पराशर, गौतम, मनु, पाणिनि, पतंजल, कात्यायन इत्यादि स्वदेशीय महा विद्वान् पुरुष, ज्यांनीं आपल्या ज्ञानरूप सूर्याची प्रभा सर्व पृथ्वीवर पाडिली आहे, व विद्यारूप अमृत पिऊन केवळ अमर होऊन गेले आहेत; त्यांची स्मृति होती. त्याचप्रमाणें होमर, हिसीयड् हिराडोटस्, प्लेटो, आरिस्टाटल, पिथागोरस्, व्हार्जिल, सिसिरो, सेनेका, प्लीनी, बेकन्, न्यूटम्, लाक्, हार्वी, मिल्टन्, शेकास्पियर्, बैरन् इत्यादि परदेशस्थ ग्रंथकारांची व दुसऱ्या नामांकित पंडितांची आठवण पडती, तेणेंकरून विचार-रूप तरंगांनीं मन केवळ विस्मित होऊन जातें. तर त्यांच्या ज्ञानाचे ध्वज आमच्या दृष्टीस पडले नसते तर आम्हांस त्यांची आठवण कोठें पडती? ज्या स्थानापासून एवढे सुखकारक परिणाम घडून येतात त्यांची तुलना दुसऱ्या साधारण कोणत्या विषया बरोबर करावी.

ह्या पुस्तकालयाच्या सभासदांचा हेतु केवळ मोठमोठाल्या ग्रंथांचा संग्रह करून पुस्तकालय सुशोभित करून ठेवावें इतकाच नाहीं. परंतु त्यांचा मोठा स्तुत्य उद्योग हाच आहे कीं, एशिया खंडाच्या प्रदेशांत पुरातन शिलालेख, ताम्रपट व जे जे पुरातन काळांतील कलाकौशल्यासंबंधी सांपडेल, त्याचा संग्रह करणें व त्याजवर विचार करणें, ह्या कामाचा विडा या सभेनें उचललेला आहे. याजप्रमाणें पुरातन काळीं भरतखंडांत जे जे शककर्ते व दुसरे राजे झाले त्यांचा शोध लावण्याप्रीत्यर्थ शेंकडो वर्षांमागील नाणें, शिक्के, मुद्रा अशा जमा करून ठेविल्या आहेत. व त्यांजवरून कित्येक राजांचे कारकीर्दीचा

ठराव केला आहे. शेंकडो रुपये खर्चून पुरातन लिपींचा शोध लावून त्या अर्था-सुद्धां सभेच्या वार्षिक इतिहासांत छापून त्यांचा प्रतिवर्षी एक ग्रंथ तयार करितात. या कामावर ५० रुपये दरमहा देऊन सरकारचे मदतीनें एक शास्त्री ठेवून हें काम प्रख्यात विद्वान् डॉक्टर विलसन् यांजकडे सोंपविलें होतें. आणि ह्या प्रीत्यर्थ सरकारनें आजपर्यंत पंचवीस तीस हजार रुपये खर्चिले. विद्वान् इंग्रज लोक ज्या ज्या देशांत आपल्या हुद्यावर जातात, तेथें या प्रकरणीं नवीन शोध करून जो कांहीं नूतन विषय सांपडेल त्यावर निबंध रचून तो या सभेकडे पाठवून देतात. तो सभेपुढें वाचल्यानंतर पुस्तकांत छापवितात. अशी त्यांची वहिवाट पुस्तका-लय स्थापित झाल्यापासून आजपर्यंत कांहीं विक्षेप आल्यावांचून सुरळीतपणें चालली आहे. एशिया खंडांतील शोध या नांवाचीं या पुस्तकालयांत जीं पुस्तकें आहेत, त्यांत भरतखंडांतील राजेरजवाडे, देवालयें, पुरातनलिपि यांजवर सुरस निबंध सांपडतात. आमच्या कित्येक राजे लोकांविषयीं कांहींच वास्तविक वृत्तांत सांपडत नसे; तो हल्लीं या परोपकारी मंडळीच्या योगानें आह्मांस समजला. हे तिचे आह्मांवर किती उपकार झाले ? असे या पुस्तकालयाच्या संबंधानें उपयुक्त विषयांवर ग्रंथ निघतात. प्रतिवर्षी इंग्लंड देशांत उत्तम प्रकारें नवीन ग्रंथ होतात. त्यांपैकीं ५,००० रुपयांचे ग्रंथ खरीद करून पाळी पाळी प्रमाणें सभासदांस वाचावयास द्यावे, व मासिक, त्रैमासिक पुस्तकें व वर्त्तमानपत्रें विकत घेऊन पुस्तकालयांत सभासदांसाठीं संग्रह करावा, असा या सभेचा नियम आहे. पाहा ! ह्या त्यांच्या वर्णनीय कृत्यावरून ते स्वत: विद्वान् होऊन दुसऱ्यांसही विद्येची अभिरुचि लागण्याचें साधन करून ठेवितात. ह्या पुस्तकालयांतील पुस्तकांची संख्या उत्तरोत्तर वाढत जाती. हे उपस्थित झाल्यावर कांहीं वर्षांनीं त्यांतील सर्व पुस्तकांचे अनुक्रमानें फेरिस छापून तयार करावें असा ठराव झाला, त्या वेळीं हें काम मयत जनरल् व्हान्स केनेडी यांणीं पत्करून मोठ्या चातुर्यानें सिद्धीस नेलें. ह्या फेरिस्ताचीं दोन मोठीं पुस्तकें छापिलीं आहेत. हें काम करण्यास मोठा विद्वान्, चतुर व किमानपक्ष पांच सहा भाषा पक्क्या जाणणारा पाहिजे. हे सर्व गुण जनरल केनडी यांमध्यें जागृत होते. हल्लीं पुस्तकांची संख्या वाढल्यामुळें नवीन फेरिस्त तयार करण्यासाठीं एक हजार रुपये खर्चावे असें ठरविलें होतें; परंतु केनडी साहेबासारिखा निपुण हें काम पत्करणारा सांपडणें कठीण. असें सांगतात कीं, ह्या पुस्तकालयांतील बहुतेक ग्रंथांचीं नांवें त्या विद्वान् गृहस्थांस मुखोद्गत होतीं.

लंडन शहरामध्यें रायल् एशियाटिक् सोसायटी नांवाचें जें एक मोठें पुस्तकालय आहे त्याची ही एक शाखा आहे. यावरून लंडन शहरामध्यें जो पुस्तकालयरूप वृक्ष आहे त्याचे महत्त्व ध्यानांत आणतां येईल. ह्या पुस्तकालयांत

सहस्त्रावधि अनेक लिपींत छापलेले व लिहिलेले ग्रंथ असून पुरातन काळांतील एशिया अथवा दुसऱ्या खंडांतील वस्तु एकत्र करून ठेविल्या आहेत. आणि ह्या वृक्षापासून जीं ज्ञानरूप सुरस फळें निघतात त्यांचा उपयोग सहस्त्रावधि लोक घेतात.

मुंबईतील ज्या पुस्तकालयाच्या शाखेविषयीं वर्णन करितों त्यास मुंबईत राहणाऱ्या प्रत्येक सभासदास प्रतिवर्षीं शंभर रुपये वर्गणी द्यावी पडती. व जे मुंबई सोडून दुसऱ्या गांवांत जाऊन राहतील त्यांस दरसाल पंधरा रुपये द्यावे पडतात. इची दरमहा सभा भरत असती. विद्वान् व संभावित गृहस्थ असून जे ह्या पुस्तकालयापासून ज्ञान संपादन करायास समर्थ असतील, त्यांसच या सभेचे सभासद करितात. कोणी द्रव्यवान् असून अविद्वान् असला तर उगीच खोगीर भरती करायास त्याला सभासद करीत नाहींत. बहुतकरून जे जे गव्हर्नर मुंबई इलाख्यावर येतात, ते ह्या सभेचे आश्रयदाते असतात, व मुख्य न्यायाधिशासारखे विद्वज्जन हिचे अध्यक्ष असतात. प्रारंभी जेव्हां या सभेची स्थापना झाली, तेव्हां सर जेम्स म्याकिंटाश् हे अध्यक्ष होते. हा हुद्दा त्या विद्वान् आणि प्रतापि पुरुषानें पुष्कळ वर्षेंपर्यंत मोठ्या तारतम्यानें व उमेदीनें बजाविला. परोपकारी व विद्वान् डॉक्टर विलसन् हे या सभेचे पुष्कळ वर्षेंपर्यंत अध्यक्ष होते आणि सध्या ते तिचे सन्मानित अध्यक्ष आहेत. हे उदार गृहस्थ ह्या सभेच्या कल्याणासाठीं फार झटतात व तीपासून एतद्देशीय लोकांस ज्ञान प्राप्त व्हावें व ते हिचे सभासद असावे म्हणून त्यांसाठीं ह्यांणीं पुष्कळ मोकाळिका केल्या आहेत. त्याचप्रमाणें सर अर्सिकन् पेरी ज्या वेळीं हिचे अध्यक्ष होते त्या वेळीं त्यांणीं एतद्देशीय पुष्कळ लोक ह्या पुस्तकालयाचे सभासद व्हावे म्हणून त्यांजकडून ५० रु० वर्गणी घ्यावी असें ठरविलें होतें.

आतां आमच्या देशांत ज्ञानरूप फळांचा वर्षाव करणारा हा वृक्ष कोणत्या परोपकारी आणि उदार गृहस्थानें कोणते वेळीं आणिला हें जाणणें आवश्यक आहे. ज्या सुज्ञ व विचारी गृहस्थानें आह्मांवर एवढे उपकार केले त्याचें नांव सर्वांस माहीत असलें पाहिजे. कांहीं वर्षांमागें मुंबईतील सुप्रीम कोर्टामध्यें सर जेम्स म्याकिंटाश् नामें मोठे निष्पक्षपाती, सहनशील व चतुर असे न्यायाधीश होते. जे या सभेचे अध्यक्ष होते असें सदरीं सांगितलें आहे त्यांनींच ही सभा सन १८०४ मध्यें लोककल्याणार्थ उपस्थित केली. ही केवळ इंग्रज लोकांसाठींच स्थापिली आहे असें कोणी समजूं नये. तर तिजपासून एतद्देशीय लोकांसही ज्ञान संपादन करून घेण्याचें साधन करून ठेवावें असा त्या परोपकारी गृहस्थाचा अभिप्राय, यांत कांहीं भ्रांति नाहीं.

सन १८६१ त मुंबईत राहणारे ह्या मंडळीचे सभासद पांसष्ट व बाहेरगांवीं राहणारे पंचेचाळीस होते. आणि ह्यांत एतद्देशीय लोकांची संख्या इतकी थोडी आहे कीं, तिजविषयीं सांगण्यास लाज वाटती. त्यांत पारशी लोकांतील बरेच गृहस्थ आहेत. परंतु हिंदुलोकांपैकीं फारच थोडे आहेत. किती हो ही दुःखाची गोष्ट ! मुंबई म्हटली म्हणजे इंग्रजी विद्येचें व व्यापाराचें व संपत्तीचें स्थान. तेथील लोक सुधारलेले, त्यांसच जर अशा पुस्तकालयांत जाऊन किंवा एथील पुस्तकें घरीं आणून वाचण्याचा कंटाळा, तर मग बिचाऱ्या इतर लोकांची काय कथा ? ज्या शहरांत विद्यालयें व पुस्तकालयें पुष्कळ आणि वाचणारांची संख्या जाजती तेंच शहर लौकिकास येतें. परंतु आमच्या कित्येक श्रीमान् लोकांची अशी समजूत आहे कीं, सरस्वती आणि लक्ष्मी यांमध्यें वैर आहे. ज्या ठिकाणीं एक वसती त्या ठिकाणीं दुसरी नांदत नाहीं. या भीतीनें ते गर्भगलित होऊन विद्येचा नाद सोडून देतात. परंतु ही केवळ मनःकल्पित भीति आहे. जेथें ज्ञान आहे तेथें सुख आहे, यात कांहीं भीति नाहीं. पहा ! इंग्रज लोकांमध्यें जे जे विद्वान् तेंच बहुतकरून सधन, सुखी व प्रतिष्ठित असतात आणि यास आमच्या एका ऋषीचेंही मत आहे.

विद्या ददाति विनयं विनयाद्यातिपात्रतां ॥
पात्रत्वाद्धनमाप्नोति धनाद्धर्मं ततःसुखं ॥

कृतीवरून मनुष्याच्या स्वभावाचें अनुमान होतें. जेव्हां विद्येविषयीं आमची अनास्था परकी लोक पाहतात तेव्हां अर्थात्‌च ते आह्मांस अज्ञानी समजतात. ग्रंथांतरीं असी गोष्ट सांपडती कीं, एके दिवशीं रोमशहराचा बादशाहा सीझर याची स्वारी रस्त्यांतून जात असतां कोणी परदेशी बगलेंत कुतऱ्याचीं व माकडांचीं पिलें मारून त्यास कुरवाळीत जात आहेत असें त्याचे दृष्टीस पडलें. तेव्हां त्याच्या तोंडांतून पुढील शब्द निघाले. " काय हो या लोकांमध्यें स्त्रियांस मुलें होत नाहींत काय ? " त्याप्रमाणें जेव्हां इंग्रज लोक आम्हांस पोरकट गोष्टींचें अवलंबन करितानां पाहतात, तेव्हां ते असें म्हणतात " कायहो अज्ञानी हिंदुलोक ! यांमध्यें कोणी विद्वान् व पोक्त पुरुष होत नाहींत ? " थोडक्या दिवसांवर एका सुज्ञ इंग्रज गृहस्थांच्या तोंडांतून असे शब्द निघाले. " अहो, हिंदू लोकहो, तुम्हांमध्यें मागें मोठमोठे विद्वान् होऊन गेले, म्हणून तुह्मांवर मी प्रीति करितों, परंतु हल्लींची तुमची विद्येवरील अनास्था पाहून मला तुमचा तिरस्कार येतो. "

ह्या पुस्तकालायाची स्थापना होऊन आज सुमारें छप्पन्न वर्षें झालीं. एवढ्या काळांत शतावधि इंग्रजलोक ह्या सभेचे सभासद होऊन गेले व भरत-

खंडासंबंधीं जे जे शोध त्यांला करणें आवश्यक होते ते करून ह्या सभेच्या संबंधानें मोठमोठाले ग्रंथ छापिले आणि अद्याप त्यांणीं तोच क्रम चालविला आहे. बरें, ह्या इतक्या दीर्घ काळांत आमच्या स्वदेशीय बंधुजनांतील किती गृहस्थांनीं या सभेपासून ज्ञान प्राप्त करून घेऊन लोककल्याणार्थ किंवा स्वहितार्थ किती ग्रंथ रचिले ? मयत बाळ गंगाधर शास्त्री ह्या सभेचे सभासद होते. आणि त्यांणीं आपल्या अल्पवयांत ह्या सभेकडून जेवढें ज्ञान संपादन करवेल तेवढें केलें. त्यांनीं इंग्रजी भाषेंत लिहिलेले कित्येक विषयांवर सुरस निबंध ह्या व जिओग्राफिकल् सोसायटीच्या वार्षिक इतिहासांत छापलेले अढळतात. असीं हल्लीं एक दोन विद्वान् गृहस्थांचीं नांवें या सभेच्या पटांत सांपडतील. परंतु या मुंबई टापूची सुमारें आठ लक्ष प्रजा आहे. त्यांत हीं नांवें कशांत काहींच नाहींत. "समुद्रामध्यें जायफळ." परंतु मुंबई टापू कां ह्मणावें, सर्व मुंबई इलाखा ज्यांत लोकांची संख्या दीड कोटीवर आहे, त्यांत हे इतके गृहस्थ म्हटलें असतां चिंता नाहीं.

आह्मां लोकांमध्यें पूर्वींपासून असीं पुस्तकालयें नसल्यामुळें मध्यम प्रतीच्या लोकांस एकादा ग्रंथ अवलोकन करण्याची इच्छा झाल्यास तो मिळणें कठीण होतें. आणि एखाद्यास ग्रंथ दिला असतां तो परत येण्याची भ्रांति पडे. यामुळें कोणी एक विद्वान् असें म्हणतोः—

पुस्तकं वनिता वित्तं परहस्तं गतं गतं ॥
कदाचित् पुनरायातं नष्टं भ्रष्टं च खंडितं ॥

एका ग्रंथांत असें वाचण्यांत आलें कीं, फ्रान्स देशामध्यें एका वयातीत झालेल्या झालेल्या पुरुषानें पंचाण्णवाव्या वर्षाच्या वयांत एक मोठा सुरस उद्भिद शास्त्रावर ग्रंथ रचून लोककल्याणार्थ छापविला. या प्रमाणें चांगली सवई लावून घेतल्यानें असे सुखदायक परिणाम घडून येतात. परंतु आमच्या लोकांचा असा समज आहे कीं, पुष्कळ ग्रंथावलोकन केल्यानें वेडा होतो. कित्येक आमचे लोक वृद्धपण प्राप्त झालें असतां उद्योग करवत नसल्यामुळें आपलें आयुष्य निजण्यांत व निरुपयोगी गोष्टी करण्यामध्यें घालवितात. ते जर या प्रतीच्या पुस्तकालयांत जाऊन पुस्तकें वाचण्यांत व त्यांवर आपले विचार लिहिण्यांत खर्चितील तर त्यांकडून आपलें हित व देशाचें मोठेंच कल्याण होईल. एके दिवशीं एका विद्वान् इंग्रजानें असा प्रश्न केला, तो ऐकून मोठें आश्चर्य वाटलें. "ग्रंथावलोकन केल्यावांचून मनुष्याचा निर्वाह होईल काय ?" यास आमचे लोक उत्तर काय देतील ? हें माझ्यानें सांगवत नाहीं.

अजरामरवत्प्राज्ञो विद्यामर्थं च साधयेत् ।।
गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् ।।

या श्लोकाच्या अन्वयाकडे लक्ष लावून जेव्हां आमचे तरुण व वृद्धलोक चालतील तेव्हांच त्यांला विद्येचा सुखानुभव घेतां येईल.

जनरल् व्हान्स केनडी ज्याविषयीं वर सांगितलें आहे, तो नव्वद वर्षांचा वृद्ध होता, तरी शास्त्री ठेवून संस्कृत ग्रंथ पढत असे. आणि मराठी, गुजराथी, व इंग्रजी नवीन पुस्तकें घेऊन सवड सांपडे तेव्हां अवलोकन करीत असे. या प्रमाणें विद्या संपादन करण्यांत कित्येक इंग्रज विद्वान् लोक आपल्या आयुष्याच्या व्यय करितात.

सन १८५२ सालीं या शहरांत एक मोठीच सांगण्याजोगी गोष्ट घडून आली. एतद्देशीय सर्व जातीचे गृहस्थ एकत्र जमून सभा भरली होती. ह्या सभेंत शेट सावकार, सरकारी चाकर व दुसरे प्रतिष्ठित लोक जमले होते. हिचा उद्देश असा होता कीं मुंबई इलाख्यांतील रयतेस कांहीं उपद्रव होत असला तर त्याचा शोध लावून सभेच्या संबंधानें रयतेचीं दुःखें कंपनी सरकारच्या नजरेस आणून देऊन रयतेस हरप्रकारें सुख प्राप्त होई असें करावें. कदाचित् जरूर पडल्यास कंपनी सरकारचें अनुमत घेऊन मुख्य सरकारास देखील अर्ज करून देशांत स्वस्थपणा राखावा. असे या सभेचे स्तुत्य उद्देश होते. ह्या सभेस " बांबे आसोसिएशन् " असें नांव ठेविलें होतें. प्रथम ही सभा भरली होती तिची रचना व गृहस्थ लोकांचा थाट व हुशारी पाहून कित्येकांस असें वाटलें कीं, हा समाज आतां एतद्देशीय लोकांचें दारिद्य आणि दुःख हीं देशांतरास लावून देईल. आणि वास्तविक ही सभा इंग्लंड देशांत पार्लमेंट या नांवाची एक सभा रयतेच्या तरफेनें आहे तिचीच एक प्रतिमा असावी असा बहुतेकांस भास झाला. परंतु आज दिवसापर्यंत या सभेकडून सांगाया जोगें कांहीं घडून आलें नाहीं. आणि अजून रयतेस कोणत्या प्रकारचीं दुःखें आहेत याचाही शोध लावला नाहीं, व पुढें लावायाचा हेतुही दिसत नाहीं. यावरून आमचे लोक केवळ आरंभशूर आहेत असें जे कित्येक म्हणतात तें खोटें नाहीं. " डोंगर व्याला आणि उंदीर निघाला. " या प्रमाणें या सभेची अवस्था झाली. जरी मुंबईतील निरनिराळ्या जातींचे गृहस्थ एखादे वेळीं लोककल्याणार्थ कृत्यें करण्यासाठीं एकत्र जमतात, तरी त्यांमध्यें तादृश एकी नव्हती. त्यांत एकमेकांशीं मोकळे मनानें वागणारे थोडेच सांपडतात. व ते अशा प्रसंगीं परोपकार बुद्धीचा उपयोग करावा, त्या रीतीनें करीत नाहींत. त्यामुळें आमची कोणतीही स्वदेश

कल्याणाविषयींची गोष्ट सिद्धीस जात नाहीं. जरी कित्येक बाह्यात्कारी एकमेकांशीं स्नेह भावानें बोलत असतात, तरी अंतर्यामीं जातिभेदामुळें ह्मणा किंवा दुसऱ्या कारणावरून ह्मणा मनांत कांहीं तरी किसपट असतें. आणि हेंच एक-आमचा मोठा शत्रु आहे. जेव्हां मुंबईतील किंबहुना ऐतद्देशीय लोक एकमेकांशीं मोकळ्या मनानें व उदार दृष्टीनें वागूं लागतील तेव्हांच ते सुखी होतील. त्याशिवाय जरी आह्मीं अशा शेंकडो सभा उपस्थित केल्या आणि हजारो शाळा घातल्या तरी फलश्रुति कांहीं नाहीं. देशाभिमान सर्वांमध्यें सारखा असला पाहिजे तेव्हांच या गोष्टी सिद्धीस जातात. प्रत्येक मनुष्यानें जातिभेद मनांत न आणितां सर्वांशीं समदृष्टीनें वागलें पाहिजे.

: १५ :

दा दो बा पां डु रं ग

यशोदा पांडुरंगी

ज्या ज्या देशांत आणि प्रांतांत महाराष्ट्र भाषा चालत आहे, आणि ती लोक समजत आहेत, त्या त्या देशांत मोरोपंतांच्या नांवा प्रमाणें इतर थोड्याच महाराष्ट्र कवींचें नांव प्रसिद्ध असेल. यांस आणखी मयूर कवि असेंहि म्हणतात. या कवीचा जितका वृत्तांत या काळीं मिळेल तितका सारा मिळवून संग्रहीत करावा अशी माझी इच्छा फार आहे. परंतु त्याविषयींची सामग्री सद्य: मज जवळ नसल्या मुळें तसें आतांच माझ्यानें करवत नाहीं. सांप्रत इतकेंच माझ्या ऐकण्यांत आहे कीं, कोल्हापूर प्रांतीं पन्हाळा किल्ला प्रसिद्ध आहे, त्या गडावर पूर्वीं पेशवाईंत कऱ्हाडे ब्राह्मण जातीचे रामाजीपंत पऱ्हाडकर या नांवाचे कोणी कारकून होते; त्यांचे मोरोपंत हे चिरंजीव. यांच्या घरीं कारकुनीचा पेशा चालत असतांहि मोरोपंतांनीं लहानपणीं काव्यव्युत्पत्ति चांगली संपादन केली. पुढें बारामतींत बाबूजी नायक यांचे पुत्र पांडुरंगराव या नांवाच्या गृहस्था कडेस जहागीर होती, त्यांणीं रामाजीपंतास आपल्या जवळ बलाविलें, आणि आपल्या खासगीच्या दफतरांत त्यांस कारकुनीची असामी दिली. एथें मोरोपंत हे पन्हाळ्या किल्ल्या वर आपल्या तीर्थरूपाचें कारकुनीचें काम चालवित होते. असें असतां एकदां दफतरांत दोन आण्याची चूक पडली होती. तिचा मेळ मिळविण्यांत पंतांस आठ दिवस सतत डोळ्यांत काजळ घालून हिशोब तपासावा लागला. हें त्यांचें अल्प वयांत इतकें अव्यवहित लक्ष पाहून त्यांच्या यजमानानें त्यांस विनोदानें ह्मटलें, ' जर तुह्मीं असें लक्ष ईश्वरभजनीं लाविलें असतें तर दोन आण्यांचे ठिकाणीं तो तुह्मांस मिळाला असता. ' हाच विनोद पंतांनीं उपदेशस्थानीं मानून तेथेंच यजमाना पुढें कारकुनीची लेखणी ठेविली; आणि पुढें आपल्या तीर्थरूपा पाशीं बारामतीस गेले. तेथें पांडुरंगरावानें त्यांची काव्यव्युत्पत्ति सुंदर आहे असें पाहून त्यांस प्रथम रामरक्षेचें स्तोत्र अनुष्टुप् छंदांत आहे तें दुसऱ्या छंदांत वाचायास सांगितलें. पंतानें थोडा अवकाश मागून ते स्तोत्र दुसऱ्या छंदांत वाचून आणखी साऱ्या रामायणाचा अर्थहि त्यांत संग्रहीत

केला

केला. हें पाहून पांडुरंगरावास फार आनंद झाला, आणि त्यांणीं त्या दिवसापासून मोरोपंतांस आपल्या घरचे पुराणिक नेमून त्यांचें व त्यांच्या तीर्थरूपाचें पान आपल्या जवळ वाढण्याची वर्दी दिली. या प्रमाणें पांडुरंगराव भेडजकर यांच्या पदरीं असतां मोरोपंतानें त्यांच्या पंक्तीस जेवावें, आणि अहोरात्र आर्या व दुसरीं कवनें रचून प्रथम पाटी वर गेरूनें खरडून ठेवावीं, आणि मग तीं सारीं आपल्या हातानें साफ लिहून ठेवावीं असा उद्योग आरंभिला. भारतांत पहिल्यानें कर्णपर्व केलें असें सांगतात. या प्रमाणें पुढें हे मोठे कवि झाले. या कवीनें आर्याछंदांत पुष्कळ ग्रंथ लिहिला आहे. सारें अठरापर्व महाभारत, सारें द्वादशस्कंध भागवत, या शिवाय पुष्कळ लहान लहान स्तोत्रें, माहात्म्यें, आणि संतचरित्रें, हे सर्व ग्रंथ मोरोपंतानें आर्याछंदानें महाराष्ट्र भाषेंत रचिले आहेत. या शिवाय हे कविराज रामोपासक होते; या कारणानें त्यांची रामचरित्रा वर नैसर्गिक भक्ति असल्यानें याणीं आर्येंत व इतर छंदांत मिळून एकशें आठ रामायणें रचिलीं आहेत, अशी लोकांत प्रसिद्ध वदंता आहे. म्यां आपल्या महाराष्ट्र भाषेच्या व्याकरणाच्या प्रस्तावनेंत या कवी विषयीं सूचनार्थ असें लिहिलें आहे कीं,–" अलीकडेस पेशवाईत बारामतीकर पांडुरंगराव यांच्या पदरीं मोरोपंत या 'नांवाचे कारकून होते, पुढें त्यांची काव्यव्युत्पत्ति सर्वोत्कृष्ट पाहून त्यांस पांडुरंगरावानीं 'आपल्या घरचे पुराणिक केलें; त्याणीं तर आपल्या रसभरित काव्यानें या भाषेस 'केवळ संस्कृत भाषेचीच प्रौढी आणिली. वामन आणि मोरोपंत यांस अनुक्रमें 'महाराष्ट्र भाषेचे व्यास व श्रीहर्ष ह्मटल्यासहि साजेल. प्राकृत भाषे विषयीं नाक 'मुरडणारे जे शास्त्री व पंडित यांस यांनींच लाजविलें. आजपावेतों जें कांहीं 'भांडार संस्कृत भाषारूप पेटींत कुलुप घालून ठेविलें होतें, आणि तिची किल्ली 'ब्राह्मणांच्याच स्वाधीन होती, तें ज्ञानेश्वर, एकनाथ, मध्वनाथ, मुक्तेश्वर, वामन, 'मोरोपंत, आदिकरून जे ब्राह्मण कवि झाले त्यांणीं उघडून काढून, त्याचें प्राकृत 'लेणें करून, सर्व लोकांस अर्पण केलें; ह्मणोन नुसतें त्यांचें कौशल्य व चातुर्य 'वर्णात्रें इतकेंच नाहीं, परंतु यांची औदार्यपूर्वक जी औपकारिक बुद्धि तिचीहि 'या प्रसंगीं प्रशंसा केली पाहिजे." यांत म्यां मोरोपंत कवीची श्रीहर्षाशीं तुलना केली आहे ती किती समंजस व योग्य आहे, हें या कवीचें सारें काव्य साद्यंत लक्षपूर्वक पर्यालोचनांत आणिलें असतां तर ध्यानीं येईलच. परंतु माझ्या बुद्धीस असें वागतें कीं, हा पुढला त्यांचा लहानसा स्तोत्ररूप ग्रंथ, ज्याज वर म्यां बालबोधार्थ टीका केली आहे, त्याच्या काव्यसरणीचें मनन केलें असतांहि ध्यानांत आल्या वांचून राहणार नाहीं. कालिदास, भवभूति, माघ, आणि श्रीहर्ष, यांचीं अनुक्रमें रघुवंशकिरातादि जीं

प्रसिद्ध

प्रसिद्ध महा काव्यें आहेत, त्यां मध्यें शब्दांच्या काठिन्या वरून आणि अर्थान्वयाच्या गूढत्वा वरून श्रीहर्षाचें जें शेवटलें नैषध काव्य, त्याचें दुर्बोधत्व बहुधा लोकानुभूत आहे; तसेंच ज्यांस संस्कृतभाषा अवगत नाहीं, अशा प्राकृत जनांस मोरोपंताच्या काव्यांत संस्कृत शब्दांचा भरणा पुष्कळ असल्यानें सहाजिक त्या शब्दांच्या अपरिचया मुळें आणि प्राकृत जनांस अप्रसिद्ध असे संस्कृत शब्द, आणि निवळ प्राकृत व ग्राम्य शब्द, यांचें मिश्रण असल्यानें संस्कृत भाषाभिज्ञ अशा पंडितांसहि त्यांची निवड करून अर्थयोजना करण्यांत अवघड प्रसंग असण्याच्या दृढ संभवा मुळें, तसेंच समयविशेषीं शब्दांचा दूरान्वय असल्यानें अर्थज्ञानाच्या दुःसाध्यत्वा मुळें मोरोपंताचें काव्यहि दुर्बोध आणि काठिण म्हणून बहुधा सर्व जनांस अनुभूत आहे.

ज्या काळीं छापखाने व टपालें यांचें या देशांत नांवहि नव्हतें त्या काळीं मोरोपंत जिवंत असतां त्यांच्या काव्यकर्तृत्वाची प्रसिद्धि काशी पर्यंत लांबलीं होती; आणि ते निवर्तल्यास अद्यापि शंभर वर्षें झालीं नाहींत इतक्यांत या देशांत जगप्रसिद्ध कवि म्हणून त्यांची कीर्ति पसरून गेली आहे; याचीं कारणें पाहतां या देशांत हरिदासांचीं कीर्तन करण्याची जी वृत्ति चालत आली आहे ती या कारणांत एक मुख्य कारण होय, असें मला दिसतें. तसें आणखी या वृत्तींस मोरोपंताच्या कृतीनेंहि फार उत्तेजन दिलें; तें असें कीं,—मराठ्यांचें राज्य स्थापित झाल्यापासून, आणि त्यांत विशेषेंकरून पेशवाईच्या कारकीर्दींत त्या राज्याचा अत्युत्कर्ष झाल्यापासून, ब्राह्मण लोकांमध्यें वेदविद्या आणि शास्त्रविद्या यांच्या बला वर ज्या वृत्त्या चालत होत्या त्यांस मोठें उत्तेजन मिळालें, तथापि त्या उत्कर्षा पूर्वीं आणि त्या उत्कर्षाच्या वेळीं हरिदासांची जी या देशांत वृत्ति चालत होती, ती बहुधा नामदेव, तुकाराम, यांचे अभंग; ज्ञानेश्वर; मुक्तेश्वर आणि श्रीधर, यांच्या ओव्या; एकनाथ, मध्वनाथ, आदिकरून साधू कवींचीं पदें, अमृतरायाचीं पदें, आणि कटिबंध, कबीराचे दोहरे व कबितें, आणि वामन पंडिताचे श्लोक; यांचीं बहाडें मुखपाठ करून, आणि त्यांत व्युत्पन्न हरिदास असल्यास थोडी काव्युत्पत्ति साध्य करून, त्यांच्या साहाय्यानें चालत होती; ह्मणून सभेंत विद्वज्जनसमाजांत हे हरिदास कितीहि वक्ते आणि सरस कीर्तन करणारे असले, तथापि दक्षणेच्या बहुमानांत या गरिबांची कोटि चौथी असे; म्हणजे प्रथम वैदिक, दुसरे शास्त्री, तिसरे पुराणिक, आणि चौथे हरिदास अथवा गोसांवी; परंतु ही वृत्ति बहुधा भगवद्भक्तीच्या बला वर आणि प्राकृत कवितांच्या साहाय्या मुळें चालत होती, म्हणून शूद्र अंत्यज यांसहि या वृत्तींत शिरण्यास कोणी प्रतिबंध केला नाहीं. हरिकीर्तन हे मुक्तद्वार समजून कोणत्याही जातीस

या वृत्तींत शिरण्याचा प्रतिबंध ब्राह्मणाच्यानींहि करविला नाहीं. ब्राह्मण, शूद्र, अंत्यज आणि शेवटीं मुसलमानहि, विठोबाचे भक्त होऊन कपाळीं बुका आणि गळ्यांत तुळशीच्या माळा घालून, यथेच्छ भजनें आणि कथा करूं लागले. त्यांत जो वक्ता आणि रसिक हरिदास असे, मग तो शूद्र कां असेना, तो श्रोते मिळवून त्या काळीं लोकांत प्रशंसेस पात्र होत असे. तथापि या वृत्तीस बहुधा प्राकृत कवितांचें साहित्य, आणि शूद्रादि नीच वर्णाचा संसर्ग असे, म्हणून ब्रह्मसमाजांत ही वृत्ति जशी बहुमानास योग्य व्हावी तशी झाली नाहीं. कितीहि ब्राह्मणव्यतिरिक्त जातीचा हरिदास रसिक आणि वक्ता असला तथापि त्यास सभेंत तर बहुमान नसेच, परंतु उलटें ही वृत्ति धारण करणाऱ्या ब्राह्मणजातीच्या हरिदासासहि सभेंत खालच्या कोटींत जावें पडे. तथापि वक्तृत्व हा लोकांच्या मनाचें रंजन करणारा, आणि तसाच प्रेमळ वक्ता असल्यास तो लोकांच्या मनाचें आकर्षणहि करणारा गुण होय, म्हणून सर्व प्रकारच्या लोकांत वक्त्या हरिदासाची वाहवा होऊन त्यास सर्वांकडून जशा बिदाग्या होऊन द्रव्यप्राप्ति होत असे, तशी वैदिक, याज्ञिक, आणि शास्त्री, यांस होत नसे. त्यांत पेशवाईंत जेव्हां महाराष्ट्रांत ब्राह्मणजातींत विद्वत्ता वाढत गेली, तेव्हां हरिदासांसहि शास्त्री, पंडित, अशा विद्वान् पुरुषां कडून वाहवा मिळविण्याचें अगत्य पडत गेलें. या कारणा स्तव ब्राह्मण जातीच्या हरिदासांस काव्यव्युत्पत्ति व क्वचित् शास्त्रव्युत्पत्तिहि वाढविण्याचें अगत्य पडत गेलें. नुसत्या प्राकृत ओव्या, अभंग आणि पदें, यांजवर कथा करून शास्त्री, पंडित आणि व्युत्पन्न अशा श्रोत्यांचें मनोरंजन करणें कठीण, म्हणून त्यांच्या भरतीस भागवतांतील श्लोक, सुभाषित श्लोक, चंपु, नाटकें, आणि काव्यें, यांतील वेंचे पाठ करून चांगली झणझाणित कथा करून दाखविणें प्राप्त होत गेलें. अशा प्रसंगाच्या अवसरीं मोरोपंतानें बारामतींत संस्कृत काव्याशीं तोल घेणाऱ्या अशा आपल्या प्राकृत आर्या बाहेर काढिल्या. तेव्हां अर्थात् अशा हरिदासांच्या द्वारानें त्यांचा प्रसार होण्यास विलंब लागला नाहीं; हेंच मोरोपंताची कीर्ति ते जिवंत असतांच काशीपर्यंत लांबण्याचें जें कारण म्हणून म्यां सांगितलें तें.

आणखी अशी अटकळ होत्ये कीं जेव्हां प्रथम मोरोपंतांच्या आर्या बारामतींतून बाहेर निघूं लागल्या, त्या काळींच बारामती जवळ सोलापुरांत रामजोशी या नांवाचे व्युत्पन्न आणि परम रसिक कवि असून त्यांणीं हरिदासाच्या वृत्तींचें अवलंबन केलें होतें; आणि नुकतेच कीर्तीच्या अंगणांत जाण्यास उमऱ्या वरून बाहेर पाऊल टाकित होते; तों इतक्यांत त्यांस पंताच्या कृतिकुमारिकेचा आल्हादजनक शकुन भेटला; तिच्या सौंदर्यानें आणि निमंत्रणरूप आनंदजनक

अशा

अशा प्रेमकटाक्षानें आकर्षितांतःकरण होऊन ही उपवर कन्या आपण वरावी अशी मनांत आवड धरून त्यांणीं तिच्या पित्याचा शोध करण्या करितां तिचेंच अनुसरण केलें. पित्यानींहि आपल्या कन्येच्या गुणास हा इतका लुब्ध पाहून तिणें यांचें पाणिग्रहण केलें असतां ती लवकरच सुखी होईल ह्मणून तसें करण्यास आपलें पूर्ण अनुमोदन दिलें. हा प्रसंग कोणी खालीं लिहिलेल्या आर्येंत असाच वर्णिला आहे;—

जैशीजनकेंदिधली सच्चिद्घनरामजोसितात्याला
तैशीमयुरेंदिधली तीआर्यारामजोसितात्याला

किंबहुना असेंहि ऐकण्यांत आहे किं, मोरोपंतांच्या आर्यांनींच रामजोशाची वृत्ति हरिकीर्तना कडेस वळविली. त्या पूर्वीं ते कलगीतुऱ्याच्या नादांत असून, लावण्याच्या छंदा वर कवनें करून, स्वच्छंदानें डफ, तुणतुणें, सारंगी आणि नाचेपोर हातीं घेऊन चरितार्थ चालवित होते. ही वेळ बाजीराव रघुनाथ पेशवे यांच्या विलासाच्या आरंभाची असावी अशी अटकळ होत्ये. त्या काळीं रावबाजीच्या उत्तेजनानें पुणें शहरांत व त्या शहराचा वारा लागून जेथें तेथें शिमग्याचें चांदणें वाढत चाललें होतें. दिवसास ब्रह्मभोजनाचा थाट, आणि दिव्यांत वात पडली नाहीं तों मंदिरांत चवघडे सणया यांचा मंजूळ घोष; श्रीमंतांच्या व सरदार लोकांच्या वाड्यांत सरकारी तायफांचे मुजरे; रात्रीस रस्त्यांत आणि बोळांत फिरणाऱ्या विलासी लोकांचीं मनें आपणा कडेस ओढून घेणारे नुकतेच चिमणी, साळू, मैना, यांच्या मंजूळ कंठांत होणाजी बाळानें घातलेले खडे सूर, आणि फौजेकडील सिलेदार, बारगीर, शिपाई, आणि शहरांतील सुखवस्तु शिंपी, माळी, सराफ, दुकानदार, यांस रिजविण्या करितां बहिरू, मल्हारी, धोंडीबापु, सगनभाऊ आणि रामागोंधळी, यांनीं सजविलेले डफ तुणतुण्याचे तमासे, आणि कलगी तुऱ्याचीं भांडणें, हे सर्व थाट रावबाजीच्या उल्लसित मनोवृत्तीच्या प्रेरणेनें पुणें शहरांत जेथें तेथें गाजून राहिले होते. मग 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें त्या प्रेरणेचा अंमल सर्व पेशवाईत पसरला नसेल असें संभवत नाहीं. त्या काळीं सर्व गुणिजनाचे आशेनें भरलेले डोळे पुणें शहराकडेस लागले असून, त्या शहरानें जो कित्ता घातला होता, त्याची नक्कल जेथें तेथें होऊन कित्येक ठिकाणीं त्या नकलेवर तान करणारे उमेदवारहि निपजूं लागले. रामजोशांसहि यद्यपि अशा उमेदवारांमध्यें गणिलें, तथापि त्यांच्या गुणांस न्यूनत्व नयेतां उलटी ती त्यांची उमेद प्रशंसेस पात्र होईल; कारण त्यांच्या कवनावरून रामजोशी हे चांगले व्युत्पन्न आणि साहित्यशास्त्रज्ञ असावे

असे

असें अनुमान होतें. असें असतां त्यांणीं आपलें लक्ष त्या काळाच्या इतर पंडितां प्रमाणें सभेंत शुष्क वादविवाद करून शालजोड्यांची आणि दक्षणेची प्रतिष्ठा मिळविण्या कडेस न लावितां, सर्व लोकांचें मनोरंजन करून त्यां मध्यें वाहवा मिळविण्या कडे लाविले, हें आश्चर्य होय. त्यांत आणखी ब्राह्मणानें विद्वानाची पूज्य प्रतिष्ठा तुच्छ मानून केवळ लोकरंजनार्थ शूद्रवृत्ति धारण करून तमासगिरांच्या निर्मत्सनेचा अंगीकार केला, येणेंकरून रामजोशी हे मोठे उदारमनाचे पुरुष होते, असें दिसतें; तसें असल्या वांचून त्या काळीं इतक्या धैर्याचें कर्म त्याजकडून घडणें कठीण, म्हणून माझ्या मतें ते मोठे प्रशंसेस योग्य होत. जर राघो धंवशा, मार्तंडा शिंपी, बहिरू, मल्हारी न्हावी, सगनभाऊ मुसलमान, अनंतफंदी ब्राह्मण, आणि रामा गोंधळी; यांणीं आपआपले फड तयार करून डफावर थाप मारल्या बरोबर पुणें शहरांत हजारो लोकांचे थवे आपल्या तमाशांत ओढून आणून त्यांस रिजवून त्यांजपासून ओंजळी भरभरून रुपये, जरीचे दुपेटे, आणि भरगच्ची शेले घेतले; तर मग रामजोशी ब्राह्मणानें आपल्या संस्कृत वाणीच्या बळानें त्यांजपेक्षां अति सरस रीतीनें वरल्या थराच्या लोकांस रिजवून आपला प्रपंच निर्वाह कां चालवूं नये ! आणि तसा त्याणें चालवायास आरंभ केला इतक्या वरून आतां तो आपल्या प्रशंसेस मुकला असें माझ्यानें अगदीं म्हणवत नाहीं. आणखी माझ्या ऐकण्यांत आहे कीं, या विद्वान् पुरुषाची प्रकृति विलासी आणि काहींशी फक्कड होती. अर्वाचीन स्मृतिकार आणि भट्ट यांच्या पद्धती वरून अत्यंत संकोचित झालेलीं जीं ब्राह्मण जातीचीं मनें, त्याप्रमाणें यांचें मन संकोचित नव्हतें. सोंवळें ओवळें आणि बाहेरील दांभिक आचार यांची त्या काळीं मोठी दांडगी पुष्टि पाहून यांच्या मनानें कंटाळा घेतला होता; इतकेंच नाहीं, परंतु अशा दांभिकांनीं असें आपलें शोचनीय अज्ञान टाकून सत्याकडे आपलें मन वळवावें, एतदर्थ या सत्पुरुषाचा उपदेशहि चालू होता असें यांच्या कृती वरून दिसते.

......सांप्रत प्रस्तुत ग्रंथविषयक कांहीं अभिप्रेतार्थांचें कथन इष्ट जाणून करितों. आपल्या इष्ट देवतांचें अथवा पुण्यश्लोक देवांचें अथवा अवतारी पुरुषांचें स्तवन ज्यांत केलें असतें, त्या लहान ग्रंथास स्तोत्र म्हणतात. हें बहुधा सर्वांस ठाऊक आहे. अशीं स्तोत्रें मोरोपंतानीं पुष्कळ केलीं आहेत. त्यांतील केकावलि हा एक ग्रंथ समजला पाहिजे. हा त्यांच्या स्तोत्ररूप ग्रंथा मध्यें मोठा विख्यात ग्रंथ होय. केकावलि शब्दाचा अर्थ असा होतो कीं, केका म्हणजे संस्कृत भाषेंत मोराच्या शब्दास म्हणतात, म्हणजे ज्यास शुद्ध मराठींत मोराचा टाहो असें म्हणतात. त्याची जी आवलि म्हणजे पंक्ति, अर्थात् एकामागें एक

मोराचे

माराचे टाहो, त्यांस केकावलि ह्मणावें. आतां आपल्या कवीनें आपलें नाम सार्थक करून आपल्यास मयूरपक्षी कल्पून कृपाघन जो भगवान त्यास उद्देशून आपले जे एकामागें एक प्रार्थनारूप श्लोक त्यांस केकावलि म्हटलें आहे; आणि हें अभिधान आपल्या कवीच्या सरस रुचीस अनुरूप आणि शुभदायक होय, असें समजलें पाहिजे. यद्यपि मोरोपंत हे रामोपासक होते असें प्रसिद्ध आहे. तथापि त्यांच्या कृती वरून जी त्यांची अंतःकरणवृत्ति अनुमित होत्ये, तिज वरून मला तर स्पष्ट दिसतें कीं, जरी त्यांचें उपास्य दैवत राम होतें, तरी त्यांची सर्व देवां विषयीं पूज्यबुद्धि असून ते परम भाविक आणि श्रद्धाळु पुरुष होते यांत मला किमपि संदेह वाटत नाहीं. नुसती देवतां विषयींच त्यांची पूज्यबुद्धि होती असें नाहीं; परंतु भाविक वारकऱ्यां सारिखी संत साधूं विषयींहि त्यांची अत्यंत प्रेमळ बुद्धि होती, असें त्यांच्या सहाजिक वाणी वरूनहि दिसतें. परंतु हा आपला प्रेमळभाव त्यांणीं आपल्या सन्मणिमालेंत विशेषेंकरून प्रकट केला आहे. या देशांत विख्यात जे अलिकडचे साधु संत त्यांची त्या ग्रंथांत त्यांणीं नमनपूर्वक थोडक्यांत स्तुति केली आहे. तींत शिंपी, सोनार, वाणी, माळी, कुंभार, चाह्मार, म्हार, कसाई, आणि मुसलमान, इत्यादि ब्राह्मणांनीं नीच मानिलेल्या जातीच्या साधूंसहि त्यांणीं आपल्या नमस्कारानें ब्राह्मणाच्या पंक्तींत आणून बसविलें आहे असें स्पष्ट दिसतें. नामदेव, नरहरि, तुकाराम, सांवता, गोऱ्हा, रोहिदास, चोखामेळा, सजना, कबीर, आणि शेख महम्मद, यां साधूं विषयीं [त्यांनीं लिहिलेल्या काव्यां]वरून हे आपले कवि परम साधु आणि अत्यंत प्रेमळ वृत्तीचे पुरुष होते असें स्पष्ट दिसतें, आणि प्रस्तुत ग्रंथा वरूनही बुद्धिवान पुरुषांच्या लक्षांत असें आल्या वाचून राहणार नाहीं. या ग्रंथांत त्यांहीं विष्णूस उद्देशून स्तवन केलें आहे. पहिल्या तीन केकांत शिष्टसांप्रदायानुसार आपल्या आराध्य दैवताच्या चरणांचें माहात्म्य वर्णून त्यास अभिवंदन केलें आहे. हा सांप्रदाय परम स्तुत्य होय; कारण येणेंकरून वंदन करणाराचा अत्यंत नम्रीभाव प्रस्फुट होतो. पुढें आपलें पातित्य आणि पतिताचें उद्धरण करण्याचें भगवंताचें शील याचें वर्णन केलें आहे. प्रार्थना करण्याच्या ओघांत जसजसा बोलण्याचा प्रसंग येत गेला, तसतसें कोठें विनय, कोठें सलगी, कोठें रोष, आणि कोठें आपला लडिवाळपणा, अशा भिन्नभिन्न भावांचें प्रदर्शन करून ही सर्व ग्रंथरचना केली आहे; परंतु त्या रचनेंत कांहीं विशेष अनुक्रम धरून आपल्या अभीष्ट अर्थाचें निवेदन केलें आहे असें मला दिसत नाहीं. यांत ग्रंथकराचें मागणें इतकेंच दिसतें किं भगवंतानें आपल्या अपराधाची क्षमा करावी, आणि आपला अंगीकार करावा. ज्ञानी जनांस भगवंता पाशीं मागणें हेंच उचित होय.

आतां याचक जनांहीं कोणत्या भावानें वदान्या पाशीं प्रार्थना करावी;– त्यांत, अत्यंत अल्पज्ञ, पापमालिन्यानें अंतर्यामीं आपादमस्तक मलिन, आणि प्रतिक्षणीं अपराधी, अशा नरदेहधारी पामर जीवानें सर्वज्ञ, अत्यंत पवित्र, न्यायी, आणि षड्गुणैश्वर्यसंपन्न, अशा जगदीश्वरा पुढें आपल्या अपराधाची क्षमा भाकणें झाल्यास, इतर सर्व भाव एकीं कडेस टाकून शुद्ध विनयतेच्याच भावानें प्रार्थना करणें उचित. असें असतां आपल्या कवीनें तर या स्तोत्रांत आपल्या विनयतेच्या भावांत भावांतराचें पुष्कळ विरजण घातलें आहे. तेव्हां ही याची कृति अशा दृष्टीनें दोषप्रवण झाल्यानें आपणांकडेस धृष्टतेचा आरोप येणार नाहीं असें बहुतेक सूज्ञ विचारी पुरुषांचें मन पडेल. या गोष्टीचा लक्षपूर्वक विचार केला असतां हें मत उपेक्षणीय आहे असें मला वाटत नाहीं. पूर्ण अंशीं नसलें तथापि पुष्कळ अंशीं हें मत ग्रहणीय होय असें माझ्या विचारास येतें. ईश्वराचें महत्त्व आणि पवित्रता, आणि मनुष्याचें क्षुद्रत्व आणि पापमलिनता, यां विषयीं विचार केला असतां जें महदंतर दिसतें. त्या वरून पाहतां मनुष्यानें तर ईश्वरा पुढें धुळींतच पडून असावें. मान उचलून वर त्याज कडेस पाहाण्याचीहि याची योग्यता नाहीं; असें असतां त्या ईश्वराला उद्देशून केली जी प्रार्थना तींत प्रार्थकानें सलगी अथवा लाडिवाळपणा, अथवा रोष यांतून कोणत्याहि भावाचें प्रदर्शन करणें हें तर त्यास केवळ अनुचित होय.

परंतु ज्या लोकां मध्यें जीवात्मा आणि परमात्मा यांच्या ऐक्यभावाचे प्रतिपादक आज पावेतों शतावधि आचार्य आणि उपदेशक होऊन गेले; आणि त्यांहीं लिहिलेले सहस्रावधि ग्रंथ चालून अद्वैत मताचा प्रचार फार होऊन गेला आहे; आणि ज्यां मध्यें ज्या श्रुतींच्या पाया वर अद्वैतमताचें मंदिर बांधलें होतें. त्या सर्व श्रुती मध्वाचार्यांनीं आपणां कडेस वळवून त्यांच्या योगांनीं जीवात्मा आणि परमात्मा यांचें तादात्म्य असंभवनीय असा आपला सिद्धांत प्रदर्शित करून जीव सेवक, आणि परमात्मा सेव्य,–सलोकता, समीपता, आणि सरूपता, या तीन काय त्या जीवांस मुक्ति; सायुज्यता अथवा कैवल्य मुक्ति जीवांस कदापि होणार नाहीं, असा आपला सिद्धांत स्थापून आपल्या द्वैतमतानें अद्वैत मताच्या खंडनार्थ प्रयत्न केला; आणि अद्यापि त्यांचे अनुयायी माध्व करीतच आहेत;– पुढें त्या मोठ्या कलहांत रामानुजांनीं दोघांची समजूत पाडण्या करितां मध्यें कावड करून विशिष्टाद्वैत मताची स्थापना केली; तथापि त्यां मध्यें अद्वैत मताची अबाधित सत्ता चालण्यांत कांहीं मोठा प्रतिबंध झाला असें नाहीं. परंतु जेव्हां अद्वैतवादी घरोघरीं चुली पर्यंत ब्रह्मज्ञान ऐकून आपणच कंटाळले, आणि पापपुण्याचा विचार

लोकां

लोकां मध्यें अत्यंत शिथील झाल्यानें अनाचाराचा बाजार कडेलोट भरूं लागला, असें पाहून जेव्हां तेच भ्याले,–ही लोकांची स्थिति तुकोबानें [आपल्या अभंगांत] सरस वर्णिली आहे.

लोकांची [ही] स्थिती पाहून जेव्हां अद्वैतवादी आपल्या मार्गाचें अतिक्रमण झाल्या मुळें आपणच थकले; तेव्हां आज पावेतों विसरून गेलेल्या आपल्या भक्ति मावली पुढें त्यांहीं साष्टांगदंडवत घातला..... आणि तिच्या पायांशीं नाक घासून, करुणा भाकूं लागले,—माते आह्मीं चुकलों; आज पावेतों आह्मांस असें वाटत होतें कीं, आमच्या अद्वैत ब्रह्मज्ञानानें आह्मांस मोठमोठे पांख फुटले आहेत, त्यांच्या योगानें आतां आह्मीं कैलास आणि वैकुंठ यांच्याहि पलिकडेस वर चिदाकाशांत उडून जाऊं; त्वां आमच्या चंचूंत चारा भरवून आमचें संगोपन करावें याचें आतां कांहीं अगत्य उरलें नाहीं; तुझ्या चोंचींतला चारा आह्मांस नको; आह्मीं स्वतंत्र उड्डाण करून या पेक्षां आपला चांगला चारा मिळवूं;——असा जो आह्मांस गर्व झाला होता तो आतां अगदीं उतरून गेला. आह्मीं तुझा विश्रांतीचा घरकुंडा सोडतांच हे आमचे अद्वैतज्ञानाचे पांख आह्मांस तोलत नाहींसे होऊन आह्मीं खालीं पडों लागलों; कित्येक जे गर्वानें कांहींसे वर उडाले त्यांस अधिक धक्का बसून त्यांचा चुराडा झाला. आतां आमच्या अनुभवास पक्कें आलें कीं, तुझ्या मुखांतल्या चाऱ्याच्या सेवना वांचून इतके मोठे पांख झेपण्याचें सामर्थ्य आह्मांस कदापि येणार नाहीं, आणि जरी त्या चाऱ्यानें तसें उडण्याचें सामर्थ्य आलें, तथापि तुझें कोटें न सोडितां तूं जेथें आह्मांस नेशील तेथें उडून तूं दाखविशील तोच चारा आह्मीं भक्षण करूं, यांतच आमचें सर्व कल्याण आहे; असें म्हणून अद्वैतवादी भक्तिमातेस शरण गेले. परंतु जरी शरण गेलें, तरी उनाड मुलें जशीं इकडे तिकडे यथेच्छ उड्या मारून भूक लागली म्हणजे आपल्या आई जवळ खाऊ मागायास जातात, तसे शरण गेले. अपराधी लोक न्यायाधिशा पुढें उभे राहून केवळ सभयतेनें आपला अपराध अंगीकृत करून, त्या कृत अपराधा विषयीं आपला पश्चात्ताप प्रकट करून मोठ्या विनयतेनें आणि दीनवाणी तोंडानें क्षमा मागायास जातात तसे गेले नाहींत. मुलें जशीं आपल्या आईबापा पाशीं कांहीं वस्तु मागतानां आपला लाडिवाळपणा, सलगी, रोष, इत्यादि भाव दाखवितात, तसे या देशांत भक्तजन आपल्या इष्ट देवते पुढें यथारुचि अनर्गल वाक्यपाटवानें अनेक भाव दाखवून वर मागतात. त्यां मध्यें विनयभाव नसतो असें माझें म्हणणें अगदीं नाहीं; हें तर माझ्या वरील लेखा वरून वाचकांच्या लक्षांत पूर्तेपणीं आलेंच असेल; परंतु त्या भावाच्या विरजणांत भावांतरांचें पुष्कळ मिश्रण असल्यानें

त्या

त्या भावास बलहीनत्व येऊन प्रार्थनीय परमेश्वराचें महत्त्व आणि गौरव यास फार गौणत्व आल्या सारिखें दिसतें असें मला खचित वाटतें. कारण, परमेश्वर आई पेक्षांहि दयालु आहे हें खरें आहे, तथापि तो न्यायी आहे, म्हणून लाडानें आपल्या मुलांस बिघडविणाऱ्या भोळ्या आई सारिखी ती आई नाहीं; परंतु जीं मुलें आपल्या आज्ञेचें उल्लंघन करून उन्मार्गवर्ती होतात, त्यांस छडी मारून सन्मार्गास लावून सुखी करणाऱ्या शहाण्या आई सारिखी ती आई आहे. किंबहुना परमेश्वराचें महत्त्व आणि सर्वैश्वर्य जर मनांत आणिलें, तर आईच्या सामान्य उपमे पेक्षां त्याच्या महत्त्वास आणि ऐश्वर्यास दयालु आणि न्यायी अशा प्रभूची उपमा अधिक योग्य दिसती; म्हणून ज्यास स्वापराधाचें ज्ञान होऊन पश्चात्ताप झाला असेल अशा क्षुद्र मानवानें परमेश्वरा पुढें शुद्ध विनयभावानेंच प्रार्थना करावी, हेंच त्यास उचित होय असें माझें मत होय. आणि या मतदृष्टीनें पाहिलें असतां हें पुढलें आमच्या कवीचें काव्य दोषारोपणास पात्र होण्यास योग्य आहे खरें, परंतु ज्या लोकां मध्यें लाडिवाळपणानें आणि सलगीनें ईश्वराची प्रार्थना आणि स्तुति करण्याचा सांप्रदाय व्यासाच्या वेळे पासून पडला आहे, त्यां मध्यें आपल्या कवीसच निवडून काढून या दोषाचा भार त्यांच्या मस्तका वर ठेवण्यास त्यांस पुढें करणें मला योग्य दिसत नाहीं. सर्वांच्या पंक्तींत यथायोग्य त्या भाराचे विभाग करून याच्या वाटणीस जो यःकश्चित् विभाग येईल तो निराळा काढून ठेवण्याचें जर कोणाच्या मनांत येईल तर भलें येऊ.

आतां आणखी एक दोष प्रस्तुत काव्यांत आढळतो, तो पूर्वोक्त दोषापेक्षांहि अधिक शोचनीय होय असें विचारशील पुरुषांच्या बुद्धींत वागल्या वांचून राहणार नाहीं; आणि वर जी म्यां दयालु आणि न्यायी अशा परमेश्वराच्या प्रार्थनेंत विनयातिक्रमणरूप दोषाची सूचना केली, त्याच दोषाचें हें परिपक्व फल होय, असें त्यांच्या ध्यानांत येऊन प्रकृत दोषप्रदर्शनांत पूर्वोक्त दोषकथनाचें समर्थनहि होईल. एकदां विनयभाव सुटला म्हणजे सलगीस आरंभ होतो, आणि ती सलगी विनोदास पोंहचवित्ये; या देशांत त्यांत विशेषेंकरून संस्कृत काव्यांत, शृंगाररसाचें प्राधान्य असल्यानें त्या विनोदांत हा रस प्रचुर होऊन शेवटी बीभत्स रसाचाहि प्रादुर्भाव होतो. असें असलें तरीं इतर लोकव्यवहारवर्णनपर काव्यांत समय विशेषीं समर्याद असल्यास शृंगार आणि बीभत्स हे रस सुसह्य आणि रुचिपरत्वें आल्हादजनकहि व्हायास शक्य आहेत; परंतु भगवत्स्तुतींत या रसाचें नुसत्या लवणा प्रमाणेंहि अल्प सेवन दुःसह; मग या रसाचे द्रोण भरभरून पिणें हें सहास कर्म भरतखंडानिवासी भक्तजनांनींच करावें; इतरांच्यानीं होणार नाहीं. पहा;--

हरिरिहमुग्धवधूनिकरे विलासिनिविलसतिकेलिपरे ॥ धृ० ॥
पीनपयोधरभारभरेणहरिंपरिरभ्यसरागं
गोपवधूरनुगायतिकाचिदुदंचितपंचमरागं ॥ हरिरिह० ॥

* * *

रासेहरिमिहविहितविलासं ॥ स्मरतिमनोममकृत परिहासं ॥ धृ० ॥
गोपकदंबनितंबवतीमुखचुंबनलंभितलोभं
बंधुजीवमधुराधरपल्लवमुल्लसितस्मितशोभं ॥ रासे० ॥

* * *

धीरसमीरेयमुनातीरेवसतिवनेवनमाली
गोपीपीनपयोधरमर्दनचंचलकरयुगशाली ॥ धृ० ॥
विगलितवसनंपरिहृतरशनंघटयजघनमपिधानं
किसलयशयनेंपंकजनयनेनिधीमिवहर्षनिधानं ॥ धृ० ॥

—गीतगोविंद

यांत पहा हे या शृंगाररसानें कसे द्रोण भरले आहेत. या पेक्षांहि प्रौढरीतीनें शृंगाररसान्वित भक्तिप्रेम पहाणें असल्यास श्री मद्भागवताचा मोठा ग्रंथ आहेच. आणखी या शिवाय पाहाण्याची इच्छा असल्यास ब्रह्मवैवर्तक पुराणांतील कृष्णजन्मखंड पहावें. परंतु वेणिसंहारनाटककारानें तर वैष्णवांसहि मळमळी सुटे असा रस आपल्या नांदीच्या एका श्लोकांत ओतला आहे. त्या श्लोकाचा एथें उपन्यास करण्यासहि मला लज्जेनें संकोच वाटतो. मग असा शृंगाररसान्वित भक्तिप्रेम प्रकट करण्याचा जेथें शिष्टसांप्रदाय प्राचीन कालापासून चालत आहे, तेथें आपल्या यःकश्चित् प्राकृत कवीनें पुढल्या स्तोत्रांत कोठें सात आठ श्लोकांत या रसाचे एकदोन थेंब ओतले असल्यास (पहा—केका, ७, १३, २४, ३५, ३६, ३७, ८३, १०२,) हा त्यांज कडेस मोठा दोष न येतां उलटें मला वाटतें कीं, हें त्या रसाचें अत्यल्पत्व त्यांच्या सदभिरुचीचें ज्ञापक होतें. इतकें वादळ चालत असतां त्यांत त्यांणीं आपल्या होडीस तो वारा फारसा न लागूं देतां संभाळलें, हें याचें कृत्य मोठें स्तुत्य होय असें विचारी पुरुषांच्या ध्यानास येईल.

ज्या देशांत व ज्या लोकांत रसभरित म्हणून प्रसिद्ध काव्यें असतात, त्यांच्या गुणांचें यथायोग्य परीक्षण करण्यास, आणि त्यांची रुचि घेण्यास, त्याच देशाचे

देशाचे डोळे आणि जीभ असली पाहिजे. इतर लोकांच्यानीं तसें यथान्याय परीक्षण होणें केवळ अशक्य असें माझें म्हणणें नाहीं; कदाचित् ते विशाल बुद्धीचे परीक्षक असल्यास योग्य परीक्षा करूं शकतील; परंतु त्यांच्या रुचीनें जो तद्देशीय सूज्ञांस आनंद होईल, त्याच मानाचा आनंद अन्यदेशीय विद्वानांस होणार नाहीं. याचीं कारणें बहुत आणि सूक्ष्म आहेत. ज्या लोकांस वंशपरंपरेनें ज्यांचा सहवास असतो, त्यांचा पूर्वापर व्यवहार, रीति, भाती, विद्या, ज्ञान, आचार, या सर्व गोष्टींच्या संघट्टनानें त्यांचीं मनें तशींच रंगलेलीं असतात; म्हणून त्यांच्या काव्यानें जे हर्षशोकादि विकार त्यांच्या मनांवर होतील, तसे विकार अशा संघट्टनाच्या अभावा मुळें ज्यांचीं मनें तशीं रंगलीं नसतात त्यांज वर होणार नाहींत. अशा विचारानें पाहिलें असतां हें पुढील स्तोत्र प्रौढ आणि रसिक काव्यांत गणिलें पाहिजे. आणखी माझी अटकळ होत्ये कीं, हें स्तोत्र पंतांनीं आपल्या वयाच्या उत्तर अवस्थेंत रचिलें असावें; ही अटकळ या काव्याच्या प्रौढवाणी वरून आणि यांत जो प्रतिपाद्य विषय आहे त्या वरून कोणी केली असतां तिचा संभव आहेच. परंतु या स्तोत्रांतील ४६ व्या केके वरून तर त्या विषयीं कदाचित् संशय असला तर तोहि दूर होईल असें मला वाटतें.

आतां केकावलि हें प्राकृत काव्य असून या वर आणखी प्राकृत टीका करण्याचें प्रयोजन काय, म्हणून इतरांच्या तर नाहीं, परंतु कदाचित् पंडित जनांच्या मनांत प्रथमतः आशंका उत्पन्न होईल. त्यास हें प्राकृत काव्य खरें, परंतु वामन, मोरोपंत यां सारिख्या पंडितांचें काव्य जरी प्राकृत आहे; तरी तें पंडितांसच समजायास शक्य असें प्राकृत काव्य आहे; त्यांत केकावलि सारिखा ग्रंथ तर विशेषेंकरून, या माझ्या म्हणण्यास तेहि रुकार देतील. आणखी लोक-स्थिति पाहिली असतां ब्राह्मण जातीच्या खाणी शिवाय पंडित रत्नाची उत्पत्तिहि असंभवनीय; त्या खाणींतहि इतर पार्थिव खाणी प्रमाणें गारगोटेच फार, कोट्यावधि गारगोट्यांत एकादें रत्न सांपडलें तर नकळे. त्या पंडितांतहि स्वाधीत-शास्त्रज्ञानाचा अभिमान एकीकडेस ठेवून, प्राकृत कवितेंत कशी चमत्कृति आहे अशी जिज्ञासा धरून, गीर्वाण वाणीच्या अभ्यसनाच्या माडी वरून प्राकृत ग्रंथ पाहण्यास खालीं उतरण्याचें लघुत्व आणि श्रम घेणारा शत पंडितांमध्यें एकादा निघाला तर निघेल. तेव्हां या मानानें पाहिलें असतां वामन, मोरोपंत यांचीं काव्यें पाहणारा दहा लक्षांत एकादा ब्राह्मण सांपडेल; निदान, लक्षांत तरी सांपडला तर सांपडेल; या माझ्या म्हणण्यांत जरी अतिशयोक्ति असली तरी ती फार आहे असें, या विषयीं यथायोग्य विचार करणारे कोणी म्हणणार नाहींत. मग ब्राह्मणव्यतिरिक्त जो फार मोठा समाज राहिला त्याची तर गोष्टहि बोलायास

नको

नको. केवळ या कवीच्या ग्रंथांच्या काठिन्या स्तवच यांच्या ग्रंथांचें दुर्ज्ञेयत्व आहे असें कोणी माझ्या या म्हणण्या वरून समजूं नये; परंतु त्या कारणा शिवाय आणखी बहुधा या देशांतील लोक अनभ्यस्त असून नुसतें वाचण्या लिहिण्याचेंहि ज्ञान त्यांमध्यें फार कमी असतें या मुळें हे ग्रंथ इतके दुर्ज्ञेय झाले आहेत असें तर मला खचित वाटतें. त्यांत मोरोपंतांचें काव्य विशेषेंकरून इतकें दुर्बोध कां यांचें कारण या उपोद्घाताच्या आरंभीं सविस्तर कळविलेंच आहे. त्यांत आणखी विचार केला पाहिजे कीं, वामन, मोरोपंत यां खारिख्या महापंडितांनीं (एथें यास महापंडित म्हटलें याची शास्त्री पंडित यांनीं मला क्षमा करावी.) संस्कृत भाषेंत आपले ग्रंथ रचण्याचें तात्कालिक श्लाघ्य कृत्य सोडून प्राकृत ग्रंथ रचण्यांत जे इतके परिश्रम केले; या वरून सद्यःप्राप्त यश कडेस त्यांनीं लक्ष न देतां इतर सर्व प्राकृत लोकांस ज्ञान व्हावें याच औपकारिक बुद्धीनें त्यांहीं हे ग्रंथ रचले असावे अशी माझी दृढ अटकळ होत्ये. म्हणून हा त्यांचा परम स्तुत्य हेतु सिद्धीस नेण्याच्या मार्गांत ज्या ज्या अडचणी आढळतील, त्या त्या सर्व दूर करणें हा आतां आपला धर्म होय, असें मनांत आणून म्यां ही प्राकृत टीका करण्याचा उद्योग प्रथमतः हातीं धरिला. मोरोपंताच्या साद्यंत कृतीचा अभ्यास करून, त्यांच्या सर्व काव्या वर टीका लिहून, तें सुबोध करण्याच्या अतिमहत्कृत्यास अवकाशाच्या आणि सामर्थ्याच्या अल्पत्वा मुळें प्रथम माझें मन धजेना; म्हणून आपल्या कवीच्या सर्व कृतींत अत्यंत प्रख्यात जीं काव्यें त्यांमध्यें प्रस्तुत केकावलि स्तोत्र हें एक लहानसें प्रख्यात काव्य जाणून म्यां यावर वानगी प्रमाणें पुढील टीका करण्यास आरंभ केला. त्यांतहि या लहानशा ग्रंथाचा विषय निवळ भगवत्स्तुतिपर असल्यानें माझें मन अधिक लोभावलें. त्यांत आणखी पंताच्या काव्यांत निष्णात म्हणून वाखाणिलेल्या पुरुषांमध्येंहि बहुतेकांस केकावलि हा ग्रंथ साद्यंत लागत नाहीं, असाहि बोभाट माझ्या ऐकण्यांत होताच; या सर्व कारणा वरून मोरोपंताच्या ग्रंथावर टीका करण्यास हाच लहानसा ग्रंथ म्यां निवडून काढिला.

त्यांत ज्या विस्तार पद्धतीनें प्रथम ही टीका करण्यास म्यां आरंभ केला, त्या गोष्टीस आज पांच वर्षें झालीं. त्या विस्तारपद्धतीचा मुळारंभीं हेतु असा होता कीं, माझी परम आवडती आणि सुशीला कन्या कावेरीबाई, जीस जगदीशानें आतां दोन वर्षें झालीं आपल्या सन्निद्ध नेलें, तिला ज्या रीतीनें हें काव्य सुबोध होई अशा रीतीनें पाल्हाळ करून म्यां याज वर टीका लिहिली. ती अशी कीं, कोणताहि कठीण शब्द पर्याया वांचून आणि अर्था वांचून ठेविला नाहीं; महाराष्ट्र ग्रंथ भाषेच्या रूपांचींहि पर्यायरूपें लिहून ठेविलीं; मनांत कीं तिला

या

या अशा पद्धतीच्या टीकेवरून हा ग्रंथ लागला तर इतर बालांसहि सहज लागेल. ही टीका म्यां शके १७८१ च्या वर्षी ठाण्यांत सरकारी कामा वर असतां प्रात:काळीं मला जो दोन तीन तास वेळ सांपडे, तो या कामा कडेस देऊन आरंभिली, आणि तेथें सुमारें सहा महिन्यांत अर्धा अधिक इतका ग्रंथ संपविला. पुढें सरकारी काम सोडून घरीं मुंबईस आलों, तेव्हां बाकी राहिलेला ग्रंथ लवकरच संपविला. त्यानंतर २३ वी मे सन १८६३ इसवीच्या रात्रीस त्या कन्येस जगदीशानें आपल्या जवळ नेलें. त्या वियोगानें अत्यंत दु:खितांत:करण होत्साता आपल्या मनांत विचार करूं लागलों कीं, तिचें स्मरण राहण्या करितां वापी, कूप, तडाग अथवा धर्मशाला, बांधून एकादें पूत कर्म करावें, तर तितकें द्रव्यसामर्थ्य आपल्यास नाहीं; तेव्हां जिच्या अभ्यासा करितां जो ग्रंथ लिहिण्यास प्रथम लेखन हातीं धरिली तोच ग्रंथ आतां तिच्या स्मरणास अर्पण करून प्रसिद्ध करावा. आणि त्या पासून आपल्या स्वदेशीय लोकांस कांहीं उपयोग घडला तर तसें स्मरणीय पूर्ण कर्म करावें. असा मनांत विचार करून ज्या रीतीनें आबालवृद्धांस हा ग्रंथ उपयोगी पडेल अशा रीतीनें पुनः याचें पूर्वापर शोधन करून छापण्या करितां सिद्ध केला.

मला एका गोष्टीची भीति वाटत्ये किं प्रौढ बुद्धीच्या पुरुषांस समजायास अगदीं अवघड नाहींत अशा शब्दांच्याहि पर्याया वर पर्याय लिहून अर्थविस्तारहि लांबवून या पुढील टीकेंत फारच पाल्हाळ केला आहे; यावरून कित्येक विद्वज्जन पुढील टीकेस दोष लावितील, त्याचा मी मोठ्या विनयतेनें स्वीकार करितों. परंतु वर जें म्यां कारण सांगितलें त्या वरून त्यांच्या ध्यानास येईल किं हें मोरोपंताचें लहानसें काव्य केवळ प्रौढ बुद्धीच्या पुरुषांस सुबोध व्हावें म्हणून ही त्यावर पुढील टीका केली नाहीं; तर शाळांत पढणाऱ्या विद्यार्थ्यांस शब्दज्ञान व्हावें, शब्दांचा परस्परान्वय समजावा, आणि कोठें कोठें वाक्यांत अलंकाराचेंहि ज्ञान व्हावें, असा जो माझा मूळचा हेतु होता, तो तसाच अबाधित ठेवून, त्यास विद्वज्जनांच्याहि आदरास पात्रता यावी म्हणून उत्तरोत्तर अर्थाची दाढर्यता आणि अधिकाधिक अनुकूलता दाखविण्या करितां जे शब्दांचे पर्याय म्हणून — अशी खुण करून लिहिले आहेत, तेहि चढत्या पायरीनें प्रविष्ठ केले आहेत; आणि वाक्याचे अर्थ आणि आशयहि त्यांच्या गांभीर्याच्या आणि गूढत्वाच्या प्रमाणानें वरच्या घडी पासून आंतील घड्या उकलून दाखविले आहेत; आणि आवश्यक स्थळीं त्यांचे इंगितार्थ आणि ध्वन्यर्थहि सुचविले आहेत; मूळ शब्दाच्या अर्थाची परिपूर्तता दाखविण्या करितां जेथें शब्दांतराचें अथवा वाक्यांतराचें अंतर्निवेशन आवश्यक, तेथें – अशा खुणेनें तो त्या खुणेच्या मागला अंतर्लेख

दाखविला

दाखविला आहे. आणखी स्थळोस्थळीं अर्थाच्या समर्थना करितां आणि स्पष्टीकरणा करितां त्या त्या पृष्ठा खालीं बारीक अक्षरांनीं टीपा करून ग्रंथांतरांचीं पुष्कळ संस्कृत आणि प्राकृत प्रमाणेंहि दिलीं आहेत. सारांश हा पुढील मोरोपंताचा लहान ग्रंथ सर्वांस सुबोधित करण्यांत त्यास जितका योग्य त्या पेक्षांहि कदाचित् अधिक श्रम घेण्यांत म्यां आपलें अंग चोरिलें नाहीं; म्हणून विद्वज्जन मजवर कृपाच करतील असा मला भरंवसा आहे. आणखी मला दुसरी अशी भीति वाटत्ये किं, या माझ्या पुढल्या ग्रंथांत प्रमादानें अथवा माझ्या अज्ञानानें अशुद्ध लेख पडले असतील, आणि कोठें कोठें मूळ अर्थाचीहि सूक्ष्मता माझ्या लक्षांत आली नसेल, आणि कोठें विपरीत अर्थहि लिहिण्यांत आला असेल, तर शास्त्रीपंडितांनीं आपल्या उदार अंतः-करणांनीं सांप्रतच्या धर्मशास्त्रा प्रमाणें कलयुगांत शुद्ध क्षात्रिय आणि शुद्ध वैश्य हे वर्ण नाहींत, म्हणून तेच सांगतात. तेव्हां अर्थात् ब्राह्मणाभावीं अवशिष्ट राहिलेल्या वेदोक्त मंत्रांनीं असंस्कृत अशा जातींतच माझा जन्म असल्यानें यथाशास्त्र मज कडून शास्त्राध्ययन अथवा काव्यव्युत्पत्ति घडणें दुर्घट, आणि वर्णा प्रमाणें वाणिहि असंस्कृत, या कारणा कडेस आपली दृष्टि पोहोंचविली असतां उक्त दोषांविषयीं त्यांची क्षमा मागण्यास मला मोठा अवकाश आहे. आतां ही पुढील टीका केल्यानें जर या आपल्या महत्कवीचा काव्यसमूह समजण्याच्या मार्गाचें मजकडून उद्घाटन होऊन तेणेंकरून स्वदेशविद्यांचें ज्ञान प्रसरणाच्यां कार्यांत मज कडून कांहींतरी सुदामाच्या पृथक्-तंदुलार्पणा प्रमाणें साहित्यार्पण झालेंच तर या माझ्या श्रमाचें साफल्य झालें असें मानून मीं समाधान पावेन.

◆ ◆ ◆

: १६ :

दादोबा पांडुरंग

बडोद्यांतील होळीचें आमंत्रण

सन १८४४ च्या शिमग्याच्या सुमारास मला श्रीमंत बाळकृष्ण ऊर्फ भाऊसाहेब शास्त्री पटवर्धन (गंगाधर शास्त्री ज्यांस बाजीरावानें त्र्यंबकजी डेंगळे यांच्या कडून पंढरपुरीं मारविलें त्यांचे द्वितीय पुत्र,) यांज कडून पत्र आलें, किं " तुह्मीं ग्रीनसाहेब मास्तर यांस बरोबर घेऊन बडोद्यास होळी पाहण्या करितां यावें. " त्यावरून आम्ही उभयतां भडोचच्या मार्गानें बडोद्यास गेलों. आमचा भडोचेंत मुक्काम असतां तेथें जवळ चार पाच कोसांवर जगप्रसिद्ध एक 'कबीरवड '[1] म्हणोन मोठें वडाचें झाड आहे तें पाहण्यास मी व मिस्तर ग्रीन आह्मीं दोघे निघालों. तिसऱ्या प्रहरीं तेथें पोहचलों. आणि पहिल्यानें तें झाड पाहिलें. तों आह्मांस असें दिसून आलें, किं खरीच या झाडाची कीर्ति आहे ती.

---

१ ' भूमिदाह ' या शब्दाचा अर्थ देतांना Dr. Robert Drummond लिहितो, " it is declared that Kuveer, from whose toothpick sprung that widely branching vudd tree, called **kubbeerburr**, on an island in the Reva or Nirmuda, ten miles East of Broach, actually dug his own grave and therein gave up his ghost, whence his sainted fame and statue on that spot." **Illustrations of the grammatical parts of the Guzerattee Mahratta and English languages, Bombay**. 1808. या वडाचें विस्तृत मजेदार वर्णन जेम्स फोर्बसनेंही दिलेलें आहे :–" The large trunks of this single tree amount to three hundred and fifty and smaller ones exceed three thousand. Each of these is constantly sending forth branches and hanging roots, to form other trunks, and became the parent of a future progeny...in march of an army, it has been known to shelter seven thousand men."- **Oriental Memoirs**, vol. I, 1834, pp. 16-19. तुळा, (पुढें चालू)

मूळच्या झाडाच्या आतां तीस चाळीस पारंब्या मोठमोठ्या लोंबून, त्या पासून त्या झाडाची संतति हाल्लीं वाढली आहे, त्यांचा विस्तार आह्मीं पाहिला. तो इतका मोठा होता, किं त्यांच्या छाये खालीं काहीं नाहीं तरी दहा हजार मनुष्यें वागतील. आह्मांस तेथें फिरतां फिरतां अगदीं सांजावलें, आणि आह्मां दोघांसही फार क्षुधा लागली. आमच्या पाशीं कांहीं खायास नव्हतें. आमची अशी अटकळ होती, किं कबीरवड पाहून संध्याकाळीं भडोचेंत जेवायास येऊं. परंतु तसें झालें नाहीं. तेव्हां त्या झाडाजवळ गांव होता, तेथें एका गुजराथी ब्राह्मणाच्या घरीं रात्रीस जेवायास व बिऱ्हाडास राहिलों. गुजराथी ब्राह्मणाचें कुटुंब चांगलें होतें. त्यांणीं मज करतां व मिस्तर ग्रीन यांज करतां उन उन स्वैंपाक करविला. ग्रीनसाहेब मोठ्या हौसेनें त्याचा तो डाळभात व पुऱ्या जेवले. त्यांस भुई वर बसून जेवतां येईना तेव्हां जवळच त्या ब्राह्मणाच्या गवऱ्यांचा ढीग रचला होता त्याचें ग्रीनसाहेबानें मेज करून त्या वर पत्रावळ मांडून वडाच्या पानाचे चिमचे केले व मोठ्या प्रीतीनें जेवले. मीं त्यांस जेवू घालून त्यांचे जेवण आटोपल्या वर मीं ब्राह्मणाच्या घरांत हिंदूंच्या चाली प्रमाणें पाटावर बसून पत्रावळ पुढें ठेवून जेवलों. सुंदर लोणकढें तूप, डाळभात, पोळ्या, शाखभाज्या व कढी होती, ती मेस्तर ग्रीन यांनीं पोट भरून खाल्ली. म्हणाले, " असें सुंदर रुचदार जेवण मी कधींच जेवलों नाहीं. आमचे इंग्लिश लोक या देशांत असून त्यास या हिंदूंच्या जेवणाची रुचि कांहींच ठाऊक नाहीं. " किती साधें व निरोगी जेवण त्या रात्रीं मला वाटलें. आह्मीं तेथेंच निजलों. त्या ब्राह्मणास चांगली पोटभर दक्षणा देऊन पहांटेस भडोचेस जाण्यास निघालों.

The fig-tree-not that kind for fruit renowned,
But such as this day, to Indians known,
In Malabar of Decan spreads her arms
Branching so broad and long that is the ground
The bended twigs take root, and daughters grow
About the mother tree, a pillared shade
High overarched, and echoing walks between.
There oft the Indian herdsman, shunning heat,
Shelters in cool, and tends his pasturing herds.
At loop-holes cut through thickest shade."

Miltons' Paradise Lost, Book IX, 1101—1110.

या कबीर वडावर सुप्रसिद्ध गुर्जर कवि नर्मद यानें एक कविता लिहिली आहे. हा वृक्ष जगांतील एक आश्चर्य आहे. [टीप — अ. का. प्रियोळकर यांची.]

चौथे दिवशीं भडोचेहून बडोद्यास पोंहचलों. पूर्वी आमच्या येण्याची भाऊसाहेबांस सूचना होतीच. म्हणोन त्यांहीं आपल्या वाड्यांत वरच्या खणांत मेस्तर ग्रीन यांची एका खोलींत राहण्याची सोई केली. भाऊसाहेबांनीं मिस्तर ग्रीन साहेबांचें आगतस्वागत करून त्यांचा सत्कार व त्यांच्या राहण्याची सोई मोठ्या बेतबातानें केली. त्यांच्या वाड्यास लागूनच त्यांचे वडील बंधु भीमाशंकर ऊर्फ रावसाहेब शास्त्री यांचा मोठा सोवळवाडा होता. त्यांत रावसाहेबांचें देवमंदिर व अग्निहोत्र असे. हे गंगाधर शास्त्री यांचे विनायक ऊर्फ आबासाहेब यासुद्धां तीन पुत्र मोठ्याच योग्यतेचे शोधक व विद्याव्यसनी होते. थोरले रावसाहेब यांची शास्त्रव्युत्पत्ति, मधले भाऊसाहेब यांची फारशी भाषेंत चांगली गति होती आणि धाकटे आबासाहेब हे इंग्लिश भाषेचे माहितगार असून त्यांत Mathematics आणि Science यांची फार आवड होती. आणि मुंबईत शाळेंत जात होतों तेव्हां पासून या उभयतां बंधू कडे आमचा जाण्यायेण्याचा फार परिपाठ असे. आमचे जुने मित्र नाना नारायण यांचा ते जावऱ्याहून परत आल्यावर त्यांची या उभयतां बंधूंनीं आपल्या कडेस शंभर रुपये दरमहा देऊन राहण्याची सोई केलीच होती. आह्मी बडोद्यास गेल्यावर हे शास्त्री यांच्या वाड्यांत रावसाहेब शास्त्री यांचे चिरंजीव तात्यासाहेब यांस इंग्लिश पढविण्याचें व दुसरें चिटीचपाटी लिहिण्याचें काम यांज कडेस होतें. या दोघां बंधूंस, विद्वान् म्हटलें म्हणजे कोणी का जातीचे असेनात, त्यांस फार आवडत असत. त्यांहीं नानांस आपल्या वाड्यांतच ठेविलें होतें. मिस्तर ग्रीन व मीं बडोद्यास जातांच भाऊसाहेबांनीं त्यांची इंग्रजी तऱ्हेनें सजविलेली खोली त्यांस दाखविली. माझ्या जेवणाची व बसण्याउठण्याची सोई त्यांच्याच वाड्यांत होती. दिवसास व रात्रीस पंक्तीस भाऊसाहेबांच्या पाना समोरासमोर आमचीं दोन पानें मांडलीं असत. एक नानांचें व एक माझें. ग्रीन साहेबांचा इंग्रजी तऱ्हेचा खाना त्यांच्या खोलींत तयार असे. परंतु ग्रीन साहेब शाहणे होते. त्यांस चांगले माहीत होतें, किं हें ब्राह्मणाचें घर आणि भाऊसाहेब जरीं मोठ्या उदार मनाचे होते, त्यांच्या मनांत इतर जातीच्या लोकांच्या खाण्यापिण्या विषयीं किमपि द्वेषभाव नसे, तथापि मिस्तर ग्रीन हे त्या वाड्यांत दोन दिवस होते तों पर्यंत खाण्यापिण्याच्या विचारास फारच संभाळून असत. त्यांत त्यांस हिंदु लोकांचें जेवण तर फार आवडत असे. मद्य घेण्याची सवई तर त्यांस बिलकूल नव्हती. भाऊसाहेब यांस मज कडून पूर्वीच माहीत झालें होतें, किं मिस्तर ग्रीन यांस बुदबळें फार चांगली खेळतां येतात, आणि त्यास गायनाचा व वाद्याचा मोठा शौक असे. यावरून या दोन्ही गोष्टीनें त्यांची मोठीच करमणूक झाली. रात्रीस एक दिवस हिंदुस्थानी गाणें व एक दिवस मराठी लावण्याचें गाणें त्यांही

मोठ्या प्रीतीनें ऐकले. ते म्हणाले, " या मराठी लावण्यांनीं तर मला माझ्या देशांत Italian Opera (इतालिअन आपरा) होत असतो त्याची बरीच आठवण झाली. " असें आह्मीं दोनतीन दिवस मोठ्या आनंदानें घालवून भाऊसाहेबांचा निरोप घेऊन परत सुरतेस आपल्या शाळेच्या कामा वर हाजर झालों. मार्गें ग्रीन साहेबांनीं भाऊसाहेबांची लियाकत, थोरपणा व बहुश्रुतपणा यांची मज पाशीं फार तारीफ केली. खरे दक्षणी ब्राह्मण लोकांत मोठे चतुर, शहाणे व देखणे पुरुष ते मीं हे पाहिले. भाऊसाहेबांस फारशी भाषा चांगली येत होती. म्हणोन त्यांज पाशीं निरंतर फारशी किताब असत, व मुसलमान लोकांचा त्यास फार सहवास होता. एके दिवशीं तेथें त्यांहीं एक मला मोठी गम्मत करून दाखविली. ती अशीः—तेथील कांहीं सुनी मुसलमान धर्माचे बोहरी बलाविले आणि त्यांशीं पुलाव, कबाब व कांदे व आले कापण्याची चतुराई यांची तारीफ करून थट्टेनें, ' अर्जी मियां गोश्तर्के क्या लज होती है, और प्याज शिवाय हमको एक दिन भी चलता नहीं, ' असें म्हटलें. त्यावरून ते कानावर हात ठेवून उठूं लागले आणि म्हणूं लागले, " भाऊसाहेब, तमे एम शूं बोलो छो. प्याज अने गोश्त ए बोल तो हमे मुसलमीन छतां हामारा मोढामांथी निकलता नथी, अने तमे बामणभाई बोलो छो ए तमने लायक नथी— " तेव्हां भाऊसाहेबांनीं मला सांगितलें, " हे गुजराथी मुसलमान बोहरी कसे आहेत ते पाहिले ना ! मांस तर काय, परंतु कांद्यांसही शिवत नाहींत. " त्या वरून मला मोठेंच आश्चर्य वाटलें. भाऊसाहेब मोठे गमती पुरुष होते. त्यांहीं भिक्षुकांची तर हटकून थट्टा उडवावी. मग त्यांहीं व त्यांच्या बायकांनीं चिडावें. जेवणांचे वेळेस तर ही त्यांची मोठी गंमत असे. एक म्हातारी बाई मुद्दाम तेथें आह्मांस हांसवायास हजर असे. स० १८४५ सांत मीं बडोद्यांत असतां घराहून बंधु भास्कर यांजकडून पत्र आलें. त्यांत असें दुःखाचें वर्तमान होतें. ते म्यांच आपल्या वहींत लिहून ठेवलें होतें. त्याचा खालीं उतारा देतों:—

" २३ जुलई १८४५. आज मुंबईहून पत्र आलें. त्यांत बाईच्या मरणाचें परम खेदकारक वर्तमान आलें. जहाले; इतके दिवस मनांत होतें, किं अद्यापि आमच्या तीर्थरूपांची मातुःश्री आमच्या माथ्या वर वडील आहे, तीही गेली. आतां वडिलां पैकीं कोणी आमच्या घरीं राहिलें नाहीं. एका मार्गें एक कशी मनुष्यें जातात ! एकास विसरलें नाहीं तों दुसरें निघोन जातें. कालचक्रधार फार तीक्ष्ण आहे. ती कोणास ठेवीत नाहीं. आज दिवस पावेतों असें मनांत येत असें कीं, तीर्थरूप मातुःश्री अल्पवयांत निघोन गेली. आणि आमची बाई अद्यापि आहे. जहाले, तिचाही मरणाचा दिवस निघोन गेला. तिणें लहानपणीं आह्मीं लहान लहान नातवंडें म्हणोन आमचे किती लाड करावे. त्यांत मीं

बाळपणा पासून फार अशक्त म्हणोन मजवर इचा फार प्रेमा होता. परम दयाळू परमेश्वर हीस आपल्या जवळ ठेवो हीच आतां त्याज पाशीं तिज विषयीं माझी प्रार्थना आहे. "

पुढें थोडे महिने गेले असतां असें वर्तमान घडून आलें, किं बडोद्याचे रेसिडेंट (Resident) मिस्तर बाइड (Mr. Boyd) हे पूर्वी थोड्या वर्षा वर धुळ्याचे कलेक्टर होते. पहा, हे तेथें वारले, आणि त्यांचें प्रेत सुरतेंत गाडायास आणिलें, ते आमच्या स्कुला वरूनच नेलें. आतां त्यांची कबर तेथेंच बांधली असावी असें मला वाटतें. त्या मिस्तर बाइड (Mr. Boyd) साहेबांच्या जागे वर माझे सुरब्बी सर रॉबर्ट कीथ आर्बथनट (Sir Robert Keeth Arbuthnot) सुरतेचे कलेक्टर यांची नेमणूक झाली. तेव्हां मीं त्यांस भेटायास गेलों आणि या नेमणुकी विषयीं मुबारकबादी देऊन आपला आनंद प्रदर्शित केला आणि उगीच सुचविलें कीं, " आपल्या वचनाप्रमाणें आतां माझें कल्याण करण्याचा ईश्वरानें आपल्या हातीं प्रसंग दिला आहे. माझी तजवीज त्या दरबारांत योग्य रीतीनें झाली असतां आपण करालच; परंतु ही आपल्यास उगीच सूचना दिली आहे. " त्यांहीं मला आश्वासन तर दिलें नाहीं, परंतु त्यांहीं ती गोष्ट आपल्या ध्यानांत ठेविली. पहा हे थोर कुलाचे इंग्लिश लोक किती ममताळू असतात ते ! त्यांहीं बडोद्यास रेसिडेंटच्या कामा वर गेल्या वर थोडक्याच महिन्यानें मला लिहून कळविलें, किं " मीं तुझी गोष्ट महाराजांस कळविली आहे, तर तूं थोडक्या दिवसांची रजा घेऊन बडोद्यास ये. "

एथें या साहेबाची माझ्याशी ममतेची वर्तणूक पहा. ज्यांस म्यां एकदोन महिने गुजराथी शिकविलें होतें इतकेंच; आणि ज्यांस सात आठ महिनें पर्यंत सतत रात्रीस जागरण करून ते मोठ्याच संकटांत असतां मदत केली त्या खानबहादुर आर्देशिर धनजीशाह यांची निमकहरामीची वर्तणूक पाहा. इतकें जमीनअस्मानाचें अंतर नेटिव आणि युरोपियन यांच्या वर्तणूकींत असतें. असें दाखले मला पुष्कळ आले आहेत. ते मीं पुढें त्या त्या प्रसंगीं सांगेन.

यावरून मीं ग्रीन साहेबांचे मार्फत एक महिन्याची रजा काढून सन १८४६ सांत बडोद्यास गेलों आणि तेथें रेसिडेंट साहेबांस जाऊन भेटलों. त्यांहीं मला सांगितलें, किं मीं तुमच्या विषयीं **सखाराम रोडे** जे हल्लीं महाराजांपाशीं त्याचें मुख्यत्वें काम पाहतात त्यांस त्यांचे बंधु **गोविंदराव रोडे** यांजकडून सारा मजकूर कळविला आहे. ते एथें हाल्लीं वकील म्हणून येत असतात. ही वकीलीची जागा त्यांचीच; परंतु त्यांज वर येथून थोडी अवकृपा झाली आहे.

त्याची सफाई होई पर्यंत त्यांस बंगल्यांत येण्याची मनाई आहे. ते तुमची व महाराजांची भेट करून देतील; म्हणोन पहिल्यानें तुह्मीं त्यांस भेटा आणि काय मजकूर होतो तो मला कळवा. या वरून मीं पहिल्यानें त्या दोघां भावांस भेटलों. त्यांहीं माझा चांगल्या रीतीनें सत्कार केला. आणि रेसिडेंट साहेबानें तुम्हां विषयीं आम्हांस मजकूर सांगितला आहे असेंही त्यांहीं मला कळविलें. पुढें त्या दोघां बंधूंच्या आंतील मसलतीनें माझें रेसिडेंट साहेबा जवळ कितपत वजन आहे हें पहिल्यानें पाहून मग यांस सरकारांस भेटवावें. त्या वरून त्यांची तीही मीं खातरी करून दिली. पुढें त्यांहीं सयाजी महाराजांची भेट करून देण्याची योजना केली. परंतु ती भेट होण्या करितां मला सतत चारपांच दिवस वाड्यांत रखडावें लागलें. एके दिवशीं तर सकाळीं बलाविलें होतें. त्या वरून मीं पहांटेस स्नान करून कांहीं उपाहार न करितां सरकारवाड्यांत गेलों. तों तेथें सारा दिवस आतां महाराजांची स्वारी बाहेर येते असें करतां करतां रात्रीं आठ नऊ वरा वर स्वारी बाहेर गच्चीत आली, तेव्हां मला गोविंदराव रोडे यांणीं कळविलें. बरें झालें. तेथें त्या वेळेस माझ्या दैवानें माझी बूज जाणणारे **त्र्यंबकशास्त्री मनोहर** हे मुख्य अदालतीच्या कामा वर न्यायाधीश होते. त्यांच्या कचेरींत मी निबिड अंधारांत बसून काळ कंठित असें. मीं त्यास पुसलें, किं "तुह्मीं अशा अंधारांत इनसाफाचें काम कसें करितां ?" तेव्हां त्यांहीं मला सांगितलें, किं "ही तर काय, परंतु तुह्मीं एथल्या पुष्कळ अंधाराच्या गोष्टी ऐकाल." हे पुरुष अलीबागचे राहणारे व आमचे लहानपणींचे शाळागुरुजी जे बापुशास्त्री मायदेव शुक्ल त्यांचे सहाध्यायी होते. हे गृहस्थही सयाजी महाराजां समोर मंडळी बसली होती त्यांत महाराजांच्या जवळ बसले आणि मला जवळ बसविलें. मग त्यांही व गोविंदराव रोडे व सखाराम रोडे यांही मिळून त्यांज पाशीं माझी मोठी शिफारस केली. साहेबांनीं जे गृहस्थ एथें आणविले आणि ज्या विषयीं मज पाशीं निरोप दिला ते हेच गृहस्थ." मग महाराज थोडे कांहीं विचारित होते, इतक्यांत त्यांचे चिरंजीव **अप्पासाहेब, नानासाहेब** व **दादासाहेब** हे त्यास मुजरा करावयास आले. मग काय पुसतां ? आप्पासाहेबां बराबर लांबलचक खबुतरांच्या व सकाळच्या कुस्तीच्या गोष्टी चालविल्या, आप्पासाहेब तरी काय लहान नव्हते. चांगले सतरा अठरा वर्षांचे ज्वान होते. त्यांस महाराजांनीं विचारिलें, "काय हो आप्पासाहेब, आज सकाळीं तुमची कोणाशीं कुस्ती झाली ? तुमच्या खबुतरांनीं अंडीं घातलीं काय ?" आप्पासाहेब म्हणतात, "होय महाराज. आजच सकाळीं मीं (खबुतरांच्या जोडप्याचें नांव घेऊन) त्यांचीं दोन अंडीं पाहिलीं. आतां लौकरच त्यांस पिलीं होतील." असें खबुतरांच्या व त्या मादीच्या बाळंतपणा विषयीं व कुस्त्यां विषयींच सुमारें अर्धातास भाषण होत होतें. माझ्या कडेस त्यांचें लक्षही

नव्हतें. त्यांच्या त्या भाषणांत मंडळी व हुजरेही मोठ्या आनंदानें अप्पासाहेबांची तारीफ करून म्हणाले, "आप्पासाहेबांचा तो जोडा लई लाडका. त्या वर आप्पासाहेबांचा लई हेत." अशा प्रकारचें भाषण. त्यांत त्र्यंबकशास्त्रीयांसही मिसळावें लागें. इतकें झाल्या वर उठतांना महाराजांनीं मज कडेस पाहिलें, आणि रोडे यांस सांगितलें कीं, "यांस उद्यां आह्मां जवळ घेऊन या." मीं तर या दोनचार दिवसांच्या हेलांडीनें फार कंटाळलों होतों, आणि त्या दिवशीं तर सारा दिवस उपास काढावा लागला. "आतां महाराजांची स्वारी बाहेर येत्ये घडिवरानें येत्ये, तुम्हीं भेट घेतल्या शिवाय बिऱ्हाडीं जाऊं नका," असे वारंवार मला रोड्यां कडून व शास्त्रीबावां कडून निरोप येत होते. मग मला तसेंच वाड्यांत कंठून राहणें भाग. महाराज निघोन आंत जनानखान्यांत गेल्या वर त्र्यंबकशास्त्री मला म्हणाले, "पाहिलीत ना ही आमच्या एथील कचेरीची मौज? तुम्हीं तर इतक्या चार पांच दिवसांतच इतके कंटाळलां. आह्मांस तर अशीं वर्षेंचीं वर्षें काढावीं लागतात. कचेरी संबंधीं कांहीं जरूरीचें सांगायाचें असलें तरीं हाच नकशा. पंधरा पंधरा दिवस लोटतात तरीं मोठ्या अगत्याची गोष्ट अम्हांस काना वर घालायास एकांत मिळत नाहीं. इंग्रेजां कडील पसाभर बाजरी घेऊन त्यांची चाकरी करावी, परंतु याचे रुपये, मशालअबदागीर नको," असें हा पुरुष मज पाशीं वारंवार उद्विग्न होऊन म्हणत असे. त्र्यंबकशास्त्री पूर्वीं अहमदाबादचे कोर्टाचे शास्त्री होते, त्यांस सयाजी महाराजांनीं आपले कडेस मागून घेतलें. हे पुरुष फार निष्कपटी व साधे होते. त्या वेळेस त्यांस सरकारांतून मशालअबदागीर होतें व दोनशें रुपये दरमाह होता शिवाय पट्टण महाल यांज कडेस होता. मीं एथें असतां यांस मीं आपल्या नव्या केलेल्या लघुकौमुदीचें भाषांतर दाखविलें. तें पाहून तर ते फारच खूश झाले. त्यांहीं साऱ्या बडोद्यांत बडे लोकां मध्यें माझ्या विद्वत्तेची गोष्ट प्रसिद्ध केली.

पुढें दुसरे दिवशीं मीं महाराजांनीं सांगितल्या प्रमाणें पुनः सरकावाड्यांत गेलों. मग त्या दिवशीं किंवा दोन तीन दिवस रखडल्या वर माझी व महाराजांची भेट झाली. परंतु या दिवशीं सखाराम रोडे आणि त्याचे बंधु गोविंदराव यांच्या समक्ष त्यांची माझी भेट झाली. मग दोघांहीं माझा सकल वृत्तांत व रेसिडेंट साहेबानें सांगितलेला निरोप पुनः महाराजां पाशीं सांगितला, आणि त्यांची खात्री केली, किं यांज वर साहेबांची मोठी मेहरबानी आहे व हे आपल्या दरबारास मोठे उपयोगी पडण्या सारखे मनुष्य आहेत. महाराजांनींही माझ्या बोलण्या वरून असेंच जाणलें. मग ते म्हणाले, "एवढे तुह्मीं लई हुशार असून शाळेंत पोरें शिकविण्याचें काम कां करितां? तें सोडा आणि

आमच्या दरबारीं या. आह्मीं तुमचा दरमाह हाल्लीं दोडशें रुपये आहे तोच आह्मीं तुह्मांस चालवूं. परंतु पुढें तुमची योग्यता वाढवूं. आमच्या एथें दरमाह मोठा नसतो; परंतु इतर राजवैभवाच्या पुष्कळ गोष्टी आहेत. तुह्मां कडेस कांहीं काम सांगूं. या मंडळीस पुसा कीं, 'तुमचा दरमाह काय आहे.' आणखी त्र्यंबकशास्त्र्यांसही पुसा." गोविंदरावानें मला पूर्वीच सांगितलें होतें कीं, "महाराज कांहीं म्हणतील, त्यास नाहीं म्हणूं नका. एकदां त्यांहीं तुह्मांस आपल्या चाकरींत ठेवण्याचें कबूल केलें पाहिजे म्हणजे झालें." मग म्यां म्हटलें, "बरें सरकार, आमच्या नशिबीं हें राजवैभव पाहिजे; परंतु इतकें मात्र आहे, किं आह्मीं आपलें काम सोडितों असें पाहिलें म्हणजे इंग्रेज सरकारही आमचा दरमाह वाढवून ठेवण्याचें करितील तेव्हां माझा बोलण्याचा उपाय राहणार नाहीं. हाल्लीं त्या सरकारास आह्मीं उपयोगाचीं मनुष्यें वाटत आहों." महाराज म्हणाले, "बरें तसें झाल्यास आम्हींही तोच दरमाह तुह्मांस देऊं. तुह्मीं आमच्याच येथें रहावें." असें म्हटल्या वर सखाराम रोडे यांहीं खूण केल्या वरून मीं उठून मुजरा केला आणि निरोप घेतला. गोविंदराव माझ्या बराबर जिन्या खालीं आले आणि म्हणाले, "फारच बरें झालें. इतक्या अगत्यांनीं महाराज कोणाशींच बोलत नाहींत. हें त्यांच्या मोठ्या मेहरबानीचें चिन्ह समजा; मीं साहेबांसही हा मजकूर सांगेन आणि त्यांज कडूनही आपल्यास सल्ला देववीन."

पुढें साहेबांची भेट झाल्या वर त्यांहीं मला सांगितलें कीं, "इतका त्यांचा आग्रह आहे तर तुह्मीं नाकारूं नये हें मला बरें दिसतें." त्र्यंबकशास्त्री वगैरे मंडळीचेंही म्हणणें तसेंच पडलें. पुढें आह्मी चारपांच दिवस बडोद्यास राहिलों. तेव्हां तेथील कांहीं दरखदार मंडळीचीही भेट घेतली. त्यांत एथील मोठे नामांकित व श्रीमंत गृहस्थ रावसाहेब गोपाळराव मैराळ हे होते. रावसाहेबांस ही खबर गोविंदरावां कडून व त्यांचे मुनीम बापू अरघडे यांज कडून होतीच. मी सकाळीं प्रहर दिवसास त्यांचे भेटीस गेलों; तेव्हां ते देवपूजेंत होते, तेथें त्यांहीं मला बलाविलें. मी गेलों तों यांज पाशीं बरीच भिक्षुक व इतर मंडळी जमली होती त्यांत मला बसायास सांगितलें. तेव्हां मी त्या मंडळींत बसलों. या अशा श्रीमंत लोकांस भेटायास टवाळ लोकही येत असतात. त्यांहीं कोणाचा लौकिक ऐकला म्हणजे कांहीं तरी टवाळी करून यजमानाच्या व इतरांच्या समक्ष त्यांचा पाणउतारा करावा हाच त्यांचा मतलब असतो. अशा लोकांचा तर या बडोद्यांत अगदींच तोटा नाहीं. त्यांतून अशा एका टवाळ मनुष्यानें मी तेथें बसलों असतां एक गम्मत केली ती ऐका. त्याणें मला पुसलें. "कांहो, आह्मीं ऐकतों, किं यांही सर्व पृथ्वीचा व पृथ्वींतील

देशांचा नकाशा केला आहे (त्या वेळेस मी आणि रा. नाना नारायण आह्मीं दोघांहीं मिळून एक Marathi Atlas केला होता तो जेथें तेथें प्रसिद्ध होताच) तर ही गोष्ट खरी आहे काय ? " "मग तर बाबा शर्त आहे यांच्या बुद्धीची," असें दुसरा म्हणाला. तिसरा म्हणतो, "हें होईल तरी कसें ? यांचें वय तर अगदीं अल्प दिसतें. तेव्हां हे सर्व पृथ्वी व पृथ्वी वरील देश पाहून आले कधीं आणि नकाशा केला कधीं ?" म्यां म्हटलें, "यांत आह्मीं कांहीं मोठें काम केलें नाहीं; इंग्रेजी नकाशे होतेच. त्यां वरून ते मराठींत उतरले इतकेंच." त्यांत तिसरा म्हणाला, "बरें दादासाहेब, जर आपणांस इतक्या सर्व देशांची माहिती आहे, तर मग आमच्या या बडोद्यांत किती बोळ व गल्ल्या आहेत तें सांगा ना ?" मीं मनांत केलें, किं या टवाळ मंडळीनें रावसाहेबां समक्ष थोडा आमचा पाणउतारा करावा असें मनांत आणिलें आहे. मग ज्यानें हा मला प्रश्न केला त्यास उलट प्रश्न केला कीं, "बरें, आह्मीं तर बडोद्यांत कधीं फिरलों नाहीं आणि आह्मांस येथले बोळ माहीत नाहींत. परंतु तुह्मीं आपला हात आपल्या मिशां वर दिवसांतून पन्नासदां फिरवितां, तेव्हां तुह्मीं तर सहज सांगावें कीं, तुमच्या मिशांत किती केस असावे तें. बरें तें सांगा पाहूं." तेव्हां रावसाहेब चकित झाले आणि वाहवा केली. म्हणाले, "भलें समयोचित उत्तर केलें." अशी एथें गम्मत झाली. मग रावसाहेबांच्या इशाऱ्या वरून कारकुनानें शेलापागोटें आमच्या पुढें ठेविलें, तें घेण्यात आह्मीं फार संकोच केला, तरीं घेणें प्राप्त आलें असावें. कारण यांत देणाराचा अपमान होतो. आणि सर्व मंडळीचा आग्रह पडला, किं या घराचा रिवाज आहे. मग म्यां तें शेलापागोटें स्वीकारिलें; आणि रावसाहेबांचा निरोप घेऊन बिऱ्हाडीं गेलों.

पुढें आमचे मुरब्बी सर राबर्ट कीथ आर्बथनट रेसिडेंट यांचा मोठा आभार मानून निरोप घेतला. आणि दुसरे दिवशीं बडोदे सोडण्याचे पूर्वी महाराजांस शेवटचा मुजरा करण्या करितां त्र्यंबकशास्त्री यांच्या मेजवानीचें आमंत्रण आह्मांस होतें, ती मेजवानी घेऊन साधेल तर त्यांच्या बराबर सरकारवाड्यांत जावें असा बेत करून त्र्यंबकशास्त्र्यांच्या बिऱ्हाडीं गेलों. तेथें सर्व तयारी होतीच. त्याच समयीं शास्त्रीबावांचे गुरु नामांकित गोपिनाथ शास्त्री आगाशे यांचेंहि बिऱ्हाड होतें. शास्त्री यांज पाशीं नेऊन त्यांची भेट करविली, आणि म्हणाले, "हे आमचे व तुमचे गुरु बापूशास्त्री शुक्ल यांचेहि गुरु." मग मी त्यांज पुढें भुई वर मस्तक ठेवून नमस्कार केला आणि बसलों. त्र्यंबकशास्त्री यांहीं आमची विद्वत्ता व आह्मीं नवे केलेल्या लघुकौमुदीचे

भाषांतराचा ग्रंथ दाखविला; परंतु विद्येच्या संबंधानें आह्मीं सूर्या पुढें खद्योता प्रमाणें असें त्यांच्या पुढें दिसलों. हे म्हणाले, " इंग्रेजींत निपुण असतील " इतकें थोडेंसें बोलून जेवायास उठले. ते तेजस्वी, गोरे, आणि वृद्ध असे ब्राह्मण होते. आह्मीं वैश्य आहों हें त्यांस समजलें होतेंच. तेव्हां ते साक्षात् आह्मांशीं फार बोलले नाहींत. परंतु जसें विद्वान् ब्राह्मणाचें तेज असतें तसें त्यांच्या मुखा वर विद्वत्तेचें तेज मला दिसलें. पुढें आह्मीं एकी कडेस त्या मंडळींत जेवायास बसलों. जेवण झाल्या वर सरकारवाड्यांत शेवटला मुजरा करायास व निरोप घेण्यास गेलों. त्र्यंबकशास्त्री यांहीं आमची गोष्ट सरकारच्या काना वर घातल्या वर ज्या खोलींत बसले होते तेथें मला बलाविलें. तेथें गोविंदराव वकील होते. मीं थोडा वेळ बसलों तेव्हां सयाजी महाराजांनीं मुंबईच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी केल्या नंतर मीं उठून मुजरा केला आणि म्हणालों, " सरकार, आतां हा मीं निरोप घेण्याचा मुजरा करितों." तेव्हां ते म्हणाले, "कसें, तुह्मीं आपल्या मनांत एथें परत येण्याचा पक्का इरादा केलात ना ?" म्यां म्हटलें, " होय, सरकार इतकी मेहरबानी करून मला अगत्यानें बलावितात हें माझें थोर नशीब. मीं नाहीं कसें म्हणावें ? महाराज पुनः म्हणाले, "पहा हो, ममइस गेल्या वर तुह्मीं आपला बेत फिरवाल. आतां ममइस कशास जातां, एथेंच राहा ना ?" म्यां म्हटलें, " नाहीं सरकार, मीं येथें रजे वर आहें; मला ज्या जाग्या वरून आलों तेंथे कायद्या प्रमाणें गेलेंच पाहिजे. नंतर त्या रजेंत मीं मुंबईस जाऊन राजीनामा देऊन तिकडल्या आमच्या साहेबास व इष्टमित्रांस भेटून आपल्या सेवेंत हाजर होतों." महाराज म्हणाले, माझ्या हाता वर असें वचन द्या कीं, मीं खचित येतों." म्यां म्हटलें, " असें मीं कसें वचन द्यावें ? तेथें गेल्या वर काय होईल हें मला आज कसें समजतें ? हाता वर हात देणें म्हणजे शपथ घेण्या सारखें मीं समजतों ज्या गोष्टीचा आपल्यास भरंवसा नाहीं त्या विषयीं शपथ कशी घ्यावी ? माझे तोंडचें वचन सरकारानें कबूल करावें." महाराज म्हणाले, "बरें आहे. तर तुह्मीं खचित परत या." असें म्हटल्या वर मीं मुजरा करून निघालों. गोविंदराव व सखारामपंत हे मज बरोबर बोलत बोलत खालीं आले आणि म्हणाले, " पहा हो सरकारचा आग्रह फार आहे. तुह्मीं येथें येण्यास चुकवूं नका ?" म्यां बरें म्हणून त्या सर्व मंडळीस नमस्कार केला आणि निघालों.

या खेपेस माझें बिऱ्हाड आमचे बालमित्र राजश्री नाना नारायण यांच्या बिऱ्हाडीं होतें. भाऊसाहेब शास्त्री तबियेत बिघडल्या मुळें आपल्या बंगल्यांत कापांत राहायास गेले होते. त्यांसही मी एकदोनदां भेटलों आणि सरकारवाड्यांत झालेला मजकूर सर्व कळविला. महाराजांनीं आप्पासाहेबां करितां इंग्लिश पढविण्यास शास्त्री यांज कडून नानास मागून घेतलें आणि त्यांची असामी

सरकारांत करून दिली. एथें मीं दहाबारा दिवस होतों तों पर्यंत नानाच्या बिऱ्हाडीं मोठ्या आनंदानें होतों. त्यांस हें माझें वर्तमान ऐकून मोठा आनंद झाला. ते म्हणाले, " बाळपणा पासून तुमच्या आमच्या सोबतीचा योगच असा कांहीं विलक्षण आहे कीं, तुह्मीं आह्मीं थोडे दिवस राहून पुढें एकत्र मिळावें !"

'आतां तुह्मीं लौकर बडोद्यास या,' अशी आमच्या मित्रानें मोठी उत्कंठा दाखविली. हे आमच्या सोयी प्रमाणें व चैने प्रमाणें सकाळीं आप्पासाहेब (पुढें खंडेराव महाराज झाले ते) यांस इंग्रजी पाठ देण्यास जात असत. त्यांच्या कुस्त्या झाल्या वर ते त्यांच्यापासून पाठ घेण्यास सरकारवाड्यांत त्यांस खोली दिली होती तींत येत असत. तेथें नानानें मला दोन तीन वेळां नेऊन आप्पासाहेबांची चांगली ओळख करून दिली. शेवटीं ते मला म्हणाले, " महाराजांनीं तुह्मांला आमच्या एथें येण्यास सांगितलें आहे त्या प्रमाणें तुह्मीं या हो, चुकूं नका." ही माझी आणि खंडेराव महाराजांची पहिली ओळख. त्यांहीं ती पुढें चांगली ठेविली, हाही मजकूर प्रसंगोपात्त वाचकांस समजेल. आमचे मित्र नाना हे बडोद्यांत राहून थोडे राजविलासी पुरुष बनले होते. त्यांस हें माझें नित्य सरकारवाड्यांत जाऊन रखडणें आवडत नव्हतें.

ते आपल्या अनुभवा वरून मला सांगत कीं, " एथील लोकांचें इतकें आर्जव नको. मीं दिवाण भाऊ तांबेकर यांशीही फटकून असतों. दोनदां तीनदां बलावितात तेव्हां एकदां जातों. नाहींतर यांहीं मला एथें चैन पडूं दिलें नसतें. मलाहि आतां तुह्मांस त्यांज पाशीं नेण्यास प्रशस्त दिसत नाहीं; ते आपल्या घमेंडीनें तुमचा जसा आदरसत्कार राखावा तसा राखणार नाहींत या भयानें मी तुह्मांला त्यांच्या जवळ नेत नाहीं. पुढें दिवाणजीस भेटण्याचे प्रसंग येतीलच. " असें आमच्या मित्रा बराबर भाषण झाल्या वर मीं परत सुरतेस गेलों, आणि तेथून आपल्या कामाचा राजीनामा मिस्तर ग्रीन (Mr. Green) यांच्या मार्फत मुंबईंत Board of Education या मंडळीचें सक्रतार (Secretary) डाक्टर स्टोवेल (Dr. Stovell) यांज कडेस पाठविला. आणि लागलाच संध्याकाळीं शेवटला निरोप घेण्या करतां खानबहादूर आर्देशिर धनजीशाह यांज कडेस गेलों. त्यांची आतां गरज सरली. त्यांस माझी भेट घेण्यानें कांहीं समाधान वाटलें नाहीं. कारण मीं आतां त्यांचा मागणेदार झालों, आणि ते माझे देणेदार. मग मागणेदारास पाहून देणेदार कसा खूश होतो ! मीं या वेळेस खूप रगडून आपलें मागणें केलें. आणि म्हणालों, " शेटसाहेब, म्यां इतकी सात आठ महिने पर्यंत सतत तुह्मांस मदत करण्याचे श्रम घेतले, रात्रीचा जागलों आणि तुह्मांस तर्जुमे करून दिले. त्या

खटल्यांतही परमेश्वरानें तुह्मांस यश दिलें. तुह्मीं सर्व मंडळी समक्ष मला अभय-वचन दिलें व त्याचे तुह्मांस आतां स्मरण आहे काय? तुह्मीं Mr. Howard यांस रोज ३०० रुपये प्रमाणें हिशोब करून सारी रक्कम देऊन आणखी जाते वेळेस त्याच्या हातांत तीन हजार रुपयांची हिऱ्याची आंगठी घातलीत, आणि मला तुमच्या कडून एक फुटकें बदाम देखील मिळालें नाहीं. आतां इतकी मेहनत घेऊन तुह्मीं मला असें विन्मुख पाठवितां हें भगवंतास कसें बरें वाटेल? याचा परिणाम तुह्मांस फार जड जाईल, याची पक्की आपल्या मनांत गांठ बांधून ठेवा. मीं तर जातों. परंतु तुह्मांस लौकरच याचा, माझ्या निराशेचा अनुभव येईल." असें म्हणून मी सलाम न करितां रागानें तसाच पाठमोर होऊन परत बिऱ्हाडीं आलों. तरी त्यानें निघतांना समाधान इतकेंच केलें कीं, "तुमचें इनाम तुह्मांस घरीं पाठवून देईन." म्यां म्हटलें, "आतां तुमच्या बोलण्या वर कोण विश्वास ठेवील? तुह्मीं स्वर्गांहून पाठवाल तरच." असें म्हणून मीं निघालों; आणि बिऱ्हाडीं आलों. पहा या सुरतेंतल्या मोठ्या नामांकित नेटिव गृहस्थाची वर्तणूक आणि एक दोन महिने उगीच एक तास खेळण्या प्रमाणें ज्यास गुजराथी शिकवायास जात होतों त्या आर्बथनट साहेबांची वर्तणूक.

पुढें लौकरच या आर्देशिराची पहा कशी दशा झाली. मीं मुंबईस गेल्या वर यांस लौकरच पेन्सन झालें. पुढें या दोघां भावांस कर्ज झालें म्हणोन त्यांची सर्व स्थावर जंगम दरोबस्त मालमिळकत साहुकारांनीं हुकुमनामे करून लिलावांत विकली. शेवटीं एक दोन वर्षांचे आंत आर्देशिर मरण पावला, तेव्हां शेवटीं त्याच्या बायकोस लोकांचें दळणकांडण करून पोट भरावें लागलें.

मीं राजीनामा पाठविल्या वर घरीं जाण्याच्या तयारी करितां मुरब्बी लोकांस व इष्टमित्रांस भेटण्या करितां मुंबईस गेलों. बडोद्यास सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या बलावण्या वरून माझ्या जाण्याचें वर्तमान पसरलें.

◆◆◆

: १७ :

विष्णुबुवा ब्रह्मचारी

सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध

राजा कसा असावा व त्याणें काय करावें व प्रजेनें कसें चालावें व त्यापासून फल काय याविषयीं हा निबंध ब्रह्मचारी बावा यांणीं लिहून सर्व लोकांस नजर केला आहे. याची अवतरणिका खालीं लिहिलेली वाचावी.

हल्लीं या भूगोलावर अनेक राज्यें आहेत, परंतु तीं चालविणाऱ्या राजांना खरी राज्यनीति काय हें माहीत नाहीं व प्रजा कोणत्या उपायानें गुन्हे करणार नाहीं हें माहीत नाहीं, यामुळें सर्व राजे व सर्व प्रजा इत्यादि मनुष्य मात्र सर्वकाळ चिंताग्रस्त व हाय हाय करीत फिरत आहेत. ह्मणजे कोणीच दुःखी नाहीं असें नाहीं. यास्तव या लहानशा निबंधांत लिहिलेली राज्य करण्याची रीत राजांनीं पकडावी व प्रजेनें त्या राज्यरीतीप्रमाणें वागण्याची रीत पकडावी म्हणजे सर्व प्रापंचिक संकटें दूर होऊन निरिच्छतेनें ईश्वराची भक्ति त्यांना घडेल आणि वेदांत शास्त्राचे पूर्ण विचार व योगशास्त्राचा पूर्ण अनुभव घेण्यास त्यांचा वृत्तीला स्वस्थता व अवकाश मिळेल आणि परस्पर मनुष्यांत अत्यंत निरिच्छ सत्य व मैत्री राहील व दया, क्षमा, शांति हीं लक्षणें मनुष्य मात्राच्या अंगीं सहज राहतील. या हेतूनें हा निबंध मी विष्णुबावा ब्रह्मचारी याणें केला, यांत जितका विचार लिहून दाखवावयाचा तितका लिहिला नाहीं. परंतु त्या सर्व विचारांचीं मूळ कारणें सूत्ररीतीप्रमाणें कळतील अशीं लिहिलीं आहेत. ह्याचा सर्वांनीं कृपा करून अंगीकार करावा. ह्मणजे सर्वांच्या अंगचीं दस्युत्व उत्पन्न होण्याचीं कारणें नष्ट होऊन राज्य उत्पन्न होईल व दस्यू कोण हें कळेल व ईश्वराची सर्व सृष्टी एक आहे व तिचा नियम एक आहे, तशीच ईश्वराकडील राज्यनीतीही एक आहे व ती सर्वांस सुखरूप आहे हें कळेल व तशा राज्यनीतीच्या राज्याचें दर्शन तेंच सर्व सुखाचें कारण आहे हें अनुभवास येईल. यास्तव कृपा करून मी आपल्या वयाच्या बेचाळीसाव्या वर्षीं म्हणजे उतार अवस्थेंत लिहिलेली राज्यनीति वाचून तिचें सर्वांनीं मनन करावें ही सर्व लोकांस मी हात जोडून विनंती करीत आहें.

१. अहो लोकहो ऐका, जितक्या प्रदेशाचा जो राजा असेल तितक्या प्रदेशांतील प्रजेला राजानें असें समजावें कीं ही सर्व प्रजा माझें एक कुटुंब आहे व मी ह्या सर्व प्रजारूपी कुटुंबाचा मालक आहें व जेवढी माझे ताब्यांत जमीन आहे तेवढी जमीन माझा एक बागच आहे यास्तव या सर्व प्रजारूपी कुटुंबाचा तेवढ्या बागांत म्हणजे जमिनींत निर्वाह होऊन प्रजारूपी कुटुंब सर्वकाळ सुखी राहील अशी तजवीज मला केलीच पाहिजे. याप्रमाणें राजाचा विचार प्रथम असावा; म्हणजे राज्य हेंच एक घर व प्रजा हेंच एक कुटुंब असा भाव असावा.

२. याप्रमाणें सर्व प्रजा एक कुटुंब आहे यास्तव ह्या सर्व कुटुंबाला सुख व्हावें ह्याविषयीं उद्योग करणाऱ्या राजाला प्रजेनें विनंती करावी कीं, जो हुकूम होईल त्याप्रमाणें वागण्यास आम्हीं प्रजा सिद्ध आहों.

३. नंतर सर्व प्रजेकडून सर्व जमीन लागवड करवावी ती अशी कीं, ज्या ठिकाणीं जी वनस्पति चांगली पिकेल त्या ठिकाणीं तिची लागवड करावी व नद्यांना धरणें बांधून सर्व जमिनीला बारा महिने पाणी पुरेल इतके पाण्याचे तलाव व कोंडी तयार कराव्या आणि अनेक प्रकारचीं फळें व कंद व भाजा व अन्नें व लांकडें व गाई, ह्मशीं, शेरडें, घोडीं, गाढवें, उंटें यांच्या निर्वाहार्थ गवत उत्पन्न करून गांवोगांव कोठारें भरून ठेवावीं व त्यांतून सर्व गांवकऱ्यांनीं पोटास लागेल तितकें अन्न न्यावें व जनावरांस चारा न्यावा. याप्रमाणें शीतकाळ व उष्मकाळ व पर्जन्यकाळ या बाराही महिन्यांत एक सारखें सर्व जमिनींतून उत्पन्न करावें आणि तें सर्वांचें उत्पन्न एकच आहे व एकाचे ताब्यांत राहून सर्वांनीं त्यांतून खावयास विपुल न्यावें व राजानें लोकरीचे व तागाचे व रेशमाचे व कापसाचे याप्रमाणें अनेक तऱ्हेचे कपडे तयार करण्याचे कारखाने तयार करून अनेक तऱ्हेचे कपडे तयार करावे आणि गांवोगांव खजिन्यांत ठेवावे. त्यांतून ज्याला जो कपडा पाहिजे तो त्यानें न्यावा व बारा वर्षें पर्जन्य पडला नाहीं तरीही पाण्याच्या पुरवठ्यामुळें जमीन सुपीकच राहवी असा पाण्याचा धरणें बांधून पुरवठा ठेवावा व सोन्यारुप्याचे मोतीं हिरे ह्यांनीं जडलेले अलंकार तयार करून गांवोगांव ठेवावे व ते सर्व स्त्रियापुरुषांनीं वापरावे आणि पुन्हा राजाच्या खजिन्यांत ठेवावे. तशींच शस्त्रें यंत्रें तयार करून गांवोगांव ठेवावीं व सर्व प्रकारचे खेळ गांवोगांव ठेवावे व आगगाड्या व तारायंत्रें गांवोगांव असावीं व सर्व प्रकारच्या कारखानदारांनीं व शेतकऱ्यांनीं व राजानें एकसारखें खाणें खावें व तें सर्वांनीं एका कोठारांतून नेऊन खावें. व सर्वांचीं लग्नें राजानें करावीं व ज्याला जी स्त्री नको त्याला दुसरी करून द्यावी व

तिला दुसरा पति करून द्यावा व सर्वांचीं पांच वर्षांचीं पोरें झालीं म्हणजे मुलीं मुलगे राजाच्या ताब्यांत द्यावे. नंतर त्यानें त्यांना सर्व विद्या शिकवून ज्याला ज्या कामांत जास्ती उद्योग करण्याची संवय असेल त्याला त्या कामाकडे लावून द्यावा व स्त्रिया पुरुष वृद्ध झालीं म्हणजे त्यांच्याकडून काम धंदा न करवितां त्यांनीं स्वस्थ बसून खावें आणि जगत् बनणाराचे उपकार आठवीत बसावें व मेल्यावर सर्वांच्या शरिरांचे तात्काळ पृथक्करण व्हावें यासाठीं सर्वांचीं शरीरें राजानें दहन करवावीं. याप्रमाणें एकच कुटुंब सर्व प्रजा आहे या वागण्याची रीत वर लिहिल्या-प्रमाणें असावी म्हणजे चोरी व मारामारी व तरकट व खूण इत्यादि गुन्हे कशाला ह्मणतात हें माहीत नाहींसें होतें व इनसाफाच्या कोर्टांची गरज मुळींच राहत नाहीं व दुष्काळ काय हें ठाऊकही होत नाहीं व सर्वांच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. यास्तव या कलमांत लिहिल्याप्रमाणें राजा आणि प्रजा यांचा खरो-खर संबंध असावा.

४. राजानें सर्व जीवात्म्यांकडून जगत् होणाराची दररोज अशी प्रार्थना करावी कीं, हे जगत् होणाऱ्या ज्ञानवान् ज्ञात्या ईश्वरा, हें सर्व विश्वच तूं झालेला आहेस व ज्या शरीराच्या आधारानें तुझी आठवण शरीराच्या हृदयांत तूं आहेस अशी मी करितों तें शरीरही तूंच झाला आहेस व ज्या मनानें संकल्प उत्पन्न होतात तें मनही तूंच होतोस व मी आहें असें मला वाटतें तें वाटणेंही तुझ्याच मीपणानें मला आहे कारण मी आहे हा अभिमान तूंच होऊन शरीरांत राहतोस म्हणून तो मी आहें ह्या अभिमानरूपानें तूं कसा आहेस हें मला ठाऊक नाहीं पण हें सर्व होणाऱ्या ईश्वरा, तूं अहंकार व मन बुद्धि व शरीर ह्यांचा आदि अंत मध्य आहेस म्हणून तुझें रूप तुला खबरच आहे. सारांश तूं सर्व झालास व होत आहेस व होशील. त्याची तुला बरोबर माहीत आहेच. कारण परिमेयता धर्म ज्याच्या अंगीं आहे त्यांनीं चलित होणें व पाणी उतरत्या भागाकडे वाहणें व अग्नीनें जाळून पृथक्करण करणें किंवा रसायण करणें व गुरुत्वाकर्षण शक्त्यादिक शक्त्यांनीं आपआपलें व्यापारांत असणें व पाण्यानें व हवा इत्यादिकांनीं पदार्थांच्या अनेक प्रकारच्या आकृती होणें व ह्या सर्व व्यापारांची उत्पत्ति स्थिति संहाराला तुझी आवश्यकता आहे. यामुळें त्या व्यापारांना जरी स्वाभाविक व्यापार असें आम्ही कल्पितों तरी ते व्यापार उत्पत्ति स्थिति संहाराला हेतु आहेत यामुळें ते स्वाभाविक भासणारे व्यापारच तुझ्या ज्ञानाचा नियम आहेत त्या स्वाभाविक व्यापाराधीन तूं नाहींस ते स्वाभाविक व्यापार तुझ्या स्वाधीन आहेत म्हणून तूं ते फिरविण्यास समर्थ आहेस म्हणजे पाणी चढणीकडे धावणें वगैरे तुझ्या स्वाधीन आहे या प्रकारचा ज्ञाता भगवान् शक्त शक्ति-मान् तूं आहेस यास्तव मला जें जें बरें दिसलें व सृष्टिनियमानें बरें भासलें

तें तें मी केलें असें म्हटलें. परंतु सत्ता तुझी आहे यास्तव तुझ्या शरीरांतील ज्ञानाला जडलेला मी अज्ञानी जीव आहें असें हे ज्ञानवाना, तूं समजून माझें जें चागलें तेंच जिवंतपणीं व मेल्यावर मला मिळावें हें देणें सर्व होणाऱ्या शक्त शक्तिमान् व ज्ञाता ज्ञानवान् हृदयस्थ ईश्वरा, तुझ्या स्वाधीन आहे. यास्तव हे ज्ञाता व ज्ञानवान् व शक्त शक्तिमान् दयाळा, मायबापा, जगत् होणाऱ्या ईश्वरा, मी अज्ञानी आहें यास्तव मजकडे कृपादृष्टि असावी याप्रमाणें दररोज प्रार्थना सर्व गांवीं सर्व शरीरधारी जीवात्म्यांकडून करवावी व स्वतां राजाच्या शरीरांतील जीवात्म्यानें करावी.

५. याप्रमाणें सर्व प्रजा एक कुटुंब व सर्व जमीन हाच एक बाग व त्यांतून जें जें निघेल तें तें सर्वांचे एक. याप्रमाणें राज्यव्यवस्था असली म्हणजे सर्वांना सर्व उपभोग मिळतात. व सर्वांना उत्तम खावयास मिळतें व सर्वांना उत्तम विपुल वस्त्रें व अलंकार भूषणें मिळतात व सर्वांना नाच तमाशे बैठकी पाहावयास सांपडतात व पालख्या व रथ व घोडे व हत्ती यांजवर सर्वांना बसावयास मिळतें. यामुळें कोणाला कांहीं प्राप्त नाहीं असें होतच नाहीं म्हणून सर्व लोक पूर्णकाम होतात. यामुळें कामाच्या अपूर्णतेनें क्रोध येणें हें शिल्लक रहात नाहीं आणि क्रोध नसल्यामुळें गुन्हा करणें किंवा गुन्हा करण्यास्तव मत्सर धरून बसणें यांचा लवलेशही रहात नाहीं यामुळें हाच प्रजेचा व राजाचा खरोखर असावा तसा संबंध आहे.

६. आतां कितीएक लोक अशी कल्पना करतील कीं, अशी व्यवस्था झाली तर संडास कोण झाडील व रस्ते कोण झाडील व पालखी कोण उचलील व गुरगुडी कोण भरून देईल व पिकदाणी धुवून आणून कोण देईल व हात, पाय कोण दाबील व हातांत जोडा घेऊन कोण उभा राहील व घोड्याला खरारा करणें व घोड्यावरून उतरण्याबरोबर घोडा हातांत धरणें हें कोण करील ? तर त्या कल्पना करणारांनीं असें समजावें कीं, मनुष्यांची अक्कल एकसारखी नसत्ये व प्रीतीही एकसारखी नसत्ये, यामुळें त्यांना कर्में करण्याची प्रीतीही एकसारखी नसत्ये. यास्तव त्या सर्वांच्या प्रकृतीचें तानमान पाहून त्यांना ते ते धंदे शिकविणें हें पांच वर्षांच्या वयाच्या मुली व मुलगे राजाच्या ताब्यांत दिल्ह्यापासून सर्वांच्या परीक्षा त्या ठिकाणीं होऊनच त्यांना विद्या शिकविल्या जातील. त्यांत किती एक स्त्रिया पुरुषांना संडास झाडण्याचीच विद्या राजा शिकवील व तितकें त्यांनीं बरोबर काम केलें म्हणजे त्यांना आइतें शिजवलेलें अन्न व उत्तम कपडे व अलंकार व स्त्रिया व स्त्रियांना पुरुष याप्रमाणें सर्व सुखभोग्य पदार्थ मिळतात. ह्या लालचीनें तितकें संडास झाडण्याचें काम ते चांगल्या मेहनतीनें करतील व

त्यांचीं पोरें पांच वर्षांचीं झालीं म्हणजे त्यांना राजा नेऊन जो धंदा शिकवील तोच तीं मोठीं झाल्यावर करतील. याप्रमाणें व्यवस्था असली म्हणजे सर्व कामें होतील व गुरगुडी व पिकदाणी धुवून आणून देण्याचें व पाय दाबण्याचें काम शिकलेलीं स्त्रीपुरुषें तें काम हलकें समजत नाहींत कारण तीं असें समजतात कीं, मुख्य अन्न हें धन आहे व वस्त्र इत्यादि सर्व सुखभोग्य पदार्थ हे त्या धनाच्या सामर्थ्यानें भोगावयाचे विलास आहेत, ह्या सर्वांची प्राप्ति आह्मीं पाय दाबणें व गुडगुडी भरून देणें व पिकदाणी धुणें इत्यादि आह्मांस येतात तीं कामें आह्मीं केलीं म्हणजे या सर्व धनादिकांची आह्मांस सहज प्राप्ति होत्ये यास्तव हें काम विनदिक्कत करावें. ह्याप्रमाणें विचार होऊन सर्व कामें चालतात व स्त्रीपुरुष हीं उभयतां राजानें बांधविलेल्या एक एक गृहांत एक एक जोडा अशीं राहून त्या ठिकाणीं त्यांना सर्व पदार्थांची प्राप्ति त्यांनीं शिकविलेलें काम केलें म्हणजे होत्ये. यामुळें सर्व कामें तीं मनुष्यें चालवितात यामुळें कोणतीच अडचण कोणालाच पडत नाहीं.

७. राजानें अनेक धंद्यांचीं खातीं काढावीं. म्हणजे एक शेतें करण्याचें खातें काढावें, त्यांत शेतें करण्याच्या मुख्य विद्येंत हुषार असे किती एक कामदार जागोजाग नेमावे. व त्यांच्या शिकविण्याप्रमाणें काम करणारे किती एक त्यांच्या हाताखालीं नेमावे व किती एक पिकलेलें धान्य कापून नेऊन दाणे काढून देणारे नेमावे व कितीएक संग्रह ठेवण्याच्या कामावर नेमावे व कितीएक जिकडे जो जितका पाहिजे तितका नेऊन पोहोंचविणारे नेमावे व किती एक वस्त्रें तयार करणारे व कितीएक शिवणारे व कितीएक लोखंडाचें काम करणारे व कितीएक लांकडाचीं व मातीचीं व दगडाचीं व काचेचीं इत्यादि कामें करणारे व कितीएक चामड्याचीं कामें करणारे व कितीएक खाणीचीं कामें करणारे व कितीएक गणित-विद्या दाखविणारे व कितीएक विद्या शिकविणारे व कितीएक पाण्यांतील जहाजी कामें करणारे व कितीएक घरें व जहाजें बांधणारे व कितीएक औषधें देणारे व कितीएक लोकांस सद्बुद्धि देणारे व किती एक जें ज्याला पाहिजे तें वस्त्र व अलंकार देणारे व परत घेऊन संग्रह करणारे व कितीएक खुराकी माल व भाज्या व तेल व तूप व गूळ इत्यादि लोकांस देणारे इत्यादि प्रकारचे सर्व ठिकाणीं सर्व नेमून सर्वांचा बंदोबस्त ठेवावा. हेंच खरोखर राजा असण्याचें काम आहे.

८. याप्रमाणें व्यवहार असला म्हणजे चोरी करून त्या मालाचें काय करावें व व्यापार करून मत्सर कसला करावा व पैसा छपवून त्याचा उपयोग काय करावा व दुसऱ्याला मारून काय मिळवावें असें झाल्यामुळें खराब कामें

सर्व व्यर्थ आहेत याप्रमाणें मनांत विचार होऊन मन स्वस्थ बसतें आणि ईश्वराचा उपकार आठवूं लागतें यास्तव प्रजेंत राज्यकारभार या रीतीचा असावा. पहा असा राज्यकारभार एक शतकपर्यंत चालेल तर दुसऱ्या शतकांतील प्रजा हल्लींच्या राजांना व न्यायाधीशांना ते मनुष्य नवते ते जनावर होते असें ह्मणेल.

९. पहा, सर्व प्रजा एक कुटुंब व सर्वांचे मुख्य धन जें अन्न तें एक सर्वांचे सुखभोग्य पदार्थ एक याप्रमाणें राज्यव्यवस्था नसल्यामुळें सर्व प्रजा परस्परांचे गुन्हे करीत आहे. व विश्वासघात करीत आहे व एकमेकांचे प्राण घेत आहे व अनेक कपटें करीत आहे व ईश्वराला शिव्या देत आहे व " काय करूं कसें करूं " या अष्टाक्षरी मंत्राचा जप करीत आहे व कितीएक कितीएकांस पीडा करीत आहेत व कुलपें किल्ल्या बाळगीत आहेत व कोणाला पुरें खावयास मिळतें व कोणाला मिळत नाहीं अशी दुर्दशा होत आहे व दुष्काळानें प्रजा मरत आहे. व एशिया, युरोप, आफ्रिका, अमेरिका या चारी खंडांतील व सर्व द्वीपांतील राजे म्हणविणारे इंग्लिश, फ्रेंच, रशियन, अमेरिकन, चिनई व हिंदुस्तानवासी व मध्य एशियानिवासी इत्यादि राजांचे कलह उत्पन्न होऊन प्राणघात होत आहेत ह्या इतक्या अनर्थांचें मुख्य कारण इतकेंच कीं, सर्व प्रजा एक कुटुंब ही वर लिहिलेली राज्यव्यवस्था भूगोलावर कोठेंच आढळत नाहीं. हेंच आहे, यास्तव सर्व प्रजा एक कुटुंब व सर्व जमीन एक बाग व त्यांतील जें जें उत्पन्न तें सर्वांचे एक व त्या सर्व खटल्याचा मालक राजा एक या प्रमाणें राज्य व्यवस्था असावी म्हणजे इंग्लिश, फ्रेंच रशियन, अमेरिकन, चिनई, ह्या राज्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना असें वाटेल कीं, आमची नीति दुष्ट ह्मणून आमच्या प्रजेंत दुष्ट गुन्हे होतात; यास्तव आपण सर्व प्रजा एक कुटुंब अशी नीति ठेवूं तरच सुखी राहूं व प्रजा सुखी राहील, कारण प्रजेच्या गुन्ह्यांचें पाप राजाच्या मस्तकावर आहे हें म्हणण्याचें कारण राज्यनीति बराबर नाहीं हें ध्यानांत ठेवून एक कुटुंब सर्व प्रजा अशी राज्यनीति ठेवावी.

१०. पहा, पुराणात एक गोष्ट लिहिली आहे कीं, कोणी एका मनुष्यास एका राजानें जेवावयास बोलाविलें त्यानें जेवून जात्येवेळेस कांहीं चोरून नेलें त्याचा इनसाफ कसा करावा व चोरास शिक्षा काय असावी हें विचारण्यासाठीं कोणी एका नीतिमान् राजाकडे गेले त्यावेळेस त्या राजानें सांगितलें कीं, ह्यानें चोरिलें त्याचें कारण चोरीचा क्रयविक्रय तुझ्या राज्यांत होतो. व त्या धनापासून सुखभोग्य पदार्थ मिळतात. परंतु सुवर्ण रौप्याशिवाय सुखभोग्य पदार्थ मिळत नाहींत, याचें कारण तुझ्या स्वाधीन सर्वांचे सर्व सुखभोग्य पदार्थ नाहींत यास्तव असला तूं अनीतिमान् राजा आहेस. यामुळें चोरी होत्ये कारण चोरी वगैरे करणें

हे सर्व सुख भोग्यपदार्थ प्राप्त्यर्थ आहे; परंतु तुझ्या राज्यनीतीनें सर्वांस सारखे सुखभोग्यपदार्थ मिळत नसतील व मिळविण्याची चिंता लोकांस पडत असेल यामुळें अनेक गुन्हे होत असतील यास्तव तूं राजा म्हणविणारा त्या तुझा शिरच्छेद करावा व राज्यनीति बदलावी हीच शिक्षा मला पसंत दिसत आहे.

११. पहा सर्व प्रजा एक कुटुंब ह्या प्रकारची राज्यव्यवस्था ह्या भूगोलावर हरएक ठिकाणीं चालू होईल त्यादिवशीं लोकहो, तुह्मीं अशी कल्पना करा कीं, भगवद्गीतेच्या दहाव्या अध्यायाच्या सत्ताविसाव्या श्लोकाच्या चतुर्थ चरणांत सांगितल्याप्रमाणें " नराणांच नराधिपं " ह्मणजे मनुष्यांत मनुष्यांचा राजा मी आहें असें ईश्वर ह्मणतो ह्या ह्मणण्या प्रमाणें राज्य उत्पन्न झालें, यास्तव सार्वभौमपद त्या राजाला मिळेल कारण तो ईश्वर अंश आहे असें भगवद्गीतेच्या दहाव्या अध्यायाच्या सत्ताविसाव्या श्लोकाच्या चतुर्थ चरणांत आहे, यास्तव अशा राज्याच्या राज्यनीतीपुढें हल्लींच्या चारी खंडांतल्या इंग्लिश, फ्रेंच, रशियन, अमेरिकन इत्यादि राज्यांच्या राजनीति ह्या कशा होतील, तर जसा सूर्यापुढें खद्योता किंवा राजापुढें चोर तशा होतील असें समजावें. यास्तव खरोखर सांगतों कीं, सर्व प्रजा एक कुटुंब अशी राज्यनीति असावी.

ह्या अकरा कलमांत लिहिल्याप्रमाणें राजा आणि प्रजा यांनीं वागावें.

• • •

: १८ :

नी ल कं ठ ज ना र्द न की र्त ने

ग्रांट डफ्कृत मराठ्यांचे बखरीवर टीका अथवा मराठ्याचे इतिहासाविषयीं थोडेंसें निरूपण

प्रथमतः मोठी दुःखकारक गोष्ट ही आहे कीं, या विषयावर ग्रंथ म्हणून फार थोडे आहेत; व जे थोडे कांहीं आहेत त्यांची गणना उत्तम प्रतींत होणार नाहीं; मध्यम प्रतींतही त्यांस सामान्यच म्हणण्यास हरकत नाहीं. केवळ याच विषयावर ग्रंथ म्हटला तर ग्रांट डफ्कृत मराठ्यांचे बखरीशिवाय दुसरा नाहीं. आमचे माजी बाळ गंगाधर शास्त्री यांनीं त्यांचे लौकिकांस साजेल असें थोडें बहुत लिहिलें आहे. " हिंदुस्थानचे इतिहास " या नांवाचे इंग्रजींत ग्रंथ पुष्कळ आहेत; परंतु एका ग्रंथांत जी माहिती सांगितली असते तिजपेक्षां दुसऱ्या ग्रंथांत विशेष म्हणण्यासारखी जास्ती नसत्ये. इंग्रजांचे कारकीर्दीचे निरूपणांत बरेंच जास्ती कमी आढळतें; परंतु मराठ्यांसंबंधीं जें असतें तें बहुधा एकच. ही मोठी चमत्कारिक गोष्ट आहे कीं, या विषयावर सर्वांचें दुर्लक्ष आहे; युरोपियनांचें तर असो, परंतु हिंदुस्थानांतील लोकांचें देखील दुर्लक्ष ! मराठी लोकांचें देखील दुर्लक्ष ! ! आमचे शाळेंतील मुलांस, व आमचे कॉलेजांतील विद्यार्थ्यांस ग्रीस, रोम आणि इंग्लंड इत्यादि देशांची माहिती बरी असत्ये; परंतु त्यांच्या स्वदेशाची माहिती फार कमी असत्ये. मागें कांहीं दिवस ग्रांट्डफ् साहेब यांच्या ग्रंथाचें भाषांतर मराठी शाळांत " वाचनबुक " असें; परंतु मुलांनीं शिवाजीचे कारकीर्दीपर्यंत वाचून कांहीं ज्ञान संपादिलें न संपादिलें, त्यांचें मनांत आपले देशाचे शूर पुरुषांविषयीं कांहीं पूज्य बुद्धि आली न आली इतक्यांतच ते इंग्रजी शिकण्यास प्रारंभ करीत; व थोडेच दिवसांत या विषयावरची माहिती विसरून जात. ही मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं, माजी डायरेक्टर हावर्ड व ग्रांट साहेब यांनीं मराठी कवितेस जसें उत्तेजन दिलें, तसें या मराठ्यांच्या इतिहासास दिलें नाहीं. सांप्रत बहुतेक शाळांतून आणि मला वाटतें शेजारील ट्रेनिंग कॉलेजांतही महाराष्ट्र " देशाच्या वर्णना " पेक्षां मोठें पुस्तक शिकविण्याची जरूर आहे, असें कोणांस वाटत नाहीं; असो; हा कामासंबंधीं प्रश्न आहे; आणि यांत अधिकारी यांनीं आपली चूक कशी सुधारावी हें आम्हीं त्यांचे त्याजकडेच ठेवितों.

मीं मागें असें सांगितलें आहे कीं, जे थोडेबहुत या विषयावर ग्रंथ लिहिलेले आहेत, त्यांस उत्तम तर नाहींच, परंतु मध्यम असेंही मोठ्या प्रयासानें म्हणावें लागेल. ग्रांट डफ् साहेबाचे इतिहासाविषयीं आमचें मत याहून निराळें आहे असें नाहीं. तो ग्रंथ मोठा गूढ अथवा समर्पक आहे असें नाहीं; त्या साहेबास जी मदत मिळाली व जे हस्तलिखित ग्रंथ सांपडले, व ज्या सनदा मिळाल्या, त्यांचा विचार केला असतां त्यांवरही मोठी सुंदर इमारत उठली असें म्हणवणार नाहीं. ज्या कोणीं कधींही हस्तलिखित 'शिवाजी महाराजाची बखर,' व 'पुण्याची अथवा पेशव्यांची बखर,' 'खरड्याचे लढाईची बखर,' व 'मल्हारराव होळकर यांनीं पानपतच्या लढाईविषयीं बाळाजी बाजीराव यांस सरकारी नात्यानें पाठविलेली उत्तम थैली,' इत्यादि ग्रंथ पाहिले असतील, त्यास आमचें म्हणणें केवळ सयुक्तिक आहे असें वाटेल; आणि वर सांगितलेल्या लेखांत स्वराज्यप्रीति व धर्म यांचे अभिमानानें जो एक प्रकारचा रंग उठला आहे, तोही साहेबांचे ग्रंथांत नाहीं असेंही वाटेल. डफ् साहेबाचे ग्रंथांत समर्पक सर्व विषयांचें विवेचन नाहीं. त्या ग्रंथांत हिंदु लोकांच्या धर्माविषयीं व हिंदूंच्या वेदांतसंबंधाविषयीं कांहींच लिहिलें नाहीं. हिंदुस्थानांतील कोणच्याही भागांतील हिंदु लोकांच्या इतिहासांत या विषयांवर दोन शब्द असणें इष्ट आहे.

...प्राचीनकालीं [या] दक्षिण देशांत व विशेषतः आपल्या महाराष्ट्र देशांत आर्य लोकांच्या वसाहती केव्हां व कशा झाल्या, कोणकोणते राजवंश कसकसे व केव्हां यांत प्रबळ झाले, त्यांचे वंशांत आतां कोण उरले आहेत, इत्यादि प्राचीन इतिहासाची माहिती संगतवार जशी असावी तशी नाहीं; इतकेंच नाहीं तर सांप्रत प्रसिद्ध असलेले भोसले, पवार, महाडीक, शिरके इत्यादि पंचकुळींचे, छत्तीस कुळींचे व शाण्णव कुळींचे समस्त मराठे हे कोण व कोठील, यांत कोणकोणचीं कुळें पूर्वेकडून राजवंशांतून निघून येऊन या देशीं वस्ती करतीं झालीं, इत्यादि उपलब्ध इतिहास यांत चांगला दिलेला नाहीं. आपले ग्रंथकार साहेब सातारचे छत्रपतीचे दरबारीं एजंट होते व सातारच्या कित्येक जात्याभिमानी राजांनीं या गोष्टीची पुष्कळच शाखवेशाख केलेली होती; या गोष्टी लक्षांत आणिल्या म्हणजे या बाबतींत साहेबांनीं जें मौन्य धारण केलें आहे, तें कांहीं अंशीं आश्चर्यकारक दिसतें. साहेब ब्राह्मण असते तर इतकें आश्चर्य वाटावयाचें कारण नव्हतें. कारण इतर जाती पुरुषाच्या बाहु व पादापासून निघाल्या व स्वजात मुखापासून निघाली, या पलीकडे कुळांच्या मुळाच्या शोधांत ते फारसे पडत नसतात. हिंदुस्थानांतील राजपुत व मऱ्हाठे यांची वृत्ति अशी उदासीन या कामीं नाहीं. सूर्यचंद्रापासून तो थेट प्रस्तुत अल्पवयी फलाणे सिंग अथवा राव यापावेतों ओढलेल्या लांब लांब वंशावळी मिरविणारीं व

अशा वंशावळी रचणारे व गाणारे जे भाट त्यास पूज्य मानणारीं कुळें या क्षत्रीय कर्मोपलंबी लोकांत बहुत आहेत व त्यांचें म्हणणें ऐकून घेऊन तें जमेस लावून त्याचा गोषवारा आपल्या वाचकांपुढें ठेवणें हें सर्व हिंदुजातीस सारखेच लेखणाऱ्या साहेबांस अमात्सर्यें करितां आलें असतें. ज्याप्रमाणें कर्नेल विलफोर्ड साहेब व टॉड साहेब यांनीं राजस्थानचे योध्यांच्या व राज्यांच्या संबंधें केलें आहे, तसेंच ग्रांट साहेबांनीं केलें असतें तर कांहीं वावगें होतें असें आम्हांस वाटत नाहीं.

'आर्म' साहेबांनीं "इंग्रेजांच्या लष्करासंबंधीं हिंदुस्थानाचा इतिहास" या नांवाचें जें एक अतिशयच मोठें पुस्तक केलें आहे व ज्या ग्रंथाचें नांव डफ् साहेबांचे ग्रंथांत वारंवार निघतें, त्या ग्रंथाचे नांवाप्रमाणेंच प्रस्तुत ग्रंथास "मराठ्यांचे मोहिमांचा इतिहास" असें म्हटल्यास देखील चालेल. त्यांत भेद इतकाच कीं, आमच्या इतिहासकारास या देशाचा अभिमान स्वराज्याप्रमाणें नसल्यामुळें त्यानें व्यक्तिसंबंधाच्या शौर्याच्या व युक्तिप्रयुक्तीच्या व धूर्ततेच्या चटकदार गोष्टी बहुतेक वगळल्या आहेत. अशा गोष्टींचा भरणा "पेशव्यांचे" बखरींत मौजेचा आहे. इंग्रज लोक त्यांच्या देशांतील लोकांस, हिंदुस्थानांतील लोकांचीं नांवें पुस्तकांत बहुत आल्यास, वाचण्याचा कंटाळा येतो म्हणून असल्या कथा मुद्दाम गाळतात. परंतु असें केल्यानें महापुरुषांचें चरित्रांचें एक साधन नष्ट केल्यासारिखें होतें व तसें होणें नाहीं; कारण हीं चरित्रें म्हणजे इतिहासाचें केवळ हृद्‌गत होय.

वर सांगितल्याप्रमाणें या ग्रंथांतील कांहीं व्यंगें आम्हीं दाखिवलीं म्हणून त्या ग्रंथाविषयीं पूज्य बुद्धि कोणापेक्षांही आमची कमी आहे असें कोणीं काडीमात्रही समजूं नये. त्या ग्रंथकर्त्यास ज्या ज्या अडचणी आल्या त्याही सर्व आमच्या लक्षांत आहेत. या विषयावर ग्रंथ लिहिण्यास प्रथम त्यांनींच प्रयत्न केला; व कोणत्याही प्रथम प्रयत्नाशीं ताडून पाहिलें असतां हा त्यांचा ग्रंथ चांगलाच झाला, असेंही कदाचित् म्हणणें भाग पडेल. त्यांनीं ग्रंथ करून आज बरींच वर्षें झालीं असून या विषयावर दुसरे कोणीही ग्रंथ करण्यास धजलें नाहीं, ही गोष्टही साहेबाचे विद्येची व मेहनतीची साक्ष आहे. या ग्रंथापासून या साहेबास एक पैशाचासुद्धा लाभ न होतां अजारी असतां सतत फार मेहनत करावी लागली. इत्यादि गोष्टींकरितां व त्यांना ग्रंथाचें नांव बदला म्हणजे तुम्हांस दोन पैशांची प्राप्ति होईल असें त्यांचे मित्र सुचवीत असतां त्यांनीं तसें केलें नाहीं, म्हणोन त्यांचे या देशावर अनंत उपकार आहेत. या सर्व गोष्टीकरितां मीं तर त्यांचे आभार इतके मानितों कीं, विषयांतर व विस्तार होत

असतां त्यांनीं एका कामगारास जें एक पत्र पाठविलें तें मी तेथें उतरून घेतों. तें पत्र ऐकिल्यावर साहेबांचे वर्तीनें मला जास्त बोलणें नको. तें पत्र :— " या ग्रंथांची तुम्ही इतकी काळजी बाळगितां म्हणून व कदाचित् तुम्हीही हिंदुस्थानासंबंधीं कांहीं ग्रंथ कराल म्हणून या ग्रंथाची मूळ उत्पत्ति व प्रसरण कसें झालें हें सांगावेंसें मला वाटतें. जर मिस्टर एलफिन्स्टन् साहेबाची बदली दक्षिणेंतून मुंबईस त्वरेनें झाली, तशी झाली नसती तर, हा ग्रंथ करण्याचें काम त्यांणींच पतकरिलें असतें व ते या कामास योग्यही खरे.

" मराठ्यांचें जें अतिविलक्षण राज्य व ज्याची हकीकत केवळ लोकांस वरवर माहीत आहे, त्यासंबंधीं लेख मिळविण्याची ही जी एकच संधी आली ती जाऊन सर्व लेख हातचे जातील, असें सर टामस् मनरो व एलफिन्स्टन् साहेब यांनीं सुचविलें त्यावरून मी लेख जमा करूं लागलों; जसजसें मी लेख मिळवीत गेलों तसतसे ते अपुरते असतांही पुढें आतां आपणांस कोणत्या लेखांची अपेक्षा आहे हें समजण्याकरितां, त्यांस क्रमवार मला लावावे लागले आणि मग थोडक्यांत मला महाराष्ट्र देशाच्या हद्दींत व तसेंच सर्व हिंदुस्थानभर हस्तक ठेवणें भाग पडलें. या पुस्तकाचा बहुतेक भाग मी माझीं इतर कामें सतत बारा किंवा चौदा तास (हीं कामें कशीं असतात हें आपणांस माहीतच आहे) करीत असतां लिहिला; पुष्कळ पुडकीं वाचलीं असतांही, ज्यांत विश्वास ठेवण्यासारखी एकही गोष्ट सांपडूं नये, अशा पुष्कळ पुडक्यांतून जे लेख काढिले होते त्यांचें भांषातर करण्याचे कामीं मला जे मजबरोबर गृहस्थ होते व ज्यांस मजसारिखेंच जबर काम करावें लागे, त्यांनीं मदत केली. त्यांत ' डब्ल्यू. आर. मॉरिस् ' यांनीं मुख्यत्वें पुष्कळ मदत केली.

" या पुस्तकांत जे पुष्कळ ठिकाणीं फार दुर्लक्ष्य करून लिहिलेलें दिसतें, त्याचें कारण असें आहे कीं, त्या वेळेस मला विलक्षण डोकें दुखण्याची व्यथा होती. या व्यवस्थेपासून पुढें मला फारच त्रास झाला. प्रत्येक पांच दिवसांनीं पाळी येऊन ती ६ पासून सोळा तासपर्यंत राही व मला काम करणें तें कपाळास थंड पाण्याची पट्टी बांधून करावें लागे. जसजसें कपाळ दुखणें बंद होई तसतसें माझे हातून पुष्कळ व उत्कृष्ट काम होई. म्हणून असे प्रसंगीं मी केव्हां केव्हां दुसरे दिवशी रात्रीं पावेतों झोंप न घेतां लिहीत असे. तेव्हां अर्थातच मला अजारी पडून घरीं (विलायतेस) पळावें लागलें. जें मीं काम हातीं घेतलें होतें तें शेवटास नेण्यास मला शक्ति व उत्साह येण्यास बरेच दिवस लागले. सरतेशेवटीं ग्रंथ संपवून तो हस्तलिखित मी मरे साहेब यांजकडे पाठविला. त्यांनीं तो परीक्षेकरितां ज्याकडे पाठविला त्याणें तो वाचून मान्य केला. पुढें मी

" अलबर मारली स्ट्रीट " त्या नांवाचे आळींत राहणारा जसा कांहीं सरदारच असा जो पूर्वोक्त मरेसाहेब त्यांचे भेटीस गेलों. त्यानें मला सांगितलें कीं, जर तुम्ही ग्रंथाचें नांव बदलाल तर आम्ही छापूं. मी म्हटलें कीं, हा ग्रंथ मराठ्यांची बखर आहे आणि 'मराठ्यांची बखर' हेंच नांव यांस योग्य आहे. तो म्हणाला तें खरें; परंतु मराठ्यांची यत्किंचित् माहिती तरी कोणास आहे? त्यास मीं उत्तर दिलें 'हें पुस्तक करण्याचें कारण काय तें तेंच. मराठ्यांची माहिती लोकांस फारच थोडी आहे!' मरेनें उत्तर केलें 'ठीक; परंतु माहिती असावी अशी तरी कोणास इच्छा आहे?' तुम्ही या ग्रंथाचें नांव 'मोगल लोकांचा पाडाव' किंवा 'इंग्रज लोकांचा उत्कर्ष' असें ठेवल्यास तें ठीक होईल. परंतु 'मराठ्यांची बखर!' छे, हें पुस्तक कोणी विकत घेणार नाहीं. हें जें तो म्हणाला, तें जरी सत्य आहे असें मला पक्कें वाटत होतें तरी त्याच्या बोलण्यानें माझी हिम्मत खचली नाहीं. * * * पुढें मीं ती माझे पुस्तकांची नक्कल " सर जेम्स माकिन्टाश " यांचे पुढें ठेवली. ते ती सर्व वाचण्याचे आधींच मोठ्या ममतेनें पायीं (कारण त्यावेळीं जनरल नव्हते) " क्याडोगान " हून " पाटर नास्टर " येथें गेले. त्यांच्या शिफारशीवरून " लांगमान आणि कम्पनी " या मंडेळीनें आम्ही पुस्तक छापितों म्हणून मला लागलीच पत्र लिहिलें. मयत 'रीस' साहेब या मंडळीचे भागीदार यांच्याशीं मीं बहुधा पत्रव्यवहार ठेविला होता. जितके त्या वेळीं लंडन शहरामध्यें पुस्तकें छापण्याचें पत्करीत असत, त्यांत आपले कामांत यांचे सारिखा वाकबगार दुसरा कोणी नव्हता. किती पुस्तकें खपतील याचा अजमास करितांना हिंदुस्थानचे नांवावर यानें फार थोड्या प्रति घातल्या म्हणून मला आश्चर्य वाटलें. त्याचें त्यानें कारण असें सांगितलें कीं, हिंदुस्थानांत लोक ग्रंथ विकत घेत नाहींत. ते वाचतात; परंतु ते पुस्तकें लोकांजवळून मागून घेतात आणि परदेशी जातांना हें पुस्तक बरोबर घेण्यास योग्य आहे अशी खातरी होण्यास बरेच दिवस लागतील. मरे जें बोलला तें खरें, कांहीं तरी पूर्वीं थोडी माहिती असल्याशिवाय जास्ती माहिती करून घेण्याची इच्छा कोणास होत नाहीं. नफ्या तोट्याचे मालक छापणारे झाले. तो ग्रंथ पूर्ण होऊन छापण्यास व तयार होण्यास मला २० हजार रुपयांवर खर्च लागला. कोर्ट ऑफ् डायरेक्टर या सभासदांनीं त्याच्या ४० प्रति घेतल्या. मराठी शब्दसंग्रहाच्या देखील त्यांनीं इतक्याच प्रति घेतल्या असत्या. एकंदरींत म्हटलें तर हें उदारपणाचें कृत्य झालें; परंतु मीं जरी हे खरोखर सरकारास उपयोगी लेख मिळविले, व एक केवळ स्वकपोलकल्पित आणि मोठा उपयोगी असा नकाशा रचून दिला, तरी मी हा त्यांस पाठिवला त्याचें त्यांनीं मला पावल्याचें उत्तर सुद्धां दिलें नाहीं. त्यांनीं कधींही मला पुसलें नाहीं; व मींही

सांगितलें नाहीं; कीं हा जो मीं खटाटोप केला त्यांत मी, १७,००० रुपयांपेक्षां जास्ती रुपयांस बुडालों. * "

या पत्रावरून कांहीं विचार मनांत येतात; ते लिहिल्यावांचून राहवत नाहीं. ग्रांट साहेबांनीं इतका श्रम करून व इतका पैसा खर्च करून जे लेख मिळविले तें आतां कोठें आहेत ! या पत्रावरून आम्हांस त्या लेखांविषयीं कांहीं हकीकत कळत नाहीं. ते कां चोरीस गेले किंवा 'न्यूटनचे' कित्येक कागदां-प्रमाणें कुत्र्यानें जाळलें किंवा जाणूनबुजून 'आलेग्झांड्रिया' येथील पुस्तकांचीं खऱ्या "धार्मिक" लोकांनीं जी दशा केली असें मानिलें आहे तशीं कांहीं झाली, याचें अनुमान होत नाहीं. कित्येक वृद्ध दप्तरांतील वाकबगार कारकुनांचें असें म्हणणें आहे कीं, या कागदांची जाणूनबुजून होळी केली. या म्हणण्यास दस्तऐवजी कांहीं कोणापाशीं लेख नाहीं. परंतु आमचे एक हुशार मित्र ** असें म्हणतात कीं, यासंबंधीं ग्रांट साहेबांचें व "दक्षिणेचे कमिशनर" साहेबांचें कांहीं लेख त्यांनीं पाहिलें आहेत. त्यावरून या कागदांचा जाणूनबुजून नाश केला असें मानण्यास हरकत नाहीं. अशा दोन विद्वान् पुरुषांनीं असें अनुचित कर्म केलें असेल अशी कल्पना करणें मनास आवडत नाहीं. परंतु ज्या अर्थीं सर्व हिंदुस्थानभर ठेवणाईत ठेवून इतिहासाचीं साधनें मिळविलीं, त्यांतून जर आतां म्हणण्यासारखें कांहीं एके ठिकाणीं मिळत नाहीं तर तीं कोठें गेलीं ? ह्या शंकेचें समाधान होत नाहीं, म्हणून ही जी दंतकथा आहे ती सांगणें आम्हांस भाग पडलें. ही येथें सांगितली त्यावरूनच आम्ही ग्रांटसाहेबाची जी स्तुति केली तिचें आमचें आम्हींच खंडन केलें असें कोणी समजूं नये; परंतु श्रोत्यांनीं असें समजावें कीं, एखाद्या गोष्टीचा पक्का निर्णय होत नाहीं व अपराध कोणाचे पदरीं बांधतां येत नाहीं, अशा प्रसंगीं मोठ्या विचारानें वागावें लागतें व सांप्रत प्रसंगीं आरोपित साहेब कैलासवासी झाले आहेत. म्हणून त्यांचें दोष-विमोचन त्यांचे हातून होणें अशक्य, ह्याकरितां त्यांस उगेच दोषी असें आम्हीं म्हटलें नाहीं. मराठ्यांची नवीन स्वबुद्धीनें बखर करणारांस काय काय साधनें मिळतील, या गोष्टीचे निरूपणांत विशेष साधनें मिळणें अशक्यसें दिसतें हें सांगण्यास त्यांस प्रतिकूल अशी जी ही दंतकथा ती सांगणें इष्ट दिसलें. यांत साहेबास दोषी ठरवावें व त्यांची विटंबना करावी असा आमचा बिलकुल हेतु

* हें पत्र आम्हीं "बॉंबे सॅटरडे रिव्ह्यू"तून घेतलें.

** रा० रा० कै० दाजीसाहेब सरंजामे, हे इनाम कमेटींत कांहीं दिवस नोकर होते.

नाहीं. यांत जर कांहीं पेशव्यांचे दफ्तरांतील लेखांचा खरोखरच नाश झाला असेल तर त्या लेखांच्या नकला आतां कोठें मिळतील अशी आशा करणें नको. ज्या देशांत पुस्तकें छापण्याची कला नसत्ये, तेथें ग्रंथांची न्यूनता व वाचकांची न्यूनता किती असत्ये, ती या निबंधाचे श्रोत्यांस सांगावी असें नाहीं. त्यांस अशा मूळ लेखांची तर आमचे मुलखांत फारच न्यूनता. कोणी राजाश्रित किंवा दरबारचे अखबारनिस हे नादानें कांहीं हकीकती, प्रकणें व बखरा लिहून ठेवीत असत. परंतु ग्रांट साहेबास कित्येक असे लेख मिळाले असतील कीं, त्यांची प्रत त्यांस मिळाली तेवढीच कदाचित् असेल. व ती आतां सर्व हिंदुस्थानांत कोठेंही मिळणार नाहीं. ज्या अर्थी आम्हीं लेखांच्या लयाची मानलेली गोष्ट सांगितली त्याअर्थी त्यांचें मूळ कारण काय, किंवा लोक याचें कारण काय सांगतात, तेंही सांगतों. आमच्या देशबांधवांनीं कित्येक लहान लहान कामांत व कित्येक मोठमोठ्या लढायांत अशीं शूरत्वाचीं कृत्यें केलीं कीं, तीं ‘ कल्लद ’ व त्याचे अनुयायी यांसही शोभावीं. त्यांचे आठवणीनें लोकांत उगीच आपल्या पूर्वसत्तेविषयीं गर्व, व त्या गर्वाचें सहचारी जे परराज्यसत्ताशत्रुत्व तें राहूं नये म्हणून हे लेख जाळिले असें महाराष्ट्र देशांतील पुष्कळ गृहस्थांचें मत आहे. त्यांत खरोखर ‘ मेलेल्या म्हशीस हंडाभर दूध ’ असेंही कांहीं झालें असेल, त्यांत संशय नाहीं. हें काय असेल तें असो; परंतु अजूनही क्षुल्लक कारणांकरितां सरकारी लेख जाळण्याची जी सुरवात आहे, तिच्या पासून ही वरील प्रकारची दंतकथा निघू शकते. शिवाय असलें कृत्य हें एकुणिसावे शतकास व इंग्रजासारखे विद्वान लोकांस युक्त नव्हे. जे हे लेख नष्ट करितात ते म्हणतात की, ज्या लेखांत कांहीं हंशील नाहीं, जे पोरकट, व निरुपयोगी, ते मात्र आम्ही नष्ट करितों. परंतु जे लेख या अधिकाऱ्यांशिवाय दुसऱ्या कोणाचे दृष्टीस पडत नाहींत, ते त्यांच्या सांगितल्याप्रमाणेंच असतील असें कशावरून म्हणावें ? व जरी कित्येक लेखांत बादशहाच्या गोष्टी, चाळीस हजार पायदळ, साठ हजार स्वार व हजार तोफा इत्यादि प्रकरणांविषयीं कांहीं जरी नसलें, तरी ते लेख नष्ट करण्यास योग्य, असें आम्ही क्षणभर सुद्धां प्रतिपादन करूं देणार नाहीं. येथें या विषयाचें प्रतिपादन करणें म्हणजे साधारण गोष्टींचें प्रतिपादन केल्यासारिखें होतें. म्हणून आम्ही जास्ती लिहीत नाहीं. कित्येक बखरी क्वचित् कोणाकोणाजवळ सांपडतात. “ शिवाजी महाराजाची बखर. ” इत्यादि ज्या हस्तलिखित बखरींचीं नांवें वर सांगितलीं त्या बखरी कित्येकांनीं पाहिल्या असतील. व अल्प पैशानें हातीं लागण्यासारिख्याही आहेत. केवळ मराठ्यांनीं जे ग्रंथ केले त्यांत या ग्रंथांची गणना करणें योग्य आहे, म्हणून त्यांचे गुणावगुणांविषयीं दोन शब्द बोललों असतां अप्रयोजक होतील असें वाटत नाहीं.

उत्तम इतिहास कसा असावा किंवा उत्तम इतिहास कोणता याविषयीं मतभेद आहे. यांतील एका मताचें असें म्हणणें आहे कीं, इतिहासकारानें आपला अभिप्राय म्हणून देऊंच नये, जें काय झालें तें इत्थंभूत सांगितलें म्हणजे झालें. हें मत ज्यांस मान्य असेल अशा वाचकांस आमच्या मराठी बखरी वाचून पूर्ण आनंद होईल. त्यांची बारीक बारीक हकीकत सांगण्याची शर्थ आहे. डेरा कोठें दिला, बसावयास कोणी घातलें, पानसुपारी कोणी वांटली, त्यांचीं नांवेंही पण दिलेलीं असतात. परंतु गोष्टींचे प्रथमतः ग्रंथकर्त्यांनें मनन करून व घाटन करून कांहीं विशेष कल्पकपणा दाखविला आहे अशीं उदाहरणें थोडीं सांपडतील. या ग्रंथांची भाषा शुकबहात्तरी, वेताळपंचविशी, विक्रमबात्तिशी, इत्यादि ग्रंथांप्रमाणेंच आहे. वाक्यें अतिशय लहान असतात. व " कीं " च्या ठिकाणीं बहुधा " जे " लिहिलेलें असतें. हा पाठ अझूनही पत्रव्यवहारांत आहे. (आपली " विज्ञापना ऐसीजे " सर्वांस माहीत आहेच). या लहान वाक्यांच्या योगानें कोठें कोठें अवचित् भाषा उद्दाम होत्ये.

या शिवाय आणखी किती एक न्यूनता या लेखांत आहेत. हे ग्रंथ बहुशः कारकुनी बाणा बाळगणाऱ्या म्हणजे साधारण कारकुनांस जितकें ज्ञान असावें तितकें ज्ञान असणाऱ्या लोकांनीं लिहिले आहेत; म्हणून त्यांची भाषा व्याकरणरहित व फारशी शब्दमिश्रित असते; व भलतेंच ठिकाणीं जमाखर्ची डौल मिरविलेला त्यांत आढळतो. आमक्यास पांच मुलें होतीं असें सांगणें असल्यास ' बितपशील " म्हणून खालीं मुलांचीं नांवें जमाखर्चासारख्या सदरांत घालून एक ओळ ज्यास्त लिहून प्रसंगीं तेथें "लंग" असा शब्द लिहिलेला असतो. याचप्रमाणें सैन्यांच्या यादी, मालांच्या झडत्या, कोटदुर्ग यांचीं नांवें, बहुधा जमाखर्ची तोरावर दिलेलीं असतात. " हरिभक्तिपरायण " हेमाडपंत यांनीं जो शिक्षाक्रम आपल्या नीतींत सांगितला आहे, त्या क्रमास अनुसरून शिरलेल्या लोकांनीं या बखरी लिहिलेल्या आहेत. तेव्हां त्यांस एक रीत्या " हेमाडपंती " हें नांव दिल्यास अयोग्य होणार नाहीं. वाक्यें यांत बहुधा लहानलहान असतात, असें वर म्हटलें आहे; परंतु कित्येक ठिकाणीं वाक्यें इतकीं लांब व असंबद्ध असतात, कीं त्यांस कोणतेही प्रकारचें व्याकरणाचें आळें घालूं म्हटल्यास तसें होऊं शकत नाहीं. एकदां लिहिणाराची लेखणी घसरली कीं तीस सावरण्याचा उपायच नसतो. बखरांतील वाक्यें जीं बहुधा लांब असतात, तीं बहुशः व्याकरणरहित असतात. तशीं जर नसतीं तर आम्हीं त्यांस दूषण मुळींच दिलें नसतें. या शिवाय वाक्यांमध्यें कार्यकारण भाव नसतो, किंवा विपरीत असतो असें म्हटलें पाहिजे. उदाहरणार्थ " संभाजी महाराज दिलेल खानाकडून आलियावरी शिवाजी महाराज यांणीं बोध करून पनाळीयावरी रहावें असा निश्चयकरून तेथें ठेविले. यास

कारभारी विठ्ठल त्रिंबक महाडकर देशपांडे बाजी मुरार यांचे नातू हे खासनिशी करून देऊन पनाळी यावरी महाराजांचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करून राहिले ", या वाक्यांत "देऊन" याचा संबंध महाराजांकडेस आणि "राहिले" याचा संबंध देशपांडे याच्याकडे आहे. याप्रमाणें ऊन प्रत्ययांत अव्यय असल्यास कार्यकारणाचा संबंध लिहिणारांचें मनांत वागत नाहीं. बहुधा जे जुने मराठी लेख आम्हीं पाहिले आहेत त्यांत ही चूक आढळतेच. फारसी उर्दु भाषेंत असे असंबद्ध प्रयोग वारंवार नजरेस येतात; तेव्हां ही सड आमचे कारकुन मंडळीनें मुसलमान ग्रंथकारांपासून घेतली असावी. तसेंच स्वकीय लोकांस ' गलीम ' किंवा ' गनीम ' म्हणजे लुटारू असें जें बखरींत म्हटलेलें असतें तेंही फारसी ग्रंथकारांच्या पद्धतीस अनुसरून असतें. कदाचित् मुसलमानी तवारीख, म्हणजे इतिहास, यांच्या आधारानेंही आमच्या बखरी क्वचित् लिहिलेल्या असतात, असाही संशय यावरून उत्पन्न होतो. मराठी कवितेमध्यें ज्याप्रमाणें स्त्रीलिंगी तृतीय पुरुषी सर्व नामाचे ठिकाणीं तृतीय पुरुषी नपुंसकलिंगीं सर्वनाम योजिलें असतें. त्याप्रमाणें या लेखांतही पुष्कळ ठिकाणीं असते. बहुत ठिकाणीं तृतीयांत कर्ता ईकारान्त आढळतो.

हिंदु लोकांत ज्यास इतिहास म्हणावे असे ग्रंथ नाहींत, असें म्हटल्यासही चालेल. कल्हणकृत " राज तरंगिणी " नामक काश्मीर देशाचा वृत्तांत मात्र इतिहासाच्या तऱ्हेवर कवितेंत लिहिला आहे. आमचे ऐकण्यांत "कालिंदी महात्म्य," म्हणून दिल्लीकडील राजांचा इतिहास संस्कृत भाषाबद्ध आहे; परंतु तो उपलब्ध नाहीं. तथापि या प्रकारच्या ग्रंथांस इतिहास ही संज्ञा देतां येत नाहीं; कारण यांचे कर्ते कवि होते व त्यांचें लक्ष इतिहास लिहिण्यापेक्षां आपलें कवित्व प्रकट करण्याकडेस जास्त होतें. पुराणें हीं आमच्यांत एक प्रकारें इतिहास मानिलीं आहेत. यापुढें मुसलमानांनीं लिहिलेल्या तवारिख, म्हणजे इतिहास, यांचा आमचे लोकांस परिचय झाला. या दोन्ही प्रकारच्या इतिहासांचे व कारकुनी बाण्याचे मासले मराठी बखरांत सांपडतात. ज्याप्रमाणें पुराणांचे आरंभीं विवक्षित कथा कोणी एक ऋषि नैमिष अरण्यांत अथवा अशाच एकादें पवित्र स्थळीं मिळालेल्या ऋषींस अथवा कोणे एकादे राजास सांगत आहे असें वर्णन केलें असतें, तसेंच कित्येक बखरांत लिहिलेलें असतें व ज्या प्रमाणें पुराणांत क्वचित् स्थळीं पुराणांची कथा सांगणारे मुनि मध्येंच स्वल्प आपल्या तर्फेचीं वाक्यें घालतात व तेणेंकरून कोण कोणास ही कथा सांगत आहे त्याची वाचकांस स्मृति होत्ये, तोच प्रकार आमचे बखरांत क्वचित् आहे. कित्येक बखरा सातारकर भोसल्यांच्या वंशांतील कित्येक राजांच्या हुकमावरून त्यांच्या पदरच्या लोकांनीं पूर्वींचे कागदा पत्रावरून लिहिल्या आहेत. अशा बखरा विश्वसनीय जास्त आहेत हें सांगणेंच नको. कित्येक बखरांत महाराष्ट्र लोकांविषयीं मुसलमान ग्रंथ-

कारांनीं लिहिलेलाच मजकूर जमेस धरून पाल्हाळ केलेला असतो. अशा प्रकारच्या बखरा बहुधा फारसी लेखांवरून उतरल्या असाव्या असा संशय येतो व त्या विश्वासार्ह नाहींत. कित्येक बखरांत त्या कोणी व कशा केल्या याविषयीं आरंभीं कांहीं वृत्तांत लिहिला नसून साधारण "राजमान्य राजश्री" हा प्रसिद्ध पत्राचा मायना आरंभीं लिहिला असून फलाण्यानें फलाण्याच्या लिहिण्यावरून फलाण्यास बखर पाठवून दिली आहे, इतकेंच लिहिलेलें असतें. आमचे गांवठी शाळांतील मुलें अक्षर घटावें म्हणून बखरांच्या नकला करितात. व कारकुनांचें काम मिळावें या पेक्षां दुसरा त्यांचा उद्देश नसतो. त्यांस साधारण पत्रें लिहितां यावीं म्हणूनच असे मायने दिलेले असतात. या ग्रंथांविषयीं शेवटीं इतकेंच सांगतों कीं, ते कोणी साद्यंत मिळवून व जागोजागीं पूर्णविराम करून छापिल्यास त्यांचा पुष्कळ उपयोग होईल.

या शिवाय कांहीं विशेष माहिती संस्थानी लोकांचे येथें मिळेल अशी आशा आहे व आलीकडे इंग्रेजींत जातींविषयीं जी माहिती व नवे तर्क निघाले आहेत; त्यांच्या साहाय्यानें व पुढें ज्या न्यूनता ग्रांट साहेबांचे ग्रंथांत आम्हीं दाखविल्या आहेत, त्यांचे पूर्णतेनें नवीन ग्रंथास बरीच मदत मिळेल, अशी उमेद धरणें योग्य आहे. ग्रांट साहेबांचे ग्रंथांत देखील कांहीं मागचें पुढें व पुढचें मागें, कित्येक गोष्टी अगदींच गाळून टाकणें व कित्येक गोष्टींचा विस्तार करणें, इत्यादि गोष्टी केल्यास बरीच सुधारणा होण्यासारखी आहे.

हा विषय लोकांस कां आवडूं नये, व पुष्कळांनीं इकडे लक्ष्य कां पुरवूं नये ? हें आम्हांस कळत नाहीं. हा विषय मनोरंजक नाहीं, किंवा महत्त्वाचा नाहीं, असें आम्हांस वाटत नाहीं, किंवा या विषयांत उलाढाली थोड्या आहेत, असेंही नाहीं. जो ग्रंथकार मराठयांचे बखरींचें विवेचन करील, त्यास राज्यांच्या घडामोडी तर काय, परंतु बादशाही साम्राज्यांच्या घडामोडीचें विवेचन करावें लागतें. प्रथमतः वाचकांस बादशाही दरबारांत नेऊन तेथील चमत्कार दाखवावा लागतो. तेथील दरबाराचा थाटमाट व राज्यांतील अंदाधुंदी हीं एकदांच दाखवावी लागतात. राजा बलहीन, दरबारांत वैमनस्यें, बादशाही जनानखाना, आणि नायकिणीचा वाडा व या सर्वांचे लफंडाव, तोंडानें बादशाहाचे आम्ही दासानुदास म्हणत असतां यजमानाचा अधिकार चालविणारे चाकर लोक, इत्यादि सर्व गोष्टी, वाचकांस दाखवाव्या लागतात; व मध्यें या सर्व गोष्टींचा पूर्ण विचार करून सुचलेले गहन विचार सांगावे लागतात. मग त्या वाचणारांस असल्या ऐषआरामांतून व थाटमाटांतून काढून, त्यांस एक लंगोटी घालून, व डोईस मुंडासें व कामळें अशा थाटानें शिवाजीच्या संगतीबरोबर मावळे लोकांचा

जमाव देऊन रानावनांतून, गिरिपर्वतांवरून आज गुजराथेंत, उद्यां कर्नाटकांत, असें हिंडवावें लागतें. पुढें ज्यांस लंगोटी, मुंडासें व कामळें यांशिवाय दुसरें प्रावर्ण माहीत नाहीं, अशांसच मोठमोठाले सरदार करून, त्यांच्या दरबारांतील चमत्कारिक बेत व अलौकिक शिपाईगिरी दाखवावी लागते. यानंतर पायांत पाटलोन व डोक्यास टोंपी असे "ताम्रमुखी" व्यापाराकरितां देशांत आणावे लागतात. त्यांची देशी राज्यांत हळूंहळूं प्रवेश करण्याची रीति व केवळ परोपकाराकरितां असें दाखवीत असतां, आपला स्वार्थ साधण्याची शैली, आज याचा पक्ष, उद्यां त्याचा पक्ष घेणें, मोठ्या राज्यांतील सरदारांस स्वातंत्र्य देऊन आपले मित्र करणें इत्यादि सर्व खुब्या दाखवून, यांच्या अद्वितीय राज्यनिपुणतेनें या व्यापाऱ्यांस सार्वभौमत्व प्राप्त झालेलेंही दाखवावें लागतें. हें कृत्य झाल्यावर आतां रयतेस काय सुख झालें यांचाही विचार करावा लागतो. हें जें कथेचें सूत्र आम्हीं दाखविलें यावरून हा विषय मोठा समर्पक व मनोरंजक असा आहे हें सर्वांस स्पष्ट कळेल.

महाराष्ट्राचें नांव पुराणांमध्यें अगदींच निघत नाहीं असें नाहीं. या देशांत सीतेच्या स्नानानें परिपूत झालेले निर्झर वहात आहेत. व रामायणांत ज्या ऋषींचीं नांवें सांपडतात त्यांतील कित्येक परम विख्यात ऋषींचे आश्रमही याच देशांत होते. पुराणांत अशी दंतकथा आहे कीं, हा देश (ज्यास पूर्वीं दंडकारण्य असें म्हणत असत.) रावणाचें राज्याखालीं होता; व त्यानें आपल्या घडशास म्हणजे वाजंत्र्यांस तो बक्षीस दिला होता असेंही आहे. हें वर लिहिलें याचें प्रसंगानें हें म्हणण्यास मूळभूत जो रामायण ग्रंथ, याविषयीं सांप्रत विद्वानांचें जें मत आहे व त्या मतास दृढ करणारीं जीं कारणें आहेत, तीं सर्व येथें सांगण्याचें प्रयोजन नाहीं; परंतु इतकेंच सांगतों कीं, रामायणांतील मूळ कथा खचित घडली असावी, व राक्षस म्हणून ज्यांस म्हटलें आहे, तें कोणी तरी शरीरानें धिप्पाड अथवा कुरूप व क्रूर जातीचे लोक असावे, व रामानें वानरांची सेना केली, यांतील तात्पर्य रामानें रानटी लोकांची एक सेना केली असें असावें असें बहुतांचें मत आहे. याविषयीं जास्त माहितीची ज्यास अपेक्षा असेल त्यानें ती अन्य ग्रंथांतून वाचली पाहिजे. या गोष्टीचा शक कोणता होता हें माहीत नाहीं. याविषयीं शुष्क तर्क फार आहेत.

या देशांत पूर्वीं ब्राह्मण लोक अगदीं नव्हते. ब्राह्मण लोक यांचे पूर्वज जे आर्य लोक यांनीं प्रथम पंजाबांत वस्ती केली; पुढें ज्या "ठिकाणीं काळ्या पाठीचा हरीण सांपडेल" त्या ठिकाणीं ब्राह्मणास वस्ती करण्यास हरकत नाहीं अशी आज्ञा झाली. यापुढें महाराष्ट्र देश त्यांचे वसाहतीस योग्य झाला. या

गोष्टीच्या शकाचें कांहीं अनुमान करितां येत नाहीं. आर्य लोकांचे वसाहतीपूर्वी या देशांत सिथियन लोक असत असें अनुमान होतें; कारण आमचे भाषेंत सिथियन भाषेंतील शब्द बरेच येतात व आमच्या धर्मात सिथियन देवताही पुष्कळ आल्या आहेत. म्हसोबा, बहिरोबा, सटवाई, यल्लमा, शिव इत्यादि देवतांविषयीं वेदांत एक अक्षर सुद्धां नाहीं. शिवाशिवाय यांचीं नांवें पुराणांतसुद्धां निघत नाहींत. वेदांमध्यें रुद्र या देवतेचें एक दोन ठिकाणीं नांव येतें; परंतु रुद्र आणि शिव एक नव्हत असें वेद जाणणाऱ्या विद्वान युरोपियनांचें मत आहे. सिथियन लोक ह्या देशांत केव्हां आले याचा निर्णय करितां येत नाहीं. या देशांतील मूळचे राहणारे लोक महार असावेत असा एक न साजण्यासारिखा तर्क केला आहे. असो. यावरून या देशांतील वस्ती मिश्र आहे हें उघड दिसतें. मराठे म्हणजे महाराष्ट्रांतील कुणबी, हे तरी याविषयींही उल्लेख नाहीं. कित्येक ग्रंथकारांनीं यांस महाराष्ट्र देशांतील मूळ रहिवाशी असें मानिलें आहे. व त्यांनीं पौराणिक धर्म स्वीकारिला असेंही मानिलें आहे. खोंड, भिल्ल, व रामोशी यांचीही मूळ रहिवाशांत गणना केली आहे. या लोकांशीं व मराठे लोकांशीं तुलना केली असतां साम्याच्या कांहीं गोष्टी दिसून येतील. बहुधा साधारण ठेंगणी भुई, शरीराचा सुदृढ बांधा, चापल्य, शरीराचें मानानें बलाचें आधिक्य व राकटपणा इत्यादि गुणसाम्य म्हटल्यास चालेल. तसेंच कांहीं लग्नसंबंधीं विधिही सारखे आहेत. मुलीस तिच्या पक्षाच्या लोकांनीं पळवून नेणें, तीस तिचे नवऱ्यानें पुनः शोधून काढणें व झेंडा नाचवणें इत्यादि गोष्टी उभयपक्षीं साधारण आहेत; परंतु या सहवासानें मराठ्यांमध्यें आल्या नसतील असेंही म्हणवणार नाहीं. आर्य लोकांचे जे 'शूद्र' तेच हे मराठे असेंही मानिलें आहे. पुढें जसें मराठे विख्यात होऊं लागले तसें ते आपणांस क्षत्रिय म्हणवूं लागले व त्यांच्या कित्येक कुळ्याही जमतात; व कांहीं दिवस वेदोक्त कर्म करण्याचाही अधिकार त्यांनीं भोगिला. असो. यावरून यांच्या मूळ उत्पत्तीविषयीं फार घोटाळा आहे हें उघड दिसून येईल.

...या प्रकारचा निर्णय करण्यास साधनें फार थोडीं आहेत व याचा निर्णय अगल्या लहानशा ग्रंथांत होणें कठीण. परंतु याविषयीं डफ् साहेबांचे ग्रंथांत म्हणण्यासारखें कांहीं लिहिलें नाहीं हें सांगणें अवश्य आहे.

...ईश्वरी सूत्र कांहीं विलक्षण असतें. ज्या देशांत एक नव्हे परंतु पांच मुसलमानी राज्यें स्थापित झालीं होतीं, ज्यांत देशी राजांचें बहुधा निर्मूलन झालें होतें, त्याच देशांतून मुसलमानी राज्य बुडविणारा शककर्ता उत्पन्न व्हावा, ही गोष्ट ज्याच्या कृपेनें पंगु गिरींचेंही लंघन करूं शकतात त्याच्या अनुग्रहावांचून कशी झाली असेल? मारणारापेक्षां तारणारा मोठा असतो हें सर्व मारणारे

जुलम्यांनीं लक्षांत वागवून तारण्याकडेसच विशेष लक्ष द्यावें, म्हणजे ईश्वरकृपेनें दोघांचेंही हित होतें. मराठी बखराकारांचें याविषयीं असें म्हणणें आहे कीं, दक्षिणेंत सर्वत्र यवनी झाली. हिंदुस्थानांत उदेपूर, जोधपूर, जयपूर, इत्यादि हिंदूचीं स्थानें रक्षिलीं होतीं त्यामुळें हिंदु लोकांस त्यांचें धर्मास बसण्यास कांहीं छाया राहिली होती, ती दक्षिणेंत नसल्यामुळें सर्वत्र उन्हाळा झाल्याप्रमाणें होऊन या देशचे लोकांस जो ताप झाला तो असह्य झाला. तेणेंकरून ते केवळ वैतागल्यासारखे झाले. शिवाय या मुसलमानी राज्यांत जेव्हां आपआपसांत युद्धें निघत तेव्हां त्यांस देशी लोकांची मदत घेणें भाग पडे. म्हणून ती निरूपायास्तव ते घेत. याचा मोबदला ते त्यांस द्यावा तसा देत नसत. म्हणून दक्षिणेंतील लोकांचीं मनें, हिंदुस्थानांतील दिल्लीच्या पादशाहीकडे जशीं राजपुतांचीं रुजूं होतीं त्याप्रमाणें, कधीं यवनांस वश झालीं नव्हतीं. अकबराप्रमाणें कोणी दीर्घ दृष्टी पादशाह या मुलखांत झालाच नाहीं. या उणीवीचें फळ त्यांस भोगावें लागलें.

आतां शिवाजीनें ज्या लढाया मारल्या, व जीं मोठमोठालीं कामें केलीं, आणि मराठी बादशाहीचा पाया कसा घातला, याविषयीं थोडीबहुत माहिती आबालवृद्धांस आहेच; म्हणून ती येथें सांगण्याची जरूर नाहीं. ग्रांट साहेबांनीं शिवाजीविषयीं जें लिहिलें आहे, तें सविस्तर लिहिलें आहे. त्यांनी माहिती बरीच मिळविली असावी....

आमच्या मतें या प्रकरणांत ग्रांट डफ् साहेबांचे हातून एकच चुकी झाली आहे. ती ही कीं, त्यांनीं शिवाजीचें चरित्र लिहितांना मराठ्यांचे लेखांवर जितका भरोसा ठेवणें योग्य आहे, तितका ठेविला नाहीं. इतकेंच नाहीं पण आम्हांस वाटतें कीं, त्या लेखांवर जितकें लक्ष्य पुरविणें योग्य आहे तितकें लक्ष्यही त्यांनीं पुरविलेलें नाहीं. कारण शिवाजीविषयीं जितका प्रतिकूल भाग त्यांचे लेखांत आला आहे तितका बहुतेक मुसलमान किंवा त्यांचे अनुयाई यांचें लिहिण्यावरूनच घेतलेला आहे. मराठी बखराकारांचें म्हणणें जमेस धरलेच नाहीं. वास्तविक पहातां मराठी लिहिणारांस आपले राष्ट्राचा किंवा आपले राजांचा किंवा वीरपुरुषांचा कैवार घेऊन लिहिण्याची मुळींच संवय नाहीं. म्हणून खऱ्याचें खोटें किंवा खोट्याचें खरें केल्याचीं उदाहरणें त्यांचे लेखांत फारच विरळा सापडतात. या लेखांत जें शिवाजीचें चरित्र लिहिलें आहे त्यावरून शिवाजी हिंदुलोकांचे शास्त्रांत सांगिल्याप्रमाणें वागणारा एक निस्सीम अति श्रेष्ठ क्षत्रिय होता याविषयीं मुळींच संदेह रहात नाहीं. महाराष्ट्रांतील लोकही त्यास अद्यापि अवतारी पुरुष असें मोठ्या प्रीतीनें मानितात. तो तसाच उदार वृत्तीचा धर्मात्मा असल्याशिवाय साधारण लोकांत सर्वत्र त्यांची अशी प्रीतिपुरस्सर ख्याती कधींच झाली नसती.

...लोकांच्या विवाहित स्त्रिया हिरावून घेण्याकरितां मोहिमा करणाऱ्यांच्या इतिहासकारांनीं शिवाजीस अनीतिमान, दगलबाज व चोर इत्यादि पाहिजे तसे दोष दिल्यास ते त्यांस शोभणारच आहेत; परंतु इतरांनीं अशांची सड घेऊं नये. शिवाजीनें अफझुलखानाचा वध केला त्यासंबंधें त्यास दंगेखोर म्हणण्याचा पाठ आहे. परंतु या संबंधें खरी गोष्ट काय आहे, मराठी इतिहासकारांचें काय म्हणणें आहे, याचा विचार केला पाहिजे. तो ग्रांट साहेबांनींही केला नाहीं ही मोठीच शोचनीय गोष्ट आहे.

जें जें शिवाजीनें केलें तें तें दोषरहित असें आम्हीं म्हणत नाहीं. परंतु त्याचें अंगीं दोषांपेक्षां गुण सहस्रावधि अधिक होते असें आमचें मत आहे. तो सत्तालोभी तर होताच, परंतु त्यास हिंदुधर्माचा मोठा अभिमान होता, व गोब्राह्मण यांचें चांगलें करावें असा त्याचा पूर्ण निश्चय होता; म्हणून असें म्हणणें भाग आहे कीं, त्यानें जें जें केलें तें तें केवळ सत्तेच्या किंवा पैशाच्या लोभानेंच केलें असें नाहीं.

शिवाजीचें चरित्र हिंदुशिवाय इतरांस यथायोग्य कळेल असें नाहीं. महा-समर्थ स्वामी रामदास यांस भिक्षेंत सर्व राज्य अर्पण करणें, रिष्यशृंगीं गेल्यावर सर्व राज्यत्याग करून तप करण्यास सिद्ध होणें, अवरंगजेबाचे हतावर तुरी देऊन परत येतांना तीर्थाटन करणें, स्त्रीनें चुडेदान मागितल्यावर तिचा भर्ता आपला शत्रु असतां आपले जीवितास धोका बसेल याची भीती न बाळगितां त्यास सोडून देणें इत्यादि शतशः महाराजांचीं कृत्यें हिंदुधर्मशास्त्राची किल्ली हातीं न घेतल्यास पूर्ण अवगत होणार नाहींत.

आम्हीं शिवाजीच्या धर्मनिष्ठेविषयीं बोललों. त्यावरून दुसरा एक विचार सुचतो. तो हा कीं, या वेळीं आमचे देशांत प्रख्यात साधू फार झाले. त्यांच्या कवनांनीं, कीर्तनांनीं आणि उपदेशांनीं, तसेंच त्यांच्या पुराणांतील गोष्टीकथनांनीं मराठे यांच्या देशांतील लोक मोठे धर्माभिमानी झाले होते. ते एकंदरींत पहातां मुसलमानांचा द्वेष फार करीत. या पुरुषांपैकींच शिवाजी एक होता. या वेळीं रामदास, तुकाराम, निंबराज व या शिवाय पुष्कळ सज्जनगडसंबंधीं साधु झाले होते. त्यांच्यायोगें आपलें लोकांचें मनांत स्वराज्य स्थापण्याविषयीं मोठी ईर्षा उत्पन्न झाली आणि मुसलमानांवर कहर गुदरला. हे वर सांगितलेले साधु यांणीं आपल्या ग्रंथांत मुसलमानी राज्याचा द्वेष वाटण्यासारखें कांहींच लिहिलेलें नाहीं. त्या साधूंचे ऐहिक विषयांकडे इतकें दुर्लक्ष्य होतें कीं, त्यांच्या देशबांधवांच्या भगव्या झेंड्याचा चोहींकडे विजय होत असतां त्यापासून त्यांचे मनास

यत्किंचितही विकार झाला नाहीं. असें असतां आमचे देशाचे उत्कर्षास हे सहज कारण झालें. तें असें. या कवींनीं आपल्या पुराणकथारूप भांडारांतील शूरत्वाचीं कृत्यें आपल्या कवितेंत (केवळ परमार्थाकरितां म्हणून) गाइलीं व तेणेंकरून त्यांचें धर्मनिष्ठबंधु ईर्षेस पडले. पुढें जसा मराठ्यांचा उत्कर्ष फार होऊं लागला तसें त्यांचें अनुकरण करणारे त्यांस पुष्कळ मिळाले. पुष्कळ मुसलमान कबीरपंथी झाले व पुष्कळ मुसलमानांनीं हिंदुधर्म स्वीकारून अल्ला व विठोबा एकच असें समजून कृष्णाचे व विठोबाचे अभंग केलेले सांपडतात. या मुसलमान साधूंचे सांप्रदायी अद्यापिही कोठें कोठें आहेत.

रोमन लोकांचें जगभर पसरलेलें राज्य व्यांडल लोक व गॉथ लोक यांनीं जसें कांहीं दिवस लुटून ओसाड पाडिलें, त्याप्रमाणेंच मुसलमानांची प्रचंड बादशाही मराठ्यांनीं ओसाड केली होती. त्यांत फरक इतकाच कीं, व्यांडल लोक यांचा व रोमन लोक यांचा विशेष शत्रुभाव असण्याचा संबंध नव्हता. जसें हिंदूंस मुसलमानांनीं गांजिलें होतें तसा कांहीं प्रकार व्यांडल लोकांविषयीं नव्हता. जशी शेतावर टोळांची गर्दी कारणावांचून अकस्मात् येते व निघून जाते त्याप्रमाणें ते रोमन लोकांवर स्वाऱ्या करीत असत आणि मालकम साहेबांचे म्हणण्यांत असें आहे कीं, जसे हे युरोपांतील रानटी लोक सर्व प्रकारें लोकांस त्रास देत व त्यांच्या स्त्रियांची विटंबना करीत त्याप्रमाणें पूर्वीच्या मराठ्यांनीं कधींच केलें नाहीं. रोमन लोकांच्या प्रचंड बादशाहीशींच आणखी एक तुलना करितां येईल. आरब लोकांनीं जसें रोमन लोकांचें राज्य घेतलें, त्या प्रकारानेंच मराठ्यांनीं मोंगलांचें राज्य घेतलें. जशी रोमन लोकांची स्थिति बिघडली होती, तशीच मोगलांची बिघडली होती. कोणत्याही लष्करी व मुलकी अधिकाऱ्यास स्वार्थाशिवाय दुसरी कांहींच इच्छा नसे. स्वार्थ साधल्यास ते पाहिजे तें करण्यास राजी असत. इकडे आरब लोकांची तर उलट स्थिति होती. अशीच स्थिति मराठ्यांचीही झाली होती. त्यांचे आपल्या देशाचे व धर्माचेसाठीं त्यांस प्राण देणें म्हणजे कांहींच नाहीं असें वाटत असे. आरब लोकांचीं जशीं लष्करी कृत्यें त्वरित होत तशींच मराठ्यांचींही होत. आरब लोकांचे लष्करास खर्च लागे त्यापेक्षांही मराठ्यांचे लष्करास कमी लागत असे. मराठ्यांचे राकटपणाविषयीं असें लिहिलें आहे कीं, वीस-पंचवीस कोसांची मजल करून शेतांतील धान्याचें कणसांवर ते कांहीं दिवस काढीत व ते खर्च फार जपून करीत, म्हणून त्यांचा खजिना सतत भरलेला असे. ही आरबी लोकांची साम्यता दाखविली. याशिवाय या दोन्ही लोकांचे उत्कर्षास त्या त्या देशांतील घोडे कारण झाले, ही एक दुसरी ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

तिसरी गोष्ट अशी आहे कीं, आरब लोक पूर्वीं युद्धांत निपूण नव्हते; परंतु ते धाडशी व राकट असत, म्हणून त्यांस रोमन व रशियन बादशाह आपले चाकरीस ठेवूं लागले. तेव्हां त्यांस युद्धकौशल्य येऊन ते त्या दोनही बादशाहीस बाधक झाले. याप्रमाणेंच मराठे मुसलमानांचे लष्करांत प्रथमतः बलिष्ठ झाले व त्यांस बाधक झाले. आरब लोकांचे लष्करी नियम व शिवाजीनें केलेले लष्करी नियम यांमध्यें इतकें साम्य आहे कीं, तें साहजिक घडलें असें म्हणतां येणार नाहीं. जी लूट मिळेल ती ज्याची त्यानें न घेतां सरकारांत हजर करावी व सरकारांनीं त्यांतील योग्य वांटा बक्षीस म्हणून त्या शिपायास द्यावा, असा शिवाजीचा नियम होता; तसाच आरब लोकांचाही असे. घोडेवाल्याचा व साध्या शिपायाचा पगार यांचा नियम व इतर कांहीं गोष्टी यांतही पुष्कळ साम्य आहे; परंतु शत्रूंशीं वर्तन करण्याचे नियमांत तर फारच आहे.

...शिवाजी मोठा कल्पक व चतुर होता. अशी दंतकथा आहे कीं, त्यास पुरतेपणीं आपली सही सुद्धां करितां येत नव्हती. असें असतां त्यानें आपल्या राज्याचा पाया शुद्ध घातला होता व त्याचे नियमास अनुसरून जर पुढें मराठे लोक चालते तर त्यांच्या स्वराज्याचा नाश झाला इतका जलद कधींच झाला नसता; परंतु तसें न झाल्यामुळें मराठ्यांसारखे योद्धे प्रथम कष्टास व तदनंतर परराज्यास वाहणारे असे झाले. शिवाजी सरसकट सर्वांस पगार देत असे. लष्करी चाकरीकरितां जहागीर वगैरे देत नसे. ही गोष्ट त्याचें शहाणपणाची साक्ष आहे. मोंगल पादशाहींत जहागिरी इतक्या मोठ्या मोठ्या असत कीं व त्या जहागीरदारांस असे हक्क असत कीं, आपला चाकरपणा सोडून स्वतंत्रपणें वागण्यास त्यांस सुलभ पडे. बंगाल्याची सुभेदारी व दक्षिणेची सुभेदारी इत्यादि सर्व याच कारणांनीं स्वतंत्र राज्यें झालीं व त्याप्रमाणेंच शिवाजीचे मार्गें मराठी राज्याची स्थिति झाली. जो ज्या सरदारानें मुलूख जिंकावा त्याची वहिवाट त्या सर करणाराचेच कुळांत होत गेल्यानें ते त्या मुलखाचे राजे बनले व त्यांमध्यें व त्यांचे धन्यामध्यें विशेष फरक राहिला नाहीं. शिंदे, होळकर व त्यांचे यजमान पेशवे यांच्यामध्यें या रीतीनें इतका थोडा फरक राहिला होता कीं, परराज्याशीं पेशवे यांणीं जे तह करावे त्यांस शिंद्यांची किंवा होळकराची जामिनकी लागत असे! याप्रमाणें मराठ्यांचे पादशाहीचा उत्कर्ष होत असतांच मध्यें एक विष कालविलें गेलें. या विषानें तिचा प्राण गेल्याचें आम्हांस कांहीं आश्चर्य वाटत नाहीं; परंतु तो प्राण जाण्यास इतका वेळ कसा लागला याचें आम्हांस नवल वाटतें. एका फारसी ग्रंथकारानें याविषयीं असें लिहिलें आहे कीं, हे रानटी मराठे

सांपाच्या शरीराप्रमाणें आहेत.* त्या सांपाचे जरी तुकडे तुकडे केले तरी ते वळवळ करितात इतकेंच नाहीं; परंतु पुनः देखील मिळतात. दुसरें कारण मराठे लोकांची स्वामिभक्ति हें आहे असें आम्हांस वाटतें. मालकम साहेब असें म्हणतात कीं, शेवटील बाजीरावास जर यत्किंचित् ज्ञान असतें तर या लोकांच्या गुणापासून त्यास मोठा उपयोग होता. मराठयांच्या घरगुती व साधारण रीतीभाती यांहीं करून त्यांचे उत्कर्षास मोठें साहाय झालें. मराठ्यांचे मोठे मोठे सरदार हे आपणांस नाईक, पाटील व चौधरी हीं विशेषणें लावून त्यांत मोठें भूषण मानीत असत व त्यांचा स्वताहाचा डामडौल फार कमी असे व त्यांचें अंगीं पराक्रम फार असे, यामुळें सर्व रयत लोकांस जरी त्यांचे उच्छृंखळपणाचा क्वचित् त्रास येई तरी हे आपल्या प्रतीचेच लोक आहेत असें वाटून आनंद होई. मोंगल लोकांचे सरदार ऐषआरामांत असत व त्यांचें अंगीं तेव्हां पराक्रमही कमी होता म्हणून त्यांची लोकांत हेळणाच होई.

शिवाजीच्या चातुर्याचें वर्णनांत, त्यानें इतरांप्रमाणें मोंगलांची सड घेतली नाहीं ही गोष्ट मोठी ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. त्यानें अष्टप्रधानांचीं नांवें संस्कृत ठेविलीं. ही गोष्ट जरी लहान आहे तरी तीवरून त्याची स्वदेशावरची व स्वभाषेवरची प्रीति दिसून येते. सर्व अष्टप्रधानांस पाहिजे तेव्हां युद्धास जावें लागेल असा नेम केला असे; व त्यांस सध्यांचे रेव्हेन्यु कमिशनरांइतके पगार असत.

...शेवटचा पेशवा मराठी म्हणीप्रमाणें "उभे फोडले तर शंख आडवे फोडले तर चक्र" असे होते. यांचें शौर्य तर लोकांस विदित आहेच. बंदुकीचा आवाज केला असतां हे लपून बसत; हें महाराष्ट्र देशांतील आबालवृद्धांसही माहीत आहे. एशिया खंडांत व विशेषतः हिंदुस्थानांत शुभाशुभ होणें राजांचे स्वभावांवर व वर्तणूकीवर अवलंबून असतें. व यावेळेस हे दिव्य राजे असल्यामुळें मराठ्यांचे बादशाहीचा लय झाला !

मागें मराठ्यांचें उत्कर्षांत एक विष कालविलें गेलें म्हणून लिहिलें आहे तें दुसरें कारण; व तिसरें कारण, या वेळेस शिंदे व होळकर व इतर मराठे सरदार यांनीं एके ठिकाणीं मिळून मोंगलावर किंवा परशत्रूवर हल्ला करण्याचें टाकून एकमेकांचेच राज्यांचा अभिलाष धरिला हें होय. शिंद्यांच्या व होळकरांच्या एकमेकांशीं लढाया होऊन त्यांनीं आपलें सैन्य व द्रव्य खराब केलें. आणि बाजीरावानें पेंढाऱ्यांच्या साहाय्यानें आपल्याच रयतेस लुटलें, त्यामुळें पेशवाई म्हणजे

* सापाविषयीं ही गोष्ट खरी आहे असें नाहीं.

अंदाधुंदी असा शब्दार्थ झाला; तो अजूनही प्रचारांत आहे. हा दोष सर्व पेशवाईस लावणें अनुचित आहे असें इतिहासदृष्टया पाहिलें असतां समजेल. एक बाजीरावाच्या राज्यांत अंदाधुंदी झाली म्हणून सर्व मराठशाईस जिच्या योगें या मराठ्यांचे देशांवर अगणित उपकार झाले आहेत, ते सर्व विसरून तीस दोष द्यावा आणि तिचे गुणांचें वर्णन करूं नये हा केवळ एक पक्षाचा न्याय होय असें आमचें मुकरर मत आहे.

आतां यापुढील नवीन राज्यापासून हित काय झालें याचा विचार केला पाहिजे. या विषयांवर लिहिण्याचें आम्हांस मोठें भय वाटतें. कारण बाजीरावाचे वेळीं जी गडबड झाली व रयत शिणली तेणेंकरून लोकांचें मनांत मोठे दुराग्रह उत्पन्न झाले आहेत. असे दुराग्रह झाल्याचीं उदाहरणें पुष्कळ सांपडतात. "पिझिस्ट्रेटस" यानें आथेन्सचें राज्य बळकाविल्यावर उत्कृष्ट रीतीनेंच राज्य केलें. तसेंच कांहीं दिवस त्याच्या मुलांनींही केलें; परंतु त्या मुलांचें राज्यांत शेवटील पांच वर्षांत फार जुलूम झाला. त्यायोगें लोकांचीं मनें त्या राज्यावरून इतकीं उडालीं कीं, यांनीं पूर्वीं जितकीं सत्कृत्यें केलीं होतीं तितकींही ते विसरून गेले.* परंतु इतिहासकार मात्र विसरले नाहींत. तसेंच मराठ्यांचे इतिहासकारानेंही विसरूं नये हें आम्हांस वाजवी दिसतें.

"The evil that men do lives after them.

"The good is oft interred with their bones."

या न्यायानें आमचे आधुनिक इतिहासकार चालतात.

मराठ्यांनीं, ज्या देशांस शूर लोक नाहींत असा अपवाद आला होता, त्या देशांत शौर्याचीं कृत्यें करून या देशास मोठेपणा आणिला. आपण कोणाचेही ताबेदार नाहीं असा आव घालून स्वतंत्र राज्याचा पाया घातला व देशाभिमान धरिला; इत्यादि स्तुत्य कृत्यें करूनच जरी ते राहिले असते तरी ते स्तुतीस पात्र होते. त्यांचें राज्य धर्माचे व हिंदू जातीचे अभिमानानें उद्भवलें; तथापि त्यांच्या राज्यांत इतर धर्माचे लोकांस इजा पोंचली नाहीं. ज्याप्रमाणें ब्राह्मण व मराठे लोकांस मोठमोठ्या जागा मिळत त्याप्रमाणेंच मुसलमानांसही मिळत. मराठ्यांचे मुलकांत मुसलमानांचे व मराठ्यांचे हिंदुस्थानांतील इतर भागांपेक्षां

---

* ग्रांट साहेबाचें मत असें आहे कीं, या वेळीं जीं आथेन्समध्यें सार्वजनिक इमारतीचीं कामें झालीं तीं सर्व केवळ लोक प्रीतीनेंच झालीं असें नाहीं. लोकांस कष्ट करण्यास वेळ व साधनें मिळू नयेत म्हणून तीं कामें उपस्थित केलीं असावीं असाही तर्क होतो; तरी ग्रांट साहेबाचे मते तें राज्य वास्तविक जुलमी होतें असें नाहीं.

सख्य असतें, व बाह्यात्कारी देखील मोठ्या शहरांतील मुसलमान खेरीज करून मराठ्यांमध्यें व त्यांमध्यें कांहीं फरक दिसत नाहीं, ही गोष्ट आमचे म्हणण्यास सबळ कारण आहे.

हिंदुस्थानांतील हिंदु रहिवाशी व मुसलमान रहिवाशी यांचा एकमेकांशीं द्वेष व एकमेकाच्या भिन्न रीतीभातींविषयीं ज्यानें विचार केला असेल त्यास हें आमचें म्हणणें अगदीं सयुक्तिक वाटेल. या गोष्टींचा विसर लोकांस पडला आहे असें लोकांचे साधारण बोलण्यावरून दिसतें, ही फार खेद वाटण्यासारखी गोष्ट आहे.

इंग्रजी झाल्यापासून हा मुलुक इंग्रजांच्या हिंदुस्थानी बादशाईतील एक भाग झाला. या नवीन बादशाईत ज्या कित्येक लोकांस मराठे आपली प्रजा नव्हे असे म्हणत अशांचाही समावेश झाला आहे. यामुळें मराठ्यांपासून उपद्रव पावलेल्या प्रजेस सुख झालें यांत संशय नाहीं. व या मानानेंच सर्व हिंदुस्थानचें एक राज्य असें कल्पून इंग्रजांचे राज्यापासून काय काय नफे झाले याची बरोबर अटकळ बांधणें फार कठीण आहे. तथापि देशास एकंदरीनें मोठा नफा झाला, व पुढें आमचे लोक स्वतः याहूनही मोठा नफा करून घेतील, अशीं चिन्हें दिसत आहेत. हा फायदा लहान नव्हे; हा विषय प्रस्तुतचे निबंधाचे बाहेरचा असल्यामुळें यावर विस्तारें लिहितां नये. सांप्रत सर्व देशभर स्वस्थता आहे ही काय ती या राज्यांत साऱ्याहून मोठी गोष्ट आहे. परंतु लोकांवर सरकारचा पूर्ण विश्वास नसल्याकारणानें त्यांस निर्वीर्य करण्याचे प्रयत्न चालले आहेत. हत्यारांचे कौशल्य व 'मिलिशिया' इत्यादि गोष्टी तर राहोत, परंतु हत्यार नुसतें बाळगण्याची देखील मनाई आहे. ही स्थिति चांगली असें कोणी म्हणणार नाहीं. सडका बांधणें व इतर लोकोपयोगी कामें करणें, विद्यावृद्धि करणें या आणखी या राज्यांतील मोठ्या गोष्टी आहेत. यांतील दुसरी गोष्ट विचार केला असतां फार मोठी आहे असें नाहीं. हिंदुस्थान कसें तरी दोन शतकें इंग्रजांचे हातीं आहे असें म्हणण्यास चिंता नाहीं. या इतक्या काळांत ज्याप्रमाणें लोकोपयोगीं कामें व्हावीं त्याप्रमाणें बिलकुल झालीं नाहींत. आमचें सध्यांचें सरकार सुधारणुकी करण्यास अमळसें जड आहे असें वाटतें. लोकांचे हक्क वाढवावे हें त्यांस समजण्यास सन १८५७ चे बंडाप्रमाणें बंड झालें तरच कळतें. ओरिसा प्रांतांतील दुष्काळासारिखा भयंकर दुष्काळ पडल्याशिवाय कालवे बांधावे, सर्वत्र जाणें-येणें सोपें असावें हें त्यास कळत नाहीं. एकंदरीनें पाहिल्यास सर्व हिंदुस्थान इंग्रजांचे राज्यापासून सुख झालें असें जें पुष्कळांचें मत आहे; तसें आमचेंही मत आहे; असें असतां आम्ही हा त्यांस दोष लावितों याचें कदाचित् कोणास नवल वाटेल व कित्येकांस, नीट माहिती नसल्याकारणानें,

रागही येईल. इंग्रजांस हिंदुस्थानापासून जो लाभ होतो त्या मानानेंच हिंदुस्थानास इंग्रजापासून होतो असें कोणाच्यानें सिद्ध करवणार नाहीं. मि० नाइट यांनीं "द व्ह्यालू आफ इंडिया टु इंग्लंड" ह्या नांवानें जो निबंध केला आहे तो ज्यांनीं पाहिला असेल ते आमचें म्हणणें समूळ ग्राह्य आहे असें म्हणतील. हिंदुस्थान इंग्रजांचे हातीं आहे म्हणून त्यांस सर्व पृथ्वीची गरज नाहीं. एवढें सामर्थ्य व ऐश्वर्य त्यांस आमच्या देशसत्तेमुळें आलें आहे. जर अमेरिकेंत लढाई उठली व तिकडून विलायतेस कापूस जाण्याचें बंद झालें व म्यांचेस्तर* येथील लक्षावधी लोक उपाशी मरूं लागले तर, इकडून कापूस जाऊन त्यांचा व्यापार चालू होतो; इतकेंच नाहीं, परंतु हिंदुस्थानांतील धार्मिक लोक वर्गणी करून त्यास रुपयेही पाठवितात; आपलें येणें अगणित त्यांजकडे असतांही गरज पडल्यास करही देतात. जर इंग्रजांचें आज चिनी लोकांशीं वांकडे पडलें तर उद्यां जी त्यांच्या व्यापारांत हानि होईल ती हिंदुस्थान असल्या कारणानें होणार नाहीं. याप्रमाणें एक अमेरिकेचें व चिनाचेंच काय; परंतु सर्व पृथ्वींतील लोकांचें वांकडें पडल्यास जर हिंदुस्थान त्यांचे हातीं आहे तर कोणतेही गोष्टीचो गैरसोय त्यांस पडणार नाहीं. हें मत आमचेंच आहे, व देशप्रीतीमुळें हा आमचा दुराग्रह आहे असें नाहीं; मोठमोठ्या विद्वान सत्पुरुष इंग्रजांचेंही असेंच मत आहे.

इंग्रज लोकांस स्वतंत्रतेची हौस असतां ते आपले हाताखालील लोकांस स्वतंत्रता देण्यास मोठे छट असें वास्तविक मत आहे. याविषयीं लॉर्ड मेकॉले यांनीं असें म्हटलें आहे:—

इंग्रज लोक राजकीय गोष्टींविषयीं विचार करितांना एखादे निस्पृह तत्त्ववेत्त्यासारिखें सयुक्तिक व यथान्याय विचार करीत नाहींत. त्यांचें वकिलासारखें कुटिल पहाणें असतें. त्यांचे विचारांमध्यें कांहीं तरी अल्पदृष्टीचें व आत्मलाभाचें आणि मारवाडीपणाचें असतेंच. लोकांचें हक्क म्हणजे ईश्वराचें लाल जे इंग्रज यांचें उपभोगास म्हणूनच केले आहेत असें त्यांस वाटतें. या हक्काचा उपभोग करण्यास दुसरीं मनुष्यें प्रयत्न करूं लागल्यास ते त्या लोकांस उत्तेजन तर देणार नाहींत; परंतु स्नेहभावानें देखील त्यांशीं वागणार नाहींत.** "

---

* हा निबंध प्रोफेसर दादाभाई नवरोजी यांनीं इष्ट इंडिया असोसिएशन सभेपुढें जो निबंध वाचिला तो इकडे प्रकट होण्याचे पूर्वी आम्हीं लिहिला हें येथें सांगणें इष्ट दिसतें.

** मेकॉलेज मिसलेनियस वर्क्स.

फ्रेंच लोकांचें वर्तन इंग्रज लोकांपेक्षां या गोष्टीमध्यें अगदीं निराळें आहे. फ्रेंच बादशाहींत अरब व मुसलमान या लोकांस जे हक्क लष्करी व इतर नौकऱ्यांत आहेत त्यांचे दशांश देखील आमचे देशांतील सुधारलेले लोकांस नाहींत. शेजारचा पांदेचरी वसाहतींत जे हक्क नेटिवांस आहेत ते इंग्रजी मुलकांत आम्हांस नाहींत.

अरब लोकांस फ्रेंच बादशाहींत लष्करी खात्यांत पाहिजे तो अधिकार देतात. आमचे राज्यांत शें दोनशें रुपयांचा सुभेदार मेजर झाला म्हणजे झालें.

या " मारवाडीपणा " मुळें मोठ्या जागा आमचे लोकांस मिळत नाहींत.

इंग्रजांचें राज्य या देशांत होण्याचे वेळीं कित्येक बादशाहींच्या उत्कर्षामुळें व कित्येकांचे अपकर्षामुळें सर्व हिंदुस्थानभर अशी धांदल झाली कीं, तिचें योगें सर्व रयत शिणली. व ज्याप्रमाणें एखाद्याच्या अंगांत संचार व्हावा, त्याचा मद उतरला म्हणजे तो स्वस्थ निचेष्ट पडतो, त्याप्रमाणें आमचा देश कांहीं हालचाल केल्याशिवाय ती धांदल संपल्यावर स्तब्ध राहिला. अशा स्थितींत शिणामुळें कसें तरी खायास मिळालें व बसावयास आश्रय मिळाला म्हणजे कृतार्थ झालों असें त्यांस वाटून, गाई, गुरें इत्यादिकांप्रमाणें आमची स्थिति झाली. खाणें, पिणें व आश्रय याशिवाय या जगांत दुसऱ्या कांहीं गोष्टी करण्यासारख्या व इच्छिण्यासारख्या आहेत हें ते अगदीं विसरून गेले. या गाढ निद्रेपासून आतां ते डोळे चोळीत चोळीत उठूं लागले आहेत. आतां पुरी झोंप जाण्यास किती दिवस लागतील याचा निर्णय कोण करील? एका परमेश्वराशिवाय याचा निर्णय आज कोणास करतां येणार नाहीं. सध्या हिंदुस्थानची स्थिति अशी झाली आहे कीं, आजपासून पुढें दहा वर्षांनीं काय होईल हें सांगवत नाहीं. या समयीं ज्यानें त्यानें आपले देशाचे हिताकरितां जपावें एवढें मात्र आपलें कर्तव्य आहे.

इतकें हें सर्व हिंदुस्थानचे राज्याचें वर्णन पुढचा संदर्भ नीट कळावा म्हणून लिहिलें. या राज्यांत जिवाचें व मालमत्तेचें चांगलें संरक्षण होतें; परंतु लोकांस इतर महत्त्व नाहीं असें आम्हीं यांत सांगितलें. ह्या आमचे अर्थाचा अनर्थ होऊं नये म्हणून पुनः सांगतों.

आतां या विस्तीर्ण देशांतील (ज्यास " कान्टीनेन्ट " म्हणजे खंड असें म्हटल्यास देखील शोभेल) पृथक् पृथक् भागांतील लोकांचें हिताहिताचा विचार केला असतां वर जो निर्णय निघाला त्यापेक्षां निरनिराळे निर्णय निघतील. उदाहरणार्थ बंगाला, ओरिसा, व कांहीं नागपुराखालील प्रदेश यांस मोठाच लाभ झाला असें म्हणतां येईल. शीख लोकांचा मुलूक, मराठ्यांचा मुलूक इत्यादि

देशांत नफा व तोटा हे समान आहेत असें वाटेल. हिंदुस्थानांतील कोणत्याही इतिहासांत हा आम्हीं जो भेद दाखविला हा लक्षांत ठेवणें अवश्य आहे. हा पुष्कळ लिहिणारांचे लक्षांत नसल्याकारणानें अगणित चुक्या झाल्या आहेत. उदाहरणार्थ एक सांगतों. हिंदुस्थानांतील लोक भित्रे असें सरसकट दूषण दिलेलें असतें. आणि पुढें इतिहासांचे कथनांत शिवाजीचे राष्ट्रांतील लोकांची शिपाइगिरी, रणजीतसिंगांचे राष्ट्राची व रजपूत लोकांची शिपाइगिरी यांची वाहवा केलेली असते. याप्रमाणें होतां होतां सुमारें हिंदुस्थानांतील अर्ध्यापेक्षां अधिक लोकसंख्येची शिपायांत गणना होते. यायोगें आपलेंच आपण खंडन केल्यासारखें दिसतें.

हिंदुस्थान अतिशय विस्तीर्ण आहे व ह्यांत अनेक जातींचे लोक आहेत, येणेंकरून ह्यांत एकी कमी आहे. मराठे लोक आपल्यास एक स्वतंत्र राष्ट्र असें मानितात; ह्याचप्रमाणें शीक, रजपूत, बंगाली, गुजराती, यांची गोष्ट आहे व या इतक्यास एक राष्ट्र कल्पिणें म्हणजे युरोपांतील तुर्कस्थान खेरीज करून सर्व युरोपखंडास एक राष्ट्र म्हणण्यासारखें कांहीं आहे. अशा लोकांस एक राष्ट्र मानून यांची राज्यनीति एकच असें काय तें आतांच झालें आहे. हें किती दिवस टिकेल व यांपासून काय काय परिणाम होतील हें नीट आज सांगतां येत नाहीं.

याकरितां एक राज्याच्या ठिकाणीं तीन किंवा चार राज्यें होतील, तरी देखील चांगलें असें पुष्कळ सुत्तज्ञांचें मत आहे. प्रत्येक " प्रेसिडेन्सी " स्वतंत्र असावी असें त्यांचें मत आहे, हें माझे अल्पबुद्धीस ठीक वाटतें.

हा निबंध मूळ इंग्रजींत कांहींसे श्रम घेऊन आम्हीं केला होता; परंतु त्या इंग्रजी लेखास निबंध असें म्हणतां येणार नाहीं. त्यास ध्यानांत ठेवण्यासारख्या गोष्टींचें व त्यावर वेळोवेळीं जे विचार सुचले त्याचें एक टिपण म्हटल्यास चालेल. या टिपणावरून फार घाईनें हा निबंध या सभेपुढें वाचण्यास आम्हीं तयार केला. यांत भाषा व मजकूर जुळण्याची सरणी यांकडे आम्हीं लक्ष्य दिलेंच नाहीं, याची आम्हांस लोक क्षमा करतील. आतां या विषयाकडे कोणाचें लक्ष्य नाहीं व तेणेंकरून आपलें फार अहित आहे, हा विषय मनोरंजक व महत्त्वाचा आहे आणि यावर ग्रंथ केल्यास तो समर्पक व गहन असा होईल इत्यादि गोष्टी मनांत ठसून जर या सभेंतील आज एक दोघांची तरी मनें या विषयाच्या अध्ययनाकडे लागतील तर सर्व आमचे हेतु सफळ झाले असें आम्ही समजूं.

● ● ●

: १९ :

काशिनाथ बालकृष्ण मराठे

नावल म्हणजे काय ?

नावल म्हणजे चमत्कारीक गोष्ट. ज्यांत आश्चर्यकारक गोष्टी फार व जो वाचला असतां अवलपासून आखेरपर्यंत वाचणारांस जागोजाग नवल वाटावें, अश्या प्रकारचा जो ग्रंथ, त्यास इंग्रजींत 'नावल' अशी संज्ञा आहे. नावल म्हणजे नवलसमूह अश्या अर्थसाम्यावरून मराठींत ही सदर्हू ग्रंथांचें तेंच नांव राखलें असतां चिंता नाहीं. संस्कृतामध्यें अश्या प्रकारचे ग्रंथ विरळा. सुबंधु नामक कवीची वासवदत्ता, दंडीचें दशकुमार चरित्र, बाण कवीची कादंबरी अशीं कांहीं नावलें संस्कृत भाषेमध्यें आहेत. परंतु नावलें गद्यात्मक असावीं, असा नियम केला नाहीं तर संस्कृतांत अनेक नावलें सांपडतील किंबहुना शास्त्रविषयक ग्रंथ वगळले तर सर्वच संस्कृत ग्रंथास नावल म्हणण्यास काय चिंता आहे ? चार वेद, अष्टादश पुराणें व एकंदर काव्यें हीं काय नावलें नव्हेत ? नाटक हें एक नावलाचेंच अन्य स्वरूप आहे. त्याचा विचार निबंधाच्या दुसऱ्या प्रकरणांत करूं.

आदि काव्य जें वाल्मिकि-रामायण त्यास आपण काय नांव द्यावें ? तें नावल नव्हे काय ? रामचंद्रासारिख्या शूर पुरुषांचें चरित्र एकवट करून वाल्मिकीनें किती सुरस आख्यायिका रचली आहे ! एकादा रसिक पुराणिक रामायण-कथा सांगत असला म्हणजे कशी हजारों मंडळी झुलत राहते ! हें काय त्या कथेचें माहात्म्य, कीं कवीची शक्ति ? विद्वज्जन हो, असें म्हणण्यास कांहीं एक हरकत नाहीं कीं, रामकथेंतील माधुर्य वाल्मीकीच्या मुखांतलें. तसेंच महाभारत तें काय सामान्य नावल आहे ? नावलांचा केवळ समुद्र ! तशींच अठरापुराणें व श्रीमद्भागवत हीं एकापेक्षां एक सुरस व मनोरंजक नावलें आहेत.

महाभारत, भागवत, रामायण व इतर पुराणें ह्यांमध्यें मनोरंजकपणाचें बीज एवढेंच आहे कीं त्यामध्यें अद्भुतांचा भरणा फार. प्राचीन काळीं थोर पुरुषांचीं चरित्रें लोक एकमेकाला गाऊन दाखवीत असत. जसें हल्लीं गोंधळी पवाडे म्हणून मन रिझवतात, तसें पूर्वीं भाट, बंदी, बारोट गांवोगांवीं वीरांचीं

चरित्रें गात फिरत व त्याजवर चरितार्थ चालवीत. अद्यापि गुजराथेंत बारोठ आहेत त्यापाशीं अनेक मोठमोठ्या लोकांच्या वंशांची माहिती मिळते. ह्या वंशचरित्रांवर आपला निर्वाह, तेव्हां त्यांच्या योगानें लोकांचें मन रिझेल असें त्यांस स्वरूप देणें भाग पडे. अर्थात् अलौकिक गोष्टींचा व अद्भुतांचा थोडा-थोडा प्रवेश झाला असेल. अशीं अद्भुतांनीं मिश्रित झालेलीं चरित्रें व्यासा-सारिख्या महाकवींच्या हातीं लागल्यावर अतिशयोक्ति आदिकरून तिखट-मीठ लागून हल्लीं पुराणांत वर्णिलीं आहेत त्या स्वरूपाला आलीं, ह्यांत आश्चर्य कोणचें ? रामायण देखील वाल्मीकीनें रचिलें, त्या वेळीं शंभर कोटी बत्तीस अक्षरीं श्लोक होतील इतका ग्रंथ होता. तो त्यानें रामाचे मुलगे कुश व लव ह्यांकडून गावविला. ह्या गोष्टीमध्यें काळाची वा सत्याची किती गडबड असेल ती असो. परंतु इतकें खरें असण्याचा संभव आहे कीं रामाविषयीं असंख्य गोष्टी प्रसिद्ध होत्या, त्या वाल्मीकि ऋषीनें एकत्र करून त्यांस सर्व अलंकारांनीं युक्त असें कवितारूप दिलें व त्या पुढें पुष्कळ लोक गाऊन दाखविण्याकरितां पाठ करीत असत. अश्या प्रकारें अनेक कथा आरंभीं सामान्य असतां कांहींच्या बाहींच झाल्या आहेत. एक लहानश्या पराचा कावळा किंबहुना कावळे होतात ही जगप्रसिद्ध म्हण आहे.

परंतु असें रूपांतर झाल्याकारणानेंच त्या ग्रंथांस थोरवी आहे. वर सांगितल्याप्रमाणें त्यांत अद्भुतांचें मिश्रण नसतें, तर तीं इतकीं लोकप्रिय झालीं असतीं काय ? आज सहस्रावधि वर्षें लाखो बायका, मुलें व वृद्ध मनुष्यें ह्यांचें मनोरंजन झालें व आनंदानें कालक्रमणा झाली असें काम सामान्य चरित्रांपासून झालें असतें काय ? वानराचें शेपूट व चापल्य आणि मनुष्यांची अक्कल व स्वामिभक्ति व एक सहस्र हत्तींचें बळ हीं एकत्र करून मारुती उभा केला. त्यामुळें अनेक अद्भुत संकटें उपस्थित करून दूर करितां आलीं. एका अस्त्राचे अंगीं हजार माणसें मारण्याची शक्ति कल्पून एका शिपायाबद्दल १००० मनुष्यांचा मोबदला केला असतां काय चिंता आहे ? वर्षाऋतूचे आरंभीं आकाशाकडे पहात बसलें असतां काय थोडीं गंधर्वनगरें दृष्टीस पडतात ? मनुष्य-मात्रास कल्पनाशक्ति दिली आहे, तिला रिझवणें असल्यास लोकोत्तर कल्पनाच केल्या पाहिजेत.

तथापि तत्त्वद्रष्टे आहेत ते असल्या कल्पनांना भुलत नाहींत. ते असल्या सालंकार वर्णनांतून सार घेऊन बाकीच्या कविकल्पोत्पन्न भागावर विश्वास ठेवीत नाहींत. पण त्या काल्पनिक भागाचा उपयोग विलक्षण आहे. मोठमोठे सूर्यवंश व चंद्रवंश ह्यांतील राजांच्या कथा आजपावेतों आबालवृद्धांच्या मनामध्यें जागृत

आहेत. कर्णाच्या दातृत्वाच्या गोष्टी ऐकून अनेक पुरुषांच्या अंतःकरणांत औदार्य उत्पन्न होतें; तसेंच शिबि राजाचें चरित्र ऐकून कित्येकांच्या मनांत सहिष्णुता प्राप्त झाली असेल; युधिष्ठिर अथवा धर्मराजाच्या किंवा नळराराजाच्या सत्य-पणामुळें व व सहनशीळपणानें असंख्य लोकांस संकटसमयीं धैर्य येतें. तसेंच ह्या नवलमिश्रित वर्णनांनीं आजपावेतों,

मान्धाताच भगीरथश्च सगरो मान्यःककुत्स्थो रघुः
पूरूःसोपि पुरूरवाःसचशिबिःपुण्यश्चकक्मांगदः
वैदेहो नहुषश्च हैह्यपतिर्वीरो ययातिर्नलः
पार्थश्चेतिनृपाःप्रशस्तयशसः प्रादुर्बभूवर्नकिम् ॥

मान्धाताप्रभृति मोठे पराक्रमी राजे प्रसिद्ध झाले नाहींत काय? ह्या राजांची चरित्रें इतकीं मनोवेधक झालीं आहेत हा कवींचा उपकार नव्हे काय?

कालीदास, माघ, भारवि, श्रीहर्ष आदीकरून कवींच्या काव्यामध्यें ही नवल-समूह फार व कल्पना गौरव फार, म्हणूनच तीं काव्यें वाचण्याविषयीं आपण इतकें झटतों. इतिहासरूपानें रघुवंशांतील राजांची एक नुसती याद व प्रत्येकानें काय काय केलें याचें एक टाचण कालिदासादि कवी शिवाय दुसऱ्या मनुष्यानें एकाद्या चोपडींत लिहून ठेविलें असतें तर रघुवंशांतले राजे इतके उदयास येते काय? दिलीपराजा, रघुराजा, अजराजा ह्यांचीं नांवें तरी आपल्याला ठाऊक असतीं काय? असो, महावीरांची व सत्पुरुषांची आठवण राहण्यास असलीं अद्‌भुत् मिश्रित चरित्रें फार चांगलीं साधनें आहेत. ज्या देशांत असले इतिहास व असलीं चरित्रें नाहींत, तो देश एक प्रकारच्या सुखास आंचवला असें म्हणण्यास चिंता नाहीं.

कोरडी नीति शिकवली असतां कोणाच्या मनांत ठसत नाहीं. इति-हासांतलीं उदाहरणें सांगितलीं म्हणजे पक्की ठसते. म्हणून इतिहास हा उदाहरणा-सहित नीतिग्रंथच आहे. परंतु पुण्यश्लोकांची जशी याद आहे—

पुण्यश्लोको नलोराजा, पुण्यश्लोको युधिष्ठिरः
पुण्यश्लोकाचवैदेही, पुण्यश्लोकोजनार्दनः ॥

अशी जो जो सद्‌गुण ज्या ज्या पुरुषामध्यें फार त्यांची त्यांची त्या गुणाच्या संबंधानें एक एक माळिका करून ठेविल्यापासून सामान्यजनांना काय फायदा आहे? उदाहरणार्थ दानशूरत्वाविषयीं हरिश्चंद्रराजा व श्रियाळराजा ह्यांची मोठी ख्याति होती; परंतु ज्या रीतीनें त्यांचीं चरित्रें सांगतात, तशीं

कवींनीं बनवून ठेविलीं नसतीं, तर त्यांच्या धैर्याचा व औदार्याचा बळकट ठसा आपल्या अंतःकरणावर कसा उठला असता ? त्या कथा वाचिल्या, ऐकिल्या अथवा नाटक रूपानें रंग–भूमीवर पाहिल्या म्हणजे सहृदयानें अंतःकरण आर्द्र होतेंच. एवढेंच नाहीं, कधीं कधीं नेत्रांतून अश्रुधारा चालतात. असो. असें अनेक प्रकारें ऐतिहासिक पुरुषांच्या चरितांच्या उदाहरणांनीं आपले मनोभाव पालटतात. ऐतिहासिक पुरुषांचा ‘ इति-ह-आस ’ (असा, असाच झाला) अश्या सत्य रूपानें वृत्तांत लिहिला तर उदाहरणोपयोगी होईल खरा, परंतु असा इतिहास वाचण्यास फार थोडे लोक प्रवृत्त होतील. इतिहासाचें वाचन म्हटलें म्हणजे मरूप्रदेशांतील प्रवासासारिखें आहे. अमुक पुरुष अमुक ठिकाणीं अमुक वेळेस जन्मला; तो आपल्या आई बापाचा फार लाडका असे; तो लहानपणीं फार खोडकर असे; अंमळ मोठा झाल्यावर आपल्या गांवच्या जात-भाईना घेऊन त्या देशच्या राजाला त्यानें मारलें व त्याच्या राज्यावर बसला; त्याला पुष्कळ बायका होत्या; पुष्कळ मुलें झालीं; अमुक देशचे त्याचे मित्र होते; त्यांस त्यानें मदत करून त्या करवीं त्यांचे शत्रु जिंकिले; दोन लढाया जिंकल्या, तीन लढाया हरला व अमुक स्थळीं अमुक कारणानें अमुक वर्षी मेला. अशीं इतिहास रूपानें चरित्रें लिहिलीं असतां तत्त्वबुभूत्सू वाचणारे फार थोडे निघतील. हल्लींच्या काळीं सुधारलेल्या देशांत सत्यशोधक विशेष झाले आहेत; म्हणून सत्य इतिहासाची अभिरूचि पुष्कळ लोकांस उत्पन्न झाली आहे. परंतु असत्य अगदीं अप्रिय, असेंही अद्याप झालें नाहीं आणि अज्ञान लोकांना तें कधींही अप्रिय होणार नाहीं. खऱ्या गोष्टी एकीकडे ठेवून, ज्यापासून मनो-रंजन होतें त्या गोष्टी खोट्या, कल्पित असें जरी पाहिल्या पानावर सांगितलें असलें तरी त्या पसंद पडतात व लोकप्रिय होतात. मराठ्यांच्या बखरीला गिऱ्हाईक मिळत नाहीं. पण मुक्तमाला, मंजुघोषा ह्यांच्या निघाल्या दिवसापासून दोन दोन आवृत्ती झाल्या. इतिहासांत वर्णिलेल्या पुरुषांचें वृत्त लिहिणें झाल्यास त्यांत देखील कांहीं कल्पित चमत्कार मिश्र केले असतां तें वृत्त पुष्कळ लोकांस मनोरंजक होतें. पक्की खात्री आहे कीं शिवाजीसारिख्या पुरुषाचें चरित्र, त्यांत कांहीं अलौकिक गोष्टी मिसळल्या असतां, फार लोकप्रिय होईल. शिवाजीची सात वेळा भवानीची गाठ पडली; तिनें त्याला एक दिव्य खड्ग दिलें व अनेक प्रसंगीं त्यास देवीनें महासंकटांतून मुक्त केलें, अशा प्रकारच्या अनेक अद्‌भुत गोष्टी शिवाजीच्या चरित्रांत अगोदरच मिश्र केल्या आहेत. त्यांवर एखाद्या कवीची बनावणी झाली म्हणजे आमच्या शिवाजीराजांना महाभारतासारख्या ग्रंथांत जागा मिळण्यास काय हरकत आहे ?

हरकत नसावीच असें आम्ही म्हणतों. वर सांगितल्याप्रमाणें वीर व थोर पुरुषांच्या चरित्रांपासून वाचणारांस व ऐकणारांस मोठा फायदा होत आहे, तर तीं लोक प्रीतीनें वाचतील असें त्यांस स्वरूप देण्यास काय चिंता आहे? परंतु सत्याच्या बळकट पायावर इमारत रचली तर ती कांहीं दिवस टिकेल, व विद्वानांच्या व अविद्वानांच्या मनाला क्षणभर विश्रांति व आनंद ह्यांचें ठिकाण होईल. जींत सत्याचा लेश देखील नाहीं. ती गोष्ट केवळ अविद्वानांचें मन कांहीं दिवस रंजवील; परंतु तीपासून दुसरा उपयोग होणार नाहीं. भारत रामायण ग्रंथ आज पावेतों मान्य झाले व चिरकाळ मान्य राहतील. ह्याचें कारण त्यांत मनोरंजक गोष्टी आहेत एवढेंच नाहीं, त्यांत श्रद्धा, भक्ति व विश्वास बसण्यासारिख्या कांहीं गोष्टीं आहेत. भावाबंधाचें वैर, सत्यानें वागण्याचे चांगले परिणाम, परमेश्वर भक्तीचीं फळें, पितापुत्रस्नेह, बंधुप्रीति, बायकोची प्रीति, बायकोचा विरह व उपकार केला असतां स्नेह व सख्य उत्पन्न होतें ह्याचे प्रत्यक्ष दाखले आहेत; म्हणून ते ग्रंथ सर्वांना आवडतात.

सत्याच्या आश्रयानें जसें असत्य शोभतें व उपयुक्त होतें, तसें असत्य स्वतंत्रपणें उपयोगी होत नाहीं. कोणी म्हणतील शुद्ध सत्य निराळें ठेवावें व असत्य निराळें ठेवावें. नावल लिहिण्याच्या कामांत असा निग्रह उपयोगाचा नाहीं. विषयगत व्यक्ति सत्य असून त्यांचें वर्णन अंशतः अद्‌भुत-मिश्रित पाहिजे ह्यास, इंग्रजींत रोमान्स (romance) म्हणतात. हा प्रकार फारच उत्तम. कारण अशा प्रकारच्या नावलांपासून मोठा उपयोग होतो. अथवा वर्णन समग्र सत्य असून व्यक्ति कल्पित असल्या पाहिजेत. हा दुसरा प्रकार. ह्यास इंग्रजींत नाव्हल (novel) असें म्हणतात. वर्णन सत्य असावें ह्याचा अर्थ इतकाच कीं प्रत्येक व्यक्तीच्या संबंधानें प्रत्येक गोष्ट कल्पित अथवा खरी, संभवण्यासारिखी असली पाहिजे. मंजुघोषा नावलांतील वसंतमाधवाचें विमान, मंजुघोषेची अप्रतिम पंडितासारिखी पत्र लिहिण्याची शैली, विचित्र पुरींतील कदंबा देवीचा प्रत्यक्ष अवतार, म्हणजे मानवी प्राण्यानें भिंत फोडून पुढें येणें, पद्मनयना राजमहालांत असतां एका गैरमाहित म्हाताऱ्या बाईच्या पाठीमागून मुकाट्यानें चालती झाली, ह्या गोष्टी अम्मळ असंभवाच्या आहेत. तसेंच रत्नप्रभेमध्यें मदनविलासानें रत्न-प्रभेच्या दाराशीं गाडी आणली असतां त्यांत तिची वयस्क मावशी येऊन बसली व तिलाच रत्नमाला म्हणून मदनविलास घेऊन गेला; तशीच कन्यादेची दासी तिचें तोंड बांधून एका गड्यानें डोकीवर तीस कोस नेली व त्याविषयीं कांहीं एक गडबड झाली नाहीं; पुढें पावसाच्या झपाट्यांत मदन-विलासाची गाडी तीस कोस गेली, ह्या गोष्टी अंमळ चांगल्याशा मनांत भरत नाहींत. मुक्तमालेला भुईमध्यें पुरली असतांही तिचें जिवंत राहणें, चार चार दिवस व कधीं कधीं

आठवडेच्या आठवडे अन्न-पाण्याविना वांचणें ह्या ही गोष्टी असंभाव्य आहेत. कोणी एका गैर माहितीच्या गोसाव्याबरोबर निबिड अरण्यांत डोंगरावर एका गुहेंत जाणें हेंही श्रीमंतांच्या स्त्रियांस अशक्य आहे. अशा अनेक गोष्टी प्रस्तुतच्या नावलांतून आहेत, त्यांत स्वाभाविकपणा नाहीं. प्रत्येक नावलामध्यें वर सांगितलेल्या प्रकारच्या गोष्टीशिवाय स्त्रियांच्या पातिव्रत्यावर फार हल्ला केला आहे. जागोजाग अशीं संकटें आणलीं आहेत कीं पातिव्रत्यभंग झालाच पाहिजे. त्या संकटांतून त्या स्त्रियांचें पातिव्रत्य निर्दोष राहिलें, ही संभवा पलीकडची गोष्ट आहे. अशी पातिव्रत्याची परीक्षा देऊन ज्या स्त्रिया शुद्ध राहिल्या त्या इहलोकच्या नव्हत. सांप्रतच्या स्त्रिया त्यांच्या तुकीस उतरणार नाहींत; व तसें पातिव्रत्य त्यांच्या आटोक्यांतही नाहीं. आणखी प्रत्येक नावलामध्यें मुख्य स्त्रीवर (नायिकेवर) व मुख्य पुरुषावर (नायकावर) जीं संकटें आणलीं आहेत, त्यांतून ते वांचले तरी कसे ? अशी शंका सर्वांना येते. तेव्हां वर सांगितल्याप्रमाणें नावलाचे दोन प्रकार. एक पुरुष सत्य, पण त्यांच्या हकीकतींत पुष्कळ असंभाव्य, मिथ्या व अद्‌भुत अशा गोष्टी घालून त्यांचें चरित्र मनोरंजक करावयाचें. दुसरा प्रकार असा कीं, पुरुष मिथ्या, पण त्यांच्या संबंधानें ज्या गोष्टी सांगावयाच्या, त्या अगदीं संभाव्य, शक्य, स्वाभाविक असल्या पाहिजेत. दोन्हीं मिथ्या असतील तर त्यांपासून सज्ञानास तर काय अज्ञानास देखील कांहीं एक उपयोग व्हावयाचा नाहीं. सांप्रत जीं नावलें पिकत आहेत तीं दुसऱ्या प्रकारचीं आहेत; पण वर्णनामध्यें जागोजाग दोष आहेत. जेवढे पुरुष तेवढे मदनाचे पुतळे, जेवढ्या स्त्रिया तेवढ्या तिलोत्तमा; प्रत्येक शोकस्थलीं मरणासारिखा शोक व आनंदस्थळीं स्वर्गासारिखा आनंद, दुसरी उपमाच नाहीं. नवरा-बायकोचें भाषण म्हणजे प्रेमाचा लोट ! त्यांत अभिप्राय गूढ राखणें किंवा गांभीर्यही बिलकुल नाहींत. सुलोचना नावलांत राजा म्हणतो—तारामती, हें साखरलिंबू पाहिलें, हें कश्यासारिखें दिसतें ? सांग बरें.

तारा—आम्हांस असलें कांहीं समजत नाहीं.

राजा—बरें, मीतरी सांगू ? हे तुझ्या – म्हणून पुढें बोलतो.

तारा—पुरे तें, कांही तरीच कल्पना पण, दुसरें कांहीं बोलणेंच नाहीं. कांहीं तरी म्हणून, कोणीकडून तरी दुसऱ्याची थट्टा करावयाची हें मला ठाऊक आहे.

प्रथमतः राजाच्या भाषणांत 'तुझ्यापुढें' – म्हणून 'पुढें बोलतो,' असें लिहिलें आहे तें बरोबर नाहीं. तुझ्या – 'म्हणून उगीच राहतो,' असें असावें. परंतु अशीं भाषणें स्त्री पुरुषांच्या मुखांत घातलीं तर अर्थ गांभीर्य रहात नाहीं. स्त्रीचा विरह झाला असतां आम्रफळ, नारिंग, साखरलिंबू ह्यांच्यांशीं स्त्रीचे स्तन

तुळिले तर पोटांतून उकळी येईल परंतु स्त्री जवळ असतांही प्रतिफळदर्शनीं तिचा विनोद करणें ह्या गोष्टीला तारामतीनें दिलेला चाबूकच योग्य आहे. रति समय वर्णन करीत असतां किंवा स्त्री पुरुषांची शृंगारिक भेट वर्णित असतां तीं प्रेमानें एकत्र बसलीं, परस्परांच्या मुखाकडे पाहून परस्परांच्या अंतःकरणांत आनंदाच्या उकळ्या फुटल्या, व एकमेकांशीं विनोदाच्या गोष्टी बोलूं लागलीं इतक्या अभिप्रायाचे शब्द बस आहेत. ह्यावरून अभिप्राय गूढ राखणें हा नावलांचा मोठाच धर्म आहे. ह्याशिवाय नावलामध्यें एणेंप्रमाणें धर्म असले पाहिजेत.

१. (अ) जसें नाटकांत तसेंच नावलांत काळ, वेळ, पुरुषस्वभाव व स्थळ हीं एक असलीं पाहिजेत. विचित्रपुरीमध्यें चार पुरुषांचें चरित्र लिहिलें आहे व ते चौघे कलकत्ता युनिव्हर्सिटींतले मोठे विद्वान होते अशी कल्पना केली आहे. त्या पैकीं एक राजपुत्र होता व दुसरा प्रधान पुत्र होता. आपल्या देशांत 'एम्. ए.' ची परीक्षा उतरण्यासारिखे राजपुत्र व प्रधानपुत्र कोठें असतील ते असोत. त्यांचीं नांवें युनिव्हर्सिटी–क्यालेंदरांतून नाहींत हें खचित. 'एम्. ए.'ची परीक्षा देण्यासारिखे राजपुत्र व प्रधानपुत्र विसाव्या शतकांत कदाचित् होतील, परंतु त्यावेळचीं माणसें आणि पंधराव्या शतकांतली मोगलाईंतील विचित्रपुरी ह्यांचा मेळ कसा पडेल तो पडो. अश्या वर्णनांपासून गोष्टी स्वभावसिद्ध वाटून त्या वाचणाराच्या हृदयास भिनाव्या तश्या भिनत नाहींत. तसें बहुतेक नावलांत हल्लींच्या कालीं ज्या गोष्टींचा विशेष संभव आहे त्या गोष्टी हिंदू राजे कल्पून त्यांच्या काळांत झाल्या असें वर्णिलें आहे, त्यामुळें काळभेद होतो व त्यामुळें असत्यबुद्धि उत्पन्न होते. मंजुघोषेंत जागोजाग विमानाची योजना केल्यामुळें त्या नावलाचा स्वभावसिद्धपणा अगदीं गेला.

(ब) जे पुरुष नावलांत वर्णिले असतील त्यांचा स्वभावही एकसारखा पाहिजे. रत्नप्रभेची मावशी वर सांगितली, तिला मदनविलासानें झिटकारिलें, त्यानंतर ती त्याशीं विरोधभावानें वागूं लागली व तिनें त्यास घरांतूनही काढून दिलें. तिचें घरांमध्यें वर्चस्व होतें, व नवऱ्याचीही अनुमति होती, म्हणून मदनविलासाविषयीं यत्किंचितही तिची इच्छा असती, तर ती त्यास काढून देतीना व मदनविलास आपणांस तुच्छ मानतो असें ठाऊक असतां मध्यान्ह रात्रीं त्याच्या हस्तगत झाली, ह्यांतहीं कांहीं आशय दिसत नाहीं. तेव्हां तिच्या वर्तणुकींत ह्या स्थळीं अमळ भिन्नपणा दिसून येतो. तसेंच मदनविलासाची लग्नाची बायको चंपकवल्लरी सुंदर असतां व तिचें ह्याचें हृदय खवळून देण्यासारिखें प्रेम असतां, तो फक्त देश पाहण्याच्या इच्छेनें एकदम घरांतून निघून जातो; व रत्नप्रभेला पाहिल्याबरोबर तिला बायको करावें म्हणून मनांत आणतो;

तिला घरांतून पळवून नेतो; ह्या गोष्टी अंमळ विलग दिसतात. कारण पुनर्विवाह करण्याची चाल होती असें जर शेवटीं मानलें आहे, तर त्याच काळीं दोन बायकांना एकदम नांदवणें हें त्या लोकांस आवडत नव्हतें, अशी कल्पना केली असतां अंमळ बरी दिसेल. मंजुघोषेंत राणीनें वसंतीस पुष्कळ मार दिला असतांही मंजुघोषेनें दिलेल्या लखोट्याची आठवण झाली नाहीं व झाडयांतही तो सांपडला नाहीं. तो एक क्षणानें राजासमोर गेल्यांबरोबर सांपडला व तिनें पोटकळीचा काढून दिला. असे संविधानकाचे दोष मंजुघोषेंत जागोजाग आहेत.

प्रसंग पाहून लांब अथवा आखूड, कठोर अथवा मृदु, पांडित्ययुक्त किंवा साधारण भाषण पात्रांच्या तोंडीं घातलें पाहिजे. मंजुघोषेचा बाप आपल्या बायकोवर कधीं रागवायचा नाहीं. तो रागावला व म्हणतो, "माझ्या इष्ट कन्येनें नृपश्रेष्ठ कुमारास शिष्टजनही संतुष्ट होऊन ज्यास मान तुकवतील अशा अष्टविवाहांतील वरिष्ठ गांधर्व विवाहें करून वरून यथेष्ट सुखोपभोगानुभव घेणार, तों या दुष्टमति भ्रष्ट स्त्रीनें केवळ एकनिष्ट सापत्न व मत्सर भावानें तिजवर महारिष्ट आणावें असा हेतु धारण करूनच माझे मनांत तिजविषयीं क्लिष्ट कल्पना भरवून रुष्ट अंतःकरणानें तिजला नाना कष्ट भोगावयास लावून नष्ट दशेस लाविलें हें स्पष्ट आहे."

काय ष्ट कारांची गर्दी !! हें खाष्ट वाक्य ऐकिल्यावर ज्यास वाद इष्ट आहे तो असें म्हणेल कीं, असल्या रागाच्या अश्लिष्ट प्रसंगीं सहिष्ट व गरिष्ट शब्दांचें साधिष्ट काम नाहीं. त्या संतापलेल्या म्हाताऱ्याला इतके ष्टकारयुक्त शब्द कसे आठवले कोण जाणें.

(क) नावलामध्यें स्थलैक्य पाहिजे. परंतु सर्व हिंदुस्थान देश एकच आहे असें घेतलें तर प्रस्तुतच्या नावलकारांच्या लिहिण्यास फारसा दोष येत नाहीं.

२. नावलांमध्यें अशा गोष्टी असाव्या कीं, त्या वाचल्या असतां वाचणारां-मध्यें विशेष दया, माया, स्नेह, प्रीति, शौर्य, धैर्य, औदार्य वगैरे गुण उत्पन्न होतील. पुराणादिकांच्या श्रवणापासून अंशतः हे गुण वृद्धिंगत होतात ह्यांत संशय नाहीं. परंतु अर्वाचीन नावलांमध्यें जागोजाग शृंगार फार व शोक फार. शृंगाररसाच्या योगानें कांहीं प्रीतीचें बीज पेरलें जात असेल खरें, परंतु शोक अतिशय, त्यामुळें जगताविषयीं औदासिन्य फार उत्पन्न होतें. प्रत्येक प्रस्तुतचें नावल संकटांचा सागर आहे. एकावर एक संकटें येतात व वाचणाराचें अंतःकरण खिन्न होतें. जागोजाग संकटांचें वर्णन तर असें हृदयवेधक केलें आहे कीं वाचणाराचें हृदय फुटून त्यांतील द्रवाच्या डोळ्यांवाटे धारा चालतात. मुक्तमालेच्या असंख्य

संकटांनीं किती स्त्रियांच्या व तरुणांच्या सुकुमार हृदयांस घरें पडलीं असतील ! मंजुघोषेला किती असह्य दुःखांत घातलें आहे ! रत्नप्रभेला दुःखांत टाकल्यामुळें किती वाचकांस वाईट वाटत असेल ! विचित्रपुरींतील पद्मनयनेला किती संकटाच्या राशी भोगाव्या लागल्या ! अशीं संकटें वाचतां वाचतां वाचकांस पुस्तक खालीं ठेवावें लागतें; डोळ्यांतले अश्रु पुसावे लागतात व कधीं कधीं खेद अतिशय झाल्याकारणानें गोष्ट सोडून द्यावी लागते. घरांत सर्व प्रकारची स्वस्थता असतां, सुखासनीं बसलें असतां ह्या कल्पित संकटांनीं आपला जीव किती अस्वस्थ होतो. कित्येक म्हणतील अश्या अस्वस्थतेमध्येंच सुख आहे. 'सुखमध्यें स्थितं दुःखं दुःखमध्यें स्थितं सुखं.' खरें सुख म्हणजे दुःखाचा अभाव. जितक्या दुःखाच्या कल्पना करवतील तितक्या कराव्या, कारण दुःखविमोचन झालें म्हणजेच सुख होतें. विक्रमोर्वशी नाटकांत म्हटलें आहे कीं—

'यदेवोपनतं दुःखात्सुखं तद्रसवन्तरम्
तप्तस्यहि तरुच्छाया निर्वाणाय विशेषतः'

अर्थ—जें सुख दुःखानंतर प्राप्त होतें तें विशेष गोड लागतें; कारण, उन्हांत तापला असेल त्यासच झाडाची थंडगार सावली अधिक सुखावह होते. परंतु पोळलेल्यास पोळवूं नये. डागावर डाग देऊं नये. एक डाग दिलेल्या जागीं दुसरा डाग दिला असतां व्रण होऊन मांस सडतें. तसें एक दुःख संपलें नाहीं तोंच दुसरें संकट घातलें म्हणजे मनास फार खेद होतो. ईश्वराच्या घरीं असा न्याय नाहीं. मुक्तमाला व मोचनगडांतील गंगू ह्यासारिख्या साध्वी स्त्रियांना पृथ्वीवर इतकीं संकटें कधीं ही प्राप्त झालीं नाहींत. अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा व दमयंती ह्यांस अशी विपत्ति कधीं आली होती काय ? सीतेस रावणराक्षस घेऊन गेला ह्या पलीकडे वाल्मीकीनें सीतेचे हाल केले नाहींत. त्या नंतर पुनः एकदां तिला आरण्यांत टाकिली, पण ऋषीच्या आश्रमीं तिला नेऊन ठेविलें. सभेंत आणून द्रौपदीचें केशाकर्षण करून तिला नग्न करण्याविषयीं दुःशासनानें प्रयत्न केला. परंतु अत्यंत दुःखग्रस्त होऊन तिनें मोठ्यानें हंबरडा फोडला:—

'हे कृष्ण द्वारकावासिन् क्वासि यादवनंदन'
'इमामवस्थां संप्राप्तां किं न रक्षसि माधव'

ही आरोळी द्वारकेस ऐकूं जाऊन, श्रीकृष्णानें अनंत हस्तांनीं तिला भरजरी शालू, पाटाव, पैठण्या हीं एकावर एक नेसवलीं. ह्या प्रमाणें द्रौपदीवरचें माहान अरिष्ट जुन्या कवींनीं कसें टाळलें आहे व त्यामुळें त्या कथा वाचणाऱ्या पतिव्रता स्त्रियांस किती आधार येत असेल. परमेश्वर सदा जवळच आहे, व तो

अचिंत्य कल्पनेच्या बाहेरच्या उपायांनीं संकटसमयीं आपल्यास सोडवील, असें म्हणण्या पासून अज्ञानांच्या जीवाला मोठा आधार असतो. विद्वानांना तीं विलक्षण संकटें खरीं वाटत नाहींत. असो. कोणावर संकटांच्या राशी आणून वाचणारांस दुःख देणें हें सर्वथैव अश्लाघ्य आहे. अनेक संकटें ऐकवून अंतःकरणें दीन व खिन्न करणें ह्यापेक्षां पुष्कळ उत्साहाच्या, शौर्याच्या, धैर्याच्या, प्रौढीच्या, औदार्याच्या गोष्टी सांगून लोकांस जरा उल्हासित करावें हें बरें.

३. नावलामध्यें ह्या सृष्टीचें नैसर्गिक स्वरूपांचे वर्णन असावें. कांहीं वृत्तांत-भाग कमजास्त असला अथवा पुरुष विशेषांचीं नांवे खोटीं असली, किंवा पुरुष कल्पित असले तरी चिंता नाहीं. परंतु त्यांच्या संबंधानें जी गोष्ट सांगितली असेल ती खरी कोठें तरी झालेली असावी. झालेली नसेल तर संभाव्य व खऱ्या सारखी भासणारी तरी असावी. केवळ अज्ञान लोकांकरिता असेल तर, अद्भुतांचें मिश्रण असलें तरी चालेल, असें पूर्वीं सुचविलेंच आहे. पण इतःपर जीं नावलें होतील त्यांत खऱ्या व संभाव्य गोष्टीच नावलकार घालतील तरच त्यांचीं पुष्कळ बुकें विकून मोठा फायदा होईल. अमुक काळीं अमुक चमत्कारिक गोष्टी झाल्या त्यांचें खरें स्वरूप मनोरंजक रीतीनें वर्णिलें असतां त्याविषयीं चिरकाळ लोकांची अभिरूची राहते. जें सुंदर स्वरूप पृथ्वीवर सांपडण्याचा संभव आहे त्याचेंच वर्णन करावें. जी निष्ठुरता, जें धैर्य, जें साहस, जो मत्सर, जी प्रीति, जी दया मनुष्याच्या हातून होण्यासारखी आहे तीचेंच वर्णन करावें. आकाश, डोंगर, पहाड, झाडी, नद्या, गुहा, दरे, मैदानें ह्यांचे जसेंच्या तसेंच वर्णन केलें पाहिजे. मनुष्यांच्या वर्णनांत देखील कांहीं एक उर्णें अधिक असतां कामानये. ज्या काळाच्या व ज्या स्थळाच्या संबंधानें नावल लिहिणें असेल त्या काळीं त्या स्थळीं जशी माणसें असतील, तशींच नावलांत दाखवलीं पाहिजेत. त्यांचा पोषाक, त्यांची चाळचलणूक, त्यांच्या कल्पना जशाच्या तशा उभ्या केल्या पाहिजेत. नावलांमध्यें हलक्या जातीचे व मध्यम प्रकारचे लोक जितके जास्त घालावे, तितका वर्णनांत स्वाभाविकपणा जास्त येतो असें डिकेन्स वगैरे आलीकडील विलायती नावल-कारांचें मत आहे. ते म्हणतात कीं श्रीमंत लोकांमध्यें कपटें फार व कृत्रिमाचें वर्त्तन फार त्या मुळें त्यांच्या खऱ्या भावना लोकांना समजत नाहींत, व भलत्याच पुरुषावर भलता गुण स्थापित करण्याचा विशेष संभव असतो. हें विलायती नावलें लिहिणारांचें मत खरें आहे असें आम्हांस वाटत नाहीं; कारण चोप-दारांच्या ललकाऱ्या, भालदारांची बडेजाव, थाटमाट, डामडौल, व मोठेपणाचा दिमाक ह्या खालीं सर्व लोक दिपून जातात, व त्यांचें खरें स्वरूप समजत नाहीं हें खरें; परंतु धैर्य शौर्यादि मोठमोठे गुण मोठ्या लोकांशिवाय इतरांत विरळा सांपडतात. बडे लोकांचें खरें स्वरूप थाटमाटांत लपलेलें असतें तरी कवींना

हृदयांत शिरून आंतलें बाहेर काढण्याची विलक्षण शक्ति असते, म्हणून खऱ्या स्वाभाविक स्थितीचें वर्णन अवश्य असेल तर त्यांतून श्रीमंत लोक त्याज्य आहेत असें आम्हांस वाटत नाहीं. आणखी मध्यम प्रतीचे लोकांचीं व हलकट लोकांचींच वर्णनें लिहिलीं तर तीं ही हलकटच होतील. त्यांत खरें वीर्य, गांभीर्य ह्यांचा लवलेश सांपडणार नाहीं. रांडा कळवंतिणींच्या मस्कऱ्या व उखाळ्या पाखाळ्या, चोरांची लुच्चेगिरीचीं भाषणें ह्यांत काय मौज आहे? अशी मौज पहावयाची असली तर मुंबईत एक दिवशीं मध्यान रात्रीं रस्त्यांतून फिरावें म्हणजे हवी तितकी दृष्टीस पडेल.

एवढ्याकरितां हलकट लोकांचें फारसें वर्णन नको; व श्रीमंत लोकांच्या थाटमाटाच्या वर्णना पासूनही नेहमीं आनंद होणार नाहीं. बायको नवऱ्याकडे गेली कीं, हंड्या झुंबरांची गर्दी, पराच्या गाद्या, मखमली रुजामे, त्यावर डाक्याच्या मलमलीचे सरपोष, किनखापी पडदे, खिडक्यांना भरजरी पडदे, त्याना गोंड्यासकट रेशमी दोऱ्या, जागोजाग सुंदर चित्रें व तस्बिरा, अयन्याच्या भिंती, बुटीदार छत, त्यांजवर झालरी, जडावाचें विड्याचें तबक, त्यांत चौफुला, अत्तरदाणी, गुलाबदाणी, चतुर्दशगुणी तयार केलेले गोविंद-विडे, चित्रविचित्र विंझणवारे, दिव्यांचा थाट, मेवा मिठाईचा लाट, व अत्तरांचा घमघमाट आणि मंद सुगंध शीतल वाऱ्याची लकेर, इतकें साहित्य बरोबर असावयाचेंच व जितके वेळ भेटीचा प्रसंग येईल तितके वेळ हेंच कांहीं हेरफेरानें बरोबर जावयाचें. त्याचें वर्णन वारंवार वाचण्यास वाचणारांचा कल होत असेल असें आम्हांस वाटत नाहीं. म्हणून सर्वकाळ श्रीमंती थाटाचें वर्णन असावें असेंही आम्हांस वाटत नाहीं. तात्पर्य जें खरें स्वरूप असेल तेंच जागो-जाग वर्णिलें पाहिजे.

४. नावलामध्यें कामक्रोधादि मनोद्वेगाचे जे वरचेवर मासले दाखवावे लागतात, ते सर्व मनुष्यजातीमध्यें ज्या सामान्य चिन्हांनीं त्यांचें प्रदर्शन होतें त्या सामान्य चिन्हांनीं दाखवावे. कुंदकलीप्रमाणें दांत, चंपाकलीप्रमाणें नाक, दांतांच्या फटीमधून दांतवणीची काळी रेघ अश्या एकदेशीय चिन्हांनीं स्वरूपाची प्रतिमा अंतःकरणांत उभी रहात नाहीं. लग्नसमारंभांत अथवा दुसऱ्या समारंभांत सांप्रदायिक गोष्टीचा फारसा उल्लेख कामाचा नाहीं, कारण ज्यांस ते सांप्रदाय माहित नसतात त्यांस त्या गोष्टी समजेनाशा होतात व त्यांपासून त्यांस आनंद होत नाहीं. तात्पर्य, कोणाच्याही विशेष गोष्टीचें फारसें वर्णन कामाचें नाहीं. प्रत्येक देशांत व प्रत्येक लोकांत पैराव निरनिराळे व चाली रीति निर-

निराळ्या असतात; परंतु आत्मा सर्वांचा एकच आहे. म्हणून आकृतीचें वर्णन करितांना आत्म्याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे.

वर सांगितलेले चार धर्म नावलामध्यें मुख्यत्वें असावे व असे धर्म असले म्हणजे नावलें फार उपयोगी ग्रंथ होतील. त्यांतून खऱ्या पुरुषांचा वृत्तांत असला तर फार उत्तम. इतिहासकारांची माहिती व कवींची कल्पना हीं एकत्र होऊन नावल रूपी ग्रंथ केले असतां किती फायदा होतो ! वृत्तांतांमध्यें लांबलचकपणा व कंटाळवाणेपणा असतो त्याचें कारण ज्या बारीक बारीक गोष्टी, त्या टाकून घेऊन मुख्य मुख्य ठळक गोष्टी घेऊन कल्पनेच्या तिखट मिठानें नावलरूपी ग्रंथ किती मिष्ट होतील !

नावलरूपी ग्रंथांना खालीं लिहिलेले गुणही अवश्य आहेत.

ज्यापासून वाचकांस उत्तेजन येईल व समाधान वाटेल असा विषय पाहिजे. नावल वाचित असतां वाचक उत्तेजनाची वाटच पाहत असतात. कांहीं विजातीय रीतीनें परस्परांची भेट, कांहीं अनपेक्षित लाभ, फसणूक, फजीती, घातपात, साहस, शौर्यकृत्य, विघ्न अथवा महासंकट यांपासून वाचकांस एक प्रकारचा आवेश येतो; त्याची त्यांस फार आवड असते. परंतु एकंदर विषय मनोवेधक असला पाहिजे, नाहीं तर वरील गोष्टींपासून फारसा आवेश येत नाहीं. अरबी सुरस गोष्टींतील अद्भुत गोष्टींनीं विद्वानांचें फारसें समाधान होत नाहीं; कारण त्यांच्या खरेपणाविषयीं भरवंसा नसतो व त्यामुळें त्यांत आस्ता लागत नाहीं. गोष्टी नव्या नव्या असाव्यात म्हणजे आनंद होतो. म्हणून देशोदेशच्या गोष्टी आणून नावलांत भराव्या असा एकादा समज होईल; परंतु नव्या नव्याच गोष्टी पाहिजेत असें आम्हांस वाटत नाहीं. कानोकानीं शिवाजीच्या गोष्टी ऐकिल्या, लिहिलेल्या बखरी पाहिल्या, मराठ्यांची बखर वाचली, कविताबद्ध शिवाजीची कहाणी वाचली तरी शिवाजी विषयीं नावल लिहितील, तर ते उड्या टाकून घेतील. कारण आपल्या देशांत जे वीर होऊन गेले त्यांविषयीं आपल्या मनांत फार बहुमान असतो व प्रीति असते, हें देशाभिमानाचें महात्म्य. आमची आजी ९० वर्षांची होऊन मेली व तेवढ्या काळांत तिनें अठरा वेळा भारत व भागवत हीं पुराणें ऐकिलीं तरी नेहमीं पुराण ऐकावयास जात असे. ह्याचें कारण ग्रंथांची थोरी. इंग्रजीमध्यें सर वाल्टर स्काटची ऐवेनो, आबट, केनिल्वर्थ नांवाचीं नावलें आहेत. त्यांतील विषय असाच उत्तेजक व आनंददायक आहे. इंग्लंडाच्या इतिहासांतील प्रसिद्ध पुरुषांचीं त्यांत वर्णनें दिलीं आहेत. नार्मन लोकांचा अतोनात जुलूम, साक्सन लोकांचा स्वतंत्र होण्याविषयीं विलक्षण

आवेश, स्त्रियांविषयीं अत्यंत बहुमान, मेरी क्वीन अफ स्काटस हिची संशयोत्पादक वर्तणूक व तिचीं अनेक दुःखें, एलिजाबेथशीं अर्ल अफ लीस्टर ह्याचा स्नेह हीं प्रत्येक इंग्लंदांतील मनुष्याच्या हृदयाला भिनलीं आहेत. आपल्या देशांत असे विषय काय थोडे आहेत? मुसलमानी राज्यांत अनेक शूर पुरुष होऊन गेले. सातारचे राजे, पुण्याचे पेशवे, पेशव्यांच्या पदरचे सरदार, सावंतवाडीचे सावंत, पवार, गायकवाड, शिंदे, होळकर, जोधपूर जयपूरचे राजे इत्यादि काय थोडे वर्णनायोग्य लोक आहेत? हे आलीकडचे लोक अल्प वाटत असले तर पुरातन काळचे अनेक वंशांतील अनेक राजे आहेत. त्यांच्या चरित्रांचा शोध करून त्यां विषयीं कां नावलें लिहूं नयेत? सांप्रतचीं सर्व नावलें विषयांच्या दुर्बळतेमुळें फार लवकर मार्गे पडतील. मोठ्या जुलुमानें तीं एकवार वाचतात, परंतु पुन्हां वाचण्याची इच्छा होत नाहीं. ह्याचें कारण त्यांतील गोष्टीविषयीं आपल्या मनामध्यें कोणच्याही प्रकारचा सन्मान नाहीं.

नावलांमध्यें किंवा तत्समान ग्रंथांत फारसें पांडित्य, शब्द लालित्य अथवा फारशी विद्वत्ता हीं कामाचीं नाहींत. मंजुघोषेंत एके ठिकाणीं आहे "वसंतासही संतत उसंत देणारी व-सं-त-मा-ध-व हीं सहा अक्षरें तिचें करण (कर्ण) रंध्रद्वारें शिरून आंतील शुद्धिकंदास जागृत अवस्था देती झाली." ह्या वाक्याचा एकाएकी कोणासही अर्थ समजणार नाहीं. एक स्वनाचे शब्द पाहून एकत्र घातले आहेत. त्यांतून फारसा आशयही निघत नाहीं. शुद्धिकंद म्हणजे काय? शुद्धि म्हणजे मूळ अर्थ स्वच्छता, प्राकृतांत शुद्धि म्हणजे हुशारी घेतात. स्वच्छतेचा अथवा हुशारीचा कांदा म्हणजे काय? व त्याला जागृत अवस्था म्हणजे काय? ह्याचें सौरस्य आमच्या अंतःकरण 'कंदांत' येत नाहीं. अशीं वाक्यें निवडलीं तर अनेक निघतील व विस्तार होईल ह्याकरितां फारसें शब्दलालित्य असूं नये असें आमचें दिग्दर्शन आहे.

गोष्ट फार साधी असावी; त्यांत फार आढेवेढे नसावे. विचित्रपुरी नावलांत व हल्लींच्या बहुतेक नावलांत संविधानकामध्यें गुंतागुंत फार, त्यामुळें त्यांतील गोष्ट समजत नाहीं व समजली तर ध्यानांत राहत नाहीं. सुलोचना व माधव ह्यांतील गोष्ट बरीच सुलभ आहे. इंग्रजींतील उत्तम नावलें ऐवेनो, आबट, केनिल्वर्थ, क्वेन्टिन डर्वर्ड ह्यांतील गोष्टी फार साध्या आहेत व सहज लक्षांत राहण्याजोग्या आहेत. ज्या गोष्टी लोकांच्या तोंडीं फार, त्यांच्या संबंधानें नावल लिहिलें तर त्याची गोष्ट वाचकांस समजते व त्यांच्या अंतःकरणांस आल्हाद देते.

ह्याप्रमाणें नावलाचे मुख्यमुख्य गुण जे आमच्या लक्षांत आले ते आम्हीं सांगितलें. त्यांत कांहीं सांगावयाचे राहिले असले तर त्यांची विद्वानांनीं पूर्ती

करावी. नावलाचें स्वरूप पद्धतवार वर्णिलें नाहीं असें कोणास वाटेल तर त्यांस आमचें इतकेंच सांगणें आहे कीं, अवकाश थोडा व उद्योग फार, त्यापुढें उपाय नाहीं. काळ पुरुषस्वभाव व स्थळ ह्यांचें ऐक्य, वाचकांच्या हृदयांत दया, धैर्य, शौर्य इत्यादि मनोवृत्ती वृद्धिंगत होतील अश्या गोष्टी, सृष्टींतील नैसर्गिक स्वरूपांचें वर्णन, सर्वसामान्य कामक्रोधादिकांचे मासले, उत्तेजन येईल व समाधान होईल असा विषय, सर्वांस समजण्याजोगे सुलभ शब्द, साधी सोपी गोष्ट इत्यादि गुणांनीं युक्त अशीं नावलें जर आमचे विद्वान् बंधू लिहूं लागतील तर जगतावर मोठे उपकार होतील. आतांशीं नावलांची कीड फार झाली आहे. लहान मुलें बाळें देखील नावलें लिहून पैसे मिळवूं लागलीं आहेत. ज्या थोड्या नावलांचा आम्ही आज उल्लेख केला तीं, आहेत त्यामध्यें, फार उत्तम अशीं आम्ही समजतों; व त्यांचे कर्ते फार विद्वान् अशी आमची पक्की खात्री आहे. परंतु नावलाला अद्याप चांगलें स्वरूप आलें नाहीं असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

• • •

झांशी व झांशीची राणी

शहरासंबंधीं सर्व मौजा पाहिल्या व ऐकल्यावर एके दिवशीं मुहूर्त पाहून सकाळींच भोजन वगैरे आटोपून मोरोपंत तांब्यांचे भेटीस निघालों. वाड्यांत जाऊन पहारेकऱ्याकडून कोणी ब्रह्मावर्तांचे ब्राह्मण भेटीस आले आहेत अशी वर्दी देवविली. परवानगी मिळाल्यावर माडीवर गेलों तो तांब्ये तक्क्याशीं मंडळींसहवर्तमान बसले होते. त्यांनीं काकांस पाहतांच उठून चार पावलें पुढें येऊन त्यांस तक्क्याशीं जागा घेतली. मीहि जवळच बसलों. कुशलवृत्त वगैरे झाल्यावर भेटीचें कारण विचारतां काकांनीं सांगितलें कीं हा ज्येष्ठ बंधूचा ज्येष्ठ पुत्र आहे. कार्यप्रयोजनामुळें पुष्कळ ऋण झालें, याजकरितां त्याजला बरोबर घेऊन आपले भेटीचा हेतु धरून आलों आहे. ग्वाल्हेरीस वैशंपायन यांजकडे बरेच दिवस काढले व तेथें कांहीं दिवस राहून काशीस जाऊं व तेथून घरीं जाऊं, वगैरे बरीच बोलणीं झाल्यावर तांब्यांनीं सरकारचे उपाध्ये लालूभाऊ ढेंकरे यांस भेटण्याविषयीं सांगितलें व मीहि बाईसाहेबांचे कानावर ही गोष्ट घालितों म्हणून म्हणाले. दुसरे प्रहरीं आम्ही लालूभाऊ ढेंकरे यांस भेटावयास गेलों. ब्रह्मावर्तांकडील कोणी विद्वान् ब्राह्मण आले आहेत अशी बातमी त्यांस अगोदरच समजली होती व आम्हांस पाहतांच उठून आमचा आदरसत्कार चांगला केला व आपण स्वस्थ असावें असें आश्वासन दिलें.

शत्रुक्षय व्हावा व राज्य सुरक्षित राहावें या हेतूनें बाईसाहेबांनीं अनेक अनुष्ठानें चालू केलीं होतीं. महालक्ष्मीस रोज नवचंडी सुरू होती. ग्रहांबद्दल जप व दानें चालू होतींच. गणपतीचे देवालयांत रोज अथर्वशीर्षाची सहस्र आवर्तनें होत असत. त्यांतच काम्य ग्रहयज्ञ गृह्यपरिशिष्टोक्त सहस्रपक्ष कुंडमंडपासहित करावा, असा ठराव झाला. सरकारवाड्याजवळ जागा पाहून तेथें विस्तीर्ण छायामंडप टाकून कुंडें, वेदी वगैरेंची सर्व तयारी झाली. काशीहून, ब्रह्मावर्तांहून मोठेमोठे विद्वान् ब्राह्मण बोलाविले होते व रोज होमाकडे शंभर ब्राह्मणांची नेमणूक झाली. मुहूर्तांचे दिवशीं पदरची बाहेरची सर्व मंडळी बसली आहे,

बाईसाहेब स्वत: स्वच्छ वस्त्र परिधान करून दत्तक मुलास घेऊन बसल्या आहेत, वेदशास्त्रसंपन्न भय्या उपासने उत्तम पाटावर बसून देखरेख करीत आहेत, व जवळच मोरोपंत तांब्ये राज्ञीजनक हजर आहेत, अशा थाटानें संकल्पास आरंभ झाला. तो सर्वानुमतें बाईसाहेबांचे नांवानें केला. नंतर नान्दीश्राद्ध सुरू झालें तों त्यांत मुलाचे पितृगणाचा उच्चार करूं लागले. त्या समयीं मजला विचार पडला कीं, मुख्य संकल्प बाईसाहेबांचे नांवाचा, व नान्दीश्राद्ध भलत्याचें होतें हें कसें ? येथें मोठमोठे याज्ञिक, शास्त्री, पंडित बसले आहेत पण कोणी बोलत नाहीं, आपण न बोलावें तर अनुष्ठानांत चूक होत आहे. शिवाय कुचेष्टा केल्याशिवाय प्रतिष्ठा वाढत नाहीं इत्यादि विचार करून गुरूचें स्मरण करून सभेंत बोलण्यास आरंभ केला, " अहो ! किंचित अनुष्ठान बंद करा. मला कांहीं प्रश्न केला पाहिजे. स्त्री वेदाधिकारी नसल्यामुळें पुण्याहवाचनादि कर्मास उपाध्याय प्रतिनिधि असतो म्हणून त्याच्या पितरांचें नान्दीश्राद्ध होईल काय ? मुख्य संकल्पी रावसाहेबांनीं आपले नांवाचा उच्चार केला असता तर ठीकच होतें; परंतु येथें बाईसाहेबांचेच नांवाचा संकल्प झाला आहे, तर त्यांचेच पितरांचें नान्दीश्राद्ध केलें पाहिजे असें मला वाटतें. " हें म्हणणें भय्या उपासने यांस सयुक्तिक वाटलें; परंतु विनायक भटजी याज्ञिकांना रुचलें नाहीं. उगाच बोलून तंटा उत्पन्न करण्यांत कांहीं हांशील नाहीं, ग्रंथाधार पाहिजे, असें म्हणतांच मी मयूख, हेमाद्रि वगैरे ग्रंथांचीं नांवें घेतलीं. ग्रंथ जवळच होते ते आणून पाहतां नान्दीश्राद्ध बाईसाहेबांचे पितरांचें करावें असें सर्वानुमतें ठरलें. तेव्हां मला फार आनंद वाटला. मी दूर बसलों होतों तों मला उपासनेबावांनीं पुढें घेऊन नान्दीश्राद्धांत बाईसाहेबांचा ऊह कसा आणावा असा प्रश्न केला. मीं लागलींच ' गृहयज्ञविधायिन्याः मम मातुः ' असा करावा म्हणून सांगतांच सर्वांनीं माना डोलविल्या. याप्रमाणें त्या सभेंत जय मिळाल्यावर उपासनेबोवांनीं माझे अंगावर पोथी टाकून मजला सदस्याचा वर्ण दिला. मीहि गुरुकृपेंकरून एक चुकी न होऊं देतां कर्म चालवून चवथे दिवशीं पूर्णाहुति देऊन समाप्त केलें. अनुष्ठानासंबंधें दररोज ब्राह्मणभोजन होत होतें व चवथे दिवशीं मुक्तद्वार होतें. सर्व ब्राह्मणांस दक्षिणा, बक्षिसें वांटलीं. त्यांत मला बारा रुपयांचा धोतरजोडा व वीस रुपयांचें पागोटें बक्षीस मिळालें. बाईसाहेबांची व काकांची ओळख पटून बरेंच बोलणें झालें. त्यांत त्यांनीं असें म्हणून दाखविलें कीं, तुमचा मुलगा चांगला विद्वान् आहे व तो येथेंच राजाश्रयानें राहील तर बरें. त्याजवर काकांनीं उत्तर केलें कीं, याकरितांच मी त्याजला घेऊन सरकारचे भेटीस आलों आहे. त्याजवर कांहीं दिवसांनीं सप्तशतीस पल्लव लावून शतचंडीचें अनुष्ठान करावें

असा बेत झाला. सर्व तयारी होऊन मुहूर्त पाहून किल्ल्यांत एक मोठी जागा पाहून तेथें घटस्थापना केली. चवदा ब्राह्मण मूळमंत्रजपाकडे बसविले. प्रत्येकाचे समोर तुपाची समई, एक अगरबत्ती व सुवासिक पुष्पें ठेविलीं असत व त्या दिवसास क्षिप्राभोजन व रात्रौ फराळ असा बेत होता. याप्रमाणें अनुष्ठान झाल्यावर व त्यांतहि शाबासकी मिळाल्यावर मार्गशीर्ष शुद्ध ५ चे दिवशीं बाईसाहेबांनीं आम्हांस किल्ल्यांत बोलावून नेऊन हुकूम केला कीं, आजपासून उभयतां शहरचे वाड्यांत बिऱ्हाड आणावें. येथें कारकून तुम्हांस चीजवस्तु देऊन सर्व बंदोबस्त ठेवील. तूर्त तुम्हांस तीस रुपये दरमहा मिळेल. याप्रमाणें हुकूम होतांच मांडवगणे यांस मजकूर निवेदन करून दुसरे दिवस बिऱ्हाड सरकारी वाड्यांत नेलें. तेथें सर्व प्रकारची उत्तम रीतीची सोय होऊन वस्त्रप्रावर्णें उंची उंची वापरावयास मिळून आम्ही आनंदानें राहूं लागलों. मोठमोठाल्या आश्रित मंडळींच्या ओळखी झाल्या व अब्रूहि वाढली. पुढें थोडक्याच दिवसांनीं मजला बाईसाहेबांनीं किल्ल्यांत हुजूर आश्रितांत घेतलें, तेव्हांपासून तर आमचा फारच बडिजाव झाला. नेहमीं रेशीमकांठी धोतरें नेसावयास, शालजोडी पांघरावयास, उत्तम पागोटें डोकीस घालावयास मिळत असे. एके दिवशीं बाईसाहेबांनीं मला शालजोडीशिवाय फिरतांना पाहिलें. तेव्हां मला संध्याकाळीं समक्ष बोलावून जरीकांठी हिरवी शाल बक्षीस दिली. बाईसाहेबांस शेंकडों नजराणे येत. ते सर्व आश्रित मंडळीचे फायद्यावर पडत. आमचें महत्त्वहि फार वाढलें. महालक्ष्मीचे देवालयांत ब्राह्मण सहस्रभोजनें चार झालीं. वाकनीस नेमून चार आणे दक्षिणा व मोतीचूर पक्वान्न असा ठराव करून कंत्राट दिलें होतें. प्रतिदिवशीं अकरा वाजतां कोणी तरी पाळीप्रमाणें पीताम्बर नेसून रुप्याची पळीपंचपात्री घेऊन महालक्ष्मीस जावें; नंतर उपाध्यांनीं उदक सोडल्यावर भात, भाज्या, कोशिंबिरी, पक्वान्न यांची चौकशी करून मग किल्ल्यांत परत यावें. याप्रमाणें मीहि दोनचारदां गेलों होतों. अशीं अनेक सुखें भोगीत, बाईसाहेबांचें सन्निध राहूं लागलों व दरबारासंबंधें व राज्यसंबंधें सर्व प्रकारची माहिती झाली.

बाईसाहेबांचा नित्यक्रम येणेंप्रमाणें होता. त्यांस शरीराचा षोक लहानपणापासून होता तो त्यांनीं स्वतंत्रता मिळाल्यावर पूर्ण केला. पहाटेस उठून कसरतशाळेंत जाऊन जोर, जोडी, मलखांब करावा; नंतर घोड्यावर बसून फिरावयास जावें व घोडा मंडळावर धरावा, कुंपणावरून उडवावा, खंदकाचे पार घालवावा, एकदम खालीं बसवावा इत्यादि नाना प्रकारच्या घोड्याच्या कसरती कराव्या. कधीं कधीं हत्तीवरहि बसत असत. याप्रमाणें सातआठ वाजेपर्यंत मेहनत झाल्यावर नेहमीं खुराक खात असत. नंतर तासभर कधीं निजत असत. कधीं तशाच स्नानास जात. स्नानाविषयीं बाईसाहेब फार हौशी असत. नेहमीं

पंधरावीस हांडे कडकडीत पाणी लागत असे. दर आठ दिवसांनीं नाहाणाचे दिवशीं सुवासिक द्रव्यानें स्नान इतका वेळ करीत असत कीं, स्नानाचें पाणी नळानें बाहेर स्वच्छ कुंडांत सोडलें होतें, तेथें पुष्कळ बायकांचें नाहाण होत असे. स्नान झाल्यावर स्वच्छ पांढरें चंदेरी पातळ वस्त्र परिधान करून आसनारूढ होऊन भस्म धारण करीत. प्रथम पतिमरणानंतर केस राखण्याबद्दल तीन कृच्छ्रें प्रायश्चित्त आहे, त्याचें उदक सोडून नंतर रुप्याचे तुळशीवृंदावनांत तुळशीची पूजा करीत असत; नंतर श्रीपार्थिवलिंगपूजेस आरंभ होत असे. त्या समयीं सरकारी गवई गात असत; पुराणिकाचें पुराणहि त्यांत सुरू असे व सरदार व आश्रित लोकांचे मुजरे होत असत. परंतु बाईसाहेबांचें लक्ष चोहोंकडे सारखें असे. जर एखादे दिवशीं दीडशें मुजरे करणारांपैकीं कोणी आला नाहीं तर दुसरे दिवशीं काल आपण कां आला नाहीं ही चौकशी झाल्याशिवाय राहात नसे. याप्रमाणें बारा वाजावयाचे सुमारास देवार्चन आटोपून जेवण होत असे. नंतर कांहीं वेळ इकडे तीकडे काढल्यावर कधीं वामकुक्षी झाल्यावर सकाळीं आलेले नजराणे रुप्याचे ताटांत रेशमी वस्त्रांनीं आच्छादून ठेवले असत ते आपले समोर आणून मनास आवडतील ते पदार्थ ग्रहण करून बाकीचे आश्रित मंडळीकरितां कोठी-वाल्याचे स्वाधीन करीत. तीन वाजावयाचे सुमारास कचेरीस जात असत. त्या वेळेस कधीं पुरुषवेष धारण करीत. पायांत पायजमा अंगांत जांभळे आंबव्याची बंडी, डोकीस टोपी घालून वर पागोट्यासारखी बांधलेली बत्ती, कमरेस काच्या किंवा जरीचा दुपेटा व त्यात लटकावलेली तरवार या प्रकारच्या पोषाखानें ती गौरवर्ण, उंच मूर्ति गौरीप्रमाणें दिसत असे. कधीं बायकांचा पेहराव असे; परंतु पतिमरणानंतर नथ वगैरे अलंकार बिलकुल घातले नाहींत; फक्त हातांत सोन्याच्या बांगड्या व गोठ, गळ्यांत एक मोत्यांचें पेंडें व अनामिकेंत एक हिऱ्याची आंगठी याशिवाय दुसरे अलंकार आम्हां बाईसाहेबांचे अंगावर कधींच पाहिले नाहींत. केसांचा नेहमीं बुचडा बांधलेला असे व नेसावयास पांढरा शालू व अंगांत स्वच्छ पांढरी चोळी असे. याप्रमाणें कधीं पुरुषवेषानें तर कधीं स्त्री-वेषानें दरबारांत येऊन, एक खोलीसारखी पडतपोशीची जागा व त्याच्या दर-वाजास बाहेरून सोनेरी मेहरब होती. त्या दरवाजाचे आंत गादी घालून सरपोस घातलेल्या जाग्यावर लोडाशीं टेकून बसावें. दरवाजाचे बाहेर दोन भालदार रुप्याची काठी घेऊन हजर असत. समोर राजेश्री लक्ष्मणराव दिवाणजी कंबर बांधून हातांत कागदांचें पुडकें घेऊन उभा असे व पलीकडे हुजूरच सातआठ कारकून बसलेले असत. लक्ष्मणराव जातीचा देशस्थ ब्राह्मण होता. तो अगदीं अक्षरशत्रु असे. त्यास लिहितां किंवा वाचतां बिलकूल येत नसे; परंतु तोंडची पाटिलकी करणारा मात्र फार हुषार होता. एखादें पत्र वाचा किंवा लिहा म्हटलें

म्हणजे लागलींच आपल्या हाताखालच्या कारकुनाकडे नजर. कचेरींत सर्व दिवाणी, फौजदारी, मुलकी कामें होत असत. बाईसाहेब बुद्धीच्या फार चपळ असल्यामुळें हकीकत तावडतोब समजून भराभर हुकूम सांगत असत. कधीं स्वतः लिहितां वाचतां येत असल्यामुळें मजकूर जुळवून आपण हुकूम लिहीत असत. बाईसाहेब न्यायाचे कामांत फार दक्ष व कडक होत्या व अपराध्यांस कधीं कधीं स्वतः छडी घेऊन शिक्षा करीत. दर शुक्रवारीं व मंगळवारीं सर्व स्वारी तयार करवून मुलास बरोबर घेऊन संध्याकाळीं महालक्ष्मीचे दर्शनास जाण्याचा नियम होता.

लक्ष्मीबाईचे स्वारीसारखा थाट आतां पुन्हां नजरेस पडणार नाहीं. बाईसाहेब कधीं मेण्यांत व कधीं घोड्यावरून दर्शनास जात. मेण्यावर किनखापी कापडास जरीनें बांधलेले चिकाचे पडदे असल्यामुळें मेणा फारच सुशोभित असे. कधीं स्वारी स्त्रीवेषानें असे. त्या वेळेस पांढरें पातळ नेसून जुजबी मोत्यांचे दागिने अंगावर असत. पुरुषवेषानें असल्यास अंगांत आंबव्याची बंडी असून पायांत पायजमा, डोकीस टोपी व टोपीवरून भरजरी पागोट्याची बत्ती बांधलेली असून पाठीवर बत्तीचा पदर जरीचा लोळत असे. तो फार मनोहर दिसे. अशी स्वारी मेण्यांत बसून मेणा झरझर चालवीत असतां मेण्याचे खूर धरून दोन किंवा चार सुंदर दासी दवडत असत. या दासी लहानपणापासून याच कामाकरितां बाळगलेल्या असत. दक्षिणेंतून लहानपणीं सुरेख कुणब्याच्या मुली विकत आणून त्यांस उत्तम खावयास घालून १५-१६ वर्षांचे सुमारास या कामावर नेमीत. त्या अविवाहित असल्यामुळें तारुण्यमदानें रसरसलेल्या असत. पांच-सहा वर्षें काम केल्यावर बहुतकरून त्या रतीसारख्या सुंदर दासी एखाद्या लुच्च्याच्या नादास भुलून फसून जात व एकदां त्या गर्भार राहिल्या म्हणजे या कामावरून दूर होऊन त्यांची गणना कुळंबिणींत होत असे. त्यांनीं जामदारखान्यांत जाऊन सोनें, मोतीं, हिरे यांचे दागिने नखशिखान्त घालून, भरजरीच्या चोळ्या घालून हिरव्या, तांबड्या, भस्मी रंगाच्या पैठण्या नेसाव्या, पायांत मोठमोठे तोडे घालून तांबडे लाल नवे उत्तम चर्मी जोडे घालावे, कधीं लुगड्याची कांस मारावी आणि एका हातांत रुप्याचे किंवा सोन्याचे दांड्याची चवरी घेऊन एक हात मेण्याचे दारास लावून मेण्याबरोबर दवडावें. तेव्हां त्या अविवाहित सुंदर सिंहकटी सर्वालंकारयुक्त दासींकडे कोणाची टक लागत नसे. स्वारीपुढें डंका निशाण असून रणवाद्यें हलके वाजत. निशाणामागून सुमारें दोनशें विलायती लोक असत व मागें पुढें सुमारें शंभर स्वार असत. स्वारी निघण्याची वेळ झाली म्हणजे बाईसाहेब दोघींस किंवा चौघींस बरोबर येण्याविषयीं हुकूम करीत. मग

मेण्याबरोबर घोड्यांवर कारभारी, मुत्सद्दी, मानकरी, भय्यासाहेब उपासने कांहीं आश्रित मंडळी असत. बरोबर शिबंदीचे लोकहि असत.

याप्रमाणें थाटानें शिंगें, कर्णे वाजत, बंदुकीचे शेंकडों आवाज काढीत, स्वारी किल्ल्याचे बाहेर पडली म्हणजे किल्ल्याचे बुरुजावरील चौघडा सुरू होई. तो स्वारी परत येईपर्यंत वाजत असे व तसाच महालक्ष्मीचे देवालयाचे नगारखान्यांतील चौघडा सुरू होत असे. किल्ल्यांतून निघून भर बाजारांतून महालक्ष्मीस स्वारी जाऊन परत येत असे. कधीं कधीं सडी स्वारी घोड्यावरून जाई त्या वेळेस दासी, आश्रित, कारकून, पायदळ वगैरे कोणी बरोबर नसत. फक्त घोडेस्वार व विलायती लोक असत. स्वारी परत येतांना रात्र झाली तर मशाली पेटवीत; परंतु घोड्यावर स्वारी असल्यास मशाली न लावितां दवडत दवडत किल्ल्यांत परत येत.

बाईसाहेबांची आश्रित मंडळीवर फार श्रद्धा असे. त्यांस खायाप्यायास चांगलें मिळावें, कपडेलत्ते चांगले असावे, त्यांस सर्व प्रकारचें सुख असावें याजविषयीं त्यांची फार दक्ष नजर असे. त्यांस सर्व गुणांची परीक्षा असून चहा असे. जवळ मोटमोठाले शास्त्री, विद्वान्, वैदिक, याज्ञिक होते व वडिलोपार्जित किरत्याप्रमाणें पुस्तकांचा संग्रह फार अमोलिक केला होता. चांगले पुराणिक, गवई, सतार वाजविणारे वगैरे लोक, निरनिराळ्या कसबाचे नामांकित कारागीर त्यांच्या पदरीं होते. बाईसाहेब स्वतः फार निष्कपट व निर्मल वृत्तीनें राहात असत तरी त्यांस सर्व प्रकारची हौस असे. कोणी उत्तम गवई आल्यास त्याचें गाणें करून बिदागी पोंचविल्यावांचून राहात नसत. शिमग्यांत रंगाचा खेळ चांगला होत असे. दत्तकपुत्र रावसाहेब यांचे स्वारीबरोबर मी त्या वर्षाचे शिमग्यांत शहरांत गेलों होतों. जागोजाग मुत्सद्दी लोकांकडे पानसुपारी होऊन रंग खेळून पुन्हां किल्ल्यांत परत आलों. त्याच दिवसांत ग्वाल्हेरीस कोंकणची नाटक मंडळी सुमारें पन्नास आली होती, त्यांस शहरांतल्या लोकांनीं पत्र पाठवून झांशीस बोलावून आणविलें. त्यांचे खेळ शहरांत पुष्कळ झाले. तेव्हां बाईसाहेबांनीं त्यांस सरकारांतून शिधा चालू करवून किल्ल्यांत पुष्कळ नाटकें करविलीं. एकदां हरिश्चंद्राचें आख्यान झालें त्या वेळेस सदोबा नाटकवाला यानें विचारिलें कीं, या नाटकांत डोंबाचे घरीं हरिश्चंद्राचे डोक्यावर मडकें फोडावें लागतें. तर त्याजबद्दल परवानगी असल्यास मडकें आणवून फोडीन. त्यावर विचार होऊन बाईसाहेबांनीं परवानगी दिली, परंतु जेव्हां नाटकांत बैठकीवर घागर फोडली तेव्हांच वृद्ध मंडळी बसली होती त्यांस हा अपशकुन आहे असा चरका बसला. नाटकें फार सुरेख होत असत. नाटकवाल्यांस संध्याकाळ

किल्ल्यांत घेऊन सर्व सरकारी खजिना त्यांचेंपुढें मोकळा ठेविला असे. मग खरे हिऱ्याचे अलंकार व जरीचीं वस्त्रें मिळाल्यावर पात्रें कां खुलणार नाहींत? नाटक झाल्यावर सर्वांचा झाडा घेऊन नंतर किल्ल्याबाहेर पाठवीत असत. कांहीं नाटकें झाल्यावर दोनतीन नाटकें दरबारच्या मंडळींच्या बायका बोलावून त्यांस दाखविलीं. शेवटीं नाटकवाल्यांस एक मेजवानी करून विदागी देऊन रवाना केलें. कोणास पागोटीं कोणास धोतरजोडे दिले व सदोबा मॅनेजर यास रोख चार हजार रुपये दिले.

बाईसाहेबांस अश्वपरीक्षा चांगली होती. उत्तर हिंदुस्थानांत त्या वेळेस तिघांचें नांव गाजत असे. एक नानासाहेब पेशवे, एक बाबासाहेब आपटे ग्वाल्हेरीकर व एक लक्ष्मीबाई झांशीवाली. एके दिवशीं एक सौदागर फार देखणे व चलाख दोन घोडे विकावयास घेऊन आला. बाईसाहेबांनीं त्यांजवर बसून मंडळावर धरून किंमत ठरविली ती एकाची हजार व दुसऱ्याची पन्नास व असें सांगितलें कीं, दुसरा घोडा जरी दिसण्यांत फार उमदा व चलाख आहे तरी तो छातींत फुटला आहे. याजमुळें अगदीं नादान आहे. त्याजवर सौदागरानें बाईसाहेबांच्या कुशलतेची तारीफ करून कबूल केलें कीं, या घोड्यास मी उत्तम मसाला देऊन देखाऊ ठेविला आहे. याची परीक्षा मीं पुष्कळ फिरलों परतु कोठें झाली नाहीं. बाईसाहेबांनीं दोन्ही घोडे ठरविलेल्या किंमतीस विकत घेतले व सौदागरास बक्षीस देऊन मार्गस्थ केलें.

बाईसाहेब स्वतः लोकांची काळजी फार वाहात असत व राजकारणाकरितां स्वतः मेहनत घेण्यास कधीं मागेंपुढें पाहात नसत. बलवासागर म्हणून एक लहान शहर झांशीचे अंमलांत आहे. तेथें चोरट्यांचा उपद्रव फार होऊन प्रजेस पीडा होऊं लागली. तेव्हां स्वतः स्वारी तयार करून बलवासागरास जाऊन पंधरा दिवस मुक्काम करून चोरांचा ठिकाणा लाविला व कांहींस फांशीं देऊन कांहींना कैद केलें व प्रान्त निर्भय केला. अशा अनेक गुणांनीं भरलेल्या त्या स्त्रीरत्नाचें औदार्य व शौर्य हे गुण तर निरुपमच होते. कोणीहि दरिद्री भिक्षुक कधींहि विन्मुख गेला नाहीं. एके दिवशीं एक काशीकर विद्वान् ब्राह्मण उपाध्यांचे मार्फत किल्ल्यांत नित्य दानास गेला. तेथें लालूभाऊ ढेंकरे यांनीं त्याची विद्येविषयीं व शीलाविषयीं फार स्तुति केली व असेंहि सांगितलें कीं, प्रथम स्त्री मरण पावल्यामुळें व वय अल्प असल्यामुळें दुसरा विवाह करण्याची भटजीची इच्छा आहे; परंतु मुलीला पैसा फार पडतो, सबब फार दुःखी आहेत. हें ऐकून बाईसाहेबांनीं प्रश्न केला कीं, रुपये देऊन मुलगी देणारा आहे कीं काय! त्याजवर भटजी नम्रतेनें बोलले कीं, आमचे जातीचा एक देशस्थ ब्राह्मण

काशीस आहे. त्याची मुलगी सुमारें बारा वर्षांची असून रूपानें बरी आहे. रास, घटित वगैरे सर्व जमलें आहे; परंतु त्यास मुलीबद्दल रुपये चारशें दिले पाहिजेत. ते मीं गरिबानें कोठून आणावे ? शिवाय लग्नाचे खर्चाकरितां सुमारें शंभर लागतील. हे शब्द ऐकतांच बाईसाहेबांनीं पांचशें रुपये तांब्याचे ताम्हनांत आणवून उदक सोडून भटजीचे पदरांत ओतले व सांगितलें कीं, लग्न होईल त्या वेळेस आम्हांस कुंकुमपत्रिका पाठविण्यास विसरूं नये. याप्रमाणें त्या भटजीबोवाचें नशीब उदयास आल्यावर तो मोठ्या उत्कंठेनें काशीस परत गेला व लग्न-समारंभाची तयारी करून बाईसाहेबांस मूळ धाडिलें.

एके दिवशीं बाईसाहेबांबरोबर मी महालक्ष्मीचे दर्शनास गेलों होतों. स्वारी परत येतांना दक्षिण दरवाजांतून आंत शिरलों तों हजारों भिकारी रस्ता अडवून उभे आहेत व गलका करीत आहेत हें पाहून बाईसाहेबांनीं दिवाणजीस कारण पुसतां लक्ष्मणराव यांनीं विदित केलें कीं, महाराज, हे लोक गरीब भिकारी आहेत; हल्ली थंडी फार पडते व यांस पांघरूण नसल्यामुळें त्यांचे फार हाल होत आहेत, याजबद्दल विचार होण्याविषयीं सरकारचे पायांपाशीं यांचा अर्ज आहे. हें ऐकून बाईसाहेबांस फार वाईट वाटलें व लागलींच हुकूम केला कीं, आजपासून चवथे दिवशीं भिकारी लोकांचा रमणा करावा व दर मनुष्यास एक रूदार टोपी, एक रूदार बंडी व एक काळी किंवा पांढरी घोंगडी द्यावी. असा हुकूम होतांच दुसरे दिवशीं शहरचे दर्जी जमा करून टोप्या व बंड्या शिवण्यास आरंभ केला व नेमिलेल्या दिवशीं दवंडी पिटवून शहरचे वाड्यासमोर भिकारी लोक जमा केले. त्यांत सामान्य गरीब लोक शिरले होते. दर एकास टोपी, बंडी व घोंगडी वांटली. सुमारें चार हजार टोपी वांटली गेली असेल. असो. अशा अनेक गोष्टी आहेत. ग्रंथविस्ताराच्या भयानें लिहितां येत नाहींत. बाईसाहेबांचें शौर्य कसें होतें ह्याची सर्व जग साक्ष देतच आहे व ह्या ग्रंथांतहि पुढें त्यांचेंच वर्णन होणार आहे. असो.

अशा त्या उदार शूर राजकारस्थानी बायकोशीं इंग्रज सरकारचें वर्तन फार अन्यायाचें झालें होतें यांत संशय नाहीं. प्रथम जेव्हां तिनें आपले दत्तक-पुत्रास राज्य देण्याविषयीं सरकारास अर्ज केला, आमचें घराणें पुष्कळ जुनें आहे व इंग्रज सरकारशीं मोठ्या नेकीनें व प्रेमानें वागत आलें आहे. आमच्या तहनाम्यावरून आम्ही दत्तक घेऊं नये असा निषेध नाहीं, सबब आमच्या जुन्या राज्यावर व नेकीवर व तहनाम्यावर लक्ष देऊन सरकारनें मेहेरबानीनें राज्य खालसा न करितां माझा दत्तक घेतलेला मुलगा कबूल करावा इत्यादि तिनें अनेक कारणें अर्जांत दाखविलीं; परंतु राज्य खालसा झालें. मात्र शहरांतील

राजवाडा व त्यांतील द्रव्य तसेंच तिजकडे राहूं दिलें होतें. तिनें मोठ्या हिमतीनें आपले नवऱ्याचे वेळचे जुने नोकर कांहीं पगार कमी करून आपलेंपाशीं ठेवून घेतले. त्यांच्या खर्चाकरितां व स्वतःच्या इतमामाकरितां तिजला इंग्रज सरकारांतून दरमहा चालू झाला होता तो मोठ्या काटकसरीनें पुरत असे. परंतु दुःखांवर डाग याप्रमाणें तोहि तिचे नवऱ्याचे कर्जाकरितां कांहीं दिवस बंद केला. तिनें केशवपन करण्यासाठीं काशीस जाण्याविषयीं परवानगी मागितली. तीहि तिला मिळाली नाहीं. अशा प्रकारची हेळसांड झाल्यामुळें त्या मनस्विनीचे मनांत इंग्रजांविषयीं द्वेषबुद्धि उत्पन्न झाली. परंतु जेव्हां धर्माचे बाबतींतहि इंग्रज सरकार अन्याय करूं लागले, तेव्हां तर तिचे पायाची आग मस्तकास गेली. हिंदुधर्मांत गोब्राह्मण फार पवित्र मानले आहेत व गाईचे वधाची फार निंदा केली आहे. झांशी शहरांत गाईचा वध करूं नये अशाबद्दल लक्ष्मीबाईनें अर्ज केला, परंतु त्या अर्जाकडे कोणी यत्किंचितहि लक्ष दिलें नाहीं. दुसरी एक गोष्ट अशी झाली कीं, महालक्ष्मीचे देवालयाचे पूजेकरितां दोन गांव तोडून दिले होते ते सरकारांत खालसा करावे असा सरकारचा हुकूम सुटला. तसें न होण्याविषयीं लक्ष्मीबाईनें पुष्कळ यत्न केला, परंतु यःकश्चित् बायकोचें ऐकतो कोण? पण लक्ष्मीबाई कांहीं साधारण बायको नव्हती. तिच्या अंतःकरणांत इंग्रजांविषयीं द्वेषाग्नि पेटून अगदीं कल्पान्त होऊन गेला. तिच्या बाळपणचा भाऊ व समदुःखी नानासाहेब त्याजपाशीं तिनें पत्रव्यवहार सुरू केला व इंग्रजांचा सूड कसा घ्यावा या विचारास व उद्योगास ती लागली.

बंडाचे नेमिलेल्या तारखेच्या आदले दिवशीं छावणींतील गोरे लोक घाबरून गार्डन साहेबासहित बाईसाहेबांस भेटले व विनंती केली कीं, उदईक आम्हांवर वाईट प्रसंग येणार असें खचित दिसतें. यापेक्षां आपण आपले राज्याचा बंदोबस्त ठेवावा. झांशीखालीं दुसरा मुलूख आहे तो मिळून २५ लक्षांचे प्रान्ताचा बंदोबस्त पुन्हां इंग्रजी अंमल होईपर्यंत आपण संभाळला पाहिजे व होईल तितकें करून आमचेंहि रक्षण केल्यास फार उपकार होतील. असें म्हणून दप्तर स्वाधीन केलें. तेव्हां बाईसाहेबांनीं उत्तर केलें कीं, पूर्वीं स्वस्थता होती त्या वेळेस मीं राज्य मागितलें तेव्हां मला मिळालें नाहीं व आतां दंग्यांत तुमचेजवळ राहणार नाहीं म्हणून मला देतां काय? कलकत्त्यास सभा झाली त्यास मला बोलाविलें नाहीं. आमचे येथें मरतेवेळेस विनंती केली कीं, माझेमागें माझ्या बायकोच्या मांडीवर दत्तक देऊन त्याच्या हस्तें राज्य चालवावें तीहि तुम्हीं जुमानली नाहीं व मला असें सांगितलें कीं, अलीकडे रुळी नवीन झाली आहे कीं, संस्थानिकांनीं दत्तक पुत्र घेऊं नये, घेतल्यास खासगी जिंदगीचा

मालक ठरेल, राज्य मिळणार नाहीं. नंतर केशवपन करण्यास प्रयागास जाण्याविषयीं हुकूम मागूं लागले तोहि मला मिळाला नाहीं. त्यांपेक्षां आतां ज्याचा रस्ता त्यानें पाहावा. शिवाय तुम्हांस आश्रय दिल्यास काळ्या पलटणी आम्हांस कुटून जाळून फस्त करितील. यास्तव होईल त्या रीतीनें आपला जीव तुम्हीच वांचवावा. असें म्हणून बाईसाहेब उठून गेल्यावर साहेबहि निघून गेले.

दहा वाजायचे सुमारास ठरावाप्रमाणें काळे लोक बेदिल होऊन दंगा करूं लागले. बंदुकीचे आवाज होऊं लागून छावणीस आग लागली. त्या छावणींत गोरे लोक थोडे होते ते सर्व त्यांनीं मारून टाकून दारूगोळा, मेखजीन, खजिना, तंबू वगैरे सामान आपले ताब्यांत घेतलें व छावणी जाळून टाकिली. सर्व काळ्या पलटणी तेथून निघून बाईसाहेबांचे वाड्यासमोर येऊन बाईसाहेबांस हांका मारूं लागल्या. तेव्हां त्यांनीं बाहेर येऊन ऑफिसर लोकांस भेटून त्यांस अभयवचन दिलें व त्यांनींहि सांगितलें कीं, तुम्ही आमचे यजमान, आम्ही तुमचा हुकूम ऐकूं व तुम्हांपासून दरमहा मुशाहिरा घेत जाऊं. याप्रमाणें राज्य हातीं आल्यावर आपले नांवाची शहरांत 'खुल्क खुदाका मुल्क बादशहाका अंमल लक्ष्मीबाईका' अशी द्वाही फिरवून सर्व कामें सुरू करविलीं. किल्ल्यांत साहेब शिरले होते म्हणून तेथील भुया नवीन करवून व गोमूत्रानें सर्व किल्ला शुद्ध करवून बाईसाहेब सुमुहूर्तावर येथें राहावयास गेल्या. नवीन बंदुका, तोफा व दारू करण्याचें काम मोठ्या झपाट्यानें चालू केलें. जुनीं माणसें कमी पगारावर बाईसाहेबांचे पदरीं होतींच. त्यांचा पगार पूर्ववत् करून राज्यसंबंधें सर्व कामाचा बंदोबस्त केला. शहरचे तटाची दुरुस्ती केली व राज्यरक्षणाकरितां अनुष्ठानें, ग्रहयज्ञ सुरू केले.

झांशी शहर हस्तगत झाल्यापासून सुमारें अकरा महिने उत्तर हिंदुस्थानांत इंग्रज बिलकुल नव्हता असें म्हटलें तरी चालेल. काल्पीखालचा छप्पन्न लक्षांचा मुलूख तात्या टोपी याचे ताब्यांत असून तहशीलदार वगैरे नेमून दिवाणी मुलकी सर्व कामें सुरळीत चाललीं होतीं. नंतर इंग्रज लोकांच्या विलायतेहून पलटणी आल्यावर मद्रासी काळ्या पलटणी बरोबर घेऊन हैद्राबादेचे निजामापासून पांच हजार स्वार घेऊन शिंदे, होळकर, गायकवाड, घोरपडे वगैरे सरदारांच्या मदती घेऊन कप्तान साहेब मुंबईहून निघाला तो जरनेली झेंडा फडकावून खानदेश, सातपुडा वगैरे मुलुखाचा बंदोबस्त करीत चालला. महूचे छावणींत कांहीं दिवस राहून इंदूरचे राज्यांत कोठें कोठें बदमाश लोकांनीं बखेडे केले होते ते सर्व मोडून टाकले.

झांशीपासून पश्चिमेस वेत्रवती नदीजवळ बाणपूर म्हणून एक लहानसें संस्थान आहे. तेथील राजा लक्ष्मीबाईचा मानलेला थोरला भाऊ होता. तो दंगा करून पलटणी लोकांस आश्रय देऊन राहिला होता. त्यानें असा विचार केला कीं, या शहरावर इंग्रजाची व आपली लढाई होणार. त्यापेक्षां शहरचे लोकांस येथून जाण्याचा हुकूम देऊन आपलें कुटुंब अर्थासहित झांशी येथें रवाना करावें. त्याप्रमाणें कप्तान साहेब जवळ आला अशी बातमी लागतांच आपली रयत बोलावून आणून त्यांस कळविलें कीं, " येथें थोडक्या दिवसांत जंग होणार, सबब तुम्हीं येथून निघून कोठें तरी ग्रामान्तरीं जाऊन आपली व्यवस्था पाहावी." नंतर राजानें आपलीं माणसें व अर्थ घेऊन झांशीस येऊन राणीचे स्वाधीन केलीं. येथें त्यास स्वतंत्र वाडा देऊन माणसें तैनातीस ठेवून बाईसाहेबांनीं त्याचा योग्य बंदोबस्त केला. नंतर राजा बाणपुरास परत गेला तों लवकरच इंग्रजी फौज बाणपुरावर आली. शहरास वेढा घालून सात दिवसपर्यंत लढाई झाली. अखेरीस इंग्रज बहादुरांनीं शहर हस्तगत करून घेऊन दोन प्रहर विजन करून शहरांत आपले नांवाची द्वाही फिरविली व राज्य निर्भय केलें. बाणपूरचा राजा राहिलेली फौज घेऊन शहरांतून निघून जाऊन वेत्रवतीचे बेहेड्यांत दबा धरून बसला. वेत्रवतीच्या कांठी मोठमोठे बेहडे म्हणजे ख्यांचा हजारों फौज राहील अशा पडलेल्या आहेत. इंग्रजांनीं बाणपूर घेतलें व राजा जिवंत असून कोठें तरी पळून गेला आहे, ही बातमी झांशीस समजतांच गडबड होऊन गेली. झांशीवर लढाई करावयाची हा निश्चय बाईसाहेबांनीं करून तटबंदीच्या तयारीस लागल्या. फौजेंत लोक जास्ती ठेवून तटावर दाट सारखी फौज लाविली व बुरुजांवरून मोठाल्या तोफा लावून ठेविल्या. दारूगोळ्याचें सामान जारीनें तयार करविण्याचे कामावर लालू बक्षी यास नेमिलें. गरीब लोकांस पुढें खाण्यास मिळणार नाहीं, सबब खंडोगणती चुरमुरे व फुटाणे भाजून ठेविले. शहरांत सर्व सामुग्री भरून ठेविली. गणपतीचे देवालयांत प्रसंग पडल्यास भोजनाचें मुक्तद्वार ठेवण्याचा विचार ठरवून तूप, साखर, कणिक, तांदूळ वगैरे सामानाची तजवीज करून ठेविली. खजिन्यांत खर्चाला पुरें इतकें द्रव्य नव्हतें म्हणून राजवाड्यांत जितकीं मोठमोठीं पातेलीं, हांडे, घागरी, डबे, घंगाळें वगैरे रुप्याचीं भांडीं होतीं तीं सर्व टांकसाळेंत पाठवून हजारों रुपये पाठविले. लढाईंत आपणांस जय यावा म्हणून परमेश्वरप्रीत्यर्थ अनुष्ठानें देवालयांतून सुरू केलीं. काल्पीस रावसाहेब व तात्या टोपीस पत्रें लिहून मदत मागितली. याप्रमाणें ती शूर बायको यत्किंचितहि न डगमगता मोठ्या शान्ततेनें व हुशारीनें शहरचा बंदोबस्त करून राहिली.

इकडे इंग्रज सरकारची फौज सर्व बुंदेलखंडाचा बंदोबस्त लावून झांशीवर पश्चिमेस दीड कोसावर येऊन थडकली. तेथें डेरे, राहुट्या वगैरे देऊन कप्तानानें स्वाराबरोबर बाईसाहेबांस पत्र दिलें. तें दिवाणजी घेऊन किल्ल्यांत आल्यावर पांच-चार मुत्सद्दी व बाईसाहेब एकत्र होऊन पत्राबद्दल विचार करूं लागले.

पत्रांत मजकूर असा होता कीं, " बाईसाहेबांनीं खुद्द बरोबर लक्ष्मणराव दिवाणजी, लालू बक्षी, मोरोपंत तांबे वगैरे आठ असामींचीं नांवें लिहिलीं होतीं त्यांस घेऊन मला येऊन भेटावें. याशिवाय दुसरें कोणीहि बरोबर आणूं नये व बरोबर हत्यार कोणतेंहि आणूं नये. आजपासून दोन दिवसांत भेटावें, पलीकडे भेटूं नये. " झांशीस लढाई द्यावयाची हा निश्चय अगोदर झालाच होता. फक्त पत्रोत्तर कसें द्यावें याचाच विचार होऊन खालील जबाब पाठवून दिला. " भेटीस कशास बोलाविलें आहे व दगा होईल का नाहीं याचा पत्रांत खुलासा कांहींच नाहीं. संस्थानचे चालीप्रमाणें हत्यारबंद लोक बरोबर घ्यावयाचे ते लोक घेऊन दिवाणजी भेटीस येतील. मी बायकोमनुष्य, माझें येणें होणार नाहीं. याजवर आपली मर्जी. " असा मजकूर लिहून बाईसाहेबांची सही होऊन लखोटा त्याच स्वाराबरोबर इंग्रजांचे गोटांत पाठवून दिला. पत्रोत्तर पाहून फौज परत दतियावर गेली व तेथें झांशीस वेढा देण्याची सर्व तयारी केली. डंघाईचे मुलुखाकडे म्हणजे काल्पीचे दक्षिणेस पंचवीस कोसांवर एक-दोन ऑफिसरांबरोबर फौज रवाना केली. पेशवे व तात्या टोपी यांनीं झांशीवाली बाईचे मदतीस येऊं नये म्हणून त्याजबरोबर लढाई नेहमीं सुरू ठेवावी हें काम त्यांजकडे सोंपवून दिलें. इकडे बाईसाहेबांनीं चांगला मनुष्य पाहून त्यांजबरोबर पांच स्वार देऊन काल्पीस रावसाहेबांकडे रवाना केला. त्या लोकांनीं श्रीमंतांस झांशींतील सर्व मजकूर कळवून अशी विनंती केली कीं, बाईसाहेब आपले भरंवशावर लढाई करीत आहेत. आपण बाहेरून येऊन इंग्रजांबरोबर लढावें व आम्ही आंतून लढतों, म्हणजे आपणांस जय येऊन इंग्रजांचें कांहीं चालणार नाहीं. रावसाहेबांनीं त्यांस सर्व कबूल करून आश्वासन देऊन परत पाठवून दिलें. इंग्रज सरकारनें झांशीचे भोंवतालीं गावोगांवीं जाहीरनामे लाविले कीं, झांशीवर जंग होणार आहे याजकरितां सर्व लोकांनीं सावध असावें. शहर घेतल्यावर तीन दिवस बिजन चालेल. त्याचा नियम असा कीं, पांच वर्षांवर व ऐशीं वर्षांचे आंत सर्व पुरुष मारले जातील. याजकरितां जंगाचे दिवसांत तेथें कोणी जाऊं नये.

●●●

: २१ :

रा. भि. गुंजीकर

आपल्या भाषेचें पुढें काय होणार ?

कित्येक गोष्टी अशा आहेत कीं, त्यांविषयीं जितका विचार करावा तितका थोडाच. अशां पैकींच कांहीं गोष्टींकडे आज आपण लक्ष देऊं. पुष्कळ लोकांच्या मनामध्यें वारंवार असे प्रश्न येत असतील कीं, काय हो, आमच्या या देशाचें पुढें व्हावयाचें काय ? आमच्या लोकांचें व्हायचें काय ? आमच्या धर्माचें व्हायचें काय ? आमच्या भाषांचें व्हायचें काय ? आमच्या रीतीभातींचें, आमच्या धंद्यारोजगारांचें, आमच्या कलाकौशल्याचें, आमच्या बायकामुलांचें आणि दुसऱ्या अनेक गोष्टींचें पुढें व्हायचें काय ? प्रश्न दिसतात लहान, पण त्यांचीं उत्तरें फार कठीण आहेत. तरी हे प्रश्न फार फार महत्त्वाचे होत. यांचा विचार प्रत्येक मनुष्यानें करण्याला योग्य आहे, तथापि सर्वच विषय एकदम घेऊन त्यांचा निकाल लावण्याचा प्रयत्न करणें सर्वथा अशक्य आहे. म्हणून सोईसोईप्रमाणें एक एक विषय घेऊं. त्या त्या विषयांच्या महत्त्वाप्रमाणें त्यांचा अनुक्रम लावतां येईल. आणि त्या अनुक्रमाला लक्षून प्रत्येक विषयाची चर्चा झाली तर तितकी विशेष चांगली गोष्ट होईल हें खरें आहे. तथापि तसा क्रम साधणें फारच कठीण म्हणून जसजशी अनुकलता होईल, तसतसा एक एक विषय म्हणजे पूर्वोक्त प्रश्नांपैकीं एकेक प्रश्न घेऊन त्याची चर्चा करण्याचा प्रयत्न करूं. आज रोजीं जो प्रश्न घ्यावयाचा तो हा, " आमच्या भाषांचें पुढें व्हायाचें काय ? "

या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वीं, आधीं त्यामध्यें काय काय गोष्टींचा समावेश होतो हें पाहिलें पाहिजे. आमच्या मतें या प्रश्नामध्यें इतक्या गोष्टी येतात. १ आमच्या भाषा म्हणजे काय ? २ त्यांची सध्यांची स्थिति कशी आहे ? ३ त्यांकडे आम्हीं दुर्लक्ष केल्यानें काय परिणाम होण्याचा संभव आहे ? आणि ४ त्यांच्या संबंधानें आपलें प्रत्येकाचें कर्तव्य काय आहे ? इतक्या गोष्टींचा विचार झाला, म्हणजे मुख्य प्रश्नाचें उत्तर सहज निघण्याजोगें होईल.

१. वस्तुतः आमच्या भाषा म्हणजे भरतखंडांतील सर्व भाषा असा अर्थ निष्पन्न होतो. तथापि तितका विस्तृत अर्थ आज आम्ही घेत नाहीं. तर इतकाच घेतों कीं, आमची महाराष्ट्र देशाची जी शुद्ध मराठी भाषा ती, आणि 'मराठी भाषेच्या पोटभाषा' हें नांव ज्या भाषांना लावतां येईल, अशा कोंकणी, गोमंतकी, खानदेशी, वऱ्हाडी, इत्यादि ज्या शुद्धाशुद्ध भाषा, त्या आमच्या भाषा असा एथें अर्थ घेतला आहे. इतक्यांच्या संबंधानेंच जर यथातथ्य विचार झाला, तर तोच कांहीं थोड्याशा फेरफारानें महाराष्ट्राच्या बाहेरच्या भाषांनाही लावतां येईल. अथवा ज्यांना तो विषय फार निकट संबंधाचा असेल, ते लोक त्याकडे लक्ष देतील.

२. आमच्या भाषांची सांप्रतची स्थिति कशी काय आहे ? आपली जी खुद्द म्हणजे शुद्ध मराठी भाषा, तिची स्थिति पाहिली, तर सांप्रत पुष्कळ गोष्टींनीं फार चांगली आहे, असें म्हणण्याला कांहीं अडचण दिसत नाहीं. कारण, तिचें शुद्ध स्वरूप म्हणजे असुक, असें आज पुष्कळ वर्षांपासून ठरून गेलें आहे, ही मोठी गोष्ट. तिजमध्यें बहुतेक विषयांवर लहानमोठे ग्रंथ बरेच झाले आहेत, व दिवसेंदिवस अधिकाधिक होत आहेत. तिजमध्यें वर्तमानपत्रें, आणि नियतकालिक पुस्तकेंही बरींच निघत आहेत. तिजमध्यें ज्या ज्या गोष्टींचें साहित्य उणें आहे, तें तें भरून काढण्याविषयीं विद्वान् लोक बराच प्रयत्न करीत आहेत. विश्वविद्यालयामधून त्या भाषेला बाहेर लावून दिलें असल्यामुळें तिच्या प्रसाराला मोठेंच विघ्न आलें ही गोष्ट खरी, तथापि लौकरच तिचा त्या विद्यामंदिरांत पुनः प्रवेश होण्याचा संभव दिसत आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

मराठी भाषेच्या ज्या पोटभाषा आहेत, त्यांची स्थिति पाहिली तर ती मात्र चांगली नाहीं असें म्हणणें प्राप्त होईल. खुद्द मराठीमध्येंच जे अशुद्ध प्रकार आहेत, त्यांनाही तूर्त या पोटभाषांमध्यें गृहीत करण्यास कांहीं बाध दिसत नाहीं. या सर्व भाषांमध्यें सर्वमान्य किंवा शुद्ध प्रकार म्हणजे असुक असें मुळींच म्हणतां येत नाहीं. ज्या त्या प्रांतांतील किंबहुना ज्या त्या गांवांतील लोक आपापली पोटभाषा तीच शुद्ध, तीच प्रौढ, तीच सर्वमान्य, असा आग्रह धरून केव्हां केव्हां भांडतात, परंतु त्या आग्रहांत कांहीं अर्थ आहे असें म्हणवत नाहीं. कारण कीं, पोकळ भांडणाखेरीज त्या त्या भाषेचा कोणत्याही उपयुक्त गोष्टी-मध्यें ते अभिमान बाळगतात असें म्हणतां येत नाहीं. त्या भाषा केवळ बोलण्याच्या कामापुरत्याच. कागदावर कधीं त्या भाषेंतला शब्द पडत नाहीं; तेव्हां पुस्तकाचें नांव तें कशाला ? केवळ कौतुकार्थ, किंवा थट्टेसाठीं, किंवा नमुन्यासाठीं क्वचित् कोणी पांच चार ओळी लिहिल्या तर ? त्यांपलीकडे कांहीं नाहीं. या भाषा बोलणाऱ्या लोकांचा पत्रव्यवहार पाहिला, तर भिन्न भाषेच्या द्वारें. मराठी

देशामध्यें मराठीनें, कानडी व मलबार देशामध्यें त्या त्या भाषेनें होतो. त्यांना स्वतंत्र भाषा हें नांव देणें फार कठीण आहे, व दिवसेंदिवस त्यांचें असलें नसलें स्वातंत्र्य तेंही जात चाललें आहे.

३. आतां तिसरी गोष्ट आमच्या भाषांकडे आम्ही दुर्लक्ष केल्यानें काय परिणाम होणार आहे? प्रथमतः मुख्य मराठी भाषेविषयीं. मराठी भाषेची स्थिति पुष्कळ चांगली आहे असें वर म्हटलें आहे, तथापि तो तिच्या स्थितीचा चांगुलपणा उणा न होतां, दिवसेंदिवस जर वाढत चालला तरच तिची स्थिति नीट राहील. नाहीं तर एकदा जर का तिचें पाऊल मागें हटलें, तर सध्यांच्या वाढत्या इंग्रजी भाषेपुढें तिचें कांहीं चालणार नाहीं. मग ती मागें पडलीच! पोटभाषा तर असून नसल्यासारख्याच आहेत. त्यांच्यामुळें मुख्य मराठी भाषेच्या शुद्धतेला मात्र बट्टा लागत आहे. इतकाच त्यांपासून लाभ. दुसरें कांहीं नाहीं. या पोटभाषांची अशी ही दीन स्थिति फार शोचनीय आहे, यांत संशय नाहीं. म्हणून या भाषांकडे जर सध्यां लक्ष न दिलें, तर दिवसेंदिवस त्यांची स्थिति अधिकाधिक बिघडत जाणार आणि तसल्या अव्यवस्थित भाषांच्या संसर्गामुळें शुद्ध मराठी भाषेलाही त्या त्या प्रमाणानें त्रास होत जाणार असें उघड दिसतें.

४. आतां शेवटचा प्रश्न. 'त्या भाषांच्या संबंधानें आपलें प्रत्येकाचें कर्तव्य काय?' शुद्ध मराठीच्या संबंधानें आमचें मत असें आहे कीं, जर मराठी भाषेची विशेष सुधारणा झाली पाहिजे, तर त्या सुधारणेचा पहिला मार्ग हा—आपलें लौकिक, धार्मिक, राजकीय, यांत्रिक, व्यावहारिक तसेंच अर्वाचीन नानाविध शास्त्रसंबंधीं जे अनेक विषय, त्यांचीं पुस्तकें, व्याख्यानें, निबंध, आणि ओतप्रोत चर्चा हीं शुद्ध मराठी भाषेनें करण्याचा उद्योग दिवसें-दिवस आपण वाढविला पाहिजे.

असा एक प्रश्न वारंवार निघत असतो कीं, पुस्तकें करावीं, अमुक लिहावें, तमुक लिहावें, पण वाचतो कोण? हा प्रश्न खरा आहे. पण त्याचें उत्तर सोपें आहे.

कित्येक पुस्तकें किंवा लेख असे असतात कीं, त्यांना कोणी विचारीतही नाहीं, किंवा त्याकडे कोणी ढुंकूनही पाहात नाहीं. परंतु कित्येक असे असतात कीं, ज्याला पुस्तक वाचण्याची बिलकुल हौस नाहीं, तशाही मनुष्याच्या कानीं त्याचा कांहीं थोडासा भाग पडला, तर त्याला तें वाचण्याची पराकाष्ठेची इच्छा होते. याचें कारण काय? तर विषयाची गोडी, आणि त्यांत पुनः लिहिण्याचेंही चातुर्य. "प्रयोजनमनुद्दिश्य मंदोऽपि न प्रवर्तते." कोणतीही गोष्ट मनुष्याच्या अंतःकरणाला जाऊन झोंबल्यावांचून तिजकडे त्याचें

पूर्ण लक्ष लागायाचें नाहीं. आणि ती तशी झोंबली, म्हणजे आपोआप तिजकडे तो लक्ष देऊं लागतो. ज्या लेखापासून कांहीं उपयोग नाहीं, किंवा कांहीं नवीन प्राप्त होत नाहीं, त्याकडे कोणीही लक्ष देत नाहीं. या करितां प्रत्येक लेखकर्त्यानें ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे, कीं, ज्या पासून कांहीं तरी नवीन कल्पना, किंवा जुन्या कल्पनांनाच नवें स्वरूप उत्पन्न होईल, असे चणचणीत लेख असल्यावांचून त्यांच्या लेखाला कोणीही विचारणार नाहीं. शिळें खाणें किती दिवस चालेल ? इंग्रजी वगैरे भाषांमध्यें ज्यांना नवें नवें कांहीं तरी प्रतिदिनीं मिळते त्यांना शिळ्या मराठी लेखांची गोडी कशी लागावी ? याखाठीं जुन्या शिळ्या कल्पना, आणि जुन्या शिळ्या गोष्टी, जशांच्या तशा पुढें न आणतां, नव्या नव्या कल्पना, किंवा निदान पक्षीं जुन्या शिळ्या कल्पनांनाच ताजी चणचणीत फोडणी देऊन जर त्या ताज्या केल्या, तर त्यांची गोडी ग्राहकांना सहज लागेल. पण ही गोष्टही लक्षांत ठेविली पाहिजे कीं, कल्पना नवीन असोत किंवा जुन्या असोत, त्यांचा उपयोग काय हे स्पष्ट असलें पाहिजे. नाहींतर त्यांपासून इष्ट हेतु कधींही साध्य होणार नाहीं. आतां हीच गोष्ट घ्या ना, कीं "मराठी भाषेचा आणि मराठी ग्रंथांचा उपयोग काय ? हा इतका खटाटोप पाहिजे आहे कशाला ? आहे इंग्रजी भाषा आयती, ती घ्यावी, तिजमध्यें पुस्तकें आहेत, लेख आहेत, सर्व कांहीं आहे." हें वाक्य केवळ काल्पनिक आहे असें नाहीं. पुष्कळ लोकांची अशीच समजूत आहे. कांहीं दिवसांमागें एका विद्वान् गृहस्थानें या मुंबईतील एका प्रसिद्ध सभेमध्यें व्याख्यान दिलें होतें, कीं, देशी भाषांचा कांहीं उपयोग नाहीं, त्यांच्या जागीं इंग्रजी भाषाच सर्वत्र चालू होईल तर बरें, इत्यादि. परंतु आमचें म्हणणें तर असें आहे कीं, ज्या देशांतील लोकांना स्वतःचें घरदार नाहीं; पण स्वतांची भाषाही नाहीं, त्यांचें जिणें व्यर्थ होय ! ज्यांची देशभाषा गेली, त्यांच्या हातून कांहीं मोठें कृत्य व्हावयाचें नाहीं. आलिकडे मुंबईतील कित्येक पारसी गृहस्थांनीं, गेल्या संपूर्ण दहा शतकांमध्यें आपली म्हणून अंगीकारिलेली जी गुजराथी भाषा, ती सोडून देऊन सर्वत्र घरीं दारीं इंग्रजी भाषाच चालू करावी असा निश्चय केला आहे असें समजतें. परंतु ही गोष्ट सर्व प्रकारें दुश्चिन्हसूचक होय, असें म्हटल्या वांचून आमच्यानें राहवत नाहीं. आम्ही तर असें समजतों, कीं ज्यांनीं देशाची भाषा सोडली, त्यांचा त्या देशाच्या संबंधाचा सर्व अभिमान गेला, ते त्या देशाला परके झाले, त्यांच्या हातून त्या देशाच्या कल्याणाची कांहीं मोठी गोष्ट होणार नाहीं. त्यांची दृष्टी बहिरंग झाली, बाहेरच्या देशा-कडे लागली, ते देशांतून दूर जातील तर वाईट नाहीं. आमच्या देशा-मध्यें जे क्रिश्चन लोक आहेत, त्यांचीही भाषेच्या संबंधानें मोठी शोचनीय

स्थिति झाली आहे. बहुतेक क्रिश्चन लोकांना, आणि त्यांत विशेषेंकरून रोमन क्याथोलिक मताच्या क्रिश्चन लोकांना देशी भाषांचें ज्ञान तांत्रिकच असल्यामुळें, त्यांनीं पोर्तुगीज किंवा इंग्लिश भाषा आपली करण्याचा यत्न चालविला आहे. परंतु त्यांचीही स्थिति हीच. त्यांना या देशाचा किंवा लोकांचा अभिमान जर कांहीं थोडासा असेल, तर तो या कृत्यामुळें दिवसेंदिवस नाहींसा होत जाणार; त्यांच्याही हातून या देशाच्या खऱ्या कल्याणाची गोष्ट कांहीं होणार नाहीं. ते आपण होऊन आपणांला इतक्यांतच परके मानूं लागले आहेत. ज्यांच्या पन्नास पिढ्यांमध्यें परदेशीय रक्ताचा लेशही खरोखरी नसेल, आणि या गोष्टीमुळें ज्यांना, आपण एथले पूर्ण देशी लोक म्हणविण्याचा मोठा अभिमान वाटावा त्यांना त्या 'देशी लोक, या शब्दाची लाज वाटूं लागली आहे; आणि कोणी म्हणतो, मी पोर्तुगीस, कोणी म्हणतो मी इंग्रज! तेव्हां अशा मनुष्याला या देशाच्या आणि या देशांतील लोकांचा कितीसा अभिमान उत्पन्न होणार हें उघड दिसत आहे. देशांतील सर्व लोक एका वळणांत राहण्याला भाषा हें एक मोठें साधन आहे. तें जर नाहीं, तर तितकें त्यांत न्यून पडलें. भाषाभेदापासून मतभेद होतो, आणि मतभेदापासून द्वेषभाव उत्पन्न होण्याला साहाय्य होतें, इत्यादि अनेक कारणांवरून पाहतां, देशभाषा जी आहे तिचा अभ्यास, आणि तिची सुधारणा, आणि व्यवहारांमध्यें तिचा होईल तितका उपयोग करण्याविषयीं प्रत्येकानें झटलें पाहिजे. इंग्रजी वगैरे फार उपयोगी ज्या परभाषा आहेत, त्यांचा अभ्यास करणें हेंही फार अवश्य आहे खरें, तथापि यावरून देशी भाषेच्या अभ्यासाचें महत्त्व उणें होतें असें नाहीं. कोणताही विचार, कोणतीही सुधारणा, जर देशांतील लहानथोर सर्व स्त्रीपुरुषांना समजली पाहिजे, जर त्याविषयीं प्रत्येक व्यक्तीनें उद्योग करण्याला झटलें पाहिजे, तर देशभाषेसारखें त्या कृत्याच्या उत्तेजनाला दुसरें साधनच नाहीं. परभाषा तुम्ही कितीही चांगल्या शिका, तथापि त्यांपासून, हा जो आबालवृद्धांच्या अंत:करणावर होणारा इष्ट परिणाम, तो कधींही साध्य होऊं शकणार नाहीं. यावरून परभाषांचा आम्ही तिरस्कार करितों असें बिलकूल कोणी समजूं नये. त्यांच्या अभ्यासाची योग्यता जी आहे ती आहेच, ती कमी होत नाहीं, तथापि परभाषांची योग्यता कितीही मोठी असली, तरी स्वदेशभाषेच्या अभ्यासाचें महत्त्व तेणेंकरून लेशमात्रही कमी होत नाहीं, इतकेंच आमचें म्हणणें आहे. तरी पुन: म्हणतों, कीं जर स्वदेशभाषा आणि परभाषा यांमध्येंच निवड करण्याचा प्रसंग आला, तर आधीं स्वदेशभाषा आणि मग परभाषा हेंच आमचें तत्त्व आहे. कारण कीं, ज्यांची देशभाषा मोडली, त्यांचे हातपाय मोडले, त्यांचीं तोंडें बंद झालीं. यापेक्षां आणखी वाईट परिणाम तो कोणता? सर्व वाईट परिणाम यांत आले. तेव्हां देशभाषेच्या त्यागाचा जर हा सर्वथा अनिष्ट परिणाम, तर

उलटपक्षीं त्याच देशभाषेच्या अभ्यासाचा काय उपयोग, हें पुनः पुनः विचार (विशद ?) करून सांगण्याचें कारण राहत नाहीं. तेव्हां स्वदेशभाषेच्या संबंधानें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म म्हटलें म्हणजे, हें आहे कीं, जितकी ती भाषा शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न करवेल तितका अवश्य केला पाहिजे. ज्यांच्या व्यवहारामध्यें तिचें कोणत्याही प्रकारें अशुद्ध रूप येत असेल त्यांनीं तें नीट लक्षांत आणून, त्याच्या जागीं शुद्ध रूप योजण्याचा झटून प्रयत्न केला पाहिजे. सांप्रत मुंबईमध्यें एका मोठ्या सभेमध्यें असा एक फार उत्तम नियम केलेला आहे, कीं त्या सभेच्या कोणीही सभासदानें मिश्रित भाषा बोलूं नये. म्हणजे अर्धें मराठी आणि अर्धें इंग्रजी असें करूं नये. निदानपक्षीं एकाच वाक्यामध्यें तरी दोन भाषांतील शब्द मिश्रित करूं नयेत. हा फार उपयोगी नियम जर सर्व लोक स्वीकारतील, तर फार उत्तम परिणाम होईल, यांत कांहीं संशय नाहीं. या शिवाय, मराठी भाषेच्या संबंधें मुख्य कृत्य म्हटलें म्हणजे इतकेंच, कीं प्रत्येकानें आपणांकडून होईल तितका तिचा अभ्यास चालू ठेवावा. आपले अनेक विचार शुद्ध मराठी भाषेनें बोलून दाखविण्याचा आणि लिहून ठेवण्याचा अभ्यास ठेवावा. ऐतिहासिक गोष्टी, सृष्टिज्ञानासंबंधीं विचार, देशस्थिति, लोकस्थिति, इत्यादि अनेक विषयांना अनुलक्षून प्रसंगोपात्त भाषण करावें, लेख लिहावे, ऐकावे, आपण लिहिलेले व इतरांनीं लिहिलेलें वाचावे; आणि आपल्या सामर्थ्याप्रमाणें अशा गोष्टींना उत्तेजन द्यावें. यांमध्यें सर्व आलें. इतकें जर प्रत्येक मनुष्यानें लक्षांत ठेविलें तर पुष्कळ झालें.

आतां मराठी भाषेच्या आसपास ज्या पोटभाषा आहेत, त्यांच्या संबंधानें कांहीं लिहिणें अवश्य आहे. त्या भाषांची स्थिति फार वाईट आहे, असें वर म्हटलेंच आहे. परंतु त्या भाषांची स्थिति सुधारण्याला आतां करावें काय, हा प्रश्न येऊन उभा राहिला. असें जर म्हटलें, कीं शुद्ध मराठी भाषेचा अभिमान धरून तिची सुधारणा करण्याचा जो उपाय वर सांगितला आहे, तोच उपाय त्या भाषांच्या संबंधानें चालविला, तर काय अडचण येईल ? बरें पाहूं तर खरें. तोच उपाय करावयाचा म्हटलें म्हणजे, काय काय बरें केलें पाहिजे ? तर प्रथमतः प्रत्येक भाषेचें एकेक व्याकरण, एकेक कोश, आणि बरींच वाचन पुस्तकें, इतकें आधीं तयार केलें पाहिजे.

शाळांमध्यें तीं शिकविलीं पाहिजेत; इतिहासादि अनेक विषयांचे ग्रंथ केले पाहिजेत; वर्तमानपत्रें वगैरे सर्व प्रकार त्या त्या भाषेत झाला पाहिजे. परंतु हें सर्व होऊं शकणारें आहे काय ? प्रांतोप्रांतीं, किंबहुना गांवोगांवीं अशा भाषा

वेगळ्या वेगळ्या आहेत. त्यांत पुनः ब्राह्मणादि जातींच्या वेगळ्या, शूद्रादि जातींच्या वेगळ्या, तेव्हां अशा निरनिराळ्या भाषा देशामध्यें किती करायाच्या ? परंतु असेंही कोणी म्हणूं शकेल कीं, कितीही होत ना, त्यांचें काय ? ज्याला त्याला आपापल्या भाषेचा अभिमान नको का ? पण हीही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, आपापल्या भाषेचा अभिमान जर पूर्वींपासून सर्वांनीं ठेविला असता, तर इतक्या वेगवेगळ्या भाषा झाल्याच नसत्या. अभिमान सुटल्यामुळेंच ही स्थिति झाली आहे. परंतु असा पूर्वपक्ष होईल कीं, गेली ती गोष्ट गेली; पण इतःपर आम्ही आमच्या भाषांचा अभिमान धरूं. आम्ही म्हणूं, फार उत्तम गोष्ट आहे, पण जर असें करूं शकाल तर. आम्ही तर खात्रीनें सांगू शकतों, कीं ही गोष्ट अशक्य आहे. कां अशक्य ? तर प्रथमतः ही व्यवस्था उत्पन्न करण्याला आणि निरंतर चालू ठेवण्याला द्रव्याचा किती भयंकर व्यय करावा लागेल हें पाहिलें पाहिजे. इतकें द्रव्य कोणीही काढूं इच्छिणार नाहीं. आग्रहास पडून कोणी मातबर मनुष्य या कृत्याला लागेल तितका पैसा द्यावयाला उभा राहिला, तरी त्याच्यानेंही हें कृत्य तडीस नेववणार नाहीं, आणि कदाचित् सिद्धीस नेलें, तरी असें म्हणणें प्राप्त आहे कीं तें केवळ वेडेपणाचें काम होईल. यासाठीं तें द्रव्य याहून चांगल्या अशा दुसऱ्या एकाद्या कृत्याला खर्चावें हें चांगलें. कारण कीं, या कृत्यापासून पैशाचा पैसा फुकट जाऊन कांहीं लाभ न होतां, हानि मात्र मोठी होईल. क्षणभर असें समजूं कीं, गांवोगांव वेगवेगळ्या भाषा कायम झाल्या, त्यांचीं वेगवेगळीं पुस्तकें सिद्ध झालीं. परंतु असल्या संकुचित भाषांपासून केवढा मोठा तोटा होणार आहे तो पाहिला पाहिजे. मराठीसारख्या स्थायिक झालेल्या प्रौढ भाषेमध्यें जें आज विद्येचें भांडार वाढत चाललें आहे, तें या लोकांना सर्वथा निरुपयोगी होईल. तें प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर मराठीचा अभ्यास वेगळा केलाच पाहिजे.

या गांवचें वर्तमानपत्र त्या गांवीं व त्या गांवचें या गांवीं कोणाला समजावयाचें नाहीं. अर्थात् तें निरुपयोगी. एका गांवच्या लोकांनीं दुसऱ्या गांवच्या लोकांस पत्र पाठवावयाचें तर प्रश्न एका भाषेंत आणि उत्तर दुसऱ्या भाषेंत असें झालेंच पाहिजे. कारण अभिमानाची गोष्ट घडली. वीस वर्षांमागें युरोपखंडामध्यें फ्रान्स आणि जर्मनी या दोन राज्यांमध्यें जेव्हां मोठा युद्धसंग्राम होऊन फ्रान्सचा मोड झाला, तेव्हां जर्मनी देशाच्या बादशहानें आपल्या जयाचें आनंदकारक वर्तमान रशिया देशाच्या बादशहाला लिहून कळविलें. युरोपखंडामध्यें निरनिराळ्या राज्यांचा परस्पर पत्रव्यवहार पूर्वींपासून फ्रेंच भाषेनें चालत आलेला आहे. परंतु जर्मन लोकांना असा गर्व झाला कीं, ज्यापक्षीं आपण फ्रेंचांचा पराभव केला, त्यापक्षीं त्यांची भाषा आतां आपणांला कशाला ?

आमचीच भाषा आम्ही चोहोंकडे चालवूं. अशा अभिमानानें त्यांनीं आपलें पत्र जर्मन भाषेनें लिहून पाठविलें. परंतु जें उत्तर आलें तें पाहतात तों फ्रेंच भाषेंतही नाहीं, आणि जर्मन भाषेंतही नाहीं, तर रशियन भाषेंत ! तेव्हां राव शुद्धीवर आले. आणि दुसरें पत्र पाठवितांना पूर्ववत् फ्रेंच भाषेचा त्यांनीं आश्रय केला. तेव्हां सर्व गोष्टी पूर्ववत् ठीक चालू झाल्या ! अभिमानाची गोष्ट म्हटली म्हणजे तेथें असाच परिणाम व्हायचा. मराठी लोकांना जर कोंकणी लोकांनीं किंवा गोमंतकी लोकांनीं पत्र पाठवायाचें तर सध्यांप्रमाणें मराठी भाषेनें पत्र लिहिलें असतां कमीपणा घेतल्यासारखें होणार. स्वतःच्या भाषेनें पत्र लिहावें, तर तें वाचण्याची खटपट करतो कोण ? तेव्हां असा वेडा अभिमान कामाचा नाहीं. शुद्ध मराठीचा आश्रय केल्यावांचून कांहीं चांगला परिणाम व्हायाचा नाहीं. पण असें जर करावें, तर अभिमान राहिला कोठें ? आणि मराठी भाषेच्यासंबंधानें लिहितांना जी इतकी देशाभिमानाची तरफ ताणली आहे, तिचा काय उपयोग ? पण असें नव्हे. मराठीच्या संबंधानें जें कांहीं लिहिलें आहे, तें योग्य आहे, परंतु ती गोष्ट एथें लागू होत नाहीं. तें कसें म्हणाल तर पाहा. मराठीचा आणि परभाषांचा जो परस्परसंबंध आहे तो वेगळा आणि तिचा आणि तिच्या पोटभाषांचा जो संबंध आहे तो वेगळा. या पोटभाषा जरी मराठींतून एका प्रकारें भिन्न आहेत, तथापि त्यांपैकीं बहुतेक मराठीपासूनच अपभ्रंश रूपानें उत्पन्न झाल्या आहेत, किंवा फारच भेद म्हटला, तर मराठीचें मूळ आणि त्यांतील कित्येकींचें मूळ तरी एकच आहे. यामुळें त्यांच्यामध्यें आणि मराठीमध्यें फार मोठासा भेद नाहीं. कांहीं विशेष शब्द आणि कांहीं विभक्तिरूपें शिवायकरून पाहिलें असतां एकंदर भाषाशैलीच्या किंवा शब्द-संग्रहाच्या दृष्टीनें फारसा भेद नाहीं. लिंगभेदादिकांमध्येंसुद्धां फार सादृश्य आहे. बोलण्याचा जो झोंक किंवा सूर त्यामध्यें मात्र बरेंच अंतर पडतें. अशा कारणां-वरून पाहतां, मराठीला सोडून स्वतंत्ररूपानें राहण्याची त्यांच्या अंगीं योग्यताही नाहीं, आणि त्यांना ती गोष्ट शोभणारी नाहीं. सध्यां कागदोपत्रीं तर त्यांच्या ऐवजीं मराठी भाषा घेतलीच आहे. तेव्हां आमचें म्हणणें इतकेंच कीं, अपभ्रंश-रूपानें असोत किंवा कोणत्याही कारणानें असोत, मराठीच्या पोटभाषा म्हणून जितक्या आहेत, त्यांतील कोणतीही भाषा बोलणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें ही गोष्ट पूर्णपणें ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, मराठी भाषेपासून आपली भाषा वेगळी नाहीं, वेगळेपणा फारफार मानिला तरी एका पिढीच्या आंतला आहे. त्यापक्षीं त्यांची सुधारणा करणें व त्यांचा अभिमान धरणें म्हणजे इतकेंच कीं, त्या भाषांमध्यें आणि मराठीमध्यें जो जो म्हणून भेद दृष्टीस पडतो, तो तो सोडून देऊन त्या भाषांनाच शुद्ध मराठीचें स्वरूप द्यावें. कोणी म्हणेल

कीं, त्या भाषा निखालस टाकून देऊन मराठी भाषाच घ्या असें स्पष्ट कां नाहीं म्हणत? संकोचित भाषण कां करतां? तर हें म्हणणें योग्य नाहीं. कारण या पोटभाषा जर मराठीहून अगदीं भिन्न असत्या, तर तेथें त्या टाका आणि ही नवी म्हणजे मराठी भाषा घ्या, हें म्हणणें शोभतें. परंतु जर त्या वेगळ्या नाहींतच तर त्या टाका, आणि ही घ्या म्हणणें लागतच नाहीं आणि जरी त्या वेगळ्या मानिल्या तरी त्या टाका असें म्हणण्याचें आतां कारणच राहिलेलें नाहीं; कागदोपत्रीं व पुस्तकादि लेखांमध्यें त्यांचा कधींही आदर झालेला नाहीं. त्यांना मुळींच सोडून देऊन तुम्ही मराठीचें कधींच ग्रहण केलें आहे. तेव्हां त्यांचा वेगळेपणा तो राहिला आहे कोठें? यास्तव पोकळ आग्रहास न पडतां, जसें लेखांमध्यें मराठीचें निर्विवाद ग्रहण केलें आहे, तसें बोलण्यामध्येंही शुद्ध मराठी भाषा योजण्याचा सर्व महाराष्ट्रजनांनीं, म्हणजे सध्यां मराठीच्या पोटभाषा बोलणारांनींही निश्चय करावा, आणि त्याप्रमाणें चालण्याची रीत एकदम सुरू करावी. हीच त्या पोटभाषांची सुधारणा. दुसरा मार्ग नाहीं. त्या पोटभाषांना मान नाहीं, त्या अशुद्ध भाषा मानल्या जातात, इतकेंच नव्हे, पण त्या ओंगळ अप्रतिष्ठित मानल्या जातात. यामुळें त्या बोलणारांना चारचौघांमध्यें मान खालीं घालावी लागते. स्वतःच्या घरीं जरी असें न घडलें, तरी आपापल्या ठिकाणाबाहेर ते गेले, म्हणजे अभ्यास नसल्यामुळें त्यांना शुद्ध बोलतां येत नाहीं, आणि मग फटफजीतीला पारावार नाहींसा होतो. यास्तव मराठीवांचून गत्यंतर नाहीं, आणि जर गत्यंतर नाहीं, तर एकदम तिचा स्वीकार करण्यासारखें दुसरें शहाणपण नाहीं. शुद्ध भाषा बोलतां येणें हा सभ्य मनुष्याचा एक अलंकार आहे, आणि सुशिक्षितपणाचें एक अंग आहे. आणि याच्या उलट जी स्थिति ती निःसंशय लांछनास्पद आहे, ही गोष्ट प्रत्येक मनुष्यानें ध्यानांत ठेविली पाहिजे. अभिमानादि सर्व गोष्टींचा पूर्वींच निकाल केला आहे. सारांश शुद्ध मराठीचा खरा अभिमान धरणें, हाच पोटभाषांचा अभिमान होय, दुसरा नाहीं.

ही सर्व गोष्ट मान्य केली, तरी एक अडचण राहते. ती कोणती? तर ज्यांना शुद्ध मराठी भाषा बोलतां येत नाहीं, मुळींच मराठी बोलण्याचा अभ्यास नाहीं आणि आसपास शुद्ध बोलणारेही कोणी सांपडत नाहींत, तर त्यांनीं कसें करावें? या प्रश्नावरून इतकें तरी म्हणतां येते कीं, त्यांना शुद्ध भाषा शिकण्याची इच्छा आहे, असें गृहीत करण्यास बाध नाहीं. म्हणून त्यांना इतकेंच सांगणें योग्य आहे कीं, परकी लोकांना जरी मराठी भाषा कठीण वाटण्यासारखी कदाचित् असली, तरी या पोटभाषांतून कोणतीही एकादी पोटभाषा ज्याची जन्मभाषा आहे, त्याला शुद्ध मराठी भाषा शिकणें फार अवघड नाहीं. इतकेंच कीं, त्यानें श्रम घेऊन थोडासा अभ्यास केला पाहिजे.

मराठी पुस्तकें आतां पुष्कळ झालीं आहेत, तीं वाचण्याचा थोडथोडा त्यानें परिपाठ ठेवावा, म्हणजे सहजच त्याची त्यामध्यें गति होत जाईल. आमची इच्छा अशी आहे कीं, या कामीं आम्हांकडून होईल तितकें आम्हीं साहाय्य करावें. म्हणून सर्व विद्वान् लोकांस आमची विनंती आहे कीं, ज्या ज्या प्रांतीं मराठी भाषेमध्यें जे जे अशुद्ध प्रकार आढळतील, ते ते त्यांनीं कृपा करून आम्हांस कळवावें. म्हणजे ते प्रकार आणि त्यासंबंधीं आमची स्वतःची माहितीही जी असेल, ती आम्ही मोठ्या आनंदानें प्रसिद्ध करूं. ज्यांना लिहितां येत नाहीं, त्यांना ज्यांना येतें त्यांनीं जर मदत केली, तर क्रमशः सर्व गोष्टी सिद्धीस जातील. अगदीं निरक्षर आणि अशिक्षित लोकांमध्यें या गोष्टींचा एकाएकीं प्रसार होणें अंमळ कठीण आहे असें प्रथमतः वाटतें खरें; परंतु केवळ शुद्ध भाषा ऐकण्यानेंही केव्हां केव्हां अशुद्ध भाषा शुद्ध होण्याच्या मार्गास लागते. पण इतकें कशाला ? ज्यांना लिहितां वाचतां येतें, त्यांच्यापुरतीच जरी आज ही सुधारणा झाली, तरी तें मोठेंच काम झालें असें म्हटलें पाहिजे. हळूहळू पुढें क्रम सुरू ठेविल्यानें सर्व नीट होत जाईल.

कित्येक वृद्ध लोकांनाही शुद्ध भाषा शिकण्याची फार हौस असते आणि तेही मोठ्या अगत्यानें शिकतात. शिकविणारा कोणी मिळत नसला तर मात्र त्यांचा उपाय चालत नाहीं; परंतु जर कदाचित् वृद्धांना आणि कित्येक तरुणांनाही हा उद्योग आवडला नाहीं, तर त्यांत काय झालें ? ज्यांना ज्यांना इच्छा आहे, त्यांनीं तो स्वतः अभ्यास करावा आणि इतरांनाही त्यापासून होणारे फायदे दाखवून द्यावे. जे ऐकतील ते ऐकोत. ज्यांना ती गोष्ट आवडेल ते ती घेतील. इतर नाहीं घेणार इतकेंच; दुसरें काय ? पण एकपक्षीं वृद्ध लोकांना या कामीं फार तसदी देण्याचें प्रयोजनच नाहीं; कारण आपोआप मागें पडत जाणारे ते लोक. म्हणून जेव्हां त्यांच्या ठायीं इच्छा आहे असें दृष्टीस पडेल, तेव्हां अवश्य त्यांना त्या कामीं मदत करावी; परंतु जेथें इच्छेचा अभाव किंवा कंटाळा दिसेल, तेथें आग्रह चालविण्याच्या भरीस पडणें अयोग्य होय. नवीन संततीला मात्र मुळापासून शुद्धच भाषा शिकविण्याचा प्रघात होईल तितका अगत्यानें ठेवावा. एकदां तो चालू झाला म्हणजे मग त्यामध्यें कांहीं अडचण येणार नाहीं. या कामीं बायकामंडळीचें मोठें साहाय्य पाहिजे आहे. त्यांना आपण शुद्धच भाषा बोलावी अशी नैसर्गिक इच्छा असते. नवीन नवीन सुंदर सुंदर पोषाखांची आणि नवीन नवीन, चांगल्या चांगल्या दागिन्यांची जशी त्यांना मोठी हौस, तशीच आपणांस चांगली शुद्ध भाषा बोलतां यावी अशी त्यांना फार हौस असते. परंतु स्त्रिया म्हटल्या म्हणजे स्वभावतः अंमळ लज्जाशील, म्हणून त्यांना हा नवीन प्रकार घेण्याला पुरुषांनींच आरंभीं उत्तेजन

देऊन, अडल्या प्रसंगीं होईल तितकें साहाय्य केलें पाहिजे. एकदां तो संकोच-रूपी अडथळा दूर झाला, म्हणजे मग पुढें कांहीं अडचण येणार नाहीं आणि भाषा शिकण्याच्या कामीं पुरुषांपेक्षां स्त्रियांच्या अंगीं अधिक सामर्थ्य आहे असें सहज दृष्टीस पडेल.

कित्येकांची अशी एक अडचण असते कीं, ते म्हणतात आम्हांला मुळापासून आपल्या मंडळीमध्यें आमच्या जन्मभाषेहून वेगळी भाषा बोलण्याचा अभ्यास नसल्यामुळें तशा मंडळीमध्यें मराठी भाषा बोलण्याला मोठा संकोच वाटतो, इतकेंच नव्हे, तर तो नवा प्रकार केवळ थट्टेसारखा वाटतो आणि मन-मोकळें पोटभर त्या भाषेनें बोलण्याला उल्हास येत नाहीं; कसेंसेंच वाटतें आणि मनाचें समाधान होत नाहीं, त्याला काय करावें ? पण कोणतीही नवी रीत चालू केली म्हणजे प्रथमतः तसें वाटावयाचेंच. इंग्रजी भाषा शिकणारांना ही गोष्ट माहीत आहे कीं, आरंभीं कांहीं दिवसपर्यंत त्या भाषेनें बोलण्याला फार शरम वाटते. चुका झाल्याबद्दल किंवा नवा प्रकार घेतल्याबद्दल कित्येक लोक थट्टाही करतात; परंतु हें सर्व आठ-पंधरा दिवस किंवा फार तर महिना दोन महिने चालतें. पुढें मग कांहीं नाहीं. तोच प्रकार येथें व्हावयाचा. आपापसा-मध्यें इंग्रजीसारख्या अगदीं भिन्न भाषेनें जर आम्हीं निःशंकपणें बोलतों, तर शुद्ध मराठीनें बोलण्यालाच आम्हांला संकोच वाटावा आणि त्या संकोचाला भिऊन आम्ही तो उद्योग सोडून द्यावा, हीच मोठी लज्जेची आणि नादान-पणाची गोष्ट आहे. सारांश, असल्या पोरकट शंकांमध्यें कांहीं अर्थ नाहीं हेंच सत्य.

आणखी असा एक प्रश्न आहे कीं, कानडा जिल्ह्यामध्यें आणि पलीकडे दक्षिणेस समुद्रतीरीं कोची प्रांतीं जे कोंकणी भाषा बोलणारे सहस्रावधि लोक राहत आहेत त्यांनीं काय करावें ? त्यांच्या देशीं मराठी भाषा नाहीं. देशभाषा म्हटली म्हणजे कानडी, मल्याळी, किंवा मलबारी. त्यांच्या कोंकणी भाषेची स्थिति पाहिली, तर मालवणी किंवा गोमंतकीपेक्षांही वाईट. त्यांनीं जर ती भाषा सोडावी तर मग घरची भाषा मराठी करावी, किंवा ती ती देशभाषाच घरीं चालवावी ? हा प्रश्न बिकट दिसतो खरा, परंतु याचा निकाल सरळ आहे. कारण त्या गोष्टीचा आम्ही आमच्या मतें कसाही निर्णय केला, तरी तो त्या लोकांच्या कानीं जाऊन पडण्याचीच प्रथमतः मोठी भ्रांति, तेव्हां त्याप्रमाणें वागणें किंवा न वागणें ही दूरची गोष्ट होय. परंतु जर हा लेख मूळ रूपानें किंवा निदान भाषांतर रूपानें तरी त्यांच्या पाहाण्यांत येईल आणि जर त्यांना हा विषय विचार करण्यासारखा आहे इतकें वाटूं लागेल, तर आमची अशी खात्री आहे कीं, त्यांना जो योग्य मार्ग

तो सहज मिळेल. तो असा–देशभाषा ज्या आहेत, त्यांचा तर ते सध्या अभ्यास करीतच आहेत. त्या प्रमाणेंच इतउत्तर पुढेंही तो अभ्यास त्यांनीं चालविला पाहिजे. कारण देशभाषे वांचून गत्यंतर नाहीं. परंतु ती भाषा सहज होते, शाळा-मध्यें तिचा अभ्यास चालतो, कामकाजामध्यें वहिवाटीनें ती येते. परंतु घरीं बोलायाची जी भाषा तिच्या जागीं त्यांनीं ती ती देशी भाषा घ्यावी अशी आम्हीं कधींही संमति देणार नाहीं. त्यांना स्वभाषा सोडून देशी भाषाच घरीं चालवा अशी कोणी शिफारस करील, तर आम्हांला ती गोष्ट मान्य होणार नाहीं. बेहत्तर त्यांची ती अशुद्ध कोंकणी भाषा आहे तशीच पाहिजे तर चालू ठेवावी, आणि बाहेरच्या व्यवहारामध्यें मात्र देशी भाषा चालवावी. परंतु कोणत्याही सबबेनें आपल्या घरच्या भाषेमध्यें त्यांनीं असा बिघाड उत्पन्न होऊं देऊं नये. तसा बिघाड झाल्यास नफ्यापेक्षां नुकसान फार मोठें होईल. प्रथमतः कदाचित् तें लक्षांत येणार नाहीं; परंतु थोडासा विचार करून पाहिला तर आमच्या म्हणण्याचा खरेपणा सहज ध्यानांत येईल. आम्हीं म्हणतों, नफ्यापेक्षां नुकसान फार होईल; फार फार नुकसान होईल; त्या नुकसानीची कल्पनासुद्धां किती एकांच्या लक्षांमध्यें एकाएकीं येणार नाहीं. इतकें मोठें नुकसान होईल. असें तें नुकसान कोणचें; असा सहज प्रश्न होणार. आमच्या म्हणण्याचा खरेखोटेपणा पहा. त्यांची जी ही सध्यांची कोंकणी भाषा आहे, हा त्यांचा सहस्रावधि वर्षांचा जागता इतिहास होय. जरी ते शेंकडों वर्षें परदेशामध्यें जाऊन राहिले आहेत, तरी ते कोण ? तर सर्व भरत-खंडामध्यें ज्यां पासून वेदादि विद्यांचा प्रसार झाला, ज्यांपासून देशांत मुळीं ज्ञानांकुर पसरला, त्या आर्यांचे हे अव्यवहित वंशज आहेत असें या त्यांच्या इतिहासावरून सहज समजतें. हे मूळचे उत्तरदेशीय असल्यामुळें महाराष्ट्रादि सांप्रत काळच्या आर्य लोकांशीं जितका त्यांचा मूळचा निकट सहोदरसंबंध आहे, तित-क्याचा शतांशही त्यांचा द्रविडांचीं मूळचा संबंध नाहीं. यावरून आम्ही द्रविडांचा तिरस्कार करितों असें कोणींही समजूं नये. परंतु आमचें म्हणणें इतकेंच कीं, सद्भाग्यानें म्हणा किंवा, भाग्याभाग्याची गोष्ट मनांत न आणिली तरी, सहज-गत्या म्हणा, ज्यांना मूळचें आर्यत्व आहे, त्यांनीं आपल्या आर्यत्वाची मोठी खूण जी आपली भाषा ती आपण होऊन टाकून देणें ही गोष्ट फार अयोग्य होय. त्यांनीं मराठी भाषाच घेतली पाहिजे. त्यांना मराठी भाषा अवघड जाणार नाहीं हें वर सांगितलेंच आहे. येणेंकरून दुसरा एक मोठा चांगला परिणाम होईल. तो असा–देशभाषा जी द्राविडजातीय आहे, तिचें लौकिक कामकाजाच्या संबंधानें त्यांनीं ग्रहण केलें असल्यामुळें आर्यांचा आणि द्रविडांचा स्नेहभाव कायमचा कायम राहून, आर्यांचें आर्यत्वही कायम राहील. जर त्यांनीं घरीही द्रवीड जातीय भाषा घेतली, तर त्यांचा जो अनादिसिद्ध उत्तरदेशीय लोकांशीं निकट संबंध

आहे, तो आणि त्यांचे उत्तरदेशीयत्व हीं दोन्ही एकदम तुटून जातील, आणि भाषेच्या संबंधानें आम्हांला ते केवळ परकीय बनतील ही गोष्ट आम्हांला तर इष्ट नाहीं. जे म्हणत असतील कीं, त्यांत काय आहे? दुहेरी भाषा कशाला पाहिजेत? एक देशी भाषा आहे तीच सर्वत्र कायम केली म्हणजे झालें. त्यांनीं या गोष्टीचा नीट विचार करावा, आणि मग हवें तसें करावें. परंतु आम्हांला तर ती गोष्ट पसंत नाहीं, असें आम्ही पुनः म्हणतों. ज्यांना महाराष्ट्र देशाशीं आणि महाराष्ट्र लोकांशीं आपलें कांहीं कर्तव्य नाहीं असें वाटत असेल, त्यांनीं मराठी भाषेशीं असलेला आपला प्राचीन संबंध पाहिजे तर बेलाशक तोडून टाकावा. परंतु त्यांनीं इतकें खचित समजावें, कीं तसें करणें ही त्यांची मोठी चूक होईल, आणि एकदां हातून गेलेली गोष्ट पुनः सुधारून घेणें फार कठीण, किंबहुना अशक्य होऊन जाईल.

याप्रमाणें गृहीत विषयाच्या संबंधाच्या चारही गोष्टींचें विवेचन केलें. यावरून आतां आपल्या भाषांचें पुढें काय व्हायाचें, याचा निश्चय जरी नव्हे, तरी सामान्यतः झोंक सहज लक्षांत येईल.

आमच्या भाषांच्या सुधारणेला अनुकूल गोष्टी कोणत्या आणि प्रतिकूल कोणत्या, हेंही आमच्या मतें आम्हीं स्पष्ट केलें आहे. अनुकूल गोष्टी जर दिवसें-दिवस प्रबल होत जातील, तर आमच्या भाषांची भरभराट होत जाईल, नाहीं-तर त्यांचा मोड होत जाईल हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. तथापि मराठी भाषेचे सर्व लोक या सर्व गोष्टींचा चांगला विचार करतील आणि तिची योग्य सुधारणा आणि योग्य भरभराट करण्याकडे आपलें पूर्ण लक्ष देतील, अशी पूर्ण आशा धरून, हा विषय आतां आटोपता घेतों.

या विषयांच्या संबंधानें ज्या कोणास कांहीं सुचवावयाचें असेल किंवा आपलें मत प्रसिद्ध करावयाचें असेल, त्यांनीं तें आम्हांकडे लिहून पाठविल्यास, अनुकूल किंवा प्रतिकूल कसेंही असो, त्याला मोठ्या संतोषानें या पुस्तकांत स्थळ दिलें जाईल.

लेखक-परिचय

बाळशास्त्री गंगाधर जांभेकर

जन्म १८१२ : मृत्यु १७ मे १८४६

बाळशास्त्री म्हणजे अव्वल इंग्रजी कालांतील मूर्तिमंत चैतन्य. त्या कालखंडांत त्यांनीं दाखविलेल्या एकेका गुणानेंही त्यांची किर्ति अबाधित राहिली असती, इतक्या विविध गुणांचा प्रादुर्भाव त्यांच्या व्यक्तिमत्त्वांत आढळतो. तीव्र ज्ञानलालसा, निरलस ज्ञानोपासना आणि अखंड ज्ञानदान यांचें ते प्रतीक होते. कोंकणांतून शिक्षणासाठीं म्हणून वयाच्या तेराव्या वर्षी मुंबईस आले आणि त्यांच्या बुद्धिमत्तेच्या प्रभावामुळें केवळ त्यांच्या वयाच्या अठराव्या वर्षी त्यांची बाँबे नेटिव एज्युकेशन सोसायटीचे नेटिव सेक्रेटरी म्हणून नेमणूक झाली. अल्पावधींतच एल्फिन्स्टन संस्थेतील पहिले हिंदी प्राध्यापक होण्याचा मान त्यांनी पटकाविला. जे. पी., दक्षिण विभागाचे स्कूल सुपरिंटेंडेंट, नॉर्मल स्कूलचे डिरेक्टर इ. अल्पायुष्यांत त्यांनीं भूषविलेल्या अधिकाराच्या जागा पाहिल्या म्हणजे त्यांच्या विलक्षण कर्तृत्वाची कल्पना येते.

या सर्वांपेक्षां त्यांनीं व्याकरण, भूगोल, गणित, इतिहास, कोश आणि प्राचीन मराठी वाङ्मयाचें संशोधन इत्यादि क्षेत्रांत लक्षणीय ग्रंथनिर्मिति करून त्यांच्या सहाय्यानें मुक्त हस्तानें समाजाला ज्ञानदान केलें आहे.

मराठी वृत्तपत्रांची सुरुवात बाळशास्त्र्यांनींच केली. १८३२ सालीं त्यांनीं ' दर्पण ' हें पहिलें वृत्तपत्र सुरू केलें. १८३७ सालीं दिग्दर्शन हें पहिलें मराठी मासिक त्यांच्याच प्रेरणेनें सुरू झालें. सामाजिक सुधारणेची आवश्यकता आणि राजकर्त्यांच्या सत्ताधारी नीतीचे दुष्परिणाम बाळशास्त्र्यांनीं या वृत्तपत्रांतून निर्धारानें स्पष्ट केले आहेत.

ह्या संग्रहांतील त्यांचे दोन्ही लेख ' दर्पण ' मधून अनुक्रमें २४ ऑगस्ट १८३२ व १४ सप्टेंबर १८३२ या अंकांतून प्रसिद्ध झाले आहेत. ' दर्पण ' मध्यें इंग्रजी आणि मराठी ह्या दोन्ही भाषांतून बातमीपत्रें व लेख येत. त्यांतून बाळशास्त्र्यांचें इंग्रजी भाषेवरचें प्रभुत्व लक्षांत येतें. त्यांचें मराठी लेखन मात्र अव्वल इंग्रजींतील आपल्या भाषेच्या प्राथमिक अवस्थेचें निदर्शक होय.

◆ ◆ ◆

लोकहितवादी (गोपाळराव हरि देशमुख)

जन्म १८ फेब्रुवारी १८२३ : मृत्यु आक्टोबर १८९२

गोपाळरावांचा जन्म व शिक्षण पुण्यास झालें. ७ व्या वर्षी विवाह आणि बाराव्या वर्षी पितृनिधन यांमुळें लहानपणींच त्यांच्यावर मोठी जबाबदारी पडली. त्या वेळीं त्यांनीं 'कोडतांत' नोकरी केली व पुढें इंग्रजी शाळेंत नांव घालून इंग्रजी व इतिहास या विषयांत प्रावीण्य मिळविलें. त्यामुळें न्यायालयांत ७७ रु. दरमहाची ट्रॅन्स्लेटरची जागा त्यांना मिळाली. पुढें मुन्सफीची परीक्षा पास होऊन मुन्सफ, प्रिन्सिपॉल सदर अमीन, असिस्टंट इनाम कमिशनर, असिस्टंट जज्ज, स्मॉल कॉज कोर्ट जज्ज, जॉईंट जज्ज, इ० निरनिराळ्या जबाबदारीच्या हुद्यांवर त्यांनीं कामें केलीं. त्यांच्या कामगिरीचा विचार करून त्यांना 'रावबहादूर' ही पदवी सरकारनें दिली. मुंबई विद्यापीठाचे फेलो, जे. पी., पहिल्या वर्गाचे सरदार, कायदे कौन्सिलचे सभासद, रतलामचे दिवाण इत्यादि मानाच्या जागा त्यांनीं भूषविल्या.

'ज्ञानप्रकाश'च्या संस्थापकांमध्यें ते होते व चार वर्षें त्याचे संपादकही होते. वयाच्या पंचविसाव्या वर्षी इंग्रजी विद्येनें प्रेरित होऊन त्यांनीं भाऊ महाजन यांनीं काढलेल्या 'प्रभाकर' पत्रांत १८१८ ते १८५० मध्यें समाजहिताच्या कळकळीनें जे आवेशपर लेख लिहिले, ते 'लोकहितवादींचीं शतपत्रें' या नांवानें प्रसिद्ध आहेत.

यांखेरीज अनेक छोटेमोठे ग्रंथ लोकहितार्थ त्यांनीं लिहिले व ते फुकट वाटले. महाराष्ट्रांतील सामाजिक सुधारणेच्या कर्तबगार पुरुषांमध्यें त्यांची गणना होते.

ह्या संग्रहांतील 'लाच व लाचेचा गुन्हा' हा लेख त्यांच्या 'लाच' आणि 'लाचेचा गुन्हा' या दोन लेखांचें संकलन आहे. या संग्रहांतील तिन्ही लेख शतपत्रांतूनच घेतले आहेत.

गोविंद विठ्ठल ऊर्फ भाऊ महाजन

जन्म १८१५ : मृत्यु १८९०

जुन्या काळच्या अत्यंत वैभवसंपन्न घराण्यांत कुलाबा जिल्ह्यांतील पेण येथें भाऊंचा जन्म झाला; परंतु त्यांच्या वडिलांच्या कारकीर्दींत सारें वैभव लयाला गेलें आणि वयाच्या आठव्या वर्षी भाऊंस आपले मेहुणे बापु छत्रे यांजकडे शिक्षणार्थ

राहावें लागलें. ' दि बॉम्बे नेटिव्ह स्कूल बुक अँड स्कूल सोसायटी ' या नांवाच्या प्राथमिक शाळेंतून १८२७ सालीं ते शिक्षण संपवून बाहेर पडले. पुढें परिस्थितिमुळें भाऊंस दुय्यम आणि महाविद्यालयांतील शिक्षण मोठ्या कष्टानें पदरीं पाडून घ्यावें लागलें.

कॉलेजमध्यें असतांनाच त्यांना लेखनाची गोडी लागली आणि पुढें महाविद्यालयांतून १८४८ मध्यें बाहेर पडल्यावर त्यांनी ' प्रभाकर ' नांवाचें साप्ताहिक सुरू केलें. इंग्रजी शिक्षणानें आपल्या तरुण सुशिक्षितांमध्यें जी एक नवी दृष्टि आणि नवा ध्येयवाद आला त्याचा पुरस्कार करून ' वृत्तपत्र ' ही एक नवी शक्ति म्हणून कौशल्यानें राबविण्यांत भाऊ अग्रेसर होते. सामाजिक, राजकीय व वाङ्मयीन दृष्ट्या ' प्रभाकर ' ने भाऊंच्या संपादनाखाली मोलाची कामगिरी बजाविली आहे.

१८५३ सालीं भाऊंनीं प्रभाकरच्या जोडीला ' धूमकेतू ' नांवाचें स्वस्त किंमतीचें साप्ताहिक काढलें. त्यांतल्या चटकदारपणामुळें तें चांगलेंच लोकप्रिय झालें होतें.

भाऊ महाजन हे अत्यंत कर्तबगार, समाजहिततत्पर, सहिष्णु, उद्योगी आणि धडाडीचे संपादक होते. मराठीतलें पहिलें वृत्तपत्रकार ' बाळशास्त्री ' होते, परंतु भाऊंनीं या व्यवसायांत शिरून आपल्या व्यापक भूमिकेंतून वृत्तपत्रव्यवसायास प्रतिष्ठा आणली व तिची पक्की मुहूर्तमेढ रोविली.

या संग्रहांतील त्यांचा पहिला लेख मार्च १८५२ च्या व राहिलेले तीन लेख मार्च-एप्रिल १८५४ च्या ' धूमकेतू 'तील आहेत.

◆ ◆ ◆

कृष्णशास्त्री हरिपंत चिपळूणकर

जन्म १८२४ : मृत्यु २० मे १८७८

अव्वल इंग्रजी कालखंडांतील कृष्णशास्त्री चिपळूणकर ही व्यक्ति मोठी वैचित्र्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण म्हणावी लागेल.

वयाच्या पंचविसाव्या वर्षापर्यंत जुन्या पद्धतीनें त्यांनीं वेदोपनिषदांचें व छंदादि शास्त्रांचें निष्ठेनें परिशीलन केलें. याच कालखंडांत त्यांनीं दाखविलेली बुद्धिमत्तेची चमक पाहून त्यांचे गुरु मोरशास्त्री साठे यांनीं त्यांना मोठ्या उदार मनानें ' बृहस्पति ' ही पदवी दिली आणि त्याच बरोबर नव्या युगधर्माला अनुसरून त्यांनीं इंग्रजी विद्या आत्मसात करावी, असा आदेश दिला. त्यांच्या तीव्र

बुद्धिमत्तेनें लवकरच इंग्रजी भाषा आत्मसात केली आणि लीलेनें इंग्रजी वाङ्मयांत अवगाहन करूं लागले. इंग्रजी भाषेच्या साहाय्यानें पाश्चात्य इतिहास, अर्थशास्त्र तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान व वाङ्मय यांमध्यें ते सहजगत्या संचार करूं लागले.

त्यांच्या बुद्धीची झेंप पाहून त्यांच्याकडे शिक्षण खात्यांतील मोठमोठ्या अधिकाराच्या जागा चालत आल्या.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्यें जी आधुनिकता आणि विचारामध्यें जी अद्ययावतता आली, त्याचा उपयोग त्यांनीं स्वतंत्र ग्रंथलेखनासाठीं केला नाहीं, हें पाहून आश्चर्य वाटतें. त्यांनीं ' अरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' इंग्रजींतून मराठींत आणल्या, रासेलसचें मराठीकरण करावयास घेतलें, संस्कृतांतील 'मेघदूत' मराठींत अनुवादलें आणि इंग्रजींतील कित्येक महत्त्वाचे विचार व विषय मराठींत सुगम करून सांगितलें. या सर्व लेखनानिमित्त प्रगट झालेलें त्यांच्या भाषाशैलीचें सामर्थ्य लक्षांत घेण्यासारखें आहे. श्लिष्ट, प्रगल्भ व प्रासादिक भाषाशैलीचें आकर्षक रूप त्यांनींच प्रथम मराठी वाचकांना बहाल केलें. खिस्ती धर्मोपदेशकांच्या प्रचाराला आळा घालण्यासाठीं १८५२ सालीं त्यांनीं ' विचार लहरी ' नांवाचें पाक्षिक काढलें होतें, पण त्यांनीं तें फार दिवस चालविलें नाहीं.

रसिक, विद्वान् तैलबुद्धीचे, विद्याप्रेमी आणि समाधानी व्यक्ति एवढेंच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें रूप डोळ्यांसमोर उभें राहतें.

ह्या संग्रहांतील दोन्ही लेख १८६१ सालीं प्रसिद्ध झालेल्या ' अनेकविद्या मूलतत्त्व संग्रह ' या लेखसंग्रहांतील आहेत.

◆ ◆ ◆

बाबा पदमनजी मुळे

जन्म मे १८३९ : मृत्यु २९ ऑगस्ट १९०६

इंग्रजी विद्या, खिस्ती धर्मोपदेशकांचा प्रचार आणि समाजसुधारणेची चळवळ यांमुळें अव्वल इंग्रजीच्या काळांत, आपला धर्म आणि आपल्या सामाजिक चालिरीती यांचा गंभीरपणें विचार होऊं लागला. लहानपणापासूनच धार्मिक वाङ्मयाची आवड असलेल्या बाबा पदमनजींवर मिशन शाळेंत खिस्ती शिकवणुकीचे जे संस्कार झाले, त्यामुळें हिंदुधर्माचा त्याग करून ३ सप्टेंबर १८५४ रोजीं ते खिस्ती झाले आणि नंतरचें सर्व आयुष्य खिस्तसेवा, खिस्तधर्मपर वाङ्मयनिर्मिति आणि ज्ञानसाधना व ज्ञानदान करण्यामध्यें घालविलें. पुण्याच्य ।

फ्री चर्चमिशनमध्यें बाबा बरीच वर्षें शिक्षक होते. नंतर सतत २५ वर्षें ते ट्रॅक्ट सोसायटीचे एडिटर होते. मोल्सवर्थ-कँडी यांनीं संपादिलेल्या कोशांच्या संक्षिप्त व सुटसुटीत आवृत्त्या त्यांनीं तयार केल्या. आपल्या खिस्तधर्म-प्रवेशाची पार्श्व-भूमि व मनोभूमिका समजावून देण्यासाठीं त्यांनीं 'अरुणोदय' नांवाचें आत्म-चरित्र लिहिले. हिंदु-विधवांच्या दुःस्थितीचें चित्रण करून हिंदु चालीरीतींतील अमानुषता वर्णून खिस्ताच्या भूतदयेचें चित्र वाचकांच्या मनावर ठसविण्यासाठीं त्यांनीं १८५७ सालीं 'यमुनापर्यटन' ही कादंबरी लिहिली. मराठींतील ही पहिली कादंबरी होय. यांखेरीज धर्मपर अशी छोटीमोठी मिळून बाबांनीं शंभरावर पुस्तकें लिहिलीं आहेत. अशा रीतीनें 'मराठी खिस्ती वाङ्मयाचा पाया' त्यांनींच घातला आणि हें वाङ्मय मोठें समृद्ध केलें.

'यमुनाबाईच्या नवऱ्यास पत्र' हा उतारा 'यमुनापर्यटन' या कादंबरींतून घेतला आहे व दुसरा उतारा त्यांच्या आत्मचरित्रांतील आहे.

◆ ◆ ◆

गोविंद नारायण माडगांवकर

जन्म १८१५ : मृत्यु २५ मार्च १८६५

माडगांवकरांचा जन्म गोव्यांत झाला. त्यांचे वडील तेथे तपकिरीचा धंदा करीत. १८२४ च्या सुमारास त्यांनीं ते दुकान मुंबईस हालविलें; त्यामुळें गोविंद नारायणांचें शिक्षण मुंबईसच सुरू झालें. प्रवेश परीक्षेपर्यंत त्यांचें शिक्षण झालें होतें, इतक्यांत १८३३ सालीं त्यांच्या वडिलांचें निधन झालें आणि घरची जबाबदारी शिरावर पडल्यामुळें १९३८ पर्यंत कांहीं शिक्षणक्रम पुरा करून त्यांनीं डॉ. विल्सन यांच्या शाळेंत शिक्षकाची नोकरी धरली. पुढें ते त्याच शाळेचे हेडमास्तर झाले.

माडगांवकरांनीं नव्या पिढीमध्यें नीतिधर्माची प्रतिष्ठापना व्हावी आणि ज्ञान वाढीला लागावें, या हेतूनें अनेक पुस्तकें लिहिलेलीं आहेत. त्या पुस्तकांची संख्या जवळजवळ १७–१८ भरेल. त्यांमध्यें त्यांनीं तत्कालीन मुंबई शहराची माहिती देण्याकरितां लिहिलेलें 'मुंबईचें वर्णन' हें पुस्तक अप्रतिम आहे. या पुस्तकांतील उतारा त्याच पुस्तकांतील आहे.

गोविंद नारायण हे आदर्श शिक्षक व शुद्ध, रसाळ व गोड अशा भाषाशैलींत उद्‌बोधक व माहितीपूर्ण विषयांवर लिहिणारे प्रासादिक

लेखक म्हणून प्रसिद्ध होते. त्या वेळच्या मराठी ज्ञानप्रसारक सभेचे ते उपाध्यक्ष होते. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वेळीं मुंबईत सार्वजनिक सभा भरवून त्यांच्या बद्दलची कृतज्ञता म्हणून त्यांना ७ हजार रुपयांची थैली दिली होती.

◆ ◆ ◆

दादोबा पांडुरंग तर्खडकर

जन्म ९ मे १८१४ : मृत्यु १७ ऑक्टोबर १८८२

अव्वल इंग्रजींतील श्रेष्ठ ज्ञानोपासक आणि कर्तबगार पुरुषांमध्यें दादोबांची गणना होते. त्यांचें प्राथमिक शिक्षण मुंबईच्या एल्‌फिन्स्टन संस्थेमध्यें झालें. नंतर इंग्लिश स्कूलांत वेस्ट स्कॉलर असतांनाच त्यांनीं खडतर प्रयत्नानें 'मराठी व्याकरण' लिहून प्रसिद्ध केलें आणि मराठी नकाशे छापले.

सुरुवातीस कांहीं दिवस एल्‌फिन्स्टन शाळेंत शिक्षक म्हणून काम केल्यावर त्यांनीं जावऱ्याच्या नबाबाचे खासगी शिक्षक म्हणून नोकरी पत्करली. तेथून ते परत एल्‌न्स्टिन हायस्कूलमध्यें दुय्यम शिक्षक म्हणून काम पाहूं लागलें. त्यानंतर सुरत येथील शाळेंत त्यांनीं कांहीं दिवस काम केलें. तेथून बडोद्यास गेलें असतां तेथें घडलेल्या हकीकतींचे त्यांनीं आपल्या आत्मचरित्रांत केलेलें वर्णन 'बडोद्यांतील होळीचें आमंत्रण' या उताऱ्यांत पाहावयास मिळतें.

मुंबई येथें बाळशास्त्री जांभेकर यांच्या मृत्युमुळें रिकाम्या झालेल्या जागेवर त्यांची नेमणूक झाल्यामुळें बडोद्याची चाकरी न स्वीकारतां ते मुंबईस आले आणि नॉर्मल क्लासच्या संचालकाची नोकरी त्यांनीं पत्करली. त्यानंतर त्यांची नेमणूक नगर येथें डे. कलेक्टर म्हणून झाली. तेथें १८५७ सालीं उद्‌भवलेल्या भिल्लांच्या बंडाचा बीमोड त्यांनीं मोठ्या मुत्सद्देगिरीनें केला. सरकारनें त्यांना 'रावबहादूर' ही पदवी देऊन त्यांचा योग्य तो गौरव केला.

दादोबांनीं मोरोपंतांच्या 'केकावली'वर यशोदा पांडुरंगी नांवाची टीका लिहिली आहे. तिची प्रस्तावना संपादित करून या संग्रहांत छापली आहे.

दीर्घोद्योग आणि समाजहिताची कळकळ, हे दादोबांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष लक्षांत राहतात. समाज-सुधारणेच्या तळमळींतून दादोबांनीं परमहंस सभेची स्थापना केली होती. सेवानिवृत्तीनंतरही त्यांनीं मोठमोठीं कामें तत्परतेनें केलेलीं दिसतात. मृत्युसमयीं ते 'ओरिएंटल ट्रॅन्सलेटर'च्या हुद्यावर होते.

◆ ◆ ◆

विष्णुबुवा ब्रह्मचारी (विष्णु भिकाजी गोखले)

जन्म १८२५ ठाणे जिल्ह्यांतील शिरवली येथें मृत्यु १८७१

भिकाजीपंतांस ११ अपत्यें होतीं, त्यांपैकीं विष्णु हा दहावा. त्याच्या वयाच्या पांचवे वर्षीं वडील दिवंगत झाले, म्हणून लवकरच त्यानें गांवांतच उमेदवारी सुरू केली आणि ९ व्या वर्षीं महाड येथें कस्टम खात्यांत नोकरी मिळविली.

लहानपणापासूनच अखंड वाचनाचा नाद. त्यांत अध्यात्मसाधनेची भर पडली आणि आजन्म ब्रह्मचारी राहण्याची प्रतिज्ञा करून ते अरण्यवासी झाले.

त्यांनीं एका छोट्या आत्मवृत्तामध्यें आपणास दत्तात्रयाचा वर असल्याचें सांगितलें आहे. बुवा प्रखर बुद्धिवादी होते आणि वेदोक्त हिंदुधर्म हा सर्वश्रेष्ठ असून हिंदुधर्मानें आपल्या पुराणोक्त कर्मकांडांच्या जंजालांतून सुटून परत वैदिक कल्पनांचा आश्रय घ्यावा, असें त्यांनीं ' वेदोक्त धर्मप्रकाश ' या ग्रंथांत प्रतिपादिलें आहे. पंजाबांत स्वामी दयानंदांनीं नंतर कांहीं वर्षांनीं ज्या वेदोक्त धर्माचा प्रसार केला, त्याहीपूर्वी विष्णुबुवांनीं त्या कल्पनेचा पाठपुरावा केलेला आढळतो.

वादविवाद आणि अत्यंत कुशाग्र बुद्धिमत्तेचे, दृढनिश्चयी असल्यानें त्यांनीं मुंबई येथें चौपटीवर खिश्चन मिशनऱ्यांचा प्रचारी व्याख्यानांना समोरासमोर उत्तरें देऊन त्यांच्या अपप्रचारास आळा घालण्याची मोठी कामगिरी बजांवलेली आहे.

' सुखदायक राज्यप्रकरणीं निबंध, त्यांनीं १८६७ सालीं लिहिला. मार्क्सवाद, समाजवाद, इ. पाश्चिमात्त्य राष्ट्रांतून निरनिराळे वाद इकडे आले, परंतु अत्याधुनिक समाजवादाची कल्पना ह्या निबंधामध्यें विष्णुबुवांनीं महाराष्ट्रांत कित्येक वर्षें अगोदर केव्हांच बोलून दाखविली आहे. विष्णुबुवांच्या द्रष्टेपणाचीही खूण निःसंशय विचार करावयास लावणारी आहे.

◆ ◆ ◆

नीलकंठ जनार्दन कीर्तने

जन्म १८४४ : मृत्यु १८९६

महाराष्ट्राची अस्मिता जागृत करणाऱ्या विचारवंतांत कीर्तन्यांची गण होते. इंग्रजांनीं लिहिलेल्या आपल्या इतिहासांतील चुका दाखवून महाराष्ट्रा खरा इतिहास शोधण्याची, लिहिण्याची प्रेरणा यांच्या या छोट्या निबंधा मिळाली. हा निबंध त्यांनीं १८६७ सालीं डेक्कन कॉलेजमध्यें असतांना वि र्थ्यांनीं स्थापिलेल्या 'पूना यंग मेन्स असोशिएशन' या सभेपुढें वाच कृष्णशास्त्री चिपळूणकर व शंकर पांडुरंग पंडित यांनीं तो ऐकून लेखका तारीफ केली.

कीर्तन्यांनीं शेक्सपियरच्या हॅम्लेट नाटकाचें भाषांतर केलें आहे व संशोध पूर्ण असे कांहीं निबंध लिहिलेले आहेत. 'हमीर महाकाव्य' हा प्राचीन संस्क ग्रंथ त्यांनीं संपादित केला आहे.

शिक्षण संपल्यावर त्यांनीं इंदूर, जावरा, देवास इत्यादि संस्थानांतून नोकर केल्या. त्यांना सरकारनें 'रावबहादूर' ही पदवी दिली होती.

◆ ◆ ◆

काशीनाथ बाळकृष्ण मराठे

जन्म १६ जुलै १८४४ : मृत्यु १३ नोव्हेंबर १९१८

पुण्यांतील प्रतिष्ठित शास्त्री घराण्यांत श्री. मराठे यांचा जन्म झाल संस्कृत भाषेचा लहानपणींच त्यांनीं चांगला अभ्यास करून त्यामध्यें प्रावीण मिळविल्यामुळें त्यांना सारख्या शिष्यवृत्त्या मिळत गेल्या, आणि त्या शिष्य वृत्त्यांच्या साहाय्यानें त्यांना स्वावलंबनानें महाविद्यालयीन शिक्षण घेतां आलें.

बी. ए. झाल्यानंतर 'त्यांना दक्षिणा फेलोशिप' मिळाली व लवकरच वऱ्हाड-नागपूरकडे नोकरीस लागले. कांहीं वर्षें नोकरी करून ते कायद्या अभ्यास करू लागले व एल्. एल्. बी. होऊन सरकारी न्यायखात्यांत शिरले.

सेवानिवृत्त झाल्यानंतरही त्यांनीं डेक्कन कॉलेजांत संस्कृताचे प्राध्याप म्हणून काम केलें.

'नावल व नाटक' हा त्यांचा प्रसिद्ध निबंध त्यांनीं १८७२ च फेब्रुवारीमध्यें ज्ञानप्रसारक सभेपुढें वाचला.

तत्कालीन नाटकें व कादंबऱ्या यांचा विचार करणारा महत्त्वाचा पहिला लेख म्हणून या लेखास ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालें.

रावबहादूर मराठे यांनीं हा निबंध लिहिण्याअगोदर 'वेदांविषयीं निबंध' हे पुस्तक १८६९ मध्यें लिहिलें होतें. त्यांनीं बृहदारण्यकोपनिषदाच्या तिसऱ्या व चवथ्या अध्यायाचें भाषांतर केलें आहे व तुकारामाचें अभंग इंग्रजींत अनुवादिले आहेत.

◆ ◆ ◆

विष्णुभट बाळकृष्णपंत गोडसे, वरसईकर

जन्म १८२७ : मृत्यु १९०१

ठाण्याजवळील वरसई गांवच्या विष्णुभटांनीं घरच्या गरिबीमुळें आपल्या चुलत्याच्या सल्ल्यानें ब्रह्मकर्म शिकून घेतलें. उत्तर हिंदुस्थानांतील मोठमोठ्या संस्थानिकांकडून आणि दानशूर धनिकांकडून दक्षिणेच्या रूपानें भरपूर पैसा गोळा करावा व वर्षभरांत परत यावें, या इच्छेनें ३० मार्च १८५७ रोजीं ते आपले चुलते रामकाका यांजबरोबर उत्तर हिंदुस्थानच्या प्रवासाला निघाले. एक जुलैला ते महूच्या छावणींत पोंचले, तेव्हां सत्तावन्नाच्या बंडाचा प्रादुर्भाव झालेला होता. तेथून पुढें उज्जैन, धार, ग्वाल्हेर या मार्गानें प्रवास करीत चातुर्मास संपवून नोव्हेंबर महिन्यांत ते झांशी येथें पोंचले.

या उताऱ्यांमध्यें त्यांनीं तेथें पोंचल्यावर तत्कालीन झांशी व झांशीच्या राणीचें झालेलें दर्शन यांचें अत्यंत परिणामकारक चित्र रेखाटलें आहे.

झांशी येथें चुलत्या-पुतण्यांचे तीन-चार महिने मोठ्या सुखांत गेले; परंतु बंडवाल्यांचा बीमोड करण्यासाठीं इंग्रज सैन्य झांशीवर चालून आले आणि झांशीच्या राणीप्रमाणेंच गोडसे भटजींचीही पळापळ झाली. काल्पी, ग्वाल्हेर, मध्य-हिंदुस्थान, इ० ठिकाणीं त्यानंतर सतत दोन वर्षें गोडसे भटजींची धांवपळ झाली व गांठी मारलेला सर्व पैसा लुटला गेल्यामुळें फक्त गंगेची कावड घेऊन ते घरीं परतले व तेथेंच विरक्त वृत्तीनें राहत असतांना १८८३–८४ च्या सुमारास आपल्या प्रवासाच्या हकीकती त्यांनीं लिहून काढल्या.

◆ ◆ ◆

रामचंद्र भिकाजी गुंजीकर

जन्म ३० एप्रिल १८४३ : मृत्यु १८ जून १९०१

बेळगांव जिल्ह्यांतील जांबोटी येथें गुंजीकरांचा जन्म झाला आणि तेथेंच त्यांचें प्राथमिक शिक्षण झालें. त्यांचे दुय्यम शिक्षण बेळगांव व मुंबई येथील एल्फिन्स्टन विद्यालयांत झालें. महाविद्यालयांतील शिक्षणामध्यें अडचणी आल्यामुळें त्यांनीं एल्फिन्स्टन हायस्कूलमध्येंच नोकरी धरली. ह्या हायस्कूलमध्यें त्यांनीं २० वर्षें नोकरी केली. आणि तेथें नोकरी करीत असतानांच त्यांनीं मराठींतील अव्वल दर्जाचें विविधज्ञानविस्तार हे मासिक १८६७ सालीं सुरू केलें. गुंजीकर त्याचे ७ वर्षें संपादक होते.

विचारसंपन्न, प्रौढ संशोधनपर लेख लिहून त्यांनीं विविधज्ञानविस्तारास फार मोठा दर्जा प्राप्त करून दिला. त्यांची ही संपादकीय कारकीर्द विष्णुशास्त्र्यांच्या निबंधमालेपूर्वीची होती, हें लक्षांत घेतले तर त्यांच्या शुद्ध आणि प्रौढ भाषाशैलीचें महत्त्व विशेषच लक्षांत येतें.

या संग्रहांतील त्यांचा लेख सप्टेंबर–आक्टोबर १८८९ च्या विस्तारांतील आहे.